# गैरसमजांचे निराकरण

**इस्लाम आणि मुस्लिमांविषयी**
**गैरसमजांचे निराकरण**

सय्यद हामिद मोहसिन

**सलाम सेंटर**
शांतता आणि बंधुभावाचा पुरस्कार करते
www.salaamcentre.in

Gair Samajaanche Niraakaran (Marathi)
Facts vs Fictions (English)

Copyright © 2015 SYED HAMID MOHSIN

ISBN: 978-81-928089-5-6

All rights reserved. No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, including photocopy, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the author, except for the situation below which is permitted.

**For Reprinting :** Reprinting or reproducing this book on the condition that absolutely no change, addition, or omission is introduced is permitted free of charge. To make high quality reprints, you may contact the author / Salaam Centre to obtain free copies of the soft copy or printing files of this book.

The Web Site of whis Book:

This e-book is available on the web world wide at:

www.misconceptions.in - www.salaamcentre.in

1st Edition : June 2015 - Quantity : 5000
No. of pages : 272
Price: Rs. 300/-

Printed and Published by:

SALAAM CENTRE
# 65, Ist main, S.R.K. Garden, Jayanagar East, Bangalore - 560 041

Branch #5, Rich homes, Rochmond road, Bangalore - 560 025

Contact: +91 99011 29956 / +91 99451 77477 / 080 - 2663 9007
Email: salaamcentrebangalore@gmail.com

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | आभार | i |
| | प्रस्तावना | iv |
| ✯ | वस्तुस्थिती विरुध्द काल्पनिक गोष्टी | १ |
| ✯ | प्रेम आम्हाला एकजीव करते | ४ |
| ✯ | साचेबंद कल्पनांचे प्रयोजन | ५ |
| ✯ | पक्षपाती इतिहास | ६ |
| ✯ | बहुपत्नित्व | ७ |
| ✯ | पर्सनल लॉ | ९ |
| ✯ | हज सबसिडी | १० |
| ✯ | लोकसंख्येचा राक्षस | ११ |
| ✯ | मुसलमानांचा अनुनय | १३ |
| ✯ | पाकिस्तान आणि भारतीय मुसलमान | १९ |
| ✯ | ७८६ | २० |
| ✯ | चंद्रकोर आणि तारा | २२ |
| ✯ | खोडसाळपणाचा अपप्रचार | २२ |
| ✯ | पाकिस्तानी ध्वज | २३ |
| ✯ | आक्षेपार्ह मांस | २४ |
| ✯ | लव जिहाद | २६ |
| ✯ | जिझिया | ३५ |
| ✯ | हिरवा रंग | ४० |
| ✯ | वंदे मातरम् | ४१ |
| ✯ | तलाक (घटस्फोट) | ४४ |
| ✯ | खुलअ | ४८ |
| ✯ | फतवा | ४९ |
| ✯ | कुफ्र आणि काफिर | ५१ |
| ✯ | मुसलमान मांसाहारी का असतात? | ५३ |
| ✯ | मांसाहार लोकांना हिंसक बनवितो काय? | ५७ |
| ✯ | हलाल आणि हराम (वैध आणि अवैध) | ५८ |

| | | |
|---|---|---|
| ✮ | हलाल | ६० |
| ✮ | हराम | ६१ |
| ✮ | बलात्कार : लैंगिक दहशतवाद | ६३ |
| ✮ | इस्लामी कायद्यात व्यभिचार व बलात्कारात फरक | ६४ |
| ✮ | पाश्चिमात्य धर्मनिरपेक्ष देशांमध्ये बलात्काराची शिक्षा | ६५ |
| ✮ | इस्लामी राज्य आणि मुस्लिम देश यात काही फरक आहे काय? | ६८ |
| ✮ | मुसलमान की मोहम्मडन? | ७१ |
| ✮ | शिया-सुन्नी मतभेद | ७४ |
| ✮ | उर्दू विदेशी भाषा आहे काय? | ७८ |
| ✮ | इस्लाम धर्मात 'धर्मगुरु' पद नाही. | ८० |
| ✮ | मस्जिद | ८१ |
| ✮ | मस्जिदीच्या आतल्या काही विशेष गोष्टी | ८३ |
| ✮ | समस्त भूतल मस्जिद आहे. | ८४ |
| ✮ | अजान (नमाजकरिता बोलावणे) | ८५ |
| ✮ | मुसलमान काबाची पूजा करतात काय? | ८७ |
| ✮ | काळा पाषाण (हजरुल असवद) | ८९ |
| ✮ | मुसलमान 'हजरुल असवद'ची पूजा करतात काय? | ९० |
| ✮ | मुस्लिमेतरांना मक्का जाण्याची अनुमती का नाही? | ९१ |
| ✮ | दरगाहांना भेट देणे | ९३ |
| ✮ | दरगाह आणि मस्जिद यातील फरक | ९४ |
| ✮ | मदरसा शिक्षण | ९७ |
| ✮ | मदरसा आणि मक्तब | १०० |
| ✮ | आजच्या काळात पैगंबर मुहम्मद (स.) यांची सुसंबध्दता | १०१ |
| ✮ | अल्लाह आणि पैगंबरांच्या मूर्त्या का नाहीत? | १०३ |
| ✮ | पैगंबर (स.) यांनी इस्लामचा प्रसार तलवारीच्या जोरावर केला काय? | १०७ |
| ✮ | इस्लाम जोरजबरदस्तीने पसरला काय? | १११ |
| ✮ | इस्लाम आणि पश्चिम | १२१ |
| ✮ | आज आणि ... | १३६ |
| ✮ | ... उद्या | १३७ |
| ✮ | आपले राजकारणी तंत्र जातीयतेच्या विषापासून मुक्त करा | १३८ |

| | | |
|---|---|---|
| ✯ | जिहाद | १४३ |
| ✯ | सर्वोच्च जिहाद | १४५ |
| ✯ | अल्पतर जिहाद | १४६ |
| ✯ | सामाजिक जिहाद | १४८ |
| ✯ | पैगंबर मुहम्मद (स.) यांनी युध्दासंदर्भात काय फर्माविले? | १५२ |
| ✯ | जिहाद शब्द : उपयोग आणि दुरुपयोग | १५४ |
| ✯ | धर्माचा दुरुपयोग | १५९ |
| ✯ | दहशतवाद | १६२ |
| ✯ | इस्लामविरुध्द तिरस्काराचा प्रचार | १६६ |
| ✯ | दहशतवादी कोण आहेत? | १७० |
| ✯ | दहशतवादाविषयी मीडियाची दुटप्पी भाषा | १७४ |
| ✯ | हिंसा, दहशतवाद आणि जातीसंहाराच्या यादीत पाश्चिमात्य सर्वात पुढे | १७७ |
| ✯ | इस्लाम धर्मात आत्मघाती बॉम्बहल्ले प्रतिबंधित आहेत | १८७ |
| ✯ | भविष्यवाणी | १९४ |
| ✯ | इस्लामी रुढीवाद | १९५ |
| ✯ | स्त्रिया | १९७ |
| ✯ | आधुनिक समाजात स्त्रियांचे स्थान | २०२ |
| ✯ | कामवासनेची वेडी धावपळ | २०४ |
| ✯ | स्त्रियांविषयी इस्लामचा दृष्टिकोन | २०६ |
| ✯ | रुपांतरण | २०७ |
| ✯ | इस्लामी कायद्यान्वये स्त्रियांचे हक्क | २०९ |
| ✯ | इस्लाम धर्मात स्त्रियांची कर्तव्ये | २१२ |
| ✯ | इस्लाम धर्मात नुसत्या गृहिणीपेक्षा मातृत्व मोठे | २१४ |
| ✯ | हिजाब किंवा बुरखा | २१७ |
| ✯ | हिजाब : अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी स्त्रियांची पसंती | २१९ |
| ✯ | हिजाब : बुध्दिमानता व सुसंस्कृतपणाचा कळस | २२२ |
| ✯ | मुस्लिम स्त्रियांसंबंधी आजचे काही वादग्रस्त मुद्दे | २२३ |
| ✯ | स्त्रियांचा शिक्षणाचा व वाहन चालविण्याचा हक्क | २२८ |
| ✯ | बहुपत्नित्व आणि एकपत्नित्व | २३० |
| ✯ | बहुपत्नित्व : एक पाश्चिमात्य हत्यार | २३० |

☆ यहूदी धर्मात बहुपत्नित्व २३१
☆ ख्रिश्चन धर्मात बहुपत्नित्व २३३
☆ हिंदू धर्मात बहुपत्नित्व २३४
☆ पाश्चिमात्य समाजात बहुपत्नित्व २३५
☆ इस्लाम धर्मात बहुपत्नित्व २३७
☆ पवित्र पैगंबर आणि त्यांचे कौटुंबिक जीवन २४१
☆ कुरआनाच्या आयती, ज्यांचा चुकीचा अर्थ घेतला गेला आहे २४४
☆ संदर्भ - ग्रंथ २५६

# आभार

आम्ही मोठ्या त्रस्त आणि चिंताक्रांत काळात जगत आहोत. विविध राष्ट्र आणि राज्यांनी मानव जातीची व्यापक अशी विभागणी करुन टाकली आहे. आंतर सामाजिक नाते-संबंध, सातत्याने धार्मिक, जातीय आणि भाषांच्या भावनात्मक संभाव्य धोक्या खाली वावरत आहोत. धर्माचा वापर लोकांना आध्यात्मिक आणि धार्मिक स्नेह-सलोख्याचा दिलासा देण्याऐवजी त्यांना विभागून टाकण्यासाठी केला जातो. ग्राहकता आणि उपभोक्तावाद आणि व्यापारउदीम दोघे एकत्र मिळून लोकांची लूटमार करतात आणि राष्ट्रांच्या नैसर्गिक सम्पत्ती व सुख-शांतीचीही लूट करतात. उपभोक्तावादाची सामर्थ्ये, जी जागतिक शक्तींना युध्दासाठी प्रवृत्त करतात, ही प्रवृत्ती वाढीस लावतात, जेणे करुन शस्त्रउद्योगाची चाके वेगाने फिरत राहावीत अध्ययन-अध्यापनाची शैक्षणिक क्षेत्रे, संशोधन संस्था आणि प्रसारमाध्यमे त्यांचा आराखडा उघड करण्यात मोठी सावधगिरी बाळतात, कारण मोठ्या प्रमाणात ते त्यांच्यावर अवलंबून आहेत. त्यांच्या पाठिंब्याविना नागरी-समाजाचा स्वर कुठेही ऐकायला येत नाही.

मीडियाद्वारे युद्धासाठी निर्मितीचे आधी एक अभियान चालविले जाते आणि नंतर मग युद्धाची सुरूवात होते, हे मान्य केले जावे. मुस्लिम समाजाच्या संदर्भात, साचेबंद कल्पना आणि पूर्वग्रहांच्या माध्यमान्वये लोकांना शत्रुत्वाच्या भावना भडकविण्यास भाग पाडले. त्यामुळे जागतिक पातळीवर विविध समाजांमधील एकोपा संपुष्टात आला आहे. जागतिक चॅनल्सच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात तिरस्काराचे विष ओकले जाते आणि शक्ती-सामर्थ्य बाळगणाऱ्यांकडून युध्दाची आग पेटविली जाते. ‘एक तर तुम्ही आमच्या सोबत आहात किंवा दहशतवाद्यांच्या सोबत आहात’ची शिकवण एखाद्याला गप्प करण्यासाठी वापरली जाते, जो बिचारा अनिर्णित, तटस्थ असतो किंवा परिस्थितीं संदर्भात काही फैसला करण्यास असमर्थ असल्यामुळे केवळ शांत व नि:शब्द असतो.

अनेक वर्षांपासून प्रसार माध्यमांतर्फे नियमितपणे एक प्रचार खूप केला जातो आणि त्या प्रचाराचे लक्ष्य मुस्लिम समाजाला बनविले जाते. ही पक्षपाताची धोरणे, इतिहासाच्या काल्पनिक आणि भ्रान्त कल्पनांच्या आधारावर असल्याचे आढळून येते, तसेच गरीब आणि राजकारणाच्या साधनांचाही वापर केला जातो. तळागाळातल्या दुर्बल आणि दारिद्र्याने गांजलेल्यांची श्रध्दा आणि त्यांची नैतिक मूल्ये कस्पटासमान तुच्छ ठरतात. त्यांच्याविषयी चाकोरीबध्द कल्पनांचे जाळे विणले जाते. जगात जे काही वाईट घडते, जी संकटे कोसळतात त्या सर्वांचे खापर त्यांच्याच शिरावर फोडले जाते. तेच दोषी ठरतात. हास्यास्पद बाब अशी की, जगातल्या महासत्ता असणाऱ्या शक्तींच्या दहशतवादाला आणि आर्थिक अधाशीपणाला बळी पडणारे स्वत:च या दहशतवादाचे आरोपी धरले जातात. जिहादसारख्या संकल्पनांचा 'निरपराधांविरुध्द पुकारलेले युध्द' असा चुकीचा अर्थ सांगितला जातो.

यात मुळीच शंका नाही की, तो कोण आहे जो तेलाच्या विहीरींवर आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर नजर ठेवून आहे. अशा खेळीच्या माध्यमातून हे पाहण्याची आणि स्पष्ट अशा असत्यांची चिरफाड करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. एकमेकांच्या श्रध्देला सकारात्मक आकलनाने जाणून घेण्याच्या भूमिकेला प्रगत करण्याचा प्रयत्न लोकांना एकत्र आणण्याच्या प्रशस्त आणि प्रदीर्घ मार्गावर नेईल. तसेच एकमेकांच्या शक्ति-सामर्थ्याचा लाभ सर्वांनाच होईल.

विभिन्न समाजांदरम्यान गैरसमज, वैरभावना अधिक मजबूत करण्याचे महद्कार्य पाश्चिमात्यांनी केले आहे. दहशतीवर आधारित तथाकथित युध्द, मध्य-पूर्वेत दशलक्षाहून अधिक झालेल्या मृत्युंपेक्षा अधिक जबाबदार आहे, जे संस्कृतीचा संघर्ष आणि गौरवर्णीय सर्वश्रेष्ठत्वाची महानतासारख्या प्रोत्साहित करणाऱ्या सिध्दान्तामध्ये रुजले आहे. जास्त पूर्वीची गोष्ट नाही. द्विराष्ट्र सिध्दान्तावर उपखंडासाठीही नेमके हेच केले. विचार आणि कल्पनांच्या पातळीविरुध्द याची गरज भासली. जर लोकांना एकमेकांच्या निकट आणले गेले आणि शांती-सद्भावपूर्वक राहण्यास तयार केले गेले, तर प्रगतीत सहभागी असलेल्या प्रत्येकाला तात्त्विक पातळीवर, पक्षपात आणि कमालीच्या भीतीद्वारे लढण्यास भाग पाडले गेले. हे सर्व समाजांच्या लोकांद्वारे जीवनस्तर व गुणवत्ता सुधारण्यासाठी सामाजिक कृतीच्या स्वरुपात समुदायांना खोलवर भेदून जाईल. सामाजिक राजकारण

आणि दहशतवादी राजकारणा मागे दडलेल्या सत्याविषयी जनजागृती करण्यासाठी आमच्या समाजाच्या विस्तृत थराप्रत जाण्याची आवश्यकता आहे.

आमच्यापैकी काहीजण काही वर्षांपासून हेच करीत आले आहेत. उपयुक्ततेच्या दृष्टीने हे करणे गरजेचे आहे. याचा लाभ आमच्यापैकी अधिकांना होईल. कार्यकर्ते, शिक्षक, अध्यापक आणि संबंधित असलेली प्रत्येक व्यक्ती. या निर्णायक स्वरुपाच्या कार्यास पुढे नेण्याच्या मदतीसाठी आम्ही हे पुस्तक 'इस्लाम : समज - गैरसमज आणि त्यांचे निराकरण' आपणासमोर आणले आहे. मी मनापूर्वक त्या लेखकांचा आभारी आहे, ज्यांच्या पुस्तकांचा मला आपल्या या पुस्तकाच्या लेखनकार्यात मोठा लाभ झाला. त्यापैकी सर्वात प्रथम मी, मिस्टर ग्राहम ई. फूलर यांचे आभार मानतो. जे एक अनुभवी, मातब्बर राजकारण शास्त्रज्ञ आणि अमेरिकेच्या सी.आय.ए. स्थित 'नॅशनल इन्टेलिजन्स कौन्सिल'चे माजी व्हाईस चेअरमन राहिले आहेत. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आणि 'प्रेस कौन्सिल ऑफ इन्डिया'चे चेअरपर्सन असलेले श्री. मार्कंडेय काटजू यांचे लिखाण, जॉर्ज टाऊन युनिवर्सिटीच्या 'इन्टरनॅशनल अफेअर्स अँड इस्लामिक स्टडीज' विभागात प्राध्यापक असलेले मिस्टर जॉन लुईस, भारतीय इस्लामिक स्कॉलर डॉ. रफीक झकरिया आणि बंगलोर येथे वास्तव्यास असणारे जेष्ठ पत्रकार मकबूल अहमद सिराज, जे 'बी.बी.सी. वर्ल्ड सर्व्हिस'सहित अनेकविध मीडिया संघटनांसाठी काम करतात यांचा खास उल्लेख करतो.

या पुस्तकाच्या लेखनामागे मी कोणताही व्यापारविषयक नफा प्राप्त करण्याचा उद्देश बाळगलेला नाही. तशी माझी अपेक्षाही नाही.

प्राथमिक हस्तलिखित, त्याची गुणवत्ता तपासून पाहण्याचे काम डॉ. यू. आर. अनंतमूर्ती यांच्यासारख्या तज्ञांनी केले. डॉ. अनंतमूर्ती यांचा 'मॅन बूकर अॅवार्ड'साठी नामनिर्देश केला गेला आणि भारत सरकारकडून पद्मभूषण अॅवार्डने गौरविले गेले. ते ज्ञानपीठचे लाभार्थीही आहेत. प्रा. बी. शेख अली, मंगलोर आणि गोवा युनिवर्सिटीजचे माजी वॉइस चान्सलर, डॉ. चंद्रशेखर कांबार ज्ञानपीठ अॅवार्डचे लाभार्थी, भारतातील सर्वोच्च साहित्यिक सन्मान, तसेच हंपी येथील कन्नड युनिवर्सिटीचे संस्थापक कुलगुरु श्री. बिपिन गोपालकृष्ण - डेप्युटी डायरेक्टर जनरल ऑफ कर्नाटक पोलीस (कायदा आणि सुव्यवस्था). मिस्टर अब्दुल रहमान कमरुद्दीन, माजी सल्लागार

युनेस्को, युनिडो आणि आय डी बी, मिस्टर मुहम्मद सनाउल्ला आय ए एस, मुख्य सचीव कर्नाटका शासन आणि मिस्टर यू. निसार अहमद आय पी एस इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस कर्नाटक या सर्वांचा ही आभारी आहे.

या लेखनकार्याच्या दुरुस्तीसाठी या सर्वांचे सल्ले मला मोठे मौल्यवान ठरले. ईश्वर त्यांच्यावर कृपा करो आणि हे कार्य तडीस नेण्यात त्यांच्या प्रयत्नांना स्वीकार करो. आमीन.

मी मकबूल अहमद सिराज- पत्रकार बी.बी.सी. वर्ल्ड सर्विस आणि मिस्टर सय्यद तन्वीर अहमद - मुख्य संपादक www.karnatakamuslims.com यांनी सतत दिलेली साथ आणि पाठबळ यासाठी त्यांचा खूप आभारी आणि कृतज्ञ आहे.

मी मुहम्मद नोमान खान यांचाही आभारी आहे. निश्चितच या कार्याला मूर्तस्वरुप देण्यात त्यांनी मोठ्या उत्साहाने, विश्वासूपणाने आणि विनयशीलतेने मोलाचे सहकार्य केले.

मी माझ्या कुटुंबातील सदस्यांचा, माझ्या भावा-बहिणींचाही आभारी आहे, मी माझी पत्नी शबाना फिर्दोस आणि कन्या सय्यदा सुफिया यांचाही कृतज्ञ आहे, ज्यांना या कामात व्यस्त असताना, काही निर्णायक प्रसंगी माझी सोबत, संगत लाभली नाही. एवढेच नव्हे तर, मी आपली आई अस्मा सारा हिचा अत्याधिक कृतज्ञ आहे हे आवर्जून सांगतो, जी माझ्या या खास कार्यास्तव सातत्याने प्रेरणास्त्रोत राहिली आहे. या तिच्या दुआ - प्रार्थना आणि दयापूर्ण शब्द होत, ज्यांनी मला पुढे जाण्यास पाठबळ दिले. आणि या सर्वांहून सर्वशक्तिमान अल्लाहची ती दया कृपा होती, जिने मला आवश्यक ती साधनसामग्री पुरविली. नवीन वेगळे साहस करण्याचा अंतर्यामी प्रचंड उत्साह दिला. नि:संशय त्याच्या कृपेविना हे खास कार्य न पूर्ण झाले असते न फलदायी ठरले असते. मी त्याच्याजवळ दुआ-प्रार्थना करतो की समस्त मानवजातीत शांती आणि प्रेमाचा संदेश पसरविण्याच्या मार्गात मला मार्गदर्शन करावे. आमीन.

बेंगळूरु **सय्यद हामिद मोहसिन**

दि. January 2014

# प्रस्तावना

ज्या जगात आम्ही राहतो, ते आकसून आज जागतिक खेडे बनले आहे. आभार आहेत त्या उपाय योजनेचे, जिच्याद्वारे आम्ही एकमेकांशी वार्तालाप करु शकतो, संपर्क साधू शकतो. नव्या प्रसारमाध्यमांनी भौतिक सीमा आखल्या आहेत. फक्त जर लोकांनी आणि राष्ट्रांनी त्यांना दृष्टीआड करायचे ठरवले तर. माहिती-क्रांतीने आम्हा सर्वांसाठी हे शक्य केले आहे की विभिन्न स्थळांचे रहिवाशी, किंबहुना युध्दग्रस्त देशाचे रहिवाशी म्हणून असण्यापेक्षा आम्ही स्वत:ला एक जागतिक खेड्याचे नागरिक म्हणून पाहावे. तथापि ठामपणे अलग ओळख राखण्यापेक्षा सामान्य मूल्ये उराशी बाळगण्याची, त्यांची काळजी घेण्याची तीव्र इच्छा आमच्यात असते. जगातील लोकांसमोर दोनच पर्याय आहेत, ते म्हणजे वेगवेगळे भाग असणाऱ्या भव्य सांस्कृतिक इमारतीच्या रंगबिरंगी कच्चीकारीच्या नक्षीदार जाड कापडाच्या स्वरुपात अस्तित्वात राहणे किंवा एकमेकांशी युध्द करण्याच्या तयारीत असलेल्या राष्ट्रांच्या भल्यामोठ्या कढईत धुमसत राहणे.

हे जग दोन विश्वयुध्दांना साक्षी राहिले आहे, प्रदीर्घ शीतयुध्द आणि आमच्या मागे शतकाच्या अंतराने घडलेले तथाकथित दहशतविरोधी युध्द काय त्या सर्वांनी जगाला अधिक राहण्या योग्य, भरभराटीचे, यशस्वी आणि सर्वतोपरि शांतीपूर्ण बनविले? बहुतेकजण माझ्याशी सहमत होतील की शांती, प्रयोगात आणली जाण्यापेक्षा आणि महत्त्वाच्या भागापेक्षा शब्दावडंबराच्या व्यवसायापेक्षा आज अवर्णनीय आहे. अधिकांश युध्दे लोकशाहींद्वारे चालू केली गेलीत, ज्या लोकशाहींना शस्त्रास्त्र निर्मात्यांच्या लॉबीने ओलीस धरुन ठेवले आहे. दहशतीविरूद्ध युध्दाचा जनसमूहांना भयकंपित करुन आणि राज्या मागून राज्याची नासधूस करुन अखेर झाला आहे, यापेक्षा की एखाद्याला न्याय मिळवून दिला गेला असता, ज्याने या

सर्वांचा नकार दर्शविला. दुरावलेल्या मनांना जोडण्यापेक्षा मीडियाने मनांच्या दरम्यान भिंती उंचावण्याची कामगिरी जास्त पार पाडली. जन्मजात चांगली कला असणाऱ्यांचा विकास, त्यांची भरभराट त्यांच्या साधनसंपत्ती आणि कौशल्यासह खंडित केली गेली. दुर्दैवाने हेच ते लोक होत जे सातत्याने शांती-सुबत्तेचे वैरी बनून विध्वंस करीत राहिलेत.

यास्तव आम्हा सर्वांना हा प्रश्न पडलाय की जागतिक शांती-सुबत्तेची हमी काय? इतरांना नेस्तनाबूत करणे आणि अत्याधिक भय- दहशतीची निर्मिती करणे हा खात्रीने शांतिमार्ग नव्हे. तिरस्काराने फक्त तिरस्कारच उत्पन्न होईल. वांशिक, धार्मिक, सामाजिक आणि जातीजातीतील भेदभाव आपल्या ठायी सदैव टिकून आहे. त्यात ते आपल्या अस्तित्वासाठी फक्त स्वाद आणि रंगाची भर घालतात आणि औदासिन्यतेच्या मानवतेला सोडून देतात.

मानवजातीमधल्या विभाजनांचे, मतभेदांचे, संघर्षांचे आणि ताणतणावांचे ते पायाभूत भाग होणार नाहीत. घृणा, तिरस्कार असहनशीलता आणि दूषित पूर्वग्रह इ. आमच्या विभक्तपणावर अधिकार गाजवणाऱ्या गोष्टींपेक्षा, दया, स्नेह, प्रेम, संयम आणि सहनशीलता इ.चा घट्ट द्रव आम्हाला बांधून ठेवील. जगाच्या मर्यादित साधनसंपत्तीसाठी, हेवा, असूया, स्पर्धा-चुरस चढाओढ इ. गोष्टींपेक्षा न्याय समता, समानता यांचे ध्येय भविष्याकडे वाटचाल करण्यास अधिक प्रेरक आणि मार्गदर्शक ठरेल. भरभराटीपेक्षा संतोष-समाधान, मक्तेदारीपेक्षा सहभागित्व आणि साधनसंपत्तीच्या भक्षणापेक्षा तिचे संरक्षण आमच्या पुढे जाण्याच्या मार्गाला प्रकाशमान करील.

हे जग अशा लोकांच्या हाती सुरक्षित आहे जे आनंदाने विविधता साजरी करतात, जे परकेपणाचा आदर-सन्मान करतात आणि एकमेकांची काळजी घेतात. परस्परांच्या सुखा-दु:खात सहभागी होतात. अशा लोकांचे भविष्य उज्वल नाही जे पूर्वग्रहांना वाढीस लावण्यात मनसोक्त आनंद लुटतात, तिरस्काराची विक्री करतात आणि जगावर वर्चस्व मिळविण्याच्या लालसेच्या अधीन जातात.

संयम, सहनशीलता, सहअस्तित्व आणि सहजीवन ही

भारतीयत्वाची प्रमुख लक्षणे आजवर राहिली आहेत. ही भूमी जिला आपण 'भारतवर्ष' म्हणून संबोधितो, सहस्त्रावधी वर्षांपासून विविधतेचे मूर्त स्वरुप राहिले आहे. आम्ही आपल्या घटना (संविधान) कर्त्यापूर्वजांचा द्रष्टेपणा डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे, ज्यांनी असा दस्तऐवज लिहून ठेवला आहे, जो सर्वांसाठी न्याय आणि समानतेची हमी देतो. तथापि लोकांच्या ऐतिहासिक वैविध्याशी जुळते घेण्याच्या अटीवर आमचे हात अशा लोकांना मानवंदना देण्यासाठी उंचावतात, ज्यांना सामाजिक आधारावर झालेल्या विभाजनाचा मानसिक आघात बसला. ज्यांनी मार्गदर्शक तत्त्वांचा चार्टर आम्हाला दिला, जेणेकरून आम्ही सुसंघटित राज्यसंस्थेला कधीही दूषित न करता आपल्या ओळखींची काळजी घ्यावी. तरीही आमची स्वप्ने काही शक्तींमार्फत बिघडवली जातात, ज्या दुष्टपणे काही समाजांचा विध्वंस करून दशकानुदशके हेच दुष्कर्म करीत आल्या आहेत. याची अनुमती मुळीच दिली जाऊ नये.

मनातला तिरस्कार उंच उंच भिंती उभ्या करतो, परिणामस्वरुपी रस्त्यारस्त्यावर लढाया होतात. फक्त लहानसहान अवरोधांच्या वीजेची प्रतीक्षा आहे. विदारक निष्पत्तीसह राष्ट्रमुखावर राग उफाळून येण्याची केवळ आमच्या स्वत:च्या संकटासाठी आम्हाला हे परवडू शकते. ती सामर्थ्ये जी मुस्लिमविरोधी अकारण नावडतेपणाला, पूर्वग्रहाला वाढीस लावतात, ते आमच्या लोकसंख्येच्या जास्तीतजास्त १३ टक्के आहेत. निश्चितच ते देशाचे शुभचिंतक नाहीत. आमचे प्रारब्ध सर्वसमावेशक भारतीय समाजात पहुडते. बहिष्कृतीचा आरंभ मन:पटलावर होतो आणि सुसंघटित राज्यसंस्थेवर, सभ्यतेवर तिच्या सावल्या लांबवर पसरत जातात. भूतकाळात आम्हाला आकस्मिक संकटांच्या क्षणांना तोंड द्यावे लागले. यास्तव सुजाणता हीच की पूर्वग्रह अकारण नावडतेपणाने कळीला उमलण्यापूर्वीच खुडून टाकले आहे, आणि त्यास इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात प्रवेश करण्यास अनुमती नाही. किंबहुना साहित्य, पत्रकारिता, मीडिया आणि राजकारणविषयक संभाषण व सविस्तर भाषणाच्या क्षेत्रातही मज्जाव आहे.

अगदी अलीकडच्या भूतकाळात, मुसलमानांविषयी,

जनसामान्यांच्या संभाषणात अकारण शंकाकुशंका फार मोठ्या प्रमाणात प्रबळ झाल्या. मान्यवर हामिद मोहसिन, संस्थापक व चेअरमन- सलाम सेन्टर यांनी अगदी काळजीपूर्वक व कसून त्या सर्व शंका-कुशंका व गैरसमजुतींना या खंडात एकत्रित केले आणि मनोरचित असत्य कथनांना वास्तव आणि सत्य गोष्टींच्या विरोधात शेजारी ठेवले. सत्य आणि वस्तुस्थितीला लबाडीने झाकलेल्या पडद्याला फाडून सत्य अनावृत्त करण्याचे कार्य त्यांनी मोठ्या मेहनतीने, चिकाटीने दीर्घकाळापासून केले. ते सत्य उघडकीस आणले, जे खोट्या व निराधार बातम्यांद्वारे अपप्रचार करणाऱ्यांनी जिहादला दहशतवादासमान ठरविले.

मुसलमानांवर टीका करण्याबाबतही हे पुस्तक कठोर आहे, जे इस्लामचे श्रेष्ठत्व आणि वर्चस्व दर्शविण्यात उतावळेपणा करतात आणि परकेपणाने समाजाचे मुख्य प्रवाहाशी असलेले नाते तोडून टाकतात, मग उजव्या कट्टरवाद्यांच्या हातातले खेळणे बनतात. हा आत्मचिकित्सक पैलू या पुस्तकाच्या शुध्दतेची व उत्तमतेची छाप आहे. 'इस्लाम : समज - गैरसमज आणि त्यांचे निराकरण' हे पुस्तक समस्त भारतीय लोकांनी सर्व प्रकारच्या भयगंडातून स्वत:ला सोडविण्यासाठी आणि आपण स्पष्टत: एका वेगळ्या समाजाचे आहोत या अहंकारी समजुतीपासून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी वाचले पाहिजे अशी मी शिफारस करतो.

अखेरीस आम्ही सर्व भारतीय आहोत याहून जास्त काही नाही, कमीही नाही आणि आमचे नशीब एकमेकांसोबत सामंजस्याने प्रवास करण्यात आणि आपल्या बरोबरीच्या लोकांशी सामाजिक जीवनात सहभागी होण्यात दडले आहे. अन्यथा आम्ही बुडून जाऊ. आमच्या खाणाखुणाही राहणार नाहीत.

बेंगळूरु **प्रा. उ. र. अनंतमूर्ती**

दि. Feb 15, 2013

# वस्तुस्थिती विरूद्ध काल्पनिक गोष्टी

## अवास्तव आणि वास्तविकता

आम्ही अशा काळात जीवन जगत आहोत, ज्यात लोक, व्यक्ती, राष्ट्र आणि धर्मांच्या दरम्यान असलेली समीकरणे सातत्याने बदलत आहेत आणि याचा जनसामान्यांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव पडतो. हा काळ, आम्ही सर्वांना हे आवाहन करतो की आम्ही स्वत:ला आणि आपल्या आचरणशैलीला बदलावे आणि श्रध्दा, नियम व पध्दतींवर वारंवार साचणारी धूळ-माती झटकत राहावे.

इस्लाम भारत भूमीवर १००० वर्षांपेक्षा अधिक काळापासून अस्तित्वात आहे, तरीही आज यावर अनेक प्रश्नचिन्हें लावली जात आहेत. या खंडप्राय देशात हिंदू आणि मुसलमान जमलेल्या बर्फासारखे राहिले नाहीत. त्यांनी एकाच भूमीवर भागीदारी केली आहे आणि गंगा व सिंधसारख्या पवित्र नद्यांचे पाणी दोघांनीही प्यायले आहे. तसेच कला, हस्तकला, सभ्यता व संस्कृती, रीती-रिवाजामध्ये एकमेकांशी स्नेहसंबंध राखले आहेत. असे असतानाही प्रसारमाध्यमे, फुटिरवादी राजकारण आणि उपखंडातील राष्ट्रांच्या रणनीतीविषयक हितांच्या भिन्नतेमुळे हिंदू आणि मुसलमान यांच्या दरम्यान असलेल्या संबंधांवर शंका-संशयांचे सावट पसरले आहे. शेजाऱ्यांमधले अंतर वाढले आहे आणि अगदी सामान्य लोक साधारण घडामोडींचे उलटसुलट राजनैतिक अर्थ काढतात. वास्तविक याच सामान्य लोकांनी यापूर्वी कधीही एकमेकांवर भिवया चढवल्या नाहीत.

अरबस्थानच्या वाळवंटात आपल्या उदयाची शंभर वर्षे पूर्ण होण्याच्या आतच इस्लामने सिंधचा दरवाजा ठोठावला, तथापि दिल्लीत पहिले मुस्लिम साम्राज्य इ. सन ११९१ नंतरच प्रस्थापित झाले. ज्या वेळी

भारताच्या अंतर्गत व्यवहारांच्या प्रशासनाला ब्रिटीश साम्राज्यवादी शक्तींनी सुरुवात केली, त्याच्या फार पूर्वी मुस्लिम सूफी-संतांच्या समुदायांनी सर्व धर्मांच्या लोकांमध्ये आध्यात्मिकता, स्नेह, शांती आणि उजेड पसरविण्या-करिता खानकाह (आश्रमां) ची स्थापना केली.

सूफी-संतांच्या एका लांब शृंखलेने उपखंडात शांती, प्रेम आणि सद्‌भावनेचा संदेश पसरविला आणि या भूमीच्या समस्त धर्मांच्या सहस्त्रावधी लोकांचे स्नेह, प्रेम, आदर आणि श्रध्दा प्राप्त केली.

हिंदू आणि इस्लामी संस्कृती, भाषा आणि वास्तुकला, भारतीय संगीत, कव्वाली, गजल, उर्दू-मोगलाई पाककला, चित्रकला, शीख धर्म, कबीर पंथ, आर्य समाज आणि या प्रकारचे इतर सामायिक कल याच मिलाफाचे फलित होते.

राजघराणी येत राहिलीत आणि जात राहिलीत. सातत्याच्या युध्दांमुळे देशांच्या सीमा बदलत राहिल्या तदनुषंगाने राजकीय बदल नवनवीन समीकरण बनवित राहिले. विकसित होणारी आंदोलने आणि राजवंशांच्या ऱ्हासाचे उत्तराधिकार, या संबंधांवर आपला वेगळा प्रभाव सोडत राहिले. मोगल साम्राज्याचा सूर्य इ. सन १८५७ मध्ये अस्त पावला आणि इंग्रज या भूमीचे नवे मालक बनले. खूप लांब अंतरावरून राज्य कारभार करणाऱ्या या वसाहतवादी साम्राज्याकरिता अशा वारसाची आवश्यकता होती, ज्यात भारतीय जनजातींमध्ये एकात्मता वाढविणाऱ्या परंपरांऐवजी त्यांना विभक्त करण्याचे सामर्थ्य असावे. एक अशी शिक्षण व्यवस्था लागू केली गेली, जी त्यांच्या शासन-व्यवस्थेकरिता कारकुनांची गरज भागविणारी आणि जनसामान्यांमध्ये अलगाव निर्माण करणारी ठरली. ज्या लोकांनी कधी धर्माच्या आधारावर तिरस्कार पाहिला नव्हता ते एकमेकांचा 'आम्ही विरुध्द ते' या शब्दांत उल्लेख करू लागले.

शैक्षणिक मागासलेपण आणि स्थानिक भाषांमध्ये लिहिण्या-वाचण्याचे आणि बोलण्याचे नैपुण्य नसल्यामुळे आज मुसलमान आपल्या देशबांधवांसमोर आपले मनोगत व्यक्त करण्यात असमर्थ आहेत. ज्यामुळे त्यांची प्रतिमा डागाळली जात आहे. त्यांच्याविषयी सहजगत्या कल्पित गोष्टी

रचल्या जातात आणि यशस्वीपणे त्यांचा प्रसारही केला जातो. ‘ध’चा ‘मा’ करून सादर केलेला इतिहास अजाण व निर्दोष नागरिकांच्या मन-मस्तिष्काला विषारी बनवित आहे. त्यांच्यात असलेल्या उणीवा मीठ-मसाला लावून पसरविल्या जातात आणि त्यांच्यातल्या गुणवैशिष्ट्यांना मात्र अल्प स्वल्प करून सादर केले जाते. अथवा सोयिस्करपणे डोळेझाक केली जाते. सामान्य लोकांमधील विचारांच्या देवाण-घेवाणाचे माध्यम हिरावून घेतले गेले आहे, यास्तव त्यांच्या दरम्यान वैचारिक समन्वय साधणाऱ्या माध्यमांना बहाल करण्याची गरज आहे. अन्यथा चुकीची माहिती आणि गैरसमजूतींच्या अंधकारात भटकत राहिल्याने संकटाचे स्वरुप अधिक बिकट होईल.

# प्रेम आम्हाला एकजीव करते

सशस्त्र, लढाऊ वृत्तीच्या आणि गुन्हेगारांच्या माध्यमान्वये भारताच्या धार्मिक तणावाला आपल्या कट-कारस्थानांनी मनाला वाटेल तसे वळण दिले जाते आणि राजकारणी लोक आपल्या अंगी असलेल्या कौशल्याने याला या मर्यादेप्रत वाढवितात की भारताच्या धार्मिक भावना शोषणाचं साधन बनतात, परिणामी भारतातल्या हिंदू आणि मुस्लिम यांच्या दरम्यान हाच तणाव आपसातील अंतर वाढविण्यास कारक ठरतो.

भारतातील एक बुजूर्ग राजकीय नेता म्हणतात, भारतात नेहमी ही प्रवृत्ती आढळून येते की मुसलमानांना 'आमचे' म्हणण्याऐवजी 'ते' म्हटले जाते आणि या प्रवृत्तीचे भयंकर परिणाम दिसून येत आहेत. आजदेखील मुसलमानांना अधिकांशरीत्या त्या प्रवाहापासून वेगळे ठेवले गेले आहे, ज्याला आम्ही राष्ट्रीय मुख्य प्रवाह म्हणतो.

आपसातील विश्वासाच्या कमतरतेमुळे सांप्रदायिकतेला पोषण मिळते आणि अशाने मनोरचित कथनांना, अर्धवट सत्य व असत्य गोष्टींना पाठबळ लाभते. विविध सांप्रदायिक शक्ती अशा प्रत्येक गोष्टीचा आपल्या फायद्यासाठी वापर करतात, ज्या तिरस्काराला वाढवून धार्मिक भावनांना प्रक्षोभित करतात. अकारण इतरांविरुध्द तिरस्काराची आग भडकवितात आणि लोकांच्या मनात अनाठायी गर्व निर्माण करतात. दुसऱ्यांची थट्टा उडविणे, त्यांचा अवमान करणे आणि स्वत:ला, आपल्या शक्ती-सामर्थ्याला आणि आपल्या महत्तेला खूप वाढवून सादर करणे हा त्याचा आवडता छंद असतो. या हेतुस्तव ओढून ताणून, विपर्यास करून सादर केलेला इतिहास, इतरांची प्रतिमा विकृत करण्याचा खटाटोप आणि सामजंस्याचा वापर न करण्याची सवय वाढीस लावणे यासारखी साधने आचरणात आहेत.

भारतात २०० दशलक्षांहून अधिक मुसलमान टीका, नापसंती आणि अपमानजनक आंदोलनाचे लक्ष्य बनविले जातात. सुमारे सगळ्याच पंथ-संप्रदायांची हीच मनोवृत्ती आहे ज्यामुळे सांप्रदायिक स्पर्धा वाढीस लागते, हिंसेचा उद्रेक करण्यासाठी एखादी क्षुल्लक घटनाही त्यांना पुरेशी ठरते. आम्ही धर्मनिरपेक्ष आणि विविधतापूर्ण लोकशाहीचे नागरिक या नात्याने फार कमी वागतो, जिथे धर्म आम्हाला बंधुभाव, स्नेह, प्रेम आणि परस्पर आदर-सन्मानाच्या बंधनात बांधण्यासाठी एक सकारात्मक शक्तीची भूमिका पार पाडत असावा. असे प्रश्न की हे कोणी व का केले, इतके स्पष्ट असतात की त्यांच्या उत्तराची गरज भासत नाही, तथापि वस्तुस्थिती अशी की आधीच जेवढी चिखलफेक केली गेली आहे आणि चिखल जितका साचला गेला आहे, त्याला खूप जास्त रगडून साफ करण्याची गरज आहे.

हे त्याच वेळी शक्य आहे, जेव्हा भारतातील दोन मुख्य जनजातींच्या दरम्यान संभाषणाचा, विचारविनिमयाचा मार्ग मोकळा केला जाईल आणि ते परस्परांना सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न करतील. त्यांनी एकमेकांच्या धर्मांना समजून घेतले पाहिजे, त्यांचा आदर राखला पाहिजे, तसेच सांप्रदायिक सद्भावना आणि आपसात बंधुभाव निर्माण केला पाहिजे. तिरस्कार आम्हाला विभाजित करतो आणि प्रेम एकसूत्र करते. मैत्री वाढविण्यासाठी आम्ही हेच ध्येय-उद्दिष्ट अंगीकारले पाहिजे आणि स्वकीयांच्या सर्वांगीण विकासाकरिता एकजुटीने काम केले पाहिजे.

## साचेबंद कल्पनांचे प्रचलन

समाजात मुसलमानांची प्रतिमा आणि त्यांच्या वृत्तीविषयी अनेक भ्रामक व चुकीच्या कल्पना आढळून येतात. उदाहरणार्थ, सामान्य व्यक्तीच्या माहितीनुसार मुस्लिम पर्सनल लॉ, चार विवाह करण्याची सुविधा देण्यासाठी आणि नकोशा पत्नीला घटस्फोट देण्याची सुविधा करून देतो. तसेच साधारणतः मुस्लिम कुटुंबनियोजन पसंत करत नसल्याने लोकसंख्येत विलक्षण वाढीचा आरोप सहजगत्या हाती लागतो. या संदर्भात म्हटले जाते की

ही अवाढव्य वाढ लवकरच बहुसंख्यकांना अल्पसंख्यक बनवून टाकील. इतिहासात केल्या गेलेल्या ओढाताणीने आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. उदाहरणार्थ, मुसलमानांची संख्या वाढविण्याकरिता जबरदस्तीपूर्वक धर्मांतराचा खोटा आरोप, मंदिरांना उद्‌ध्वस्त करणे आणि त्या जागी मस्जिद उभारणे, मूर्ती भंग करणे वगैरे पसरविल्या गेलेल्या भ्रामक कल्पना मुसलमानांना एका खलनायकाच्या स्वरुपात प्रस्तुत करतात आणि या आधारे जरी सूड घेण्याची मागणी केली जात नसली तरी निदान सूड घेण्यायोग्य अवश्य ठरविले जाते. हे मनोरचित की मुसलमान एकत्रपणे एखाद्या पार्टीला मत देतात आणि मुस्लिम संघटनांचे, निवडणुकीच्या मैदानात वेगवेगळे होऊन उतरण्यास अल्पसंख्याकांच्या राजकारणी रणनीतीच्या स्वरुपात पाहिले जाते. जेव्हा काही राजकीय पक्ष, पैगंबरांच्या जयंतीला राष्ट्रीय सुटी घोषित करण्याचा निवडणुकीचा डाव खेळतात किंवा मुसलमानांची अवस्था सुधारण्याकरिता एखादे पाऊल उचलतात तेव्हा याला अनुनय, मनधरणी आणि अल्पसंख्यांकवाद अशी नावें दिली जातात आणि मग मना-मनातले अंतर वाढविण्यासाठी व संघर्षाचा उद्रेक करण्यासाठी अपेक्षित व्यासपीठ तयार होते.

## पक्षपाती इतिहास

हिंदू आणि मुसलमानांच्या दरम्यानचे अंतर अधिक वाढविण्याकरिता आणि स्वत:चा राजकीय स्वार्थ साधून घेण्याकरिता औरंगजेब आणि टीपू सुलतानसारख्या ऐतिहासिक व्यक्तींची प्रतिमा पक्षपातीपणे सादर केली जाते. उदाहरणार्थ, औरंगजेबतर्फे बनारस येथील मंदिर उद्‌ध्वस्त केले जाण्याची घटना बुद्धीपुरस्सररीत्या प्रचारात आणली जाते. परंतु औरंगजेबद्वारे गोवळकुंडाची जामा मस्जिद उद्‌ध्वस्त करण्याच्या घटनेचा चुकूनही उल्लेख केला जात नाही. ही मस्जिद या कारणास्तव पाडली गेली की कुतुबशाही राजा अबुल हसन तानाशाहतर्फे या मस्जिदीचा परिसर आपल्या चुकीच्या मार्गाने जमविलेल्या धन-संपत्तीला ठेवण्याकरिता वापरला जात होता. या दोन्ही

घटनांमध्ये देवस्थानांचा वापर चुकीचा होत असल्याचे औरंगजेबला आढळून आले होते. दुसऱ्या बाजूला काही मुस्लिम इतिहास कारांनी औरंगजेबाच्या कार्यांचा उल्लेख पवित्र शब्दांनी आणि स्तुती-प्रशंसेसह केला आहे, जो अनुचित व अनाठायी आहे. कारण या बादशहाने आपल्या आजारी पिता शाहजहानला सुमारे सतरा वर्षे कैदेत ठेवले आणि आपल्या तीन भावांची निर्दयपणे हत्या केली. वस्तुस्थितीच्या आधारावर पाहिल्यास त्याचे प्रत्येक पाऊल केवळ आपली सत्ता टिकवून ठेवण्याच्या रणनीतीच्या स्वरुपात उचलले गेले होते. त्याच्या या कृत्यांचा मतितार्थ न याहून जास्त होता, न याहून कमी. त्याला न उत्तम स्वरुपात सादर करण्याची गरज आहे आणि न त्याची पात्रता कमी करण्याची गरज आहे.

## बहुपत्नित्व

मुसलमानांमध्ये बहुपत्नित्व प्रचलित असण्याची अवास्तव धारणादेखील लोकांच्या मनात रुजलेली आहे. बहुपत्नित्व आणि लोकसंख्या वाढ यातला संबंध अगदी साधारणरीत्या विकृत करून आमच्या मनात ठसविला गेला आहे. सर्वसाधारणपणे जन्मास येणाऱ्या बालकांची संख्या, जन्म देण्याच्या वयोगटात अस्तित्वात असलेल्या स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून असते आणि जन्मसंख्या याच वयोगटापर्यंत मर्यादित राहते. प्रथम तर ही गोष्ट अनाकलनीय आहे की, एखादा मनुष्य एक किंवा त्याहून अधिक पत्नी राखतो, कारण जन्मास येणाऱ्या बालकांची एकूण संख्या स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून आहे, जी बहुपत्नित्वाने प्रभावित होत नाही. जर बालकांची संख्या प्रभावित होते तर ती त्या संख्येपेक्षा अधिक असते, जी कन्या भ्रूणहत्येची सामाजिक कुप्रथा आणि वधूला, तिच्या माता-पित्याकडून जास्तीतजास्त हुंडा उकळण्यासाठी जाळून मारण्याने होते.

दुसरे असे की समाजात स्त्रिया आणि पुरुषांच्या संख्येचे जे प्रमाण आहे, ते मुस्लिम पुरुषांना चार पत्नी करण्याची सवलत त्या वेळेपर्यंत देऊ शकत नाही जोपर्यंत तीन चतुर्थांश पुरुष अविवाहित नसतील. इ. सन १९८१

च्या जनगणनेनुसार स्त्री-पुरुष प्रमाण मुस्लिमांसाठी १.०६८ आणि हिंदूंसाठी १.०७२ होते. या अनुषंगाने दर १००० मुस्लिम स्त्रियांवर १०६८ मुस्लिम पुरुष होतात. ही आकडेवारी लक्षात घेता, या मोठ्या मानसिक कावेबाजीला कोणीही समजू शकतो की सर्वच मुसलमान चार-चार पत्नी कशा ठेवू शकतात!

तथापि बहुपत्नित्वाच्या संदर्भात पन्नास वर्षांपूर्वी (इ. सन १९६१) ची जनगणना मुस्लिम बहुपत्नित्वाचे काल्पनिक व मनोरचित सत्य पूर्णपणे उद्ध्वस्त करते, हा आरोप तोपर्यंत सिध्द होऊ शकत नाही जोपर्यंत सामाजिक कल पूर्णपणे दया, अनुकंपा राखणारा होत नाही जो खरोखर तसा नाही. या जनगणनेनुसार बहुपत्नित्वाच्या घटना आदिवासींमध्ये सर्वाधिक (१५.२५), त्यानंतर बौध्दांमध्ये (७.९), जैन लोकांत (६.७२) आणि हिंदूंमध्ये (५.८), सर्वांत कमी मुसलमानांमध्ये (५.७०) होत्या. 'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पुणे' येथील संशोधिका मल्लिका बी. मिस्त्री यांच्याद्वारे केलेल्या शोधात हा निष्कर्ष काढला गेला की मुसलमानांमध्ये बहुपत्नित्वाचे शेकडा प्रमाण हिंदूंपेक्षा अधिक नाही.

काही राज्यातल्या जहालमतवादी आणि कट्टरपंथी संघटनांच्या प्रचारतंत्राने, 'हम दो हमारे दो, वो पांच उनके पच्चीस'ची घोषणा देऊन मोलाची कामगिरी केली आहे आणि याच्याद्वारे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे की मुस्लिम पतींना सर्रास चार पत्नी ठेवण्याचा अधिकार दिला गेला आहे. या घोषणेला प्रसारमाध्यमांद्वारे संपूर्ण मुस्लिम समुदायाच्या प्रतिमेला काळिमा लावण्यासाठी निवडले गेले.

इ. सन १९९३ मध्ये अहमदाबाद (गुजरात) चे आठ प्रभाग ज्यात सुमारे पूर्णत: मुस्लिम लोकसंख्या होती त्यात केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले की या संपूर्ण प्रभागात केवळ २७९ पुरुष असे आढळलेत, ज्यांच्या दोन पत्नी होत्या या निष्पत्तीचा रिपोर्ट लिहिताना 'हिंदुस्तान टाइम्स' (दि. १३ जुलै २००३) ने लिहिले,

''मुसलमानांना नेहमी टोमणा मारला जात असला तरी वस्तुस्थिती ही

आहे की हिंदूदेखील बहुपत्नित्वाच्या चाली-रीतित गुंतलेले आहेत. त्या वेळी अहमदाबादचे जिल्हाधिकारी कार्यालयात २९,५५१ मैत्री कराराच्या घटनांची रीतसर दफ्तरी नोंद झाल्याचे आढळून आले. मैत्री कराराचा पावर विवाहित हिंदू पुरुष आणि अन्य स्त्रीच्या दरम्यान हिंदू विवाह कायद्याच्या कलमांपासून बचाव करण्यासाठी केला जातो. जो कायदा पत्नी हयात असताना पतीला दुसऱ्या विवाहापासून रोखतो.''

हा करार कायद्याच्या दृष्टीने लागू करण्यायोग्य नाही, किंबहुना याचा हेतु विवाहित पुरुषाच्या इतर जोडीदाराला सुरक्षा-भावना प्रदान करतो.

## पर्सनल लॉ

काही गट 'मुस्लिम व्यक्तिगत कायद्या'ला मुसलमानांकरिता विशेषाधिकार या स्वरुपात सादर करतात, परंतु ते या गोष्टीकडे डोळेझाक करतात की अशा प्रकारचे विशेषाधिकार सर्व संप्रदायांसाठी आहेत. हिंदू आणि हिंदू धर्मात वेगवेगळ्या समुदायांचे स्वत:चे असे वेगवेगळे कौटुंबिक नियम आहेत, ज्यांना कोणत्या न कोणत्या स्तरावर कायदेशीर मान्यता प्राप्त आहे. संपत्तीची वाटणी आणि कर वगैरेपासून बचाव करण्याकरिता हिंदू संयुक्त कुटुंब कायद्याला मान्यता लाभली आहे. पूर्वोत्तर राज्यांच्या अनेक जनजातींचे आपले कौटुंबिक व्यवहार चालविण्याकरिता त्यांच्या पारंपरिक नियमांना विधिवत मान्यता प्राप्त आहे. गोवा पोर्तगाली कायद्यांचे पालन करतो. दक्षिणेकडील राज्यांचे हिंदू अशा कौटुंबिक कायद्यांचे पालन करतात जे उत्तरेकडील राज्यांमध्ये प्रचलित कौटुंबिक कायद्यांहून पूर्णपणे भिन्न आहेत. तथापि समस्त गटांना सतत कायदेशीर सुधारणेची गरज जाणवते. परंतु एक राष्ट्राने सरळ समान नागरी कायद्याला अधीरतेने व उतावळेपणाने स्वीकारणे खूप कठीण ठरेल आणि याचा विरोध मुसलमानांच्या तुलनेत हिंदू बहुसंख्यांकाद्वारे जास्त होईल.

# हज सबसिडी

मुस्लिम हज-यात्रींना दिली जाणारी हज सबसिडी (जी सर्वोच्च न्यायालयाच्या एका आदेशान्वये हळूहळू समाप्त केली जात आहे) जी केंद्रीय हज कमेटीच्या चार्टर्ड उड्डाणांवर प्राप्त होते, एक विसंगती होती, जिचा काही सुशिक्षित मुसलमान सातत्याने विरोध करीत आले आहेत. हे राज्याच्या धर्मनिरपेक्ष धोरणाला धरुन नाही आणि हे इस्लामी शिकवणींनुसार अगदी अयोग्य आहे. परंतु याचसोबत अनेक राज्यांनी इतर धर्मांच्या तीर्थ यात्रांवर सबसिडी द्यायला सुरुवात केली आहे.

# लोकसंख्येचा राक्षस

## मुस्लिम लोकसंख्येतील वाढ खरोखर भयावह आहे काय?

एक भ्रामक कल्पना अशी की लोकसंख्यावाढीचा दर मुसलमानांमध्ये अधिक आहे आणि लवकरच त्यांची लोकसंख्या, हिंदूंच्या लोकसंख्येपेक्षा जास्त होईल परिणामत: हा देश एक मुस्लिम-राष्ट्र बनेल. काही लोक म्हणतात की मुसलमान कुटुंब-नियोजनाला अंमलात आणत नाहीत आणि आपली लोकसंख्या वाढविण्याकरिता अनेक विवाह करतात.

खरी गोष्ट अशी की टोकाची भूमिका घेणाऱ्या काही जातीयवादी शक्तींनी गेल्या काही वर्षांपासून या बनावट सत्याचा प्रचार केला आहे. या सांप्रदायिक शक्तींनी मुस्लिम-लोकसंख्येत वाढीच्या दराचे भय खूप फुगवून दाखविले आहे आणि पसरविले आहे या हेतुने की त्यांना आपल्या बहुसंख्याक मतांना एकगठ्ठा करणे सहज शक्य व्हावे आणि यासाठी त्यांनी अर्धसत्याला ओढून ताणून आणि अफवा पसरविण्याच्या सर्व तंत्रांचा वापर करून या कल्पित गोष्टींना जनसामान्यांच्या मन-मस्तिष्कात प्रभावी शैलीने ठसविले आहे.

धर्माच्या आधारावर केली गेलेली सर्वेक्षणे या सामान्य भ्रमाला पूर्णत: नाकारतात. या सर्वेक्षणांमध्ये धर्माचा वापर एक मार्करच्या स्वरुपात केला गेला आहे. इ. सन १९७१ च्या सर्वेक्षणानुसार हिंदूंची लोकसंख्या ८२.७ टक्के आणि मुसलमानांची लोकसंख्या ११.२ टक्के होती. इ. सन १९९१ च्या जनगणनेनुसार हे आकडे हिंदूंसाठी ८२.६ टक्के आणि मुसलमानांकरिता ११.४ टक्के असे होते (संदर्भ- मल्याळम मनोरमा, १९९२) मुसलमानांच्या लोकसंख्येचा वृध्दी दर किंचित अधिक आहे, अर्थात २.७ टक्के वार्षिक. वास्तविक हिंदूंच्या लोकसंख्येचा वृध्दी दर इ. सन २००१ च्या जनगणनेनुसार

२.३ टक्के आहे. परंतु याचे कारण हे की मुसलमानांची सामाजिक, आर्थिक अवस्था खालच्या दर्जाची आहे आणि त्यांच्यात निरक्षरताही अधिक आहे. समसमान सामाजिक आणि आर्थिक अवस्था बाळगणाऱ्या मुसलमानांच्या आणि हिंदूंच्या दरम्यान लोकसंख्या वाढीचा दर समान आहे. या संदर्भात केरळ राज्य एक उदाहरण आहे, जिथे तिन्ही मोठे समुदाय हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन यांचा लोकसंख्या वृध्दी दर १.८ टक्के आहे. कारण या ठिकाणी तिन्ही धर्मांच्या लोकांमध्ये साक्षरतेचा दर समान आहे. या उलट जम्मू आणि काश्मीरमध्ये हिंदूंच्या लोकसंख्येत वृध्दी दर मुसलमानांपेक्षा अधिक आहे. हिंदूंचा लोकसंख्या वृध्दी दर ३.७ टक्के आहे, मात्र मुसलमानांचा लोकसंख्या वृध्दी दर २.६ टक्के आहे. एकंदरीत हे आकडे हे दर्शवितात की धर्माच्या आधारावर लोकसंख्येच्या वाढीचा दर समान आहे. याव्यतिरिक्त, जरी या वेळी वृध्दी-दरातले अंतर चालू राहत आहे, तरीही पुढील शतकापर्यंत मुसलमानांची लोकसंख्या, हिंदूंच्या तुलनेत जास्त होण्याची शक्यता नाही. याच्या उलट जर सध्या असलेल्या वृध्दीदराचे विश्लेषण केले गेल्यास हे स्पष्ट होईल की इ. सन १९६१ ते १९७१ आणि इ. सन १९७१ ते १९८१ या कालावधीत हिंदू लोकसंख्येतील वाढ २३.७१ टक्के ते २४.४२ टक्के झाली. त्याच कालावधीत मुसलमानांच्या लोकसंख्येतील वाढीचा दर ३०.८० टक्क्यांवरून घसरुन ३०.२० टक्के झाला. जर हे वाढीचे दर एकाच पातळीवर स्थिर झाले तर इ. सन १९८१ पासून १०० वर्षांपर्यंत हिंदू आणि मुसलमान यांचा दशकीय वृध्दी दर अनुक्रमे ३०.७१ टक्के आणि ३०.५५ टक्के राहील, अर्थात हिंदू लोकसंख्या वाढीचा दर मुसलमानांच्या तुलनेत जास्त ठरेल.

# मुसलमानांचा अनुनय

काही टोकाची भूमिका घेणाऱ्या राजकीय आणि सामाजिक पक्ष-संघटनांचा हा खास मुद्दा राहिला आहे की काँग्रेस आणि इतर काही राजकीय पक्ष मुसलमानांचा अनुनय करतात आणि त्यांना देशाच्या अर्थ व्यवस्थेत आणि साधन-संपत्तीत उचित व देय हिश्श्यापेक्षा जास्त देतात. हा आरोप राजेंद्र सच्चर कमेटीच्या अहवालाद्वारे निराधार असल्याचे सिध्द झाले आहे. ही सच्चर कमेटी इ. सन २००५ मध्ये केंद्र शासनाद्वारे मुस्लिम समुदायाच्या सद्यस्थितीतील सामाजिक आणि शैक्षणिक अवस्थेवर अहवाल तयार करण्याकरिता नेमली गेली होती. कमेटीने आपला अहवाल इ. सन २००६ मध्ये सादर केला. कमेटीने विरोधकांद्वारे मुस्लिमांची मनधरणी होत असल्याच्या नीतीचे बनावटी सत्य पसरविणाऱ्यांचे तोंड बंद करण्यासाठी प्रामाणिक आकडे प्रस्तुत केले. कमेटीने हा निष्कर्ष मांडला की भारतातल्या मुसलमानांची अवस्था अनुसूचित जाती-जमातीपेक्षाही निकृष्ट दर्जाची आहे. कमेटीने सत्याचा पाठपुरावा करून आश्चर्यजनक आकडे प्रस्तुत केले आणि हे सांगितले की शासकीय नोकऱ्या आणि इतर सामाजिक आर्थिक क्षेत्रांमध्ये मुसलमानांची अवस्था हेच त्यांच्या सामाजिक अवस्था आणि अनुनयाला तपासून पाहण्यास पुरेसे आहे. आम्ही हे बघितले पाहिजे की या मापदंडानुसार मुसलमान कोणत्या जागी उभे आहेत. स्मरणात असावे की देशात मुसलमानांची लोकसंख्या सुमारे १५ टक्के आहे.

१. मुसलमानांमध्ये साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय स्तरावर सरासरी साक्षरता प्रमाणापेक्षा खूप खालावलेले आहे. ६ ते १४ वर्ष वयोगटातील २५ टक्के मुस्लिम मुले एक तर कधीच शाळेत जात नाहीत, किंवा मध्येच शाळा सोडून देतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शैक्षणिक संधींचा विस्तार भारतीय मुसलमानांकरिता लाभदायक ठरला नाही. प्रमुख

महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी-स्तरावर एकूण २५ विद्यार्थ्यांमध्ये १ मुस्लिम विद्यार्थी असतो. सर्व सामाजिक आणि धार्मिक संप्रदायांमध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांचा बेरोजगारीचा दर सर्वाधिक आहे. शिकत असलेल्या मुस्लिम मुलांपैकी केवळ ३ टक्के मुले मदरशात जातात. सच्चर कमेटीने या गोष्टीचाही उल्लेख केला आहे की अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या विकासाकरिता जी सकारात्मक पावले उचलली गेलीत, त्यापासून निदान या जाती-जमातींना काही संवैधानिक तरतुदी मिळाल्या आहेत. याचप्रकारे भारतीय मुसलमानांकरिता अशा सकारात्मक उपक्रमाची गरज आहे.

२. शासकीय विभागातील उच्च स्तरीय नोकऱ्यांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व मोठे करूणाजनक आहे. प्रथम श्रेणीच्या नोकऱ्यां मधील त्यांचा सहभाग ३.१० टक्के, द्वितीय श्रेणीत ४.३ टक्के, चतुर्थ श्रेणीत मात्र ८.१६ टक्के आहे, खाजगी क्षेत्रात तर ही आकडेवारी याहून कमीच आहे.

३. नोकरशाहीत एकंदरीत मुसलमानांचे शेकडा प्रमाण फक्त २.५ आहे वस्तुत: भारताच्या एकूण लोकसंख्येत मुसलमानांची संख्या १५ टक्के आहे.

४. आय.ए.एस.मध्ये मुसलमानांचे प्रमाण ३ टक्के आय.एफ.एस.मध्ये १.८ टक्के, रेल्वेत ४.५ टक्के, पोलिस दलात ६ टक्के, आरोग्य सेवा विभागात ४.४ टक्के आणि वाहतूक यंत्रणेत ६.५ टक्के आढळून आले. वास्तविक भारताच्या लोकसंख्येत मुसलमान १५ टक्के आहेत. भारतीय रेल्वेत मुसलमान फक्त ४.५ टक्के आहेत आणि यात ९८.७ टक्के मुसलमान निम्नस्तरीय पातळीवर तैनात आहेत. विद्यापीठे आणि बँकांमध्ये मुसलमानांचा सहभाग फार कमी प्रमाणात आहे. कोणत्याही राज्यात शासकीय नोकऱ्यांमध्ये मुसलमानांचा सहभाग त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नाही. पोलिस शिपायांमध्ये यांचा सहभाग केवळ ६ टक्के आहे. आरोग्य-विभागात ४.४ तर वाहतूक विभागात ६.५ टक्के आहे.

५. उच्च-न्यायालयांमध्ये ३१० न्यायाधीशांमध्ये (१ एप्रिल इ. सन १९८० च्या रिपोर्टनुसार) फक्त १४ मुस्लिम न्यायाधीश होते.

६. आर्थिक सहाय्यासंदर्भात कर्ज घेणारे मुसलमान ४.३ टक्के होते आणि मुसलमानांना दिले गेलेले कर्ज, एकूण वितरीत केलेल्या कर्जाच्या २.०२ टक्के होते. समग्र आर्थिक क्षेत्रात मुसलमानांना दिले गेलेले 'डिफ्रंन्शिअल इन्ट्रेस्ट रेट क्रेडिट' केवळ ३.७६ टक्के होते.

७. उद्योगांमध्ये देशातील सर्वांत मोठ्या औद्योगिक घराण्यांमध्ये, जास्त करून उद्योग मुसलमानांच्या मालकीचे किंवा नियंत्रणात नाहीत. मुसलमानांच्या ज्या उद्योगांना लायसेन्स दिले गेले, त्यांची संख्या २ टक्कयांहून कमी आहे.

मुसलमान हस्तकला उद्योगात प्रामुख्याने कुशल कारागिराचे स्थान बाळगतात. या क्षेत्रात काम करणाऱ्या कारागिरांपैकी ५१.८९ टक्के कारागीर मुसलमान होते. परंतु या क्षेत्रात मुसलमानांचे स्वामित्व फक्त ४.४ टक्के होते.

सर्वांत जास्त चिंताजनक हकीगत अशी की सच्चर कमेटीला असेही आढळून आले की भारतीय मुसलमानांना कोणत्याही अर्थपूर्ण राजकीय सहभागापासून वंचित राखण्याच्या योजनाबध्द कट-कारस्थानाच्या आरोपात काही तथ्य आहे. उदाहरणार्थ, बिहार, उत्तर प्रदेश, प. बंगाल आणि अधिकतर राज्यांमध्ये अशा निवडणूक क्षेत्रांना रिजर्व घोषित केले जाते, जे मुस्लिम बहुल निवडणूक क्षेत्र असतात. तिथे केवळ अनुसूचित जातीचे उमेदवारच निवडणूक लढू शकतात. उघड आहे की मुसलमान अनुसूचित जातीवर्गात येत नाहीत.

# हीच का मनधरणी?

भारतीय मुसलमानांमध्ये केल्या गेलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष हे दर्शवितात की वेगवेगळ्या राज्यकर्त्यांनी विविध आयोगांद्वारे दिल्या गेलेल्या सल्ला-मसलतींवर एक तर कमी लक्ष दिले किंवा त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले आणि त्यांनी या आयोगांना केवळ मते प्राप्त करण्याचा डाव म्हणून वापरले, जेणेकरून त्यांच्याद्वारे मुसलमानांना हा आभास देता यावा की ते मुसलमानांच्या मागासलेपणाबाबत किती गंभीर आहेत. परंतु खरे पाहता ते काहीच करत नाहीत.

सर्वेक्षण दर्शविते की भारतीय मुसलमानांची आर्थिक अवस्था खरोखर दयनीय आहे. अहवाल देणाऱ्यांपैकी ३०.४ टक्के लोकांनी आपले घरगुती उत्पन्न १०,००० पेक्षा  कमी असल्याचे सांगितले, २४.४ टक्के लोकांनी १०००१ ते २०,००० पर्यंत सांगितले ७.५ टक्के लोकांनी २०,००१ ते ३०,००० पर्यंत सांगितले, ३.८ टक्के लोक ३०,००१ ते ४०,००० पर्यंतच्या उत्पन्न गटातील होते. १ टक्का लोक ४०००१ ते ५०,००० पर्यंत आणि ५.६ टक्के लोक ५०,००० हून अधिक उत्पन्न असलेले होते. मुसलमानांची २७.६ टक्के लोकसंख्या झुग्गी- झोपड्यांमध्ये राहते आणि ४६.१ टक्के लोक एक खोलीच्या घरांमध्ये राहतात.

जर भारतीय मुसलमानांची वेगवेगळ्या शासन कर्त्यांनी मनधरणी केली आहे, त्यांचे सांत्वन-समाधान केले आहे तर मग त्यांची आर्थिक अवस्था इतकी दयनीय का आहे? याचे उत्तर हेच की त्यांचा अनुनय केला गेला नाही किंबहुना त्यांच्याविषयी असा प्रचार केला जातो. आपला स्वार्थ साधणाऱ्या लोकांची आपली गुप्त उद्दिष्टें आहेत.

वोट बँकचे राजकारण, भारतीय राजनीतीत आढळून येणाऱ्या उद्दिष्टां मधील मुख्य खलनायक आहे. जेव्हा रिजर्वेशनच्या संदर्भात मंडल

आयोगाच्या शिफारसींना लागू केले गेले, तेव्हा त्याचा हेतु हिंदूंच्या मागासलेल्या जाती-जमातींना लाभ पोहचविणे हा होता. मुसलमानांना लाभ पोहचविणे नव्हता. मुसलमानांना मंडल आयोगाने काहीच लाभले नाही. त्याद्वारे फक्त हिंदूंच्या मागास वर्गीयांचा अनुनय केला गेला. उत्तर भारतातील २० टक्के लोकसंख्या सवर्ण हिंदूंची आहे. मंडल आयोगाने त्यांच्या हिताला हानी पोहचली. त्याच लोकांनी मंडल आयोगाच्या शिफारसी आणि आपल्याच धर्माच्या कनिष्ठ वर्गांविरुध्द हिंसक प्रदर्शने केलीत.

भारतातील मुस्लिम अल्पसंख्यांकांच्या स्थितीविषयी राजेंद्र सच्चर कमेटीचा जो अहवाल सादर केला गेला आहे, त्यामधील भारतीय मुसलमानांची आकडेवारी आणि राष्ट्रीय अध्ययन अहवाल कोणालाही रागात आणू शकतो. विशेषत: मुस्लिम अल्पसंख्यांकांची आजची सामाजिक आणि आर्थिक अवस्था ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्सनुसार बरीच खाली गेली आहे. नोकऱ्यांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे. म्हणून त्यांच्यापैकी अधिकांश लोक दारिद्र्य रेषेहून खालच्या स्तराचे जीवन जगत आहेत आणि त्यातले अधिकांश निरक्षर आहेत. ही आकडेवारी कोणाच्याही मनात शंका सोडत नाही की गंभीरतापूर्वक सकारात्मक कारवायीविना हा समुदाय सतत जास्तीतजास्त वंचित होत राहील. मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व मोठ्या वेगाने कमी होत चालले आहे. सुरक्षेचा अभाव आणि समानतेच्या कमतरतेमुळे त्यांना धोका जाणवतो आणि ते प्रामुख्याने अल्पसंख्यांक ओळखीवर अवलंबित राहतात. जातीय दंगलींनंतर निर्माण झालेल्या समस्या आणि मुस्लिमांद्वारे वेगळ्या वस्त्या उभारण्याच्या स्थितीने जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे, कारण मुसलमानांचे वेगळ्या वस्तीतला जीवनस्तर खालावला जातो आणि भयपूर्ण मानसिकता निर्माण होते, ज्यामुळे रुढीवादी विचारसरणीचा विकास होतो आणि दोन्ही समुदायांमध्ये भावनात्मक अडसर उभे राहतात. प्रशासनात असलेल्या अधिकाऱ्यांचा अल्पसंख्याकांबद्दलचा दृष्टिकोन हळूहळू सावत्र नागरिकांसारखा होत चालला आहे, जो त्यांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनविण्याचा मार्ग मोकळा करीत आहे. हळूहळू दोन प्रकारचे परिमाण आणि वर्तन मूळ धरत चालले आहेत. एक वागणूक बहुसंख्यांक

समुदायाच्या सुखवस्तू आणि सामर्थ्यशाली लोकांबद्दल आहे आणि दुसऱ्या प्रकारची वागणूक अल्पसंख्यांक वर्गाबद्दलची आहे. जातीयवादी शक्तींचे अल्पसंख्यांकांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनविण्याचे ध्येय-उद्दिष्ट साकार व्हायला सुरुवात झाली आहे.

आज भारतात गरज या गोष्टीची आहे की, ''मुसलमानांचा अनुनय''सारखी बेजबाबदार विधाने वापरली जाऊ नयेत जेणेकरून हा जनसमूह प्रगतीपथावर पुढे जाऊ शकावा, राष्ट्रीय मुख्य प्रवाहात सहभागी होऊ शकावा आणि मुख्य प्रवाहाशी संलग्न असलेल्या अन्य जाती-समूहांसोबत शांती आणि सद्भावपूर्वक राहू शकेल.

## पाकिस्तान आणि भारतीय मुसलमान

हे एक फार मोठे मनोरचित सत्य आहे आणि याचा कट्टर पंथी समूह प्रचार करतात की पाकिस्तान मुसलमानांसाठी पवित्र भूमी आहे. परंतु खरी गोष्ट अशी की इस्लामी श्रध्देनुसार मुसलमानांकरिता कोणतीही भूमी पवित्र नाही. कोणत्याही भूभागाशी पावित्र्य बांधलेले नाही. याहून जास्त पाकिस्तानाशी कोणतेही इस्लामी महत्त्व जुळलेले नाही. ज्या प्रकारे मक्काशी जुळलेले आहे, जिथे काबागृह आहे तसेच मदीना जिथे प्रेषितांची मस्जिद (मस्जिदे नबवी) आहे. पाकिस्तान, मलेशिया, चाड आणि उज्बेकिस्तानप्रमाणे जगात पसरलेल्या ५७ मुस्लिम राष्ट्रांपैकी एक आहे. तद्वतच पाकिस्तानी राष्ट्र-ध्वजाशीही एखादे इस्लामी महत्त्व जुळलेले नाही. भारतीय मुसलमान न त्या ध्वजाची पूजा करतात आणि न त्याला फडकविण्यास एखादे पुण्य-कार्य समजतात. जगातल्या इतर देशांच्या ध्वजासारखा तो एका देशाचा ध्वज आहे. भारतातील कोणत्याही धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय नेत्याने कधी क्रिकेट किंवा हॉकी मॅचमध्ये पाकिस्तान जिंकल्यावर आनंदोत्सव साजरा करण्याचा न तर सल्ला दिला आणि न याबाबत प्रोत्साहन दिले. पाकिस्तानात असे कोणतेही धार्मिक स्थळ नाही, ज्याची भारतीय मुसलमान यात्रा करतात. तथापि पाकिस्तानच्या लाहोर या ठिकाणी असलेल्या गुरुद्वाराची यात्रा भारतातील शीख समुदायाचे लोक करतात.

# ७८६

ख्रिश्चन धर्माचे प्रतीक क्रॉस किंवा सूळ आहे. ओम किंवा स्वास्तिक हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करतो. जे लोक धर्मांना त्यांच्या बोधचिन्हांद्वारे ओळखतात, ते नेहमी ७८६ ची संख्या किंवा चंद्रकोर व ताऱ्याला इस्लामचे प्रतीक मानतात. सर्वसामान्यांच्या मनात हा विचार इतका रुजला आहे की धार्मिक समुदायांकडून जी आवाहने केली जातात, ती या बोधचिन्हांवर आधारित असतात. इस्लामने आपल्या ओळखीसाठी कोणतेही प्रतीक निर्धारित केलेले नाही.

७८६ ही संख्या अरबी भाषेत 'बिस्मिल्ला हिर्रहमान निर्रहीम'चे प्रतिनिधित्व करण्यासाठी वापरली जाते. ही एक लहानशी दुआ (प्रार्थना) आहे जी पवित्र कुरआनाच्या प्रत्येक अध्यायाच्या आरंभी उच्चारली जाते. हा आदेश दिला गेला आहे की मुसलमानांनी आपल्या प्रत्येक कामाची सुरुवात याच प्रार्थनेसह केली पाहिजे जिचा अर्थ आहे, ''आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो मोठा दयाशील आणि अतिशय कृपाशील आहे.'' अरबी भाषेत प्रत्येक अक्षराला एका ठराविक संख्येचे मूल्य दिले गेले आहे. जिला गणिताच्या 'अबजद' पध्दतीच्या स्वरुपात ओळखले जाते बिस्मिल्लाहि र्रहमानि र्रहीम लिहिण्यात जी अक्षरे येतात, त्यांचे सांख्यिक मूल्य एकूण ७८६ होते. काही लोक जेव्हा एखादी गोष्ट रेकॉर्ड करतात किंवा पत्र लेखनाच्या आरंभी बिस्मिल्लाह लिहू इच्छितात तर संपूर्ण दुआ न लिहिता फक्त ७८६ लिहितात. इस्लाम धर्मात याला कसलेही धार्मिक महत्त्व नाही. ही केवळ एक साहित्यिक परंपरा आहे, जी अरबी साहित्यात प्रचलित आहे. याला कोणताही धार्मिक आधार नाही.

काही अंधश्रध्दांनी आधुनिक रुप अंगीकारले आहे. ७८६ देखील आधुनिक उपकरण बनले आहे. काही श्रीमंत मुसलमान ही इच्छा बाळगतात

की त्यांच्या मोटर गाडींना असा रजिस्ट्रेशन नंबर मिळावा, ज्याचे शेवटचे अंक ७८६ असावेत काही लोक इच्छितात की त्यांच्या मोबाईल फोनचे शेवटचे अंक ७८६ असावेत. यासाठी ते वाटेल तेवढा खर्च करण्यास तयार असतात, काही लोक असेही आहेत, जे हा आकडा अशासाठी मिळवू इच्छितात की तो तोंडीपाठ करणे सोपे आहे आणि दुसऱ्यांना सांगायलाही सोपे. चित्रपट व्यवसायदेखील या संख्येच्या भावनात्मक आकर्षणाचे शोषण करू इच्छितो. उदा. बॉलीवुडचा सफल चित्रपट ‘वीर जारा’मध्ये अभिनेता शाहरुख खान ला लाहोर जेलमध्ये कैदी नं. ७८६ च्या भूमिकेत दाखविले गेले आहे.

# चंद्रकोर आणि तारा

इस्लामी काल गणना चंद्राच्या गतीला अनुसरुन आहे. इस्लामची हिजरी कालगणना, जी द्वितीय खलीफा हजरत उमर (रजि.) यांच्या शासन काळात सुरु केली गेली ती जुन्या चांद्रवर्षीय तारखांच्या दिनदर्शिकेवर आधारित होती. इस्लाम धर्माची महत्त्वपूर्ण कर्मे, उदा. हज, रमजान महिन्याचा रोजा, ईदुल फित्र आणि ईदुल अजहा वगैरे चंद्राच्या विविध अवस्थानुसार असतात. म्हणूनच चंद्रोदयाची घटना खूप बारकाईने रेकॉर्ड केली जाते कारण चंद्रोदयापासूनच इस्लामी महिना सुरु होतो. तुर्कीची उस्मानी खिलाफत, जिच्या सत्तेखाली यूरोप आणि आशियाचा बराच मोठा भूभाग येत असे. त्यांनी चंद्रकोर आणि ताऱ्याला आपल्या राजवटीचे बोध-चिन्ह म्हणून अंगीकारले, त्याला आपल्या ध्वजावर अंकित केले. त्याच वेळेपासून मुस्लिम-जगतने त्याच उस्मानी ध्वजाचा अंगीकार केला आणि आजपर्यंत तो प्रचलित राखला. अनेक मुस्लिम राष्ट्रांनी चंद्रकोर आणि तारा याला आपल्या राष्ट्रीय बोधचिन्हाचा भाग बनवून घेतले, तथापि या मागे कोणताही धार्मिक आदेश नाही.

## खोडकरपणाचा अपप्रचार

एक मजेदार गोष्ट अशी की काही अतिरेकी भूमिका घेणारे राजकीय पक्ष आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या संघटना चंद्रकोर आणि तारा असलेल्या झेंड्याला पाकिस्तानी ध्वज सांगून 'ध'चा 'मा' करून त्याद्वारे जनसामान्यांना पथभ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक मुसलमानांची ओळख म्हणून लावल्या गेलेल्या झेंड्यांमध्ये चंद्रकोर आणि तारा पाहिला जाऊ शकतो, जे दरगाह आणि कब्रस्तानांच्या ठिकाणी लावले जातात.

पाकिस्तानच्या राष्ट्रध्वजात डाव्या बाजूला पांढऱ्या रंगाच्या पट्ट्या असतात, ज्या डावीकडे सुमारे एक चतुर्थांश भागावर असतात.

## पाकिस्तानी ध्वज

ही गोष्टही मोठी गंमतीची आहे की ज्या उजव्या बाजूच्या हिंदुत्ववादी संघटना मुसलमानांवर, कमी देशभक्त असण्याचा आरोप ठेवतात. त्या सर्व सामान्यांना मुसलमानांच्या चंद्रकोर व तारा असलेल्या झेंड्याला पाकिस्तानी राष्ट्रध्वज दर्शवितात.

परंतु कोणी कल्पनाही करू शकत नाही की या जातीयवादी संघटना याच्याही एक पाऊल पुढे जाऊन स्वत: शासकीय कार्यालयावर पाकिस्तानचा ध्वज फडकवितात, जेणेकरून सामाजिक तणाव निर्माण करावा. उदाहरणार्थ, कर्नाटकहून हा रिपोर्ट आला की पोलिसांनी जानेवारी इ. सन २०१२ मध्ये कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्ह्याच्या सिंदकी या ठिकाणी श्रीराम सेनेच्या सहा कार्यकर्त्यांना अटक केली (पाहा- द हिंदू, जानेवारी ११,१२) विशेष म्हणजे श्रीराम सेनेच्या तरुणांनी स्वत:च तहसीलदार कार्यालयावर पाकिस्तानी ध्वज फडकविला आणि या अपराधासाठी तालुक्याच्या मुसलमानांना जबाबदार ठरविले लोकांच्या भावना भडकविणाऱ्या आपल्या कार्यपध्दतीत जातीयवादी तत्त्वे एवढे कच्चे असतील अशी अपेक्षा नव्हती की ते या कामगिरीत सहजपणे पकडले गेले.

# आक्षेपार्ह मांस

काही दिवसानंतरच चार हिंदू तरुण हैद्राबादच्या सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या शहरात एप्रिल इ. सन २०१२ च्या पहिल्या आठवड्यात अनेक मंदिरांमध्ये गोमांस फेकताना पकडले गेले. परिणामी सांप्रदायिक हिंसेची आग भडकली होती. पोलिसांनी त्वरित कारवाई केली आणि पुढच्याच आठवड्यात जातीय दंगा घडवून आणण्याच्या इराद्याने मंदिरांना अपवित्र करण्याच्या आरोपा खाली चार हिंदू तरुणांना अटक करण्यात आली.

अशा प्रकारच्या घटना या गोष्टीकडे संकेत करतात की लोकांनी धार्मिक बोध-चिन्हांना किंवा धार्मिक स्थळांना अपवित्र केल्या जाण्याच्या घटनांनी फार मोठ्या प्रमाणात उत्तेजित व्हायला नको. भारतासारख्या अनेक जाती-धर्माच्या लोकशाहीत उत्पात व उपद्रव निर्माण करणाऱ्यांची कमतरता नाही, जे या प्रकारच्या भावनांनी राजकीय लाभ प्राप्त करू इच्छितात आणि यासाठी ते समाजाला, प्रसंगी आगीच्या हवाली करू शकतात.

अगदी टोकाची भूमिका घेणाऱ्या संघटना निवडणुकीत लाभ मिळविण्याकरिता उपद्रवी, समाजकंटक एजंटांची नेमणूक करू शकतात, जसे वरील दोन्ही घटनांवरून स्पष्ट होते ज्यात उजव्या बाजूच्या हिंदुत्ववादी संघटनांनी स्वत: अशा कृत्यांसाठी मुसलमानांवर आरोप थोपण्याच्या हेतुने आपत्तिजनक वस्तू ठेवल्या, असे घृणित कृत्य करण्याची मुसलमान कल्पनाही करू शकत नाही.

याद्वारे हाही संकेत मिळतो की उजव्या बाजूच्या संघटनांना आपल्या जुन्या डावपेचांच्या घटत जाणाऱ्या निष्कर्षांनी नैराश्यपूर्ण परिणाम हाती लागत आहेत. अयोध्यासारख्या दुभत्या जनावराचे सारखे सारखे दूध काढून बिचारे जनावर कोरडे पडले आहे. यास्तव ते आता सांप्रदायिक भावनांना

भडकविण्यासाठी आणि आपली वोट बँक भक्कम करण्यासाठी कोणताही उपद्रव माजविण्यास तत्पर आहेत. हिंदू आणि मुसलमानांवर आधारित जनसामान्यांना अशा घटनांबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्यात खूप सावधगिरी बाळगली पाहिजे, आपला संयम सोडू नये जर जनसामान्य सतर्क राहतील आणि कायदा-सुव्यवस्था अंमलात आणणारे प्रशासन पक्षपात करण्यास नकार देईल तर अशा प्रकारची उपद्रवी कट-कारस्थाने रचणाऱ्यांचे कुटिल डाव मातीस मिळतील, जे समाजाच्या स्थैर्यास हानी पोहचविण्यासाठी ठाम आहेत.

# लव जिहाद

## दिशाभूल करणारी घोषणा एक धोकादायक हत्यार बनते.

ज्या 'लव जिहाद'नं एका हिंदू संप्रदायास हिंसक बनण्यास प्रवृत्त केलं त्याचा भलताच इतिहास आहे. या वक्तव्याचे दोन्ही शब्द 'लव' आणि 'जिहाद' अर्थानं एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. ९/११ च्या घटनेपासून जिहाद मेनस्ट्रीम मीडियामध्ये आला आणि सामाजिक मानसिकतेचा अंगच बनला. पवित्र कुरआनात याचा अर्थ प्रयत्न आणि संघर्ष आहे. याउलट या शब्दाचा उपयोग मुस्लिमेतरांच्या हत्येसाठी केला जातो. 'लव जिहाद' नक्कीच एका सैतानी बुद्धिमत्तेची निर्मिती आहे, ज्यास मुस्लिमांना बदनाम करण्यासाठी उपयोगात आणलं जात आहे. काही मुस्लिम संघटना, मुस्लिमांची लोकसंख्या वाढविण्याच्या उद्देशानं मुस्लिम तरुणांना बिगर मुस्लिम तरुणींशी लग्न करण्यासाठी त्यांना निधी देत आहे, असा सर्रास अपप्रचार केला जात आहे. या तरुणांना मोटर बाईक आणि मोबाईल फोन विकत घेण्यासाठी आणि मुस्लिमेतर तरुणींना फूस लावण्यासाठी पैसे दिले जातात.

'हिंदू रक्षक समिती' या नावाची संघटना महाराष्ट्रात हिंदू धर्माची सुरक्षा करण्यासाठी हे सांगत फिरत आहे की अशा जोडप्यांना विभक्त करा ज्यात मुलगी हिंदू असेल. अशा प्रकारची जोडपी खूप असतील, अशातली गोष्ट नाही. पण हिंदू धर्माचं हे स्वयंसिद्ध सुरक्षक क्षुल्लक संशयावरून अशा जोडप्यांवर तुटून पडतात. 'या' शब्दाचा अशा प्रकारे प्रचार केला गेला की केरळमध्येसुद्धा एका ख्रिश्चन गटानं या वृत्तीस आळा घालण्यासाठी विश्व हिंदू परिषदेशी हात मिळविला.

भारतात या शब्दाचा प्रयोग तटीय कर्नाटक आणि केरळच्या काही भागांमध्ये सुरू झाला. रा. स्व. संघाचे प्रशिक्षण घेतलेल्या प्रमोद मुतालिक

यानं याच शब्दाचा उपयोग करून श्री रामसेने नावाची संघटना स्थापली आणि अशा जोडप्यांना लक्ष्य केले ज्यात मुलगी हिंदू आणि मुलगा मुस्लिम असेल. ज्या विवाहांचा विरोध मातापित्यांनी केला असेल अशा विवाहांना संशयानं पाहू लागले. अशा प्रकरणांची श्री रामसेनेनं कोर्टापर्यंतदेखील वर्णी लावली. मुस्लिम मुलानं हिंदू मुलीशी बळजबरीनं विवाह केल्याचं निमित्त केलं जायचे. सजल राज आणि असगर या घटनेकडे राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहिले जावे असा निकाल कर्नाटक उच्च न्यायालयानं दिला ही मजेशीर बाब आहे.

न्यायाधीशांनी असे निर्देश दिले की कर्नाटकचे डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि इस्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांनी या शब्दाशी संबंधित प्रकरणाची चौकशी करावी आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत ती मुलगी आपल्या आई-बापाजवळ राहील. हे प्रकरण फक्त आंतधर्मीय विवाहाशी संबंधित असलं तरी मुलीनं राजकीय दबावाला न जुमानता आपल्या पतीसोबतच राहण्याचा निर्णय घेतला.

चौकशी समितीनं, ज्याचं नेतृत्व डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस हे करत होते. अशा अफवा या एखाद्या मक्कार बुद्धिमत्तेची फसवेगिरी असल्याचा अहवाल त्यांनी सादर केला. या अहवालात असेदेखील म्हटले होते की ''आंतरधर्मीय विवाह होत असतात, पण त्यामध्ये कसलीही जोरजबरदस्ती होत नसते. तसेच या लग्नामध्ये कोणतीही संघटित योजना असल्याचा पुरावा नाही.''

श्री रामसेनेच्या अपप्रचाराच्या मोहिमेनुसार कर्नाटक राज्यातच ४ हजारपेक्षा अधिक हिंदू मुलींना फसवून त्यांचं धर्मांतर केले गेले आणि लग्नं लावून दिली आहेत.

ही अफवा एखाद्या वणव्यासारखी प्रसारित केली गेली आणि माता-पिता घाबरू लागले. अनेक मुलींना आई-बापाबरोबर राहण्याची सक्ती केली गेली आणि त्यांचं भावनिक ब्लॅकमेल केलं गेलं.

अशाच प्रकारच्या दोन प्रकरणांमध्ये केरळ उच्च न्यायालयानं वादी-प्रतिवादींची बाजू ऐकून घेतल्यानंतर कमी-अधिक प्रकरणांत असाच निकाल

दिला होता. या प्रकरणामध्ये दोन हिंदू मुली घर सोडून निघून गेल्या होत्या आणि मुस्लिम युवकांशी लग्न करण्यासाठी त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला होता. केरळच्या न्यायालयानंही या घटनेची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश दिले होते आणि ही गोष्ट समोर आली की या घटनांशी 'लव जिहाद'चे काहीएक देणे-घेणे नाही. अशा प्रकारच्या विवाहांच्या संबंधानं विविध संघटनांद्वारे ज्या गोष्टी प्रसारित केल्या गेल्या त्या सर्व अफवा आणि अपप्रचारापलीकडं काही नाही. तरीदेखील 'लव जिहाद' हा सामाजिक चिंतनाचा विषय बनून गेला.

उत्तर प्रदेशच्या मुजफ्फरनगर जिल्ह्यामध्ये आणि त्यास लगत असलेल्या भागात जाणूनबुजून मुलींची छेड काढण्याची योजना आखली गेली. अफवा पसरवल्या आणि 'लव जिहाद'चा व्यापक प्रसार केला गेला. ('इनहद' या सामाजिक संघटनेच्या मुजफ्फरनगर जिल्ह्याबाबतच्या अहवालामध्येही हेच सांगितलं गेलं आहे.) मुस्लिम युवकांद्वारे हिंदू मुलींना फूस लावून त्यांना धर्मांतर करण्यास विवश केलं गेलं आणि लग्न करण्याच्या घटनांना वारेमाप प्रसिद्धी दिली गेली. दंगली घडवून आणण्यासाठी हिंदू मुलींशी मुस्लिम युवकांनी लग्न करण्यासाठी त्यांची छेड काढली.

गुजरातमधील दंगलींच्या काळातसुद्धा आपण अशा प्रचाराचा सामना केलेलाच आहे की मुस्लिम युवक आदिवासी मुलींना फूस लावून त्याच्याशी लग्न करत आहेत आणि त्यांचं धर्मांतरही करत आहेत. दंगलीत प्रमुख भूमिका वठविणारा बाबू बजरंगी अशा अफवांची विशेष योजना करत होता. त्याचीही अशाच तऱ्हेची गँग आहे जिचे कार्यकर्ते अशा जोडप्यांना लक्ष्य करून त्यांना एकमेकांपासून वेगळं होण्यासाठी विवश करतात. या सर्व कारवाया धर्माचं रक्षण करण्याच्या नावानं केल्या जात आहेत. कोणत्याही बहुधर्मीय समाजामध्ये आंतरधर्मीय आणि आंतरजातीय विवाह सामान्य बाब आहे. पण देशात जातीयवादी राजकारणानं भरारी घेतल्यानंतर आंतरधर्मीय विवाहसंबंधांचा तीव्र विरोध सुरू झालेला आहे.

खरे पाहता अशा घटनांमागे राजकीय उद्दिष्टे दडलेली आहेत. हिंदू संघटनांची स्वत:ला हिंदूंचे रक्षक आणि हिंदू नीतीमूल्यांची जोपासना करणारे

आहेत हे सिद्ध करण्याची धडपड असते. दुसरे कारण मानसिकतेशी संबंधित आहे. कोणत्याही धर्म किंवा समुदायाच्या महिलेनं धर्माची चौकट ओलांडून लग्न करणं म्हणजे आपल्याला पराभव पत्करावा लागतोय अशा भावना निर्माण होतात. त्याचबरोबर दुसऱ्या संप्रदायाचे लोक त्यास आपल्या प्रतिष्ठेचा विषय समजतात. खरे पाहता हे शतकानुशतके चालत आलेल्या पुरुषी अहंकाराचं द्योतक आहे. अनेक लोकांच्या मते महिला त्या त्या संप्रदायाच्या सन्मानाचे प्रतीक असतात आणि त्यांचं आपल्या समुदायाबाहेर लग्न करण्याने आमच्या समुदायाच्या सामाजिक भावनांचा अनादर होतो.

गेल्या काही काळापासून एक प्रकारच्या तंत्राचा वापर हिंदू मुली आणि हिंदू धर्माच्या रक्षणाच्या नावानं मुलींना आपल्या जीवनसोबतीच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा हक्क हिरावला जात आहे. मुजफ्फरनगर येथे या शब्दाचा दुरुपयोग करून परिस्थितीला हिंसक वळण देण्यात आलं आणि जातीय दंगली घडविण्यासाठी बनावट गोष्टी रचल्या गेल्या. 'लव जिहाद' आता फक्त एक घोषणाच नसून एका हत्यारात त्याचं रूपांतर झालेलं आहे. एकीकडे त्याद्वारे मुस्लिमांमध्ये नकारात्मक वृत्ती निर्माण केली जाते तर दुसरीकडे स्त्रीला तिच्या स्वातंत्र्याच्या अधिकारापासून वंचित केले जाते. भारतात धर्माच्या नावानं जे राजकारण चालविलं जात आहे विशेषकरून संघ परिवाराकडून ते अफगाणिस्थानातील तालिबानी विचारधारेपेक्षा वेगळं नाही. बऱ्याच धार्मिक मूलतत्त्ववादी विचारधारेचे लोक धर्माच्या नावानं जे अभियान चालवित आहेत ते खरे पाहता स्त्रीच्या अधिकारांची पायमल्ली करण्यासाठी वापरले जातात. श्री रामसेनेपासून बाबू बजरंगीच्या कारवाया आणि नंतर मुजफ्फरनगर दंगलीमध्ये जे काही समोर आलं हे सर्व त्याच तत्त्वावर आधारित आहे, ज्याद्वारे महिलांना पुरुशांची मालमत्ता समजले जाते आणि म्हणून त्यांच्या आचार-विचारांवर नियंत्रण ठेवणं आहे.

या बाबतीत एकीकडे 'जिहाद'ला हिंसेचं नाव दिले जाते आणि प्रेम प्रकरणांत गुंतवून त्यांची निंदा केली जाते, हे दोन्ही परस्परविरोधी आहेत. आणि अशी कुठली संघटना असेल जी बळजबरीनं प्रेमाच्या गोष्टींना उत्तेजन देत असेल, कल्पनेबाहेरचं आहे. 'इश्क' म्हणजे प्रेम दोन लिंगांमध्ये आपोआप

उत्पन्न होणाऱ्या भावना आहेत, ज्याचा संबंध संवेदनांशी आहे. कोणावर ते लादलं जाऊ शकत नाही. यासाठी बाहेरील दबाव आणि आधाराची आवश्यकता नसते. प्रेम अशी कुठली गोष्ट नव्हे जिला निमित्ताची गरज असते आणि प्रत्यक्ष जीवनामध्ये सिनेमासारखं त्यास अंमलात आणलं जाऊ शकत नाही. मानवी हृदय याचे स्रोत असतात. बाहेरील दबावानं प्रेमाच्या कारवायांना प्रोत्साहन दिलं गेलं तर असे संबंध जास्त काळ टिकत नसतात. लवकरच त्याचं पितळ उघडं पडते.

## शाही प्रेम

खालच्या कुळातील मुलींनी आणि हिंदू राजकन्या मुस्लिम राजा आणि सम्राटांशी विवाह केल्याची उदाहरणं आहेत. खाली काही अशा हिंदू राजकन्यांची नावं देत आहोत ज्यांनी शाही प्रेमप्रकरणांतून मुस्लिमांशी विवाह केला. हे ऐतिहासिक तथ्य आहे.

१. गुजरातच्या राजकन्या कमला देवी यांनी भारताचा सम्राट अल्लाउद्दीन खिलजी यांच्याशी विवाह केला होता. (व्ही. डी. महाजन, एस चाँद ॲण्ड कं.प्रा.लि., न्यू दिल्ली, १९७५, पृ.१३१)

२. दुसऱ्या राजकन्या दावल देवी यांनी अल्लाउद्दीन खिलजी यांचा पुत्र eKepej Keeve UebUeMeer eUeJeen keaue (ibid pg.138)

३. गयासुद्दीन तुगलक यांच्या पित्याने तो एक साधा सैनिक असताना एका जाट महिलेशी विवाह केला आणि तिचाच मुलगा गयासुद्दीन तुगलक पुढे भारत सम्राट झाला. (ibid pg.166)

४. मुहम्मद बिन तुगलक यांनी पुन्हा एका हिंदू महिलेशी विवाह केला आणि तिचा मुलगा फिरोज शाह भारताचा सम्राट झाला. (ibid pg.201)

५. लोदी घराण्याचा संस्थापक बहलोल लोदीचा विवाह कनिष्ठ जातीतील एका सोनाराच्या मुलीशी झाला होता. तिचा मुलगा पुढे जाऊन सिकंदर

शाह नावानं १४८९ साली सम्राट झाला. (ibid pg.2019)

६. मुगलकाली भारतात 'लव जिहाद'चे भलतेच दूरगामी परिणाम उमटले. बादशाह अकबर यानं कच्छावाहचा राजा बिहारीमल याची कन्या जोधाबाईशी विवाह केला. बादशाहनं आणखीन चार राजपुत मुलींशी विवाह करावा यासाठी तिनं आग्रह केला होता. त्या सर्वांना तिनं महालात राहायची सोय करून दिली होती आणि अकबरच्या इतर मुस्लिम पत्नींबरोबरच त्या राजपुत पत्नींबरोबर जोधाबाई प्रेमानं राहत होती. (ibid, Chapter III, pg.74)

७. राजा भगवानदास याच्या कन्या जोधबाईचा (जोधाबाई नव्हे) विवाह अकबर आणि जोधाबाई यांचा पुत्र सलीम याच्याशी झाला. नंतर जहांगीर या नावानं सलीम भारताचा सम्राट झाला. (ibid pg.74)

## विसाव्या शतकातील महत्त्वाची प्रकरणं

✯ शाहबाज़ भुट्टोचा विवाह एका महाराष्ट्रीयन दलित लक्कीबाई या महिलेशी झाला. तिनं झुल्फीक़ार अली भुट्टो यास जन्म दिला जे पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान होऊन गेले. खुर्शीद बेगम या इस्लामी नावानं तिचं नामकरण झालं होतं. (विकीपीडिया)

✯ माजी उपराष्ट्रपती आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य नायाधीश मुहम्मद हिदायतुल्ला याचा विवाह हिंदू महिला पुष्पाशी झाला होता. (विकीपीडिया)

# दांभिकपणा

उजव्या विचारसरणीचे लोक खोट्या बातम्या रचण्याचा उद्योग सुरू ठेवून आपल्या दुष्कृत्यांशी लोकांना त्रास देण्यापासून कधी थकत नाहीत. कोणत्याही सभ्यतेमध्ये रिविध जाती-संप्रदायांतील स्त्री-पुरुषांमधील प्रेमप्रकरण आणि आंतरजातीय विवाह सामान्य बाब आहे. वरकरणी जरी आपण पाहिलं तर दोन विभिन्न धार्मिक श्रद्धा बाळगणाऱ्या व्यक्तींमध्ये असे विवाह होत आहेत. साधारण परिस्थितीमध्ये भारतात विवाह पारंपरिक पद्धतीनं बऱ्याच चौकशी करून घडवून आणले जातात. आंतरधर्मीय विवाहांच्या बाबतीत ही साधारण समज असते की त्यामागे प्रेम प्रकरण असतात. तसेच वैयक्तिक आवड-निवड असते. जहालमतवादी उच्चभ्रू हिंदू घराण्यांमध्ये अशा विवाहांची बऱ्यापैकी उदाहरणं आहेत.

हे विलक्षण सत्य बाहेर आलं आहे की भाजपचे आघाडीचे मुस्लिम नेते मुख्तार अब्बास नकवी यांनी विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष अशोक सिंघल यांच्या कन्येशी विराह केला आहे. भाजपचेच आणखीन दुसरे आघाडीचे नेते शाहनवाज हुसेन यांनी बिहारमधील किशनगंजच्या रेणु नामक हिंदू महिलेशी विवाह केला आहे. त्या सध्या दिल्लीत शिक्षिका आहेत. दिवंगत केंद्रीय मंत्री सिकंदर बख्त यांनी राज शर्मा या हिंदू महिलेशी विवाहबद्ध होते. भाजपचे माजी अध्यक्ष मुरली मनोहर जोशी यांच्या कन्येनं एका मुस्लिमाशी विवाह केलेला आहे. भाजपचे सर्वात ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या मुलीनं एका मुस्लिमाशी विवाह करणे पसंत केलं आहे. शिवसेनेचे सर्वेसर्वा बाळासाहेब ठाकरे यांच्या नातीनं नेहा ठाकरे यांनीदेखील मुस्लिमाशी विवाह केलेला आहे. नदीम हैदर हे सुब्रमण्यम स्वामींचे जावई आहेत. अशा सर्व जोडप्यांनी जाहीररित्या हिंदुत्ववादी परिवाराच्या आशीर्वादानं विवाह केलेला आहे ही मजेशीर गोष्ट होय. त्यांना या विवाहांमागं 'लव जिहाद' षड्‌यंत्राचा वास आला नाही? जर तसे नव्हे तर साधारण व्यक्तींबाबत अशा आंतरधर्मीय विवाहांबाबत आक्षेप घेण्याचं कारण काय? आपल्याच लोकांमधील इतके आंतरधर्मीय विवाहित जोडपे असतील तर सामान्य माणसांबाबत 'लव जिहाद'चे बळी असल्याचे सांगत सुटणे हा दांभिकपणा आहे.

# अपवाद नव्हे परंपरा

एवढेच नसून हिंदी सिनेसृष्टी बॉलीवुडमध्ये तर अशा प्रकारचे विवाहसंबंध एक परंपराच आहे, अपवाद नव्हे. आमिर खाननं पहिली पत्नी रिना दत्तची निवड केली होती. नंतर त्यानं किरण रावशी दुसरा विवाह थाटला. सुपरस्टार शाहरुख खाची पत्नी दिल्ली येथील गौरी खान आहे. सलमान खानचा पिता सलीम यांनी गतकाळातील प्रख्यात अभिनेत्री हेलनशी विवाह केला. अरबाज खानची पत्नी मलाईका अरोरा आहे. संजय दत्तची दुसरी पत्नी दिलनाझ शेख विवाहानंतर मनायता दत्त बनली. भारताची पहिली मिस इंडिया नय्यर मिर्झानं हिंदू धर्माचा स्वीकार करून आपलं नवीन नाव नलिनी पटेल ठेवलं. मधुबाला (मुमताज बेगम) हिनं किशोरकुमार यासी विवाह केला. प्रसिद्ध अभिनेत्री नफिसा अलीनं आर. एस. सोन्धीशी विवाह करण्यापूर्वी हिंदू धर्मात प्रवेश केला. तमिळ अभिनेत्री खुशबू (नकहत खान) हिनं एका नंतर दुसऱ्या हिंदू अभिनेत्याशी विवाह केले. पहिले प्रभू नंतर सुंदर. शर्मिला टागोर हिनं पत्तौडीचे नवाब मन्सूर अली खानशी विवाह केला. त्यांनी सैफ अली खान आणि सोहा अली खान या कलाकारांना जन्म दिला. करीना कपूर सैफ अली आणि सोहा खाननं कुणाल खेमुशी विवाह केला.

मुंबईचा माजी डॉन अरुण गवळी यानं आयेशाशी विवाह करून नवीन आशा नाव ठेवलं. मुंबईची गायिका आरा खान हिनं विवाहासाठी हिंदू धर्म स्वीकारून अन्नपुर्णा देवी झाली. पतीशी घटस्फोट झाल्यानंतरदेखील ती हिंदू धर्मातच राहिली. भाजप खासदार आणि सिनेतारका हेमा मालिनी आणि तिचा पती धर्मेंद्रची गोष्ट तर आश्चर्यकारकच आहे. दोघांनी १९७९ साली विवाहासाठी हेमा मालिनी हिनं आयेशाबी आणि धर्मेंद्र यानं दिलावर खान या मुस्लिम नावांनी अर्ज दाखल केला. धर्मेंद्रचा विवाह यापूर्वी कौरशी झाला होता. हरियाणाचे माजी उपमुख्यमंत्री चंद्रमोहन यांचं प्रकरणही अशातलंच. त्यांनी इस्लाम स्वीकारून चाँद मुहम्मद हे नवीन नाव ठेवलं आणि दुसऱ्या महिलेशी विवाह केला. त्या महिलेनंही इस्लाम प्रवेश करून फिजा परवीन हे नाव धारण केलं.

## वैयक्तिक निवडीचं स्वातंत्र्य

अशा विवाहांपैकी बऱ्याच विवाहांबाबत आपल्याला असे वाटत असेल की 'सोयीचं धर्मांतर' असेल. पण आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती अशी की 'सेलेब्रिटिज्' सुद्धा प्रेमात पडतात. स्वत:च्या धर्मातील आणि द्विपत्नित्व अथवा द्विपतित्वावरील (एकाचवेळी दोन पत्नी किंवा पती बाळगणे) प्रतिबंध टाळण्यासाठी दुसऱ्या धर्मामध्ये प्रवेश करण्यास त्यांना कसली चिंता वाटत नाही. यावरून हे स्पष्ट होते की कोणत्याही मानवी समाजानं महिलेला वैयक्तिक आवडी-निवडीचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे आणि कोणतीही किंमत मोजून तिचा सन्मान करायला हवा. या मोजक्याच अशा प्रसिद्ध आंतरधर्मीय विराहांच्या घटना असतील. आपण राहतो त्या जागी, घराशेजारी शेकडो मुस्लिम पती आणि हिंदू पत्नी किंवा हिंदू पती आणि मुस्लिम पत्नी असलेले संबंध आपल्याला हमखास पाहावयास मिळतील. अशआ सर्व विवाहांचं षड्‌यंत्र असल्याचा संशय धरणं म्हणजे नैसर्गिक प्रेमभावनांचा अपमान करणे होय, ज्या धर्म, संप्रदाय, राष्ट्रीयत्व आणि वर्ग अशा सर्व मर्यादा ओलांडत असतात.

# जिझिया

## महत्त्व आणि पार्श्वभूमी

इस्लामला बदनाम करण्यासाठी इस्लामविरोधी साहित्यिक आणि पौर्वात्य संस्कृतीचे अभ्यासक इस्लामच्या विविध परिभाषांचे चुकीचे अर्थ लावत आहेत, त्यांतील एक म्हणजे जिझिया. जिझियाचा संदर्भ सोडून चुकीची व्याख्या आणि स्पष्टीकरण करीत आहेत. हे समजण्यासाठी रास्त उपाय म्हणजे मूळस्रोतांपासून हे समजून घेतलं जावं आणि ऐतिहासिक संदर्भाची माहिती करून घेतली जावी.

इस्लामच्या अर्थव्यवस्थेमध्ये जकात, उश्र, सदकात आणि जिझियाचा समावेश होतो. या सर्व आर्थिक स्रोतांमध्ये जिझियाचा वाटा नगण्यच आहे. खालील ओळींवरून वाचकांना जिझियाचे सत्य काय ते जाणून घेण्यास मदत मिळेल.

## जकात

वंचितांचा अधिकार. याचे आदेश कुरआनात दिलेले आहेत. (कुरआन ९:६०) जकात सधन लोकांच्या संपत्तीत वंचितांचा हक्काधिकार होय. त्यांनी ८८ ग्रॅम इतक्या सोन्याच्या किंमतीची वार्षिक बचत केली असल्यास त्यातून २.५ टक्के रक्कम वेगळी काढून ठेवावी. जे एखाद्या इस्लामी राजवटीतील नागरिक असतील तर मुस्लिमांकडून जकातची रक्कम वसूल करून गोळा करण्याची जबाबदारी इस्लामी शासनावर असते. याव्यतिरिक्त गरीब आणि गरजू तसेच समाजाच्या कल्याणासाठी वित्तीय योगदान द्यावे. अशा प्रेरणा मुस्लिमांना दिल्या जातात. या ऐतिहासिक

योगदानास 'सदका' (दानधर्म) म्हटले जाते. 'उश्‍र' हा शेती उत्पादनाद्वारे कमवलेल्या संपत्तीतून ५-१० टक्के सक्तीचा कर आहे. त्याचबरोबर वैयक्तिक उत्पादनं जसे- गॅस, पेट्रोल, धातु, कोळसा, सोने, चांदी, हिरे याद्वारे कमवलेल्या मिळकतीवर २० टक्के कर द्यावयाचा आहे. 'फितरा' नावाचं प्रतिदान 'ईदुल फित्र' (रमजान ईद) साजरी करण्यापूर्वी प्रत्येक नागरिकानं अगदी त्याच दिवशी जन्मलेल्या बाळाकरवी त्याच्या मातापित्यानं द्यावयाचं अनिवार्य प्रतिदान आहे. यापैकी कोणताही कर अथवा दानधर्म कोणत्याही बिगरमुस्लिम नागरिकाकडून इस्लामी शासन वसूल करत नाही.

## जिझिया संरक्षणात्मक कर

मुस्लिमेतरांना मुस्लिमांसाठी अनिवार्य असलेल्या जकातऐवजी जिझियाची मागणी केली जाते. समाजातील प्रतिष्ठित आणि सधन लोकांकडून ४८ दिरहम प्रतिव्यक्ती या दरानं, मध्यमवर्गीय नागरिकांकडून २४ दिरहम कर खालच्या स्तरातील लोकांकडून दरवर्षी वसूल केला जातो. कोणते जरी मापदंड लावून पाहिलं तर मुस्लिमांकडून ज्या प्रमाणात विविध कर वसूल केले जातात त्यापेक्षा ही रक्कम क्षुल्लकच म्हणावी लागेल. जिझिया कर देणाऱ्यांना सैनिकी सेवेतून वगळले गेले आहे. तसेच कसल्याही प्रकारचा धार्मिक निधी त्यांच्याकडून घेतला जाऊ शकत नाही. त्याच्या सुरक्षेची आणि सन्मानाची हमी देऊन त्यांना विशेष स्थान दिलं जातं. त्यांना हे खात्रीनं माहीत होतं की मुस्लिमांसाठीच्या जकात आणि उश्‍रच्या अनिवार्य देणगीबद्दचा त्यांच्यावरील हा जिझिया कर आहे, सरसकट कर नव्हे.

प्रत्येक मुस्लिमेतरावर जिझिया लागू होत नाही. फक्त सज्ञान आणि सुदृढ पुरुषांकडून तो घेतला जातो. स्त्रिया आणि मुलांना यातून वगळलं आहे. तसेच अपंग, आजारी, अशक्त लोकांकडूनही घेतला जात नाही. धर्मगुरू, पुरोहित, संत आणि चर्च / मंदिरातील पुजारी उपजीविकेचे कोणतेही सधन नसेल अशा लोकांनादेखील वगळण्यात आलं आहे. जर इस्लामी शासन मुस्लिमेतरांचं संरक्षण करण्यात असमर्थ ठरले तर त्यास वसूल केलेली

जिझियाची रक्कम ज्याची त्यांना परत करावी लागेल. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जिझिया देणाऱ्या मुस्लिमेतरांच्या संरक्षणाची जबाबदारी घालून दिली आहे.

## सैन्य सेवेतून वगळण्यात आलं

आपण जर जिझियाची व्याख्या आणि त्याच्या कक्षा समजून घेतल्या तर अधिक सोयिस्कर होईल. इस्लाममध्ये जिझिया म्हणजे एक प्रकारचा दंडनीय कर असे कधीच समजलं गेलं नव्हतं, तर हा काही लोकांचा विशेषाधिकार होता, ज्यांना इस्लामी राजवटीत सैन्यात भरती केलं जात नसतानादेखील त्यांना संरक्षण दिलं जायचं. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी इस्लामी राज्यात राहणाऱ्या बिगर मुस्लिमांना जिझिया कर लागू करून त्याबद्दल त्यांना सुरक्षेची हमी लिखित स्वरूपात दिली होती. याबाबतच्या ज्या तरतुदी लिहून ठेवल्या गेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे–

१. त्यांच्या जिवांचं रक्षण केलं जाईल. जर त्यांच्यावर शत्रूंनी हल्ला केला तर इस्लामी राज्याचं सैन्य त्यांचा प्रतिकार करतील, त्यांना कसलीही शारीरिक हानी पोचू देणार नाहीत.

२. त्यांची मालमत्ता, घरंदारं, शेती आणि त्यांच्या मालकीतील सर्वांची सुरक्षा केली जाईल.

३. जिझिया वसूल करणारे कारकून त्यांच्याकडे स्वत: जातील. त्यांनी स्वत: येऊन कार्यालयात जमा करण्याची गरज नसेल.

४. त्यांच्या व्यापार-उदिम, व्यापारी काफिले आणि इतर जीवनावश्यक स्रोतांना इस्लामी राजवटीचं संरक्षण प्राप्त असेल.

५. त्यांचं धर्मांतर करण्यासाठी कसलाही प्रयत्न केला जाणार नाही की त्यांच्या धर्मश्रद्धेची अवहेलना केली जाईल.

६. त्यांचे पंडित-पुजारी, पुरोहित, बिशप्स, साधु-संत यांना त्यांच्या पदावरून काढले जाणार नाही.

७. त्यांच्या मूर्ती, चित्रं, क्रॉस, धर्मस्थळे आणि सर्व धार्मिक प्रतीकांची सुरक्षा केली जाईल.

८. त्यांच्या राहत्या वस्त्यांवर सेना धाड घालू शकणार नाही.

९. त्यांच्याकडून उश्र (कृषी उत्पादनावरील १/१० प्रमाणे कोणताही कर घेतला जाणार नाही.

१०. त्यांना परंपरागत लाभत असलेले हक्काधिकार कमी केले जाणार नाहीत.

११. हे नियम अशा बिगर मुस्लिमांनाही लागू असतील जे भविष्यात अस्तित्वात येतील.

(संदर्भ : 'धर्म इस्लाम', हिंदी, ईश्वरनाथ टोपा)

इस्लामी राज्यव्यवस्थेनं या नियमांचं पूर्णपणे पालन केलं. इस्लामचे चौथे खलीफा (इस्लामी शासनाचे सत्ताधीश) हजरत अली यांनी ठळकपणे उद्गारले की ज्या लोकांनी स्वेच्छेनं मुस्लिमेतर असणं स्वीकारलं आणि जिझिया देणयाचं मान्य केलं त्यांना सुरक्षा दिली जाईल. त्यांचं रक्त आमच्या रक्तासारखं, त्यांचं जगणं आमच्या जगण्यासारखंच. ज्या मुस्लिमेतरांनी स्वेच्छेनं इस्लामी सैन्यात सेवा करण्याचं निवडलं, त्यांना जिझिया करातून वगळण्यात आलं.

## धर्मांतर घडवण्यासाठी नव्हे

मुस्लिमेतरांना इस्लाम स्वीकारण्याची सक्ती करण्यासाठी जिझियाची तरतूद केली नव्हती. ज्या प्रमाणात हा कर लागू केला जात होता ते जस्त नव्हतं की त्यास एक प्रकारचा दंडनीय कर समजला जावा. इतिहासात याची साक्ष नोंदवून ठेवली आहे की जिझिया हा इस्लाम धर्मात धर्मांतर करण्यासाठी योजला गेला नव्हता.

# ताबेदारी नव्हे

त्या काळात मुस्लिमेतरानं स्वत:ची गुलामी किंवा ताबेदारी जाहीर करण्यासाठी जिझियाला मान्य केलं असे नाही. इतिहासाद्वारे ही माहिती मिळते की औरंगजेब यांनी अनेक हिंदू सैनिकी अधिकारी, जसे जसवंतसिंग (त्यांच्या प्रशासनातील संरक्षणमंत्री), राजा राजरूप, कबीर सिंह, उरघनाथ सिंग, प्रेम देव सिंग, दिलीप रॉय आणि रसिक लाल क्रॉय यांची नेमणूक केलेली होती. जर जिझिया देणं हा दंडनीय कर आहे हे त्यांच्यावर स्पष्ट झालं असतं तर त्यांनी या पदांचा स्वीकार करून आपल्या सन्मानाचा सौदा केला नसता. खरे पाहता अकबर बादशाहच्या दरबारात १४ हिंदू मनसबदार होते, तर औरंगजेबच्या दरबारात १४८ मनसबदार होते.

(संदर्भ : 'मुघल गव्हर्नमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन', श्री राम शर्मा, हिंद किताब्स, १९६१)

सर्वप्रथम मुस्लिम राजा अल्लाउद्दीन खिलजी यांनी मुस्तिमेतरांना जिझिया कर लागू केला होता. मुगल बादशाह अकबर याने तो रद्द केला होता आणि औरंगजेब यांनी पुन्हा (इ.सन १६५८-१७०७) पुन्हा तो लागू केला, असे म्हटले जाते. विलक्षण गोष्ट अशी की औरंगजेबने हिंदूंना शिक्षा करण्यासाठी हा कर लागू केला होता, यात तथ्य नाही. त्याचवेळी आपण पाहतो की त्यानं अकबर आणि जहांगीर बादशाह यांनी लागू केलेले ६५ प्रकारचे कर रद्द केले होते. ज्यामुळे औरंगजेबच्या शासनकाळात राष्ट्रीय उत्पादनात ५० दशलक्ष रुपयांचा तुटवडा झाला.

(संदर्भ : 'मुघल ॲडमिनिस्ट्रेशन', जदुनाथ सरकार)

## मध्यपूर्व देशांमध्ये कर नाहीत

शेवटी आपण आधुनिक मुस्लिम जगातकडे वळू या. जवळपास ७० लाख भारतीय ज्यामध्ये मुस्लिमेतरांची संख्या जास्त आहे, ज्यात कारकून आणि व्यवस्थापक यांचा समावेश आहे, सध्या मध्यपूर्वेतील मुस्लिम देशांमध्ये नोकरी आणि इतर व्यवसाय करत आहेत. त्यांच्यातल्या कुणाकडूनही कोणत्याच प्कारचा कर घेतला जात नाही. इतकंच नव्हे तर त्यांच्याकडून आयकरसुद्धा घेतला जात नाही. जर ते भारतात, मायदेशी नोकरी-व्यवसाय करत असते तर अशा प्रचंड पगारदाराकडून आयकर वसूल केला गेला असता. एवढंच नाही तर त्यांना तिथं सेल्स टॅक्स आणि सेवाशुल्कही द्यावं लागत नाही. या देशांपैकी काही तर अंशत: वैचारिक राष्ट्रं आहेत. ते कोणताही कर लागू करत नाहीत. खरे पाहता त्यांच्यामधील अनेक देशांमध्ये त्यांना मोफत वैद्यकीय सेवा, प्रवास भत्ता आणि इन्शुरन्सची सुविधा प्राप्त आहे.

या चर्चेद्वारे जे उघड होत आहे ते असे की मुस्लिम सत्ताधारी आपल्या धर्माच्या नियमांचं पालन करत होते आणि विविध परिस्थितींमध्ये लोकांना सामावून घेत होते.

## हिरवा रंग

ही धरणादेखील आहे की हिरवा रंग मुसलमानांसाठी पवित्र आहे. इस्लामी श्रध्देनुसार कोणताही रंग पवित्र नाही. सर्वच रंग सर्वशक्तिशाली अल्लाहतर्फे प्रदान केले गेले आहेत. तथापि एक कथन आहे की हिरवा रंग पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना पसंत होता. कारण त्याचा स्वभाव चांगला व शीतल आहे. सध्या याला स्वाभाविकत: प्रेमाचा संकेत समजला जातो.

# वंदे मातरम्

## राष्ट्रप्रेमापेक्षा राजकारण अधिक

या गीताचा इतिहास गुंतागुंतीचा आहे. हे गीत बंकीमचंद्र चटर्जी यांनी लिहिले. नंतर त्यांच्या 'आनंद मठ' या कादंबरीत याचा समावेश केला गेला. या कादंबरीत तीव्र स्वरुपाची मुस्लिम विरोधक साहित्य आहे. हे गीत समाजाच्या एका वर्गात खूप लोकप्रिय होते, परंतु मुसलमानांचा या गीताबाबत तीव्र आक्षेप होता कारण या गीतात भारताची तुलना दुर्गा देवीशी केली गेली आहे. इस्लाम एकेश्वरवादी धर्म असल्यामुळे अल्लाहशिवाय अन्य कोणत्याही उपास्याची उपासना करण्याची अनुमती तो देत नाही. परंतु पुराणमतवादी तत्त्वे, हे गीत गाण्यास नकार करण्याबाबत मुस्लिम समुदायावर नेम साधण्याची संधी पाहतात आणि जो कोणी हे गीत गाण्यास नकार देतो, त्याला देशद्रोही ठरवितात.

राष्ट्रीयत्व आणि देशप्रेम मुसलमानांनाही पसंत आहे, परंतु याचे क्षेत्र देशपूजापर्यंत पसरलेले नाही. राष्ट्रभक्ती आणि देशप्रेमामध्ये एक अंतर राखले जाते. देश मग तो सऊदी अरब असो किंवा इराण असो, तिथल्या नागरिकांना आपल्या राष्ट्राची उपासना करा असे सांगितले जात नाही. राष्ट्राशी एकनिष्ठता राष्ट्राला ईशत्वाच्या स्थानाप्रत पोहचवू शकत नाही.

प्रसिध्द कवी रविंद्रनाथ टागोर यांनी लिहिलेल्या 'जन गण मन' या कवितेची राष्ट्रगीत म्हणून निवड केली गेली आहे, कारण त्यात देशाच्या अनेकतेची व विविधतेची प्रशंसा केली गेली आहे. ही बाब उल्लेखनीय होय की वंदे मातरम या गीताची फक्त दोन कडवी राष्ट्रगीत म्हणून अंगीकारलेली आहेत. उर्वरित भागाला राष्ट्रगीताच्या स्वरुपात घेतले गेले नाही, ज्यात हिंदू देवी-देवतांची तुलना मातृभूमीशी केली गेली आहे.

काही तत्त्वे 'जन गण मन'चे महत्त्व कमी करण्यात पुढाकार घेत राहिलेत. या संदर्भात त्यांचे म्हणणे असे की हे गीत ब्रिटनचा सम्राट जॉर्ज पंचमच्या भारतात आगमनप्रसंगी त्याच्या स्तुतीप्रित्यर्थ लिहिले गेले होते. हे मनोरचित कथन अलिकडच्या काळातच रचले गेले आहे, जेणेकरून नोबेल पारितोषिक विजेत्याची प्रतिमा डागाळली जावी, ज्यांचे साम्राज्यवादविरोधी विचार साऱ्या जगाला माहीत आहेत.

नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या 'आजाद हिंद सेना'ने 'जन गण मन' या गीताला राष्ट्रगीतच्या स्वरुपात अंगीकारले आणि महात्मा गांधी म्हणत असत की '''जन गण मन'ने आमच्या राष्ट्रीय जीवनात एक स्थान निर्माण केले आहे.'' याच कारणास्तव काही तत्त्वे जन गण मनला दूर सारुन बंकिमचंद्र चटर्जी लिखित वन्दे मातरम्‌ला त्या जागी आणू इच्छितात.

वंदे मातरम् गाण्याबाबत मुसलमानांचा विरोध, 'जन गण मन'चे महत्त्व कमी करण्याच्या, भारतातील काही तत्त्वांद्वारे केल्या जाणाऱ्या प्रयत्नांच्या तुलनेत, कमी महत्त्वाचा आहे. वस्तुत: ही बाब जातीयवादी राजकारणाचा पैलू आहे, जो एका समुदायाला राष्ट्रगौरव साजरा करण्याच्या किंवा राष्ट्राचा सन्मान करण्याच्या पध्दतीची निवड करण्यापेक्षा अधिक एका समुदायाला कोपऱ्यात ढकलण्याचा प्रयत्न आहे.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयानेही आपला दृष्टिकोन स्पष्ट केला जेव्हा 'विटनेस फेथ'च्या काही शाळकरी मुलांनी राष्ट्रगीत गाण्यास नकार दिला होता, कारण त्यांचा धर्म हे गीत गाण्याची अनुमती देत नव्हता. परिणामी शाळेने या मुलांना शाळेतून काढून टाकले. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले, ज्याने आपले मत मांडताना म्हटले की कोणतेही धर्मनिरपेक्ष न्यायालय एखादी धार्मिक श्रध्दा उचित असण्या किंवा नसण्याची तपासणी करू शकत नाही. ज्या आधारावर न्यायालयाने हा निर्णय घेतला होता, हे मूल्यांकन होते की काय ही श्रध्दा खरोखर एखाद्या समुदायाच्या एक महत्त्वाच्या गटाद्वारे धार्मिक हेतुने राखली जाते आणि हे की ही श्रध्दा सामाजिक शांतीव्यवस्था आणि नैतिकतेविरुध्द तर नाही? सर्वोच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या हकालपट्टीला रद्द केले आणि म्हटले की ही काढून टाकण्याची कारवाई

घटनेच्या कलम २५ द्वारे दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या हमीविरुध्द आहे आणि त्या विद्यार्थ्यांना पुनश्च शाळेत घेतले गेले.

आमचे एक प्रख्यात कायदेतज्ञ श्री. सोली सोराबजी यांनी जस्टिस चिनप्पा रेड्डी यांच्या निकालाच्या आधारावर या निर्णयाच्या तार्किकतेचे स्पष्टीकरण केले आहे,

''आमची परंपरा सहनशीलतेची शिकवण देते, आमचे तत्त्वज्ञान संयम बाळगण्याची शिकवण देते, आमची घटना (संविधान) सहनशीलतेच्या आधारावर काम करते. आपण या सहनशीलतेला घटवू नये.''

# तलाक

## (घटस्फोट)

अनेकविध धर्मांमध्ये इस्लाम हा पहिला धर्म आहे, ज्याने विवाह आणि घटस्फोटाची सोपी आणि विस्तृत पध्दत सादर केली. पवित्र कुरआनानुसार विवाह एक पुरुष आणि स्त्रीच्या दरम्यान एका सामाजिक कराराच्या माध्यमाने घडून येतो. स्त्री आणि पुरुष काही व्यक्तींच्या अर्थात साक्षीदार आणि काजीसमक्ष एक प्रतिज्ञा घेतात. दोन्ही पक्षांकडून एक जण विवाहाचा प्रस्ताव मांडतात, दोन जण साक्षीदार बनतात आणि हा वैवाहिक करार काजी कलमबध्द करतो, याप्रसंगी काजी पवित्र कुरआनातील काही आयतींचे (वचनांचे) पठण करतो, ज्याला निकाहचा खुतबा (प्रवचन) म्हटले जाते. नंतर काजी दुल्हा (वर) आणि दुल्हन (वधू) दोघांच्या सह्या घेतो. अशा प्रकारे हा समझोता दोन्ही पक्षांद्वारे स्वीकारला जातो आणि विवाह-समारंभ समाप्त होतो.

परंतु जर दोन्ही पक्षांना असे आढळून आले की वर-वधूंचा स्वभाव, आवडी-निवडी परस्पर-भिन्न आहेत आणि मूल-बाळ झाल्यानंतरही जमेनासे झाल्याने एकत्र राहू शकत नाही, तर अशा स्थितीत इस्लामने यातल्या तथ्यांना आणि मानव-स्वभावाच्या वैशिष्ट्याला ध्यानी घेतले आणि विभक्त होण्याची उपाययोजना केली. विभक्त होण्यासाठी मोठी विस्तारपूर्वक प्रक्रिया पार पाडली जाते. याच प्रक्रियेला 'तलाक' म्हटले जाते. कशीतरी ही धारणा बळकट झाली आहे की एक मुस्लिम पुरुष आपल्या पत्नीला फक्त तीन वेळा तलाक म्हणून घटस्फोट देऊ शकतो. आता या प्रक्रियेशी बरीचशी विडंबनाही जोडली गेली आहे. तलाकच्या संदर्भात काही अविचारी मौलवींनी असे काही फतवे दिले आहेत की जर कोणी फोन मोबाईल किंवा एस.एम.एस. संदेश अथवा ई-मेल पाठवून आपल्या पत्नीला तलाक देतो, तर तो तलाक

मान्यताप्राप्त ठरतो, याला दुजोरा देण्यासाठी काही मौलवींचे कथन, पुष्टी म्हणून जोडले जाते की ते अशा प्रकारचा तलाक वैध असल्याची अनुमती देतात, मग एखाद्याने दारू पिऊन नशेच्या अवस्थेत किंवा स्वप्नातही तलाक शब्दाचा उच्चार केलेला का असेना. ही सर्व बॉलीवुड चित्रपटांसाठी एक मसालेदार सामग्री बनली आहे.

त्याचप्रमाणे ही गोष्टदेखील विचार करण्यायोग्य आहे की इस्लाम धर्म, कशा प्रकारे असा तलाक वैध ठरविल जो मद्याधुंद अवस्थेत दिला गेला असेल, वस्तुत: नशेच्या अवस्थेत पढली गेलेली नमाज स्वीकृत ठरत नाही. यास्तव यात शंका घेणे फायद्याचे ठरेल की काही स्वत:चा स्वार्थ बाळगणारे गट इस्लाम आणि त्याच्या कौटुंबिक कायद्याविरुध्द अशा प्रकारच्या भ्रामक कल्पना पसरवित आहेत. अर्थात कोणताही सूज्ञ मनुष्य अशा निर्णायक मतांचा स्वीकार करू शकत नाही.

या संदर्भात निदान असे म्हटले जाऊ शकते की मीडियाद्वारे हा खेळ पूर्णत: खोडकरपणे खेळला जात आहे. पहिली गोष्ट तर ही की मीडिया आणि वृत्तपत्रांमध्ये तलाकसंबंधीच्या ज्या बातम्या प्रकाशित होतात, त्यांच्याबाबतीत सत्य हे आहे की मुस्लिम विवाहाचा परिणाम तलाकच्या स्वरुपात कमीच होतो दुसरे असे की हे अगदी शक्य आहे की अशा प्रकारच्या काही घटना हेतूपुरस्सररीत्या लोकांसमोर आणल्या जात असतील, ज्यामुळे ‘टेलिविजन रेटिंग पॉईंट’ वाढवला जावा आणि यासाठी काही सूज्ञता न बाळगणाऱ्या मौलवींकडून फतवा प्राप्त केला जावा. तिसरी गोष्ट आमच्याकरिता दुर्भाग्यपूर्ण बाब होय, काही मुसलमान बेजबाबदारपणे आचरण करीत, कमी ज्ञानामुळे किंवा क्रोधावेशात तीन तलाक देऊन मोकळे होतात आणि मुस्लिम स्त्रीचे आयुष्य उद्ध्वस्त करतात. यामुळे इस्लामच्या प्रतिमेला फार मोठी हानी पोहचते आणि ज्यामुळे इस्लाममध्ये तलाकच्या विचारसरणीवर टीका करण्याची आणि इस्लाम धर्मावर चिखलफेक करण्याची काही लोकांना आयती संधी मिळते.

इस्लाम धर्म पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या वैयक्तिक स्वभावाच्या विविधतेला मान्य करतो. वस्तुत: निकाह त्यांना पती-पत्नीच्या स्वरुपात

जोडतो, तथापि त्या सर्वशक्तिमान अल्लाहने त्यांना विभक्त होण्यासाठीची उपाययोजनाही केलेली आहे जो समस्त मानवजातीचा निर्माणकर्ता आहे. जर ही उपाययोजना नसती तर अशा अनेक विवाहित जोड्यांचे जीवन नरकमय झाले असते, जे साधारणपणे संसाराची गाडी एकत्रपणे खेचू शकत नाहीत. पुरुषांनी स्त्रियांचे हत्यासत्र सुरु केले असते, अथवा स्त्रियांनी, वैवाहिक जीवनातल्या असह्य कटुतेला कंटाळून आत्महत्येचा मार्ग पत्करला असता. इस्लाम धर्म, निश्चितपणे, एका अशा पुरुष आणि स्त्रीला एकत्रित बांधून ठेवू इच्छित नाही, जे एकत्रित राहण्याचा मनापासून तिटकारा करतात आणि आपली आवड, स्वभाव आणि प्रवृत्ती यांच्या दरम्यान अनुकूलता आणण्यात अयशस्वी ठरतात. याच कारणास्तव या वैवाहिक संबंधातून बाहेर काढण्याचा एक मानाचा मार्ग उपलब्ध करून दिला गेला आहे. यालाच तलाक असे म्हणतात, जे जातीसमूह आपल्या वैवाहिक बंधनाला कोणत्याही परिस्थितीत तोडण्याची अनुमती देत नाहीत, त्यांच्यातल्या स्त्रियांना धमकाविले जाते, मारहाण केली जाते, अनेकविध प्रकारे छळले जाते, एवढेच नव्हेतर त्यांना जाळून ठार मारले जाते.

आज दुर्दैवाने तलाकच्या उपाय योजनेचा काही मुस्लिम पुरुष दुरुपयोग करताना आढळतात आणि गेल्या काही वर्षात इस्लामी कायद्याच्या चुकीच्या स्पष्टीकरणाने, यास चुकीच्या पध्दतीने लागू करण्याची आणि याला वैध ठरविले जाण्याची शक्यता असल्याचे सांगितले आहे.

परंतु वास्तविकता ही आहे की इस्लाम धर्मात तलाक अतिशय तिरस्करणीय उपाययोजना आहे. तथापि ही केवळ प्रतिकूल विवाहांना समाप्त करण्यासाठीच इस्लामी शरीयतीत एक उचित उपाययोजना आहे.

पवित्र कुरआनात तलाकची अनुमती दिली गेली आहे, तथापि पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी म्हटले आहे,

> ''समस्त उचित आणि धर्मसंमत कर्मांमध्ये, अल्लाहच्या
> दृष्टीने तलाकपेक्षा कोणतीही गोष्ट अप्रिय नाही.''

एखाद्या पतीने आपल्या पत्नीला तलाक कशा प्रकारे द्यावा याचे

वर्णन कुरआनात अशा प्रकारे दिले गेले आहे :

> ''जर तुम्ही स्त्रियांना तलाक द्याल आणि त्या आपली इद्दत पूर्ण करून घेतील, तर मग एक तर तुम्ही आपल्या पत्नीला भलेपणाने राखायचे असेल तर राखा अन्यथा सन्मानाने बिदा करा.'' (कुरआन : २ : २३१)
>
> अन्य एका ठिकाणी पुन्हा हा आदेश दिला गेला आहे की :
>
> ''तलाक दोन वेळा आहे मग सामान्य नियमानुसार (स्त्रीला) रोखले जावे किंवा भल्या पध्दतीने बिदा केले जावे आणि तुमच्याकरिता उचित नव्हे की, जे काही तुम्ही त्यांना देऊन टाकले आहे, त्यातून काही परत घ्यावे, या स्थितीखेरीज की दोघांनाही भय असावे की ते अल्लाहच्या (निर्धारित) मर्यादांवर कायम राहू शकणार नाहीत.''
>
> (कुरआन : २ : २२९)

वर दिलेल्या आयतींना जर सूरह निसाच्या ३४ व्या आणि ३५ व्या आयतींसोबत एकत्र वाचल्यास, सात टप्प्यांवर आधारित तलाक प्रक्रिया ध्यानी येते. परंतु कसे तरी या प्रक्रियेला विसरण्यात आले आहे आणि निकाह लावणाऱ्या काजींनी, पतीद्वारे उच्चारलेल्या 'तलाक' शब्दाने विवाह-बंधन तोडले जाण्याला वैध ठरवून घेतले आहे.

जे लोक अशा प्रकारे तलाक देतात, त्यांच्याविषयी पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हे घोषित केले की हे लोक अल्लाहच्या आदेशांशी खेळ खेळतात. ज्या पुरुषाने अशाच प्रकारे तलाक दिला होता, त्याला पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे निकटस्थ सहकारी हजरत उमर (रजि.) यांनी दंड केला होता.

# खुलअ

## तलाक प्राप्त करून घेण्याचा स्त्रियांचा अधिकार

जेव्हा पती-पत्नी अशा स्थितीप्रत पोहचतील की दोघेही आपल्या विवाह-बंधनाला यापुढे चालू ठेवू इच्छित नसतील आणि पत्नी स्वत: आपल्या पतीपासून तलाक घेऊ इच्छित असेल तर इस्लाम तिलादेखील हा अधिकार प्रदान करतो. जर पती तलाक देण्यास इन्कार करीत असेल तर एक मुस्लिम स्त्री तलाक मिळविण्यासाठी काजीकडे जाऊ शकते. परंतु हा तलाक ताबडतोब होऊ शकत नाही. यात एक इद्दत (कालावधी) किंवा प्रतीक्षेचा अवधी असला पाहिजे. जसे की प्राध्यापक कूलजन म्हणतात की हा कुरआनाचा सर्वश्रेष्ठ शोध आहे. हा कालावधी त्या वेळेपर्यंत असतो, जेव्हा पत्नी तीन मासिक पाळी पूर्ण करते आणि ती जर गर्भवती असेल तर हा कालावधी प्रसूतिपर्यंत असतो.

या कालावधीत तिला आपल्या पतीकडून आर्थिक मदत प्राप्त करण्याचा अधिकार आहे. प्रतिक्षेचा हा कालावधी एकमेकात समेट घडवून आणण्याकरिताही उपयोगात आणला जाऊ शकतो. पवित्र कुरआनात अल्लाहने पैगंबर (स.) यांना स्पष्टत: म्हटले आहे :

> ‘‘हे पैगंबर (स.)! सांगा की जेव्हा तुम्ही स्त्रियांना तलाक द्याल तर ध्यानी असू द्या की तलाक त्यांच्या इद्दतवर देणे आणि इद्दतची गणना करा. अल्लाहचे भय राखा. तोच तुमचा पालनहार आहे. न तुम्ही स्वत: त्यांना त्यांच्या घरातून बाहेर काढावे आणि न त्यांनी स्वत: निघूनजावे परंतु जेव्हा त्या उघडपणे निर्लज्जतेचे कृत्य करतील.’’
>
> (कुरआन - ६५ : १)

# फतवा

'फतवा' म्हणजे इस्लामी शरीअतचा एक धर्मशास्त्रीय दृष्टिकोन परंतु काहीजण याला धार्मिक न्यायालयाचा आदेश समजतात. याचे कारण हे आहे की काही हास्यास्पद फतव्यांचा प्रचार केला जातो. ज्यामुळे जनसामान्यात ही धारणा निर्माण झाली की अधिकांश मुसलमान अशा प्रकारचे फतवे मान्य करतात आणि त्यांचे पालनही करतात. वास्तविक सामान्य मुसलमानांपैकी खूप कमी असे आहेत जे मुफ्तीजवळ एखाद्या प्रकरणासंबंधी कायद्याचा सल्ला घेण्यासाठी जातात.

एखादा फतवा विचित्र आणि न्यायमूल्यांशी विसंगत वाटला तरीसुध्दा. तथापि त्यात असा विवाद निर्माण व्हायला नको, ज्या प्रकारचा विवाद आज दिसून येत आहे. मीडिया (प्रसारमाध्यमे) विलक्षण आणि मुर्खतापूर्ण गोष्टींच्या शोधात असतो आणि याद्वारे तो इस्लामी धार्मिक संस्थांच्या प्रतिमेला गालबोट लावू इच्छितो, म्हणूनच तो अशा प्रकारच्या दस्तावेजांवर तुटून पडतो आणि त्यासंबंधी आरडा ओरड करतो. देशात सहस्त्रावधी मदरसे आहेत आणि या मदरशांमध्ये विवाद मिटविणाऱ्या कमेट्यादेखील आहेत, तेव्हा त्या ठिकाणी एखाद्या विशिष्ट खटल्या संदर्भात अनेक प्रकारचे धार्मिक दृष्टिकोन येऊ शकतात. विचित्र बाब ही की मीडिया काही फतव्यांना उराशी कवटाळून त्याला निर्णायक रुप देतो आणि मग त्याला रुढिवादाचा नमुना म्हणून सादर करतो. याहून क्लेशदायक बाब ही की लोकांच्या मते अधिकांश मुसलमान अशा धार्मिक सल्ला-मसलतींशी अत्याधिक ओढ राखतात.

ही गोष्ट योग्य पार्श्वभूमीत समजून घेण्याकरिता हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की फतवा म्हणजे एखाद्या न्यायाधीशाने दिलेला निकाल नव्हे. हा केवळ धर्मशास्त्रीय दृष्टिकोन आहे. इंग्रजीचा एक विश्वकोष 'ए शॉर्टर

इन्सायक्लोपीडिया ऑफ इस्लाम' फतव्याची व्याख्या अशा प्रकारे करतो:

(अनुवाद) ''हा मुफ्तीद्वारे दिलेला एक औपचारिक कायदेशीर दृष्टिकोन आहे, जो एखाद्या न्यायाधीशाने किंवा एखाद्या व्यक्तीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणून आहे.''

फतवे केवळ दृष्टिकोनाचे स्थान राखतात आणि हे कुणावर बंधनकारक नसतात. यांना मान्यही केले जाऊ शकते आणि अस्विकृतही केले जाऊ शकते. ज्या लोकांकडे या दृष्टिकोनाची विचारणा केली जाते. तेदेखील फतवा मानण्यावर किंवा त्याचे पालन करण्यावर आग्रह धरत नाही. ते स्वत: म्हणतात की तुम्ही वाटेल तसे याला मान्यही करू शकतात आणि अमान्यही करू शकतात. जे लोक गुंतागुंतीच्या समस्यांना तोंड देतात, ते धार्मिक संस्थांकडून धर्मशास्त्रासंबंधीचे मार्गदर्शन घेतात आणि जेव्हा ते यांना स्वभावत: परस्पर विरोधी असल्याचे पाहतात तेव्हा त्यांना नवल वाटत नाही.

# कुफ्र आणि काफिर

काफिर या शब्दाविरुध्दही आक्षेप घेतले गेले आहेत. मीडियाच्या काही विभागांनी याला विवादास्पद स्वरुपात सादर केले आहे, जणू हा शब्द मुसलमानांकडून मुस्लिमेतरांना शिवीगाळ करण्यासाठी किंवा त्यांना अपमानित करण्यासाठी वापरला जातो. खरे तर या शब्दाला आणि त्याच्या अर्थ व आशयाला चुकीचे समजण्यात आले आहे.

'काफिर' हा शब्द याचा धातु शब्द 'कुफ्र'पासून बनला आहे. 'कुफ्र'चा अर्थ 'काही झाकणे' किंवा 'लपविणे' असा होतो. 'रात्री'ला 'काफिर' म्हटले जाते, कारण ती प्रकाश लपविते. दाट काळ्या ढगांनाही काफिर म्हटले जाते कारण ते प्रकाशमान आकाशाला आणि सूर्याला लपवितात. किंबहुना, शेतकऱ्यालाही काफिर म्हटले गेले आहे, कारण तो शेतात बीज लपवितो.

काफिर किंवा कुफ्र शब्दाशी नकारात्मक अर्थ जुळलेले नाहीत. तेव्हा याबाबत कोणाचा अपमान होतो असे मुळीच नाही. कुफ्र हा शब्द मुस्लिमेतर शब्दाचा पर्याय नाही आणि न सगळेच मुस्लिमेतर लोक काफिर आहेत. धार्मिक परिभाषेनुसार काफिर तो होय, जो एखाद्या गोष्टीच्या सत्यतेला नाकारतो किंवा तिला स्वीकारण्यास इन्कार करतो अशा प्रकारे एका धर्माचे लोक, दुसऱ्या धर्माच्या लोकांसाठी काफिर ठरतात. साम्यवादी आणि भांडवलशाहीचा पुरस्कर्ता दोघे एकमेकांचे काफिर आहेत. तथापि इस्लामी परिभाषेत जो मनुष्य अल्लाहव्यतिरिक्त अन्य एखाद्या उपास्याला मानण्यास इन्कार करतो, तो ईमान धारक आहे. वस्तुत: काफिर तो होय जो इन्कार करतो, परंतु यात अपशब्द वापरण्याची भावना मुळीच नाही.

हे समजून घेणे आवश्यक आहे की अल्लाहने धर्माच्या संदर्भात प्रत्येकाला स्वेच्छेने निवड करण्याचे स्वातंत्र्य प्रदान केले आहे.

या संदर्भात कुरआन फर्मावितो :

“धर्माच्याबाबतीत कसलीही जोर जबरदस्ती नाही. उचित गोष्ट नादानीच्या गोष्टीपासून वेगळी होऊन स्पष्ट झाली आहे. तेव्हा आता जो कोणी उल्लंघन केलेल्या विद्रोहीला नाकारुन अल्लाहवर ईमान राखेल, तर त्याने असा भक्कम आधार धरला, जो कधीही तुटणारा नाही. अल्लाह सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे.” (कुरआन- २ : २५६)

यास्तव इस्लाम आणि मुसलमानांना हा अधिकार नाही की, त्यांनी त्या लोकांना अपमानित करावे, जे एक अल्लाह आणि सर्व पैगंबरांशी श्रध्दा भाव राखत नाहीत.

# मुसलमान मांसाहारी का असतात?

पारंपरिक स्वरुपात मानवजाती दोन उगमांपासून लाभणाऱ्या अन्न-सामुग्रीवर अवलंबून राहिली आहे. त्यापैकी एक म्हणजे शेती आणि बागांपासून आणि दुसरा जनावरांपासून जे मूलत: गुराढोरांपासून प्राप्त केले जाते आणि काही जलचर प्राण्यांपासूनदेखील जे लोक केवळ वनस्पतींपासून आपले खाद्य प्राप्त करून जीवन जगतात, त्यांना 'शाकाहारी' म्हटले जाते आणि जे लोक आपला उदरनिर्वाह वनस्पतींखेरीज पशूंपासूनही प्राप्त करतात त्यांना 'मांसाहारी' म्हटले जाते. भोजन करण्याच्या आधारावर आणखी एक प्रवर्ग आहे, ज्याला इंग्रजीत 'वेगन' असे म्हणतात. हे लोक अशा प्रत्येक खाद्य-पदार्थांपासून पथ्य राखतात, जे जनावरांपासून प्राप्त होतात. उदा. दूध, मध, अंडे आणि दुधापासून उत्पादित इतर सर्व पदार्थ.

गेल्या काही वर्षांमध्ये शाकाहारी आणि इंग्रजी शब्द वेगनिजम़ हे जागतिक स्वरुपाचे आंदोलन बनले आहेत. यांचा आधार जनावरांच्या हक्कांचा आदर आणि आपल्या मानवी गरजा भागविण्यासाठी त्यांचा वापर न करणे या गोष्टींवर आहे. हे लोक अशा प्रत्येक गोष्टीचे पथ्य बाळगतात, जिच्यामुळे पशू-हत्या होते. यास्तव ते त्यांच्यापासून कोणताही लाभ प्राप्त करण्यापासून दूर राहतात.

ख्रिश्चन धर्म आणि ज्यू धर्माप्रमाणे इस्लाम अशा भूभागावर उदयास आला आणि अशा समाजात उदयास आला, जो मूलत: शेतीचे काम करीत असे किंवा ग्रामीण होता. या तिन्ही धर्मांच्या पैगंबरांची मोठी लांब लचक रांग आहे जे पॅलेस्टीनसारख्या भूमीच्या जवळपास आले आणि अशा जमिनीवर विकसित झाले, जी जास्तकरून कोरडी होती आणि जिथे जनावरे चारणे आणि त्यांचे पालनपोषण करणे लोकांचा मुख्य व्यवसाय होता. या तिन्ही धर्मांच्या अनुयायींना वारसाच्या रुपात अशी पोषण परंपरा लाभली, जे

अधिकांश प्रमाणात पाशू-प्रोटीनवर आधारित होती. असेही नव्हते की या धर्मांनी, जनावरांची शिकार करणे आणि त्यांची हत्या करणे अनिवार्य केले होते आणि मांसाला त्यांच्या अन्न-सामुग्रीचे प्रमुख अंग बनविले होते.

दुसरे हे की अधिकांश धर्मांमध्ये पशूंना खाण्याकरिता जबह: करणे पूर्णपणे स्विकृत मानले जाते. तरीही काही धर्म असे आहेत, जे या गोष्टीला क्रूरता समजत नसले तरी अनैतिक अवश्य समजतात. भोजनाच्या सवयींचा संबंध दयाशीलता आणि सहानुभूतीशी नाही. एखादा मनुष्य मांसाहारी असूनही दयाळू आणि सहानुभूती राखणारा असू शकतो आणि याच्या उलट एक मनुष्य पूर्णत: शाकाहारी असूनही क्रूर व निर्दयी असू शकतो.

तिसरे असे की आधुनिक संशोधनाद्वारे हे सिध्द झाले आहे की वनस्पतीदेखील सजीव आहेत. त्यांनाही वेदना जाणवते आणि ते संगीत व यासारख्या इतर बाह्य प्रभावांबाबत आपली प्रतिक्रियाही व्यक्त करतात. त्यांनादेखील सुख-दु:खाची अनुभूति होते आणि पाण्यासाठी ते रडतातही. अमेरिकेतल्या शेतकऱ्यांनी अशा यंत्रांचा शोध लावला आहे, जे रोपट्यांचा रुदन-स्वर अशा वेळी वाढवितात जेव्हा त्यांना पाण्याची खूप गरज असते आणि ते अशा सिंचनयंत्राची निर्मिती करण्याचा प्रयत्न करीत आहे, जे अशा प्रकारे रोपट्यांच्या रडण्याने त्वरित सक्रिय व्हावेत.

इस्लामी सिध्दान्त या तत्त्वज्ञानावर आधारित आहे की मानव, या भूतलावर सर्वोच्च प्राणी आहे, ज्याला पृथ्वीच्या समस्त स्त्रोतांपासून लाभ घेण्याची आणि त्यांना उपयोगात आणण्याची पात्रता व परवानगी दिली गेली आहे. तथापि त्याला हा आदेशही दिला गेला आहे की त्याने या स्त्रोतांचा वापर अशा प्रकारे करावा की ते वाया जाऊ नयेत. आधुनिक कथनानुसार अशा प्रकारच्या वापराला अव्याहत वापर (Sustainable) म्हटले जाते. अर्थात नैसर्गिक साधन-संपत्तीचा वापर अशा प्रकारे करणे की निसर्गाला नैसर्गिक प्रक्रियेद्वारे त्या स्त्रोतांची भर काढता यावी.

इस्लामचे तत्त्वज्ञान मानवाकडून ही अपेक्षा करते की त्याने पृथ्वीच्या समस्त वस्तूंचे संरक्षक बनावे, ज्या जमिनीवर आहेत आणि ज्या जमिनीतून निर्माण होतात. त्याने त्यांच्यावर स्वामित्व गाजवू नये, त्यांचा खरा स्वामी

केवळ अल्लाह आहे मानव फक्त रक्षण करणारा आहे. यास्तव रक्षण करणाऱ्याने पूर्ण निष्ठा व प्रामाणिकतेने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे आणि या नैसर्गिक साधन-संपत्तीचा आपल्या गरजेनुसारच वापर केला पाहिजे. आपली लोभ-लालसा भागविण्यासाठी, मोहाच्या आहारी जाऊन त्यांची साठेबाजी करू नये.

कुरआन म्हणतो,

''हे ईमान बाळगणाऱ्यांनो! वचन-करारांचे पूर्णपणे पालन करा. तुमच्याकरिता चतुष्पाद प्रवर्गातील सर्व जनावरे वैध आहेत, मात्र ज्यांचा उल्लेख केला गेला ते वगळता.''

(कुरआन- ५ : १)

अन्य एका ठिकाणी कुरआन म्हणतो,

''आणि निश्चितच तुमच्याकरिता चतुष्पाद प्राण्यांमध्येही एक बोध आहे. त्यांच्या पोटांमध्ये जे काही आहे, त्यातून आम्ही तुम्हाला पाजतो. आणि तुमच्याकरिता त्यांच्यात अनेक फायदे आहेत आणि तुम्ही त्यांना खातातही.''

(कुरआन- २३ : २१)

पौष्टिक आहार-विशेषज्ञ या गोष्टीशी सहमत आहेत की मांस किंवा जंतू प्रोटीनयुक्त अन्न असते आणि हे त्या आठ आवश्यक अमीनो आम्लांची पूर्तता करते, ज्यांचे शरीरात एकत्रीकरण केले जाते आणि त्यांचे आहारात असणे आवश्यक आहे. मांसात लोह, विटॅमिन बी-१ आणि नियासिनही असतात. याउलट शाकाहारी भोजना, प्रोटीनचे प्रमाण अत्यल्प असते आणि ज्यामुळे एनेमिया रोग होऊ शकतो. ज्यापासून भारताची सर्वसामान्य जनता त्रस्त आहे. सर्वसामान्यांना प्रोटीनयुक्त पोषक आहार पुरेशा प्रमाणात प्राप्त होत नाही.

आपल्या तोंडाची आतली रचना बघा. लक्षपूर्वक पाहिल्यास असे दिसून येते की माणसाला अशा प्रकारचे दात दिले गेले आहेत, जे चावून खाणे व कापून खाणे या दोघाही कामांसाठी उपयुक्त आहेत. अर्थात निसर्गाने

मानवाला मांसाहारी आणि शाकाहारी दोन्ही प्रकारचे बनविले आहे. परंतु अशाच प्रकारे जर जनावरांचे निरीक्षण केले तर असे दिसून येईल की जनावरांचे दात केवळ चपटे असतात, ज्यांचा उपयोग फक्त चावून खाण्यासाठीच होतो. जंगलात राहणाऱ्या हिंस्र पशूंचे दात केवळ अणकुचीदार, कापून किंवा फाडून खाण्याच्या कामाचे असतात, जे भक्ष्याला कापून किंवा फाडून टाकण्यासाठी उपयुक्त असतात. तात्पर्य, माणसाकडून दोन्हीही प्रकारचे आहार खाण्याची आशा राखली जाऊ शकते अर्थात वनस्पती किंवा शाकाहार आणि गुराढोरांवर आधारित मांसाहार. त्याचप्रमाणे माणसाची पाचन शक्ती ही शाकाहारी व मांसाहारी दोन्ही प्रकारची अन्नसामुग्री पचविण्याची क्षमता बाळगते.

# मांसाहार लोकांना हिंसक बनवितो काय?

इस्लाम धर्म भोजन आणि आहारच्या संदर्भात काही नियम प्रस्तुत करतो. तो शाकाहारी पशूंचे मांस खाण्याची अनुमती देतो. विशेषत: आठ प्रवर्गाच्या चतुष्पाद (तो पशू जो दूध देणारा आणि चार पायांचा असतो अशा) प्राण्यांचे, परंतु मांसाहारी पशूंना खाण्यास मनाई करतो. इस्लाम धर्म ज्या जनावरांना खाण्याची अनुमती देतो त्या जनावरांमध्ये गाय, शेळी, मेंढा, उंट, म्हैस यांचा समावेश होतो. एवढेच नव्हे तर या वैध (हलाल) ठरविलेल्या जनावरांना हलाल पध्दतीनेच कापले गेले पाहिजे अन्यथा ते खाण्यायोग्य नाहीत ती जंगली जनावरे जे आपले खाद्य प्राप्त करण्यासाठी दुसऱ्या जनावरांची शिकार करतात, ते वैध (हलाल) नाहीत. येथपर्यंत की शाकाहारी जनावरांपैकी काही जनावरे उदा. डुक्कर मुसलमानांकरिता आणि ज्यूंकरिता हराम (निषिध्द) आहे.

या गोष्टीला कोणताही वैज्ञानिक आधार नाही की मांसाहार लोकांना अधिक हिंसक बनवितो. जसे या आधीच सांगितले गेले आहे की एखाद्या माणसाचे पालनपोषण आणि जगासंबंधी त्याचा दृष्टिकोन त्याला हिंसक किंवा शांतताप्रिय बनवितो. उदा. जर्मन देशाचा नेता ॲडॉल्फ हिटलर पूर्णत: शाकाहारी होता, परंतु त्याच्या अंत:करणात कुत्सित आणि वाईट महत्त्वाकांक्षा, अर्थात शेजारी राष्ट्रांना बलपूर्वक ताब्यात घेणे, यासारख्या भयंकर गोष्टी होत्या आणि वस्तुत: तो लक्षावधींच्या नरसंहारास जबाबदार होता. यास्तव अशा मनोरचित कल्पनांना तिरस्काराने रद्द करण्याची गरज आहे. कारण अशा कल्पित गोष्टी यालाच पात्र आहेत. प्रेम आणि सहानुभूती तसेच तिरस्कार व शत्रुत्व या गोष्टींचा संबंध खाद्य पदार्थांशी व आहाराशी जोडणे तर्कसंगत ठरत नाही. भारतातील आदिवासी अनेक प्रकारचे मांस खातात, परंतु त्यांच्याविषयी क्रूरतेची ओरड होत नाही.

# हलाल आणि हराम

## (वैध आणि अवैध)

इस्लाम धर्म आपल्या अनुयायींना, उचित जीवनयापनाकरिता विस्तृत मार्गदर्शनासोबत आचरणाचे नियम कायदे प्रदान करतो. ज्या गोष्टींना करण्याची, कृती करून दाखविण्याची आणि ज्या वस्तूंना खाण्याची व पिण्याची अनुमती दिली गेली आहे, त्यांना हलाल (वैध) म्हटले जाते आणि ज्या गोष्टींना किंवा वस्तूना करण्याची, अंमलात आणण्याची आणि खाण्या पिण्याची इस्लामी शरीयतीद्वारे मनाई केली गेली आहे, त्यांना हराम (अवैध) म्हटले जाते. हराम (निषिध्द) वस्तू खाल्ल्याने आणि हराम कर्म केल्याने अल्लाह नाराज होतो आणि अशा लोकांना पवित्र कुरआनात कडक शिक्षेची ताकीद सुनावली गेली आहे. अशा गोष्टींना गुन्हा म्हटले जाते. मुसलमानांनी या अपराधांपासून दूर राहिले पाहिजे. उदाहरणार्थ, मुसलमानांना डुकराचे मांस किंवा मद्यपान अथवा अन्य एखाद्या मादक पदार्थांचे सेवन करण्यास मनाई केली गेली आहे. मुस्लिम पुरुषांना सांगितले गेले आहे की त्यांनी सोन्याचे अलंकार आणि रेशमी कपडे अंगावर घालू नयेत. सोने कोणत्याही प्रकारे अंगावर घातले जाऊ शकत नाही, परंतु रेशम जर इतर सूत किंवा वुलनच्या धाग्यांसह विणले गेले असेल तर असे कपडे घातले जाऊ शकतात.

हराम व हलाल, वागणूक आणि अर्थोपार्जनाच्या मामल्यापर्यंतही विस्तृत आहे. मुसलमान असलेल्या व्यक्तीने आपली रोजी रोटी, अवैध साधनांद्वारे, उदा. चोरी, धोका, भ्रष्टाचार, लाच, अवैध वसुली आणि सट्टा जुगारसारख्या अन्य साधनांचा वापर करून, मुळीच प्राप्त करू नये. कोणताही ईमान बाळगणारा मनुष्य जो हराम साधनांनी कमविलेल्या धनाने लाभ प्राप्त करतो किंवा त्या धनाच्या आधारे जीवन जगतो, तो गुन्हेगार आहे. तद्‌वतच

ईमान बाळगणाऱ्या माणसाने व्यभिचारासारखे कृत्य करता कामा नये. एखाद्याची त्याच्या पश्चात निंदा-नालस्ती करणे, खोटे बोलणे, समलैंगिक समागम, दुसऱ्यांच्या पाळतीवर राहणे, टोमणे मारणे, इतरांची थट्टा उडविणे वगैरे वर्तनाचे असे प्रकार आहेत, जे अप्रियतेपासून हराम कर्मांच्या दरम्यान येतात.

# हलाल

## जनावरांना जबह: करण्याची (कापण्याची) इस्लामी पध्दत

मुसलमान आणि ज्यू हलाल (वैध) प्राण्यांना, मानेच्या खालच्या भागाकडून धर्मसंमत पध्दतीने 'जबह:' करण्यावर (कापण्यावर) आग्रह धरतात. ही पध्दत 'जबह:' केलेल्या जनावरातून संपूर्ण रक्त बाहेर पाडण्यास सहाय्यक ठरते. अशाने ही खात्री होते की मृत जनावराच्या रक्तनलिकांमध्ये रक्त साचून राहात नाही आणि अशा प्रकारे ते धार्मिक दृष्टीने शुध्द होते. जेव्हा हा 'जबीहा' मुसलमान करतो, तेव्हा याला हलाल म्हटले जाते आणि हा स्वीकार करण्यायोग्य भोजनाचा भाग आहे, ज्याला ज्यूदेखील खातात.

इस्लाम आणि ज्यू धर्म, जनावरांची मान खालच्या बाजूने कापण्यास सांगतात आणि वरून कापण्यास अवैध सांगतात. इस्लामी पध्दतीने केलेल्या जबहामुळे शरीराचा संबंध जनावराच्या मेंदूपासून तत्क्षणी तुटत नाही. यास्तव मेंदू रक्तस्त्राव होऊ देतो आणि जनावराचे मृत-शरीर रक्तरहित होते. रक्तरहित मांस स्वास्थ्यवर्धक असते आणि बराच वेळ ताजे राहते. या पध्दतीने श्वासनलिका आणि रक्तवाहिन्या कापल्या जातात, परंतु मागे असलेल्या मज्जारज्जुची यंत्रणा शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत असते आणि रक्ताचा शेवटचा थेंबही बाहेर काढून टाकते. जेव्हा जनावर पूर्णत: मृत होते आणि सर्व गात्रे शिथिल होतात, तेव्हा डोके शरीरापासून वेगळे केले जाते आणि मांसाचे तुकडे करण्याची प्रक्रिया पुढे पार पाडली जाते.

रक्त हे जीव-जंतू आणि अन्य विषारी घटकांची वाढ होण्याचे माध्यम मानले जाते. म्हणूनच 'जबहा' करण्याची इस्लामी पध्दत, 'जबहा'च्या इतर पध्दतींच्या तुलनेत अधिक आरोग्यदायक, स्वच्छ-शुध्द आणि जंतूरहित असते.

# हराम

## मद्य आणि जुगारावर प्रतिबंध

पवित्र कुरआन प्रामुख्याने ईमान बाळगणाऱ्यांना मादक पदार्थांचे सेवन आणि जुगाराच्या आहारी जाण्यापासून रोखतो. मद्य या कारणास्तव वर्ज्य केले गेले आहे की ते बुद्धीला नष्ट करते आणि सामाजिक वर्तनावर नकारात्मक प्रभाव टाकते. मादक पदार्थांना, विशेषत: मद्याला फार मोठ्या प्रमाणात अनेक सामाजिक अपायांचे, वाईट गोष्टींचे मूळ कारण मानले जाते. मद्यधुंद अवस्थेत गाडी चालविल्याने वाहतूक मार्गात होणाऱ्या अपघातांचे प्रमाण अधिक असते. गल्ली बोळातली भांडणे, स्त्रिया आणि लहान मुलांवर होणारा हिंसाचार, सामान्यत: मद्यधुंद अवस्थेच्या प्रभावापायी होतो, कारण मद्यपान करणारे आपले बौध्दिक संतुलन हरवून बसतात, त्यांना आपल्या सामाजिक आचरणाचा व वर्तनाचा विसर पडतो मद्यधुंद अवस्थेच्या प्रभावामुळे अमेरिकेच्या मद्यालयांमध्ये गोळीबार होणे एक नित्याची बाब बनली आहे. पवित्र कुरआन खालील शब्दांत ईमान राखणाऱ्यांना आदेश देतो की त्यांनी मद्य, अन्य मादक पदार्थ आणि सट्टा, जुगार व इतर अशा वाईट गोष्टींपासून दूर राहावे :

> ''श्रद्धावंत लोकहो! मद्य, जुगार, वेदी आणि बाणांचा शकुन वास्तवात वाईट आणि सैतानी कृत्ये आहेत. तुम्हांस यशस्वी व्हायचं असल्यास या गोष्टींपासून लांबच राहा.''
>
> (कुरआन- ५ : ९०)

दारू पिण्याची सवय आरोग्याला हानिकारक तर आहेच, त्याचबरोबर आर्थिकदृष्ट्या माणसाचा सर्वनाश करणारीही आहे. जे लोक दारुच्या धुंदीत असतात, ते विषयवासनेच्या आहारी जातात आणि सहजपणे

दुष्कर्म, बलात्कार, येथपर्यंत की आपल्या अगदी जवळच्या नात्यातील स्त्रियांशी कुकर्म करण्यास बळी पडतात.

इस्लाम धर्मात जुगार खेळणे हराम ठरविले गेले आहे, कारण याची वाईट सवय लागते आणि लाभाच्या तुलनेत जुगारहानी जास्त पोहचवितो. गृहस्थ जीवनाची अर्थव्यवस्था कोलमडून टाकतो. जुगार, मग तो लॉटरीच्या माध्यमाने खेळला जावा किंवा घोड्यांच्या रेसमध्ये पैसा लावला जावा, तो संभावनेचा खेळ आहे, ज्यात अनेक लोकांची हार होण्याची शक्यता असते आणि काही लोकांच्या नशीब उजळण्याची शक्यता संदिग्ध असते. जे लोक या गोष्टींच्या नादी लागून, त्यांना त्यांची सवय जडते, त्यांना उत्पादनाच्या कामात रस वाटत नाही आणि शक्यतांपासून लाभ उचलण्याचे साधन शोधत फिरतात. त्यांच्यासाठी भाग्याचे द्वार फार कमी उघडते, उलट जुगारासाठी सतत पैसे लावत राहिल्याने त्यांची आर्थिक स्थिती हळूहळू कमजोर पडत जाते, त्यांना कंगाल करून टाकते किंवा ते लवकरच कर्जबाजारी आणि तंगीच्या परिस्थतीला बळी पडतात.

अमेरिकेच्या न्याय विभागांर्तगत 'नॅशनल क्राइम विक्टीमायजेशन सर्व्हे ब्यूरो ऑफ जस्टिस'नुसार केवळ इ. सन १९९६ मध्येच सरासरी दररोज २.७१३ बलात्कार झाले. आकडे आम्हाला सांगतात की अधिकांश बलात्कार करणारे, हा गुन्हा करताना दारुच्या धुंदीत होते, तसेच विनयभंग व छेडछाडचे प्रकारही नशेच्या अवस्थेत होतात.

# बलात्कार

## लैंगिक दहशतवाद

इस्लामी शरीअत कायद्यात बलात्काराला एक वेगळा अपराध गट म्हणून वर्गीकृत केले गेले नाही, ज्यामुळे यावर शिक्षा-संदर्भात काहीसा संदेह निर्माण झाला आहे. काही लोकांनी चुकीने असे समजून घेतले आहे की बलात्काराचे व्यभिचाराच्या शीर्षकान्वये मूल्यांकन करण्याची गरज आहे. वास्तविक बलात्कार दहशतवादी अपराधांच्या श्रेणीत येतो, ज्याला 'हिराबा' म्हटले जाते. 'हिराबा' म्हणजे लोकांवर सशस्त्र हल्ला करून किंवा बळाचा वापर करून त्यांना धमकावून भयभीत करणे, हत्या करणे, त्यांच्यावर दहशत बसविणे आणि जोर जबरदस्तीने उघडपणे त्यांची संपत्ती ताब्यात घेणे होय. संपत्तीचा उल्लेख प्रामुख्याने केला गेला आहे, कारण 'हिराबा' दरोडाशी जुळलेला आहे, परंतु हा आदेश समानरीत्या त्या लोकांना लागू पडतो, जे बलात्काराच्या हेतुने इतरांना आतंकित करतात.

इस्लाम धर्मात हिराबा मोठमोठ्या अपराधांमध्ये सर्वांत जास्त गंभीर स्वरुपाचा अपराध आहे आणि कुरआन व पैगंबरीय आचरणशैली (सुन्नत)नुसार याचा कठोरपणे निषेध केला गेला आहे. वस्तुत: अशा अपराधांच्या शिक्षेसंबधी कुरआनात अल्लाहचे फर्मान खालीलप्रमाणे आहे :

> ''जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबराशी लढतात आणि जमिनीवर बिघाड निर्माण करण्यासाठी धाव-पळ करतात, त्यांचा मोबदला तर केवळ हाच आहे की त्यांना वाईटरीत्या ठार केले जावे किंवा सूळावर चढविले जावे किंवा त्यांचे हात-पाय परस्पर विरूद्ध दिशेत कापून टाकले जावेत किंवा त्यांना देशाबाहेर घालविले जावे. हा अपमान आणि

तिरस्कार त्यांच्यासाठी जगात आहे आणि आखिरतमध्ये त्यांच्यासाठी भयंकर यातना आहे. परंतु जे लोक, या आधी की तुम्हाला त्यांच्यावर अधिकार प्राप्त व्हावा, परत येतील (अर्थात क्षमा-याचना करून सुधारतील) तर अशा स्थितीत तुम्हाला माहीत असले पाहिजे की अल्लाह मोठा क्षमाशील, दया करणारा आहे.'' (कुरआन- ५ : ३३, ३४)

## इस्लामी कायद्यात व्यभिचार व बलात्कारात फरक

इस्लाम धर्माचे सुरुवातीच्या काळातील विद्वान, विशेषत: अल् दसूकी आणि न्यायाधीश इब्नुल अरबी यांनी हे कारण स्पष्ट केले की बलात्काराला, व्यभिचाराच्या उलट 'हिराबा' (दहशतवादा) च्या अपराधांसमान का समजले गेले पाहिजे. इब्नुल अरबी एक घटना सांगतात, ''जिच्यात एका समूहावर हल्ला चढविला गेला आणि त्या समूहातील एका स्त्रीवर बलात्कार केला गेला.'' काही लोकांचा या संदर्भात तर्क असा होता की हा अपराध 'हिराबा'मध्ये समाविष्ट केला जाऊ नये, कारण यात संपत्ती वगैरे लुटली गेली नाही आणि शस्त्रांचाही वापर झाला नाही. या तर्कास उत्तर देताना इब्नुल अरबी म्हणाले, ''लज्जास्थानांवर घातलेला दरोडा, संपत्तीवर टाकलेल्या दरोड्यापेक्षा अधिक वाईट आहे आणि असा कोण आहे जो आपला बलात्कार केल्या जाण्याच्या तुलनेत आपल्यावर दरोडा टाकला जाणे पसंत करील.'' हे वर्गीकरण तर्कसंगत आहे कारण यात जी वस्तू घेतली गेली ती पीडित व्यक्तीची संपत्ती होय आणि ही संपत्ती त्या व्यक्तीच्या मान-प्रतिष्ठा आणि सुरक्षेची भावना आहे.

अशा प्रकारे 'हिराबा'च्या स्वरुपात बलात्कार एक हिंसक अपराध आहे, ज्यात बलात्काराचा वापर एका शस्त्राच्या स्वरुपात केला जातो. अशा प्रकारे हिराबाचा खटला चालविण्यात लक्ष बलात्काराच्या आरोपीवर केंद्रित होते. विशेषत: त्याचा इरादा आणि शारीरिक कृत्य आणि खटल्याचे लक्ष बलात्काराला बळी पडलेल्या व्यक्तीवर नसते, कारण यात सहमती घेतली

गेलेली नसते. हिराबाचा आरोप सिध्द करण्यासाठी चार साक्षीदारांची गरज भासत नाही जशी सध्याच्या काळातील काही अप्रामाणिक शरीअत कौंसिल चुकीने विश्वास ठेवतात. याच्याऐवजी यात परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारावर वैद्यकीय तपासणी आणि प्रमाणांच्या आधारे खटला चालविला जातो.

परिणामी, बलात्काराच्या अपराधीला अपराधी म्हणून सिध्द करणे पूर्णत: नाजुक ठरते कारण इस्लामी न्यायालयात याचा अर्थ गुन्हेगाराच्या जीवन-मृत्युचे अंतर आहे. यास्तव ही गोष्ट निर्धारित करण्यासाठी एक काळजीपूर्वक मूल्यांकन केले जाते. आरोपी असलेल्या व्यक्तीने काय खरोखर हा अपराध केला आहे? जर ठोस पुराव्यांनी हे सिध्द झाले की लैंगिक संबंध आपसातील संमतीने झाला आहे आणि बलात्काराच्या आरोपीवर मिथ्यारोप ठेवला जात आहे. तर त्या दोघांवर व्यभिचाराचा आरोप निश्चित केला जाईल आणि त्या दोघांना, व्यभिचाराच्या अपराधाचीच शिक्षा मिळेल.

## पाश्चिमात्य धर्मनिरपेक्ष देशांमध्ये बलात्काराची शिक्षा

सर्वसाधारणपणे पाश्चिमात्य देशांमध्ये, विशेषत: अमेरिकेत या वेळी शिक्षा देण्याची जी पद्धत आहे, तिच्यावर एक दृष्टिक्षेप टाकला असता, कुणाच्याही आकलनात ही गोष्ट येऊ लागते की बलात्काराच्या घटनेत तिथले चिकित्सक, पोलिस अधिकारी, कुटुंबीय आणि पीडित हे सर्व केवढ्या अगतिकतेला बळी पडत आहे. कागदोपत्री अहवाल हे दर्शवितात की अमेरिकेत ६० टक्के घटनांची रीतसर नोंद केली जात नाही.

या आकडेवारी मागे कोणते कारण आहे? सर्वांत प्रथम, ही समस्या पसरत जाण्यावर विचार करणे गरजेचे आहे.

- ✯ इ. सन २००३मध्ये बलात्कार किंवा विनयभंगाच्या सुमारे ४० प्रतिशत घटनांची नोंद कायदेशीररीत्या झाली.
- ✯ प्रत्येक २.५ मिनिटात अमेरिकेत कोणत्याना कोणत्या ठिकाणी,

कुणाच्या तरी सोबत विनयभंग झाला.

☆ अशा प्रकारच्या हल्लयांच्या परिणाम स्वरुपी ४,०६५ स्त्रिया गर्भवती झाल्या.

(हे आकडे पेनसिल्वानिया कोलिशन अगेन्स्ट रेप. http://pearog/aboutsa/stats.html द्वारे घेतले गेले.)

अमेरिकासारख्या प्रगत देशाच्या खुल्या व निर्बंध समाजात बलात्कार इतके सामान्य का आहेत? वास्तविक याच्या मागे अनेक कारणे आपली भूमिका पार पाडीत आहेत. जर एखाद्या विशेष अपराधाकरिता फार सौम्य स्वरुपाची शिक्षा असेल आणि अपराधाच्या संभाव्य लाभांच्या तुलनेत जोखीम नसेल, तर अशा स्थितीत अपराधींवर वचक राहात नाही आणि निर्धास्तपणे तो अपराध करीत राहण्याची शक्यता वाढते. दुर्दैवाने अर्थशास्त्रज्ञ किप विस्कसीने 'जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स'मध्ये लिहिले,

''(पाश्चिमात्य देशात) अपराधाच्या घटनांमध्ये कायदा लागू करणाऱ्या व्यवस्थेकडून अपराध्याला चिंताजनक स्वरुपात जोखीम (शिक्षेचे प्रावधान) अल्प राहते आणि आकडेवारीवरून असे दिसून येते की तरुण अपराधी हे तथ्य चांगले जाणतात.''

वस्तुत: अमेरिकेत बलात्काराच्या अपराधिक मामल्यात खटला चालविण्याचे आकडे स्तब्ध करणारे आहेत. वास्तविक, बलात्कार किंवा विनयभंगाचे ६० टक्के प्रकरणांची कायदा लागू करणाऱ्या एजन्सीजजवळ रीतसर नोंद होत नाही. त्यात अपराध्याला कधी तुरुंगात राहण्याचा किंवा शिक्षा भोगण्याचा प्रसंग येत नाही. परंतु अशा घटनांमध्ये, ज्यांची रीतसर नोंद केली जाते किंवा ज्यांचा निकाल लावला जातो, त्यात काय बलात्काराचे प्रकरण लेखी नोंद होण्यात आणि पीडित स्त्रीला न्याय मिळण्यात काही संबंध आहे? दुर्दैवाने हे आकडे उत्साहजनक नाहीत 'रेप एब्युज अँड इन्सेस्ट नॅशनल नेटवर्क'ने जी आकडेवारी तयार केली आहे त्यांचे निरीक्षण केल्याने आम्हाला खालील गोष्टी कळतात :

☆ जर बलात्काराचा रिपोर्ट कायद्याची सक्तीने अंमलबजावणी

करणाऱ्यांजवळ लेखी स्वरुपात केला जातो, तर गुन्हेगाराला अटक होण्याची शक्यता ५१ टक्के असते.

✮ जर खटला न्यायालयात चालला तर गुन्हा सिध्द होण्याची शक्यता ५८ टक्के असते.

✮ जर गुन्हा सिध्द झाला तर गुन्हेगाराला तुरुंगवास भोगण्याची शक्यता ६९ टक्के असते.

अशा प्रकारे ३९ टक्के लैंगिक अपराधांची नोंद कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांकडे होते, त्यापैकी १६.३ टक्के गुन्हेगारांचीच तुरुंगात जाण्याची शक्यता असते. बलात्काराच्या ज्या घटनांची दफ्तरी नोंद होते, त्यापैकी सुमारे ६ टक्के बलात्कार करणारे, अर्थात १६ पैकी फक्त एकच काही दिवस तुरुंगवास भोगेल आणि इतरांची सुटका होईल.

अशा प्रकारे जर आम्ही बलात्कार करणाऱ्यातर्फे संभाव्य सुडाच्या खऱ्या धोक्याच्या तुलनेत गुन्हा सिध्द होण्याचे अतिशय लहान रेकॉर्ड पाहिल्यास, अधिकांश स्त्रिया, बलात्काराचा रिपोर्ट करणार नाहीत. कारण इतर कारणांखेरीज सुडाचीही जोखीम, न्याय प्राप्तीच्या आशेहून जास्त असते.

# इस्लामी राज्य आणि मुस्लिम देश यात काही फरक आहे काय?

पाश्चिमात्य देशांच्या लोकांमध्ये आज जे मोठमोठे गैरसमज पसरले आहेत, त्यापैकी एक धारणा अशी की मुस्लिम देश म्हणजे अशी ठिकाणे, जिथे वैयक्तिक आणि शासकीय पातळीवर इस्लामी कायदाच लागू आहे. अशा मुस्लिम देशांमध्ये जे काही चालले आहे, लोक त्याची तुलना इस्लाम धर्माशी करू लागतात, अशी गोष्ट आहे जी अधिकांश बाबींमध्ये सत्यापासून दूर म्हटले जाऊ शकत नाही.

मुस्लिम देशांना स्वातंत्र्य लाभताच संपूर्ण जगात इस्लामी आंदोलन आपापल्या देशांमध्ये इस्लामी राज्य स्थापित करण्यासाठी कार्यरत राहिलेत. इस्लामी राज्याशी अभिप्रेत एक असे शासन जिथे शरीअत किंवा इस्लामी कायदा लागू असेल आणि धार्मिक विद्वान किंवा राष्ट्रीय इस्लामी आंदोलनाचे नेतृत्व करणारे लोक एकतर शासन सत्तेत काही प्रभाव राखत असतील किंवा राजकीय सत्ताधिकारावर त्यांचे पूर्ण नियंत्रण असेल.

गेल्या काही दिवसात, अनेक मुस्लिम देशांनी, स्वत:ला इस्लामी राज्य म्हणून घोषित केले आणि वरकरणी शरीअतचा कायदाही लागू केला. ते मोजके असे काही पारंपरिक न्यायिक आदेश आहेत, ज्यांचा संबंध शिक्षा, स्त्रियांचा सन्मान आणि इस्लामी धर्मशास्त्राचे इतर विशेष पारंपरिक पैलू आहेत. अशा प्रकारे इस्लामी विधि-नियम किंवा कायदे आणि कोडे मारण्याची शिक्षा व हात कलम करण्याची शिक्षा वगैरे न मोठ्या प्रमाणात प्रचारात आणले गेले. या खरे पाहता कायद्याच्या 'बाह्य सीमा' आहेत ज्यांना केवळ अशा परिस्थितीमध्ये लागू केले गेले पाहिजे, जेव्हा सामाजिक न्याय, संपत्तीची विभागणी, नागरिकांसाठी राज्याची कर्तव्ये, दया व सहानुभूतीसारख्या

मौलिक कर्तव्यांची पूर्तता केली गेली असेल. ही कर्तव्ये पूर्ण केल्याविना, जेव्हा इस्लामी कायदे अंमलात आणले जातात, तेव्हा आम्ही एका अशा कठोर राज्याची निर्मिती करतो, जे रुढिवादी आणि कट्टर स्वरुपाच्या कायद्यांच्या आधारावर काम करते आणि ज्याचे वर्तन पूर्णत: कुरआनातील शिकवणी आणि इस्लामच्या भावनांविरुध्द असते. यात इस्लामच्या नावाने दडपशाही व जुलूम जबरदस्तीला उपयुक्त घोषित केले जाते. अशा प्रकारे स्वयंघोषित इस्लामी राज्ये आणखी काही नाही, तर अशी वक्रभावी उपकरणे बनतात, जे विशिष्ट वर्ग, परिवार किंवा सैन्याच्या सत्तेला न्यायपूर्ण असल्याचे दर्शवितात.

अनेक लोक, या मुस्लिम देशांमध्ये जे काही होत आहे, त्याची तुलना इस्लामच्या आचार-विचारांशी करतात. वास्तविक, बहुतेक मामल्यांमध्ये त्यांची ही धारणा सत्यापासून बरीच दूर आहे. यामुळे अनेक पाश्चिमात्य देशांमध्ये नागरिकत्व प्राप्त करण्याची लालसा का बाळगतात, वस्तुत: त्यांच्या स्वत:च्या देशांमध्ये इस्लाम धर्म अस्तित्वात आहे? याचे उत्तर या तथ्यात लपले आहे की अधिकांश मुस्लिम देशांमध्ये मुसलमान केवळ लोकसंख्येनुसारच जास्त आहेत, तिथे इस्लाम, देशाचा मूलभूत कायदा नाही.

खरे पाहता, अधिकांश मुस्लिम देशांवर अतिशय क्रूर जुलमी दडपशाही करणाऱ्या निरंकुश राज्यकर्त्यांची राजवट आहे आणि बहुतेकबाबतीत यांचे सरकार, इराकच्या सद्दाम हुसैनच्या शासनापेक्षाही अधिक वाईट आहे. इजिप्त, अल्जेरिया, सीरिया, जॉर्डन आणि पाकिस्तान, यासारख्या देशांच्या पॉलिसी आणि वर्तनावर एक ओझरता दृष्टिक्षेप टाकल्यास हे माहीत पडेल की या देशांमध्ये मानवाधिकारांना पायदळी तुडविले जात आहे आणि नागरिक स्वातंत्र्यावर निर्बंध घातले जात आहेत या देशांचे हुकूमशहा सतत निवडणुकींमध्ये धांदली माजवितात. विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात टाकतात किंवा त्यांची हत्या करवितात. त्यांच्या परिवार-जनांना अटक करतात आणि कोणत्याही न्यायालयीन कारवाईविना खटला चालवून दीर्घकाळ त्यांना तुरुंगात डांबून ठेवतात. तुरुंगवास भोगणाऱ्या कैद्यांना इतर गंभीर स्वरुपाचे अन्याय आणि मानवाधिकारांच्या उल्लंघना सोबतच मानसिक आणि शारीरिक यातनाही दिल्या जातात.

परंतु हा चुकीचा विचार मनात आणू नका की हे लोक ज्या परिस्थितींमध्ये आपला देश सोडण्यास विवश झाले, त्या परिस्थितींचा इस्लामशी काही संबंध आहे. इस्लामी कायद्याच्या मूलभूत आकलनाने माहीत पडेल की या देशांमध्ये जे काही होत आहे, इस्लाम त्याचा विरोधक आहे आणि यासाठी तुम्हाला त्या देशातले लोक, आपला मायदेश सोडून जाताना दिसणार नाहीत जिथे कोणत्या न कोणत्या स्तरावर आपल्या शासनांमध्ये इस्लाम धर्म अंमलात आणला जातो.

# मुसलमान की मोहम्मडन?

मुसलमान कोणत्याही प्रकारे पैगंबर मुहम्मद (अल्लाहची दया आणि कृपा असो त्यांच्यावर) यांची भक्ती-उपासना करीत नाही. मुसलमानांची श्रध्दा आहे की मुहम्मद, सर्व शक्तिमान अल्लाहतर्फे पाठविले गेलेले अंतिम पैगंबर होते आणि इतर सर्व पैगंबरांप्रमाणे तेदेखील मनुष्य होते. तरीदेखील काही लोकांची ही चुकीची धारणा आहे की मुसलमान (अल्लाह रक्षण करो) मुहम्मद (स.) यांची उपासना करतात आणि याच कारणास्तव मुसलमानांना चुकीने मोहम्मडन असे म्हटले जाते.

हजरत ईसा (अलै.) प्रमाणे पैगंबर मुहम्मद (अल्लाहची दया व कृपा असो त्यांच्यावर) यांनीदेखील, आपण स्वत: ईश्वर असल्याचा दावा केला नाही. त्यांनी लोकांना केवळ एकमेव अल्लाहच्या उपासनेकडे बोलाविले आणि सतत आपण एक मनुष्य मात्र असण्यावर जोर देत राहिले. स्वत:ला उपास्य बनविले जाण्यापासून बचावकरण्याकरिता पैगंबर मुहम्मद (अल्लाहची दया व कृपा असो त्यांच्यावर) यांनी सांगितले की त्यांना नेहमी ''अल्लाहचा दास आणि पैगंबर म्हणून संबोधिले जावे.'' त्यांनी सांगितले, ''माझी स्तुती-प्रशंसा अशा प्रकारे करू नका, ज्या प्रकारे ख्रिश्चनांनी ईसा बिन मरियम यांची प्रशंसा केली. (आणि त्यांनी त्यांना अल्लाहचा पुत्र बनविले) मी केवळ अल्लाहचा दास आणि त्याचा पैगंबर आहे.''

मुहम्मद (अल्लाहची दया व कृपा असो त्यांच्यावर) यांना अल्लाहचे अंतिम पैगंबर या स्वरुपात, अल्लाहचा संदेश संपूर्ण मानवजातीपर्यंत पोहचविण्याकरिता निवडल गेले होते. त्यांना केवळ ग्रंथातले शब्द पोहचविण्याकरिता सांगितले गेले नव्हते, किंबहुना त्या शब्दांचे व्यावहारिक प्रयोगाचे जिवंत उदाहरण बनण्यासाठीही पाठविले गेले होते. मुसलमान, त्यांच्या महान नैतिक चारित्र्यामुळे त्यांच्यावर अत्याधिक प्रेम करतात आणि

त्यांचा आदर-सन्मान करतात आणि यासाठीही की त्यांनी अल्लाहतर्फे प्रदान केलेल्या सत्याला आमच्यापर्यंत पोहचविले ते सत्य म्हणजे इस्लामचा विशुध्द एकेश्वरवाद (तौहीद) होय.

मुसलमान पैगंबर मुहम्मद (अल्लाहची दयाव कृपा असो त्यांच्यावर) यांचा महान आदर्श आचरणात आणण्याचा यथाशक्ती प्रयत्न करतात, परंतु कोणत्याही प्रकारे ते त्यांची पूजा करीत नाहीत. इस्लाम धर्म, मुसलमानांना ही शिकवण देतो की त्यांनी समस्त पैगंबरांचा आदर-सन्मान राखावा. तथापि या आदर सन्मानाचा आणि त्यांच्याशी प्रेम राखण्याचा अर्थ त्यांची पूजा करणे नव्हे. मुसलमान जाणतात की सर्व प्रकारची उपासना केवळ एकमेव अल्लाहकरिताच असते.

इस्लाम धर्माच्या दृष्टीने, अल्लाहसोबत किंवा अल्लाहव्यतिरिक्त पैगंबर मुहम्मद (अल्लाहची दया आणि कृपा असो त्यांच्यावर) यांची उपासनादेखील अक्षम्य पाप आहे. जर एखादा मुसलमान, आपण मुसलमान असल्याचा दावा करीत असेल, परंतु तो अल्लाहशिवाय आणखी कुणाची उपासना करीत असेल तर अशाने त्याचा तो दावा फोल ठरतो. ईमान राखण्याची घोषणा केल्याने ही गोष्ट स्पष्ट होते की मुसलमानांनी केवळ एक अल्लाहचीच उपासना केली पाहिजे.

इस्लाम आणि मुस्लिम असे शब्द आहेत, जे पवित्र कुरआनात वापरले गेले आहेत. सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो,

> ''नि:संशय, अल्लाहकरिता स्वीकारार्ह जीवनपध्दती केवळ इस्लाम आहे.'' (कुरआन- ३ : १९)
>
> ''त्याने तुमचे नाव मुस्लिम ठेवले होते आणि या कुरआनातही मुस्लिम हेच ठेवले आहे.''
> (कुरआन- २२ : ७८)

हजरत आदमपासून पैगंबर मुहम्मद (स.) पर्यंत समस्त पैगंबरांनी एकच संदेश दिला आहे :

> ''अल्लाहचे आज्ञा पालन करा, अन्य कोणाचे नव्हे.''

पैगंबरांच्या माध्यमाने पाठविला गेलेला हा संदेश, पैगंबर मुहम्मद (अल्लाहची दया व कृपा असो त्यांच्यावर) वर पूर्ण झाला, जे पैगंबरांच्या शृंखलेचे अंतिम पैगंबर होते. ही गोष्ट कुरआनात फर्माविली गेली आहे,

> ''आजच्या दिवशी मी तुमच्याकरिता तुमचा धर्म परिपूर्ण केला. मी तुमच्यावर आपला अनुग्रह पूर्ण केला आणि इस्लामला तुमच्या जीवनव्यवस्थेच्या स्वरुपात निवडले.''
>
> (कुरआन - ५:३)

यास्तव इस्लामला मुहम्मदवाद (मुहम्मडनिजम) आणि मुसलमानांना 'मुहम्मडन' संबोधणे चुकीचे आहे. तसेच पैगंबर मुहम्मद (स.) यांना इस्लामचा संस्थापक म्हणण्याऐवजी, इस्लामचे अंतिम पैगंबर या स्वरुपात पाहिले पाहिजे.

# शिया-सुन्नी मतभेद

मुस्लिम समाजात 'शिया' आणि 'सुन्नी'सारखे संप्रदाय, मुस्लिमेतर बांधवांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करतात. ज्याअर्थी अनेक मुसलमान स्वत:च इतिहासाचे ज्ञान कमी बाळगतात किंवा आपले म्हणणे मांडण्याची त्यांच्या अंगी अशी गुणवत्ता नाही की या बाबींना उचित ऐतिहासिक यर्थादर्शन चित्रात राखू शकावे आणि म्हणूनच या प्रश्नांची उत्तरे लाभत नाही.

श्रध्दा तत्त्वांच्या संदर्भात शिया आणि सुन्नी दोघेही अधिकांश समानता बाळगतात आणि नमाज, रोजा, जकात, हज वगैरे श्रध्दाविषयक गोष्टींमध्ये काही फरक नाही. या दोन प्रमुख संप्रदायांच्या दरम्यान मतभेद, सुरुवातीला आध्यात्मिक मतभेदांमुळे आला नाही, किंबहुना याची मूळ कारणे राजकीय स्वरुपाची होती. मागील शतकांच्या कालावधीत राजकीय-मतभेदांमुळे अनेक रीति-रिवाज जन्मास आले आणि नंतर त्यांना आध्यात्मिक महत्त्व दिले जाऊ लागले.

## उगम-नेतृत्वाचा प्रश्न

शिया आणि सुन्नीची विभागणी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतरच सुरु झाली आणि प्रश्न हा उद्‌भवला की मुस्लिम राष्ट्राचे नेतृत्व कोण करील? सुन्नी मुसलमान या विचाराशी सहमत आहेत, जो पैगंबराच्या अनेक साथीदारांचा विचार होता की नवा नेता मुसलमानांच्या योग्य लोकांमधून निवडला जावा आणि हेच केले गेले. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे निकटतम स्नेही आणि सल्लागार, प्रथम खलिफा किंवा इस्लामी राज्याचे पहिले प्रमुख बनविले गेले. अरबी शब्द 'सुन्नी'शी अभिप्रेत ती व्यक्ती होय, जी पैगंबरांच्या आदर्शाचे अनुसरण करते.

दुसरीकडे काही मुसलमान असे मानतात की नेतृत्व पैगंबर (स.) यांच्या स्वत:च्या कुटुंबातच राहिले पाहिजे. विशेषत: त्या लोकांमध्ये, ज्यांना

पैगंबर (स.) यांनी नियुक्त केले अथवा (त्यांच्यानुसार) त्या इमामांच्या हाती असले पाहिजे, ज्यांना स्वत: अल्लाहने नियुक्त केले.

शिया मुसलमानांची धारणा आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतर नेतृत्व सरळ पैगंबरांचे चुलत भाऊ आणि जावई हजरत अली बिन अबू तालिब यांना मिळायला पाहिजे होते. इस्लामच्या संपूर्ण इतिहासाच्या कालावधीत शिया मुसलमानांनी निवडण्यात आलेल्या मुस्लिम नेत्यांच्या प्रामाणिकतेला स्वीकारले नाही, किंबहुना, याच्याऐवजी त्यांनी इमामांची एक साखळी निवडली, ज्यांच्याविषयी त्यांची श्रध्दा आहे की या शृंखलेला पैगंबर मुहम्मद (स.) अथवा स्वत: अल्लाहने नियुक्त केले होते. शिया हा अरबी शब्द आहे, ज्याचा अर्थ असा समूह जो समर्थन करतो वस्तुत: हा शब्द शियान-ए-अली असा आहे, ज्याचा अर्थ अलीचा समूह होय. यांना अहले बैत अर्थात पैगंबर (स.) यांच्या कुटुंबियांचे अनुयायी असेही म्हटले जाते.

## शिया-सुन्नी लोकसंख्येचे प्रमाण :

साऱ्या जगात सुन्नी मुसलमान बहुसंख्यांक आहेत. यांची लोकसंख्या ८५% आहे. शिया मुसलमानांची विशेष संख्या इराण व इराकमध्ये आढळून येते आणि यमन, बहरीन, सीरिया आणि लेबनानमध्ये हे मोठ्या अल्पसंख्यांकाच्या स्वरुपात आहेत.

## धार्मिक आचरणात फरक :

राजकीय नेतृत्वाच्या आरंभिक प्रश्नाने आध्यात्मिक जीवनाचे काही पैलूही प्रभावित झाले, परिणामी मुसलमानांच्या दोन संप्रदायांमध्ये विभिन्न प्रथा, परंपरांचा जन्म झाला.

हे स्मरणात राखणे महत्त्वाचे आहे की आचार-विचार आणि प्रथा-परंपरांमध्ये मतभेद असतानाही शिया आणि सुन्नी मुसलमान इस्लामच्या मूलभूत श्रध्दा-तत्त्वांमध्ये समानता राखतात आणि अधिकांश लोक एकमेकांना मुस्लिम-बंधु समजतात. वास्तविक बहुतेक मुसलमान या दोन्ही संप्रदायांपैकी, कोणा एका संप्रदायाचा सदस्य असल्याचा दावा करीत नाही. किंबहुना मुसलमान स्वत:ला केवळ मुस्लिम म्हटले जाणेच पसंत करतात.

## धार्मिक नेतृत्व :

शिया मुसलमानांची श्रध्दा आहे की इमाम स्वभावाने निष्पाप असतो आणि म्हणूनच त्याचा सत्ताधिकार दोषरहित आहे, यासाठी त्यांची नेमणूक सरळ अल्लाहकडून होते. यास्तव शिया मुसलमान, जास्त करून इमामांवर श्रध्दा राखतात आणि त्यांच्या कबरींचे दर्शन (जियारत), त्यांना ईश्वराचे मध्यस्थ मानून करतात.

सुन्नी मुसलमान हा युक्तिवाद मांडतात की इस्लाम धर्मात वंशाच्या आधारावर धार्मिक नेत्यांचा एखादा विशेषाधिकार प्राप्त असा, समूह नाही आणि संत-महात्म्यांचा वशिला किंवा त्यांच्यावर श्रध्दा ठेवण्याचा निश्चितपणे कोणताही ठोस आधार नाही. सुन्नी मुसलमानांचे मत असे की मुस्लिम समुदायाचे नेतृत्व कुणाचा जन्मसिध्द हक्क नाही, किंबहुना ही एक अनामत आहे, विश्वासाची ठेव आहे, जिचा सांभाळ केला जाऊ शकतो, किंवा त्यासाठी दुसऱ्याच्या हवाली दिले जाऊ शकते अथवा लोक स्वत: ती जबाबदारी आपल्या शिरावर घेऊ शकतात.

## संघर्ष आणि वितंडवाद

भारत, पाकिस्तान आणि सऊदी अरबसारख्या अनेक देशांमध्ये शिया-सुन्नी मतभेद सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांपर्यंत पसरलेले आहेत लेबनान, भारत आणि पाकिस्तानसारख्या लोकशाही असलेल्या देशात हे मतभेद विविध राजकीय विचारधारा आणि सामाजिक गटांमध्ये दिसून येतात. सऊदी अरब आणि सीरियासारख्या देशांमध्ये दोघांमधील तणाव नेहमी टिकून असतो. इराक आणि अफगाणीस्तान या देशात सशस्त्र संघर्षही होत राहिले, ज्यामुळे गेल्या दहा वर्षांच्या काळात युध्देही झालीत आणि सामाजिक अशांती कोणत्याही मतभेदाला 'लक्ष्य' बनविण्यास टपून बसलेली असते. भारतातही कधी कधी आम्ही लखनौसारख्या शहरात 'मोहर्रमच्या मिरवणुकीचा मार्ग'सारख्या लहानसहान गोष्टींवरून संघर्ष पाहतो. वैयक्तिक स्वार्थ बाळगणाऱ्या लोकांच्या हातून अशा घटनांचा यथेच्छ लाभ घेतला जात राहतो.

वरील विवरणावरून जो महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढला जाऊ शकतो, तो असा की इस्लामदेखील त्या विविधतेचे प्रदर्शन करतो, जिची अपेक्षा, फार विशाल स्वरुपात अनुसरण केल्या जाणाऱ्या धर्माकडून केली जाऊ शकते. इस्लाम आपल्या अनुयायींना अशा एका वर्ण व वंशाच्या माळेत गुंफू इच्छित नाही, जी इतर समूदायांना दडपून टाकण्यास तत्पर असावी. इस्लामने आपला संबंध सृजनशीलरीत्या विविध वांशिक, भाषिक आणि राजकीय गोष्टीशी स्थापित केला आहे आणि विभिन्न सभ्यता व संस्कृतीच्या रंगी बेरंगी मिश्रणाच्या स्वरुपात याचा उदय झाला. ही गोष्ट नवलपूर्ण वाटायला नको, किंबहुना याचा अभाव याला भयानक बनवील. एक असा धर्म ज्याचा प्रसार भूमध्ये सागराच्या कासाब्लांकापासून, प्रशांत महासागराच्या ब्रूनाईपर्यंत असावा, तो इतक्या विशाल भूभागावर सामाजिक आणि सांस्कृतिक एकरूपतेचे स्वप्न पाहू शकत नाही आणि न इस्लाम असा एखादा दावा करतो. त्या सर्वांमध्ये जी गोष्ट समान आहे, ती म्हणजे इस्लामचे सिध्दान्त होय ते शिया-सुन्नी मतभेदांना याच दृष्टी प्रांतात बघितले गेले पाहिजे.

# उर्दू विदेशी भाषा आहे काय?

उर्दू भाषा विकसित करण्याकरिता, जी पावले उचलली जातात, अर्थात त्या दिशेने जे प्रयत्न केले जातात, त्यांना नेहमी परकीय भाषेला प्रगत करणे म्हटले जाते. हे आजच्या काळातील मनोरचित गोष्टींपैकी एक बनावट सत्य होय. संभवत: सिंधु आणि गंगा यांच्या मधल्या क्षेत्रात उर्दू भारतीय मुसलमानांच्या ओळखीचा आवश्यक घटक राहिला असेल, तथापि ही पूर्णत: भारतीय आर्य भाषा आहे, तिचे व्याकरण संस्कृत भाषेप्रमाणे आहे. उर्दूचा विकास मोगल कालीन भारताच्या लष्करी छावण्यांमध्ये झाला, जिथे अनेक वंशांचे गट आपसात मिसळून राहात आणि ते आपसात हिन्दी, संस्कृत, वृजभाषा, प्राकृत आणि पाली वगैरे वेगवेगळ्या भाषेत बोलत असत.

भारतातील समस्त मुसलमान उर्दू भाषेत बोलत नाहीत आणि न या भाषेचा वापर करणारे (किंवा ज्यांनी भूतकाळात यास हातभार लावला आहे) सर्व मुसलमान आहेत. उर्दूचा साहित्यिक वारसा आपल्यासोबत धर्मनिरपेक्ष ओळख बाळगतो, ज्यात अनेक लेखक, कवी, कथाकार आणि निबंधकारांनी फार मोठे योगदान दिले आहे. भागवत गीतेचा उर्दू अनुवाद, इतर कोणत्याही भारतीय भाषेत याच्या अनुवादांपेक्षा जास्त आहे. अनेक मोठमोठे उर्दू लेखक उदा. आनंद नारायण मुल्ला, मलिक राम, कृष्णचंद्र, विश्वेश्वर प्रदीप, मनोरमा दीवान, मुन्शी प्रेमचंद्र, रघुपती सहाय फिराक गोरखपुरी, वृज नारायण चकबस्त आणि गोपीचंद्र नारंग इ. सर्व हिंदू समुदायाशी संबंधित होते. उर्दूचा मध्य-पूर्व देशांशी आणि अरब लोकांशी कसलाही संबंध नाही. पाकिस्तानने राष्ट्रीय स्तरावर तिला आपली सरकारी भाषा म्हणून अंगीकारले असले तरी पाकिस्तानच्या सर्वच चार राज्यांमध्ये राहणारे लोक आपापल्या प्रांतीय भाषांचा वापर करतात, अर्थात सिंधी, बलूची, पंजाबी आणि पश्तूनी. तद्‌वतच पाकिस्तानच्या चार क्षेत्रीय भाषांपैकी एक भाषा सिंधी, भारताच्या

राष्ट्रीय भाषांमध्ये संमिलित आहे. हे एकमेकांना साशंक नजरेने बघण्याचे कारण ठरण्याऐवजी आमच्या समान वारसाचा संयुक्त विस्तार ठरावा. हिची फारसी (पर्शियन) लिपीदेखील तिला विदेशी किंवा परकीय ठरवित नाही. तीन अन्य भारतीय भाषा, सिंधी, पंजाबी आणि कश्मिरी यादेखील फारसी लिपी वापरतात. या संदर्भात जर तुम्हाला एखादे प्रमाण किंवा ठोस पुरावा हवा असेल, तर भारतीय रिजर्व्ह बँकेद्वारे जारी केल्या गेलेल्या 'नोट'ला उलट करून पाहा तिथे विविध भाषा-लिपी आढळतील.

सर्वांत जुने आणि अजूनही टिकून राहिलेले उर्दू मासिक जे शंभर वर्षांपेक्षाही जास्त जुने आहे आणि ज्याचे नाव 'मस्ताना जोगी' असे आहे. याचा मालक एक हिंदू आहे आणि या क्षणी सर्वाधिक वाचले जाणारे उर्दू दैनिक 'राष्ट्रीय सहारा' एका मुस्लिमेतराद्वारे 'सहारा समूह'च्या वतीने चालविले जात आहे.

# इस्लाममध्ये ‘धर्मगुरू’ पद नाही

काही लोक इमाम, मुफ्ती, काझी किंवा मौलवीपदाला धर्मगुरूपदाच्या स्वरुपात पाहतात. एक इमाम केवळ नमाजचे नेतृत्व करतो आणि मुफ्ती धार्मिक बाबींशी संबंधित एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या धार्मिक ज्ञानाच्या आधारावर आपला दृष्टिकोन सादर करतो. काजी न्यायालयाचा प्रमुख असतो आणि तो विवादांना निकालात काढतो. मौलवी एक धार्मिक विद्वान असतो, जो कुरआन शिकतो व शिकवितो. यापैकी कोणालाही कसलेही दैवी स्थान प्राप्त नाही. यांना अल्लाह आणि मनुष्याच्या दरम्यानचा वशिला किंवा मध्यस्थ समजले जात नाही. एखाद्या इमामाजवळ आपले पाप-कर्म स्वीकारण्याची गरज भासत नाही. कोणताही मनुष्य अल्लाहसमोर दुआ-प्रार्थनाच्या माध्यमाने आपल्या अपराधांची क्षमा याचना करू शकतो. कोणताही मुसलमान, ज्याने कुरआनाचा काही भाग तोंडी पाठ केला असेल आणि प्रत्यक्षत: इस्लाम धर्माचे पालन करणारा दिसून येत असेल, तर तो मस्जिदीत नमाजचे नेतृत्व (इमामत) करू शकतो. घरगुती धार्मिक विधिसाठी उदा. खतना, मक्तब, किंवा घर अथवा व्यवसायाच्या उद्‌घाटनासाठी एखाद्या धार्मिक नेत्याला बोलाविण्याची आवश्यकता नसते. मस्जिदींत कोणाच्याहीकरिता कोणतेही स्थान राखून ठेवलेले नसते. मस्जिदीत स्थान जो प्रथम येईल त्याला या आधारावर लाभते. इस्लाम धर्मात कोणताही प्रतिष्ठावाद नाही. सर्वच्या सर्व एकाच पातळीवर उभे राहतात आणि एकाच ताटात एकत्र बसून खातात. कुरआनाचा हा आदेश मनात राखणे उपयुक्त आहे,

> ‘‘अल्लाहच्या नजरेत तुमच्यात सर्वाधिक प्रतिष्ठित तो आहे, जो सर्वांत जास्त अल्लाहचे भय बाळगणारा आहे.’’

# मस्जिद

१. मस्जिद इस्लामच्या अनुयायींकरिता उपासनास्थळ आहे, जिथे ईमान राखणारा मनुष्य अल्लाहसमोर आपला माथा टेकतो.

२. अनेक मस्जिदींमध्ये भव्य गुंबद (घुमट), मीनारे (मनोरे) आणि नमाज पढण्यासाठी हॉल असतात.

३. मस्जिदीत नमाज पढत असताना कोणतीही मूर्ती, आकृती, चित्र, ऐतिहासिक अवशेष (पैगंबरांचे) अथवा एखादा पवित्र ग्रंथ ठेवला जात नाही.

४. मस्जिदीत जाताना प्रवेश फी लागत नाही आणि प्रवेश केल्यानंतर उपासना पार पाडण्यासाठी नारळ, मिष्टान्न, अगरबत्ती किंवा चादर वगैरे चढविण्याची गरज नसते.

५. मस्जिद असे ठिकाण आहे जिथे मुसलमान नमाजसाठी एकत्र होतात. याखेरीज हे स्थान सूचना, शिकवण, अध्ययन आणि भांडण-तंटे सोडविण्याचे केंद्रही असते.

६. सर्व मुसलमान एका रांगेत उभे राहून नमाज पढतात. मस्जिदीत नमाज पढताना कोणत्याही माणसाशी खास श्रेष्ठतापूर्ण व्यवहार केला जात नाही आणि कोणालाही त्याच्या सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय पदामुळे विशेष स्थान दिले जात नाही.

७. नमाजची वेळ आकाशात सूर्याच्या स्थितिनुसार निश्चित केली जाते.
* फज्रची नमाज सूर्योदयापूर्वी असते.
* जुहरची नमाज सूर्य माध्यान्ही येऊन सरकू लागतो, त्या वेळी असते.
* अस्रची नमाज अशा वेळी असते, जेव्हा वस्तूंच्या सावल्या त्यांच्या उंचीपेक्षा दुप्पट होतात.

✯ मगरिबची नमाज सूर्यास्त झाल्यावर लगेच पढली जाते.

✯ दिवसातली पाचवी आणि अंतिम नमाज पूर्णपणे अंधार पडल्यानंतर अथवा सूर्यास्तानंतर ९० मिनिटांनी होते.

नमाजच्या वेळेचे सक्तीने पालन केले जाते. कोणत्याही महत्त्वपूर्ण व्यक्तीच्या गरजेनुसार वेळेत बदल केला जाऊ शकत नाही.

८. मस्जिदीत इमाम नमाज पढवितात. या ठिकाणी पुरोहितवाद नाही एक विद्वान मनुष्य किंवा असा मनुष्य जो समाजात, प्रामाणिक मानला जात असेल तर तो नमाज पढवू शकतो.

९. मुस्लिमेतरांनाही मस्जिदीत प्रवेश करण्याची अनुमती असते.

१०. मस्जिदीत कुर्बानी (पशुबळी) करणे, नमाजचा भाग नाही.

११. मद्यपान केल्यावर मस्जिदीत प्रवेश वर्ज्य आहे, एवढेच नव्हे तर कोणी कच्चा कांदा, किंवा लसूण चावून खाल्ल्यास मस्जिदीत प्रवेश करण्यापूर्वी त्याला आपले तोंड चांगले स्वच्छ करण्याचा सल्ला दिला जातो.

१२. नमाजपूर्वी हात, चेहरा आणि पाय धुणे अनिवार्य आहे. याला ‘वुजू’ असे म्हणतात.

# मस्जिदीच्या आतल्या काही विशेष गोष्टी

## नमाजचा हॉल :

नमाजसाठी जो हॉल बनविला जातो, त्याला 'मुसल्ला' किंवा 'कार्पेट एरिया' म्हणतात, जिथे लोक माथा टेकतात.

## मेहराब :

मेहराब मस्जिदीच्या भिंतीत एक अर्धगोलाकार स्थान असते, जे काबागृहाच्या दिशेकडे संकेत करते अर्थात मक्का येथे असलेल्या काबागृहाची दिशा अशा प्रकारेही ती दिशा होय, जिच्याकडे नमाज पढताना मुसलमानांनी आपले तोंड केले पाहिजे. तसेच ज्या भिंतीत मेहराब बनलेला असतो, तिला 'किबलाची दिवार' (भिंत) म्हणतात.

## मिंबर :

मिंबर मस्जिदीत एक उंच आसन असते ज्यावर उभे राहून इमाम प्रवचन देतात किंवा जमात (सामूहिक) च्या नमाजमध्ये लोकांना संबोधित करतात. हा उपदेश साधारणपणे शुक्रवारी दुपारच्या नमाजप्रसंगी दिला जातो. जेव्हा मोठी जमात असते.

## वुजूच्या सुविधा :

मस्जिदींमध्ये नेहमी वुजूसाठी हौद किंवा फव्वारे लावलेले असतात किंवा नळांच्या रांगा असतात. नमाज अदा करण्यापूर्वी मुसलमानांनी स्वत:ला स्वच्छ-शुध्द करून घ्यायचे असते. या स्वच्छताप्राप्तीच्या प्रक्रियेला वुजू म्हटले जाते. ज्या हॉलमध्ये नमाज अदा केली जाते, त्यात बूट चप्पल घालून जाऊ नये. नमाज पढणाऱ्यांकडून आणि मस्जिदीत ये जा करणाऱ्यांकडून अपेक्षा केली जाते की त्यांनी मस्जिदीत स्वच्छ-शुध्द आणि पवित्र स्थितीत प्रवेश करावा.

# समस्त भूतल मस्जिद आहे

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले सारी धरती मस्जिद आहे. पैगंबर (स.) यांच्या या हदीस वचनाचा साधा सरळ अर्थ असा की अल्लाहने पैगंबरांना पृथ्वीवर कोठेही नमाज पढण्याची अनुमती दिली आहे. पृथ्वीचा कोणताही भाग स्वाभाविकत: अशुध्द नाही. त्या अनुषंगाने मुसलमान पैगंबर (स.) यांचे अनुसरण करीत, जगात कोठेही नमाज पढू शकतात. म्हणूनच नेहमी हे पाहण्यात येते की मुसलमान सार्वजनिक ठिकाणी उदा. लहान मोठी उद्याने, सडकेच्या किनारी, रेल्वे प्लॅटफार्म आणि विमानतळाच्या टर्मिनल्सवर नमाज पढतात मुसलमानांकरिता संपूर्ण धरणी उपासना स्थळ आहे. ते ठरलेल्या वेळेवर अल्लाहचे स्मरण करतात आणि नमाज अदा करतात, मग पृथ्वीवर ते कोठेही असोत.

या सर्वसाधारण अर्थाखेरीज पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हदीस वचनाचा आणखी एक महत्त्वपूर्ण अर्थ आहे. एक मुसलमानाला ही वस्तुस्थिती जाणवते की मस्जिद एक शांतीपूर्ण स्थान आहे, तिच्यात लोक स्वच्छ शुध्द अवस्थेत प्रवेश करतात. त्यांचे शरीर आणि कपडे स्वच्छ असतात. त्यांची मनेही शुध्द असतात. ते मस्जिदीत अल्लाहचे विनम्र दास व उपासक या नात्याने येतात. जेव्हा ते मस्जिदीत प्रवेश करतात तेव्हा मस्जिदीत आधीपासून हजर असलेल्या लोकांना अस्सलामु अलैकुम असे म्हणत सलाम करतात. आधीपासूनच मस्जिदमध्ये असलेल्या लोकांसाठी सलामतीची दुआ प्रार्थना असते. मस्जिद शांती, सद्भाव, सुसंवादाचे तेज पसरविते आणि अद्वैतवाद (उपास्याची एकमेवता) आणि मानव-बंधुत्वाचा संदेश देते.

यास्तव पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जेव्हा धरणीची तुलना मस्जिदीशी केली, तेव्हा पैगंबर या गोष्टीवरही जोर देत होते की समस्त धरणीला शांतीपूर्ण स्थान बनविले जावे. पैगंबरांच्या दृष्टिकोनानुसार समस्त जनांनी या धरणीवर सुख शांतीचा आनंद प्रत्येक ठिकाणी घेऊ शकावे. शांती सुबत्तेचा आदर्श त्याच वेळी प्राप्त केला जाऊ शकेल, जेव्हा ही धरणी खरोखर मस्जिदसमान होईल आणि मस्जिदीप्रमाणेच, शांती, सद्भाव आणि मानव-बंधुत्वाचा संदेश सर्वत्र पसरविल.

# अजान

## (नमाजकरिता बोलावणे)

संपूर्ण भूतलावर प्रत्येक मस्जिदीत दररोज पाच वेळा नमाज किंवा इस्लामी उपासना पार पाडली जाते. प्रत्येक मुसलमानाकडून ही अपेक्षा केली जाते की तो प्रत्येक नमाजच्या वेळी मस्जिदीत नमाज पढण्यास अग्रक्रम देईल. तद्‌वतच इस्लाम लोकांच्या दरम्यान जवळचे सामाजिक संबंध निर्माण करू इच्छितो आणि अशा समाजाची रचना करू इच्छितो, जिथे लोक एकमेकांना जाणत असावेत आणि सुख-दु:खात व एकमेकांच्या समस्या सोडविण्यात, वचन करारात सहभागी होत असावेत.

याच नमाजांकरिता लोकांना बोलाविण्यासाठी उंच मिनाऱ्यांवरून अजान दिली जाते. काही मुस्लिमेतर बांधव, नमाजकरिता. बोलाविण्या (अजान) लाच नमाज समजतात. काहींच्या मते मुसलमानांची नमाज लाउड स्पीकरवर पढली जाते.

इतर काही लोक हे जाणून घेण्यास उत्सुक असतात की मुसलमान का म्हणून अकबर बादशहाला बोलावितात, जो न आता शासन करीत आहे आणि न जिवंत आहे.

अजानला माइक्रोफोनवर पुकारण्यात एकूण दोन-तीन मिनिटे लागतात. पैगंबर (स.) यांनी अजानचे शब्द निश्चित केले आहेत आणि जकार्तापासून कासाब्लान्कापर्यंत उंच उंच मिनाऱ्यांवरून अजानचा एकसमान स्वर ऐकू येतो. अजान त्या वेळी प्रचलित चर्चच्या घंटानादापासून आणि मंदिरात शंख वाजवण्यापासून वेगळी अशी एक बोलाविण्याची पध्दत अंगीकारली गेली. अजान देताना उच्चारल्या जाणाऱ्या शब्दांचा अर्थही जनसामान्यांसमोर सादर केला गेल्यास लाभप्रद ठरेल.

| | |
|---|---|
| १. अल्लाहु अकबर- | अल्लाह सर्वांपेक्षा मोठा आहे. (चार वेळा) |
| २. अशहदु अल्ला इलाह इल्लल्लाह- | मी साक्ष देतो की अल्लाहखेरीज कोणीही उपासना करण्यायोग्य नाही. (दोन वेळा) |
| ३. अशहदु अन्न मुहम्मदर्रसूलुल्लाह- | मी साक्ष देतो की मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत. (दोन वेळा) |
| ४. हय्य अलस्सलाह- | या नमाजकडे (दोन वेळा) |
| ५. हय्य अलल फलाह- | या सफलतेकडे (दोन वेळा) |
| ६. अल्लाहु अकबर- | अल्लाह सर्वांपेक्षा मोठा आहे. (दोन वेळा) |
| ७. ला इलाह इल्लल्लाह- | अल्लाहखेरीज कोणीही उपास्य नाही (एकदा) |

ही एकसमान आणि कधीही न बदलणारी पुकार, जी अल्लाहच्या महानतेची घोषणा (अल्लाहु अकबर) ईमानची घोषणा (मी साक्ष देतो की अल्लाहखेरीज कोणीही उपास्य नाही आणि मी साक्ष देतो की मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत आणि नमाजकरिता आवाहन व इहलोक आणि परलोकात सफलतेच्या प्राप्तीसाठीची पुकार सुमारे १५ शतकांपासून जगात जिथे जिथे मुसलमान राहतात, त्या प्रत्येक ठिकाणी निनादत आहे. आपली वेगवेगळी बोली, लय व आवाजासह ही पुकार अल्लाहची स्वरबध्द प्रशंसा करीत राहते आणि लोकांना आध्यात्मिकतेकडे बोलावित राहते. कधीही पहाटे पहाटे झोपेतून जागे करण्याचे काम करते तर कधी कामात गुंतलेल्या दिवसाच्या शेवटी संध्याकालीन स्मरणिकेचे काम करते आणि दिवस मावळल्यावर जेव्हा रात्र होते, तेव्हा ही पुकार दिवसाचा शेवट करते.

अजान त्या एक अल्लाहचे स्मरण करून देते, ज्याने आपल्या दासांना त्यांच्या कार्यमग्न दिनचर्येतून आध्यात्मिकरीत्या जागे करण्यासाठीही व्यवस्था प्रदान केली आहे, यासाठी की त्याचे स्मरण केले जावे आणि लोक आपल्या कर्तव्यास पार पाडण्याकरिता ईशपरायणतेने प्रेरित होऊन आणि आपल्या पालनकर्त्याशी वचनबध्दतेचे नूतनीकरण करून मस्जिदीतून परत व्हावेत.

# मुसलमान काबाची पूजा करतात काय?

समस्त जगाची केंद्रस्थानीय मस्जिद 'हरम' मक्का येथे आहे. 'काबा' जो एक घनाकार पेटीसारखा बांधा आहे, याच्या मध्यभागी आहे.

काबा एक अभयारण्य होय, जिथे कोणत्याही जीवाची हत्या केली जाऊ शकत नाही. या ठिकाणी माशी आणि डास मारण्याची मनाई आहे. जर तिथे एखाद्याला आपल्या पित्याचा मारेकरी दिसला, तरी त्याच्याकडून ही अपेक्षा केली जाते की तो त्या मारेकऱ्याला हानी पोहचविणार नाही.

मुस्लिमेतर बांधवांकडून एक सर्वसाधारण प्रश्न हा विचारला जातो की मुसलमान काबाच्या दिशेने का झुकतात आणि त्याची पूजा करतात?

याचे उत्तर अगदी साधे सरळ आहे. काबा मक्का शहरात असलेला किबला आहे. किबलाशी अभिप्रेत ती दिशा होय, जिच्याकडे तोंड करून मुसलमान नमाज अदा करतात. हा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे की मुसलमान नमाज पढत असताना आपले तोंड काबागृहाच्या दिशेने करत असले तरी ते काबागृहाची पूजा-अर्चना करीत नाही. खरेतर मुसलमान अल्लाहखेरीज दुसऱ्या कोणाचीही उपासना करीत नाही आणि कोणासमोर झुकतही नाही. इस्लाम धर्म लोकांना एकतेच्या बंधनात बांधून ठेवण्यात विश्वास ठेवतो.

पवित्र कुरआनात हे फर्माविले गेले आहे की :

> ''आम्ही तुमचे मुख आकाशाकडे वारंवार उंचावत असलेले पाहत आहोत, आता आम्ही तुम्हाला त्या किबलाकडे फिरवून देऊ, ज्यास तुम्ही पसंत करता, तेव्हा आपले मुख मस्जिद-ए-हराम (काबा) च्या दिशेने वळवा.''
>
> (कुरआन- २ : १४४)

## १. इस्लाम एकतेच्या बंधनात विश्वास राखतो

जर मुसलमानांना काबागृहाकडे तोंड करण्याचा आदेश दिला गेला नसता, तर मुसलमान सर्व दिशांकडे तोंड करून नमाज पढत राहिले असते. मुसलमानांमध्ये नमाजच्या माध्यमातून एकतेची भावना वाढीस लावण्याकरिता, मुसलमान जगात कुठेही असोत त्यांना एकाच दिशेकडे आपले तोंड राखण्याची ताकीद दिली गेली आहे आणि ही दिशा काबागृहाकडे आहे. जर काही मुसलमान काबागृहाच्या पश्चिमेकडे राहतात, तर नमाज पढताना ते आपले तोंड पूर्व दिशेकडे राखतात. जर ते काबागृहाच्या पूर्व दिशेस राहतात तर ते नमाज पढताना पश्चिमेकडे तोंड करतात जर कोणी त्यांना अवकाशातून नमाज पढताना पाहिल तर त्याला समस्त मुसलमान एकच मध्यबिंदू असलेल्या वर्तुळात नमाज पढत असलेले दिसतील, ज्या वर्तुळाचे केंद्रस्थान 'काबा' आहे.

## २. काबागृहाची प्रदक्षिणा एक अल्लाहकडे निर्देशासाठी आहे :

जेव्हा मुसलमान मक्का येथे मस्जिद-ए-हराम या ठिकाणी जातात, तेव्हा ते काबागृहाला प्रदक्षिणा घालतात. ही कृती, एक अल्लाहची उपासना आणि एक अल्लाहवर श्रध्दा ठेवण्याचे प्रतीक आहे. ज्याप्रकारे प्रत्येक वर्तुळाचा एक केंद्रबिंदू असतो. तसेच एकच उपास्य अर्थात एकमेव अल्लाह उपासनेस पात्र आहे.

## ३. लोकांनी काबागृहाच्या छतावर उभे राहून अजान दिली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळात लोक काबागृहाच्या छतावर उभे राहून अजान देत असत. या पध्दतीवरून हे दिसून येते की पैगंबर (स.) यांनी काबागृहाची उपासना केली नाही किंबहुना काबाच्या दिशेने तोंड करून नमाज अदा केली आहे.

# काळा पाषाण (हजरुल असवद)

'हजरुल असवद'चे महत्त्व कोणते? मुसलमान याचे चुंबन का घेतात?

'हजरुल असवद' काबागृहाच्या पूर्वेकडील भिंतीत लावलेला एक दगड आहे. मुसलमान याच्याशी एक इस्लामी अवशेष म्हणून प्रेम करतात. मुस्लिम या हदीस ग्रंथातील एका हदीस वचनानुसार याचा इतिहास हजरत आदम (अलै.) आणि हौवा यांच्या काळाशी संलग्न आहे. एक हदीसनुसार हा दगड आकाशातून आदम आणि हौवाला हे दाखविण्याकरिता खाली पाडला गेला होता की अल्लाहचे घर अर्थात काबागृह कोणत्या ठिकाणी आहे.

आणखी एका हदीस वचनानुसार काळा पाषाण काबागृहाच्या दगडांपैकी एक दगड आहे. याचे महत्त्व हे की हजरत इब्राहीम आणि हजरत इस्माईल (अलै.) यांनी ज्या बांधणीची उभारणी केली होती, तिचा केवळ एकमेव शिल्लक राहिलेला मूळ दगड आहे. काबा आपल्या इतिहासात पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आगमनापूर्वीही अनेकदा नष्ट झाला आणि त्याला पुन्हा निर्माण केले गेले. 'हजरुल असवद' एकमात्र असा दगड आहे, जो हजरत इब्राहीम आणि हजरत इस्माईल यांच्या काळापासून आतापर्यंत अनेक विनाशकारी दुर्घटनांनंतरही कायम आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मक्केहून स्थलांतराच्या काही वर्षानंतर हज केला. त्यांनी हजरुल असवदचे चुंबन घेऊन काबाच्या प्रदक्षिणेचा आरंभ केला. ही पैगंबरांची, जेव्हापासून त्यांना त्यांच्या धर्मामुळे आपल्या प्रिय शहरापासून अनेक वर्षांपूर्वी घालविले गेले होते, मोठे वेदनाकारक घरी परतणे होते. काळ्या पाषाणाविषयी, ज्याचे मुसलमान, हजच्याप्रसंगी चुंबन घेतात, पवित्र पैगंबरांच्या एका प्रसिध्द सहकारीच्या संदर्भात एका कथनाचा उल्लेख

केला गेला आहे. हजरत उमर (रजि.) यांनी याच हजरुल असवदला संबोधून म्हटले, ''मी जाणतो की तू एक दगड आहेस आणि तू न एखाद्याला लाभ पोहचवू शकतो आणि न हानी पोहचवू शकतो. जर मी पवित्र पैगंबरांना तुला चुंबन घेताना पाहिले नसते, तर मी तुझे कधीही चुंबन घेतले नसते.''

## मुसलमान हजरुल असवदची पूजा करतात काय?

'हजरुल असवद'विषयी खास उल्लेखाची गरज आहे, कारण याच्या संदर्भात अनेक गैरसमज पसरले आहेत. हा काही आकाशातून खाली आलेला दगड नाही, किंबहुना एक साधारण काळा दगड आहे. याचे व्यावहारिक महत्त्व हे की हा काबाच्या प्रदक्षिणेची सुरुवात दर्शवितो आणि आपल्या रंगामुळे त्या वास्तुबांधणीत तिची एक वेगळी ओळख आहे. दुसरे असे की या दगडाची पूजा होत नाही आणि न मुसलमान याच्या दिशेने सजदा करतात. सजदा केवळ काबागृहाच्या कोणत्याही अंशाकडे तोंड करून केला जातो आणि अधिकांश लोक या काळ्या पाषाणा (हजरुल असवद) कडे आपले तोंड करीत नाहीत. हे उल्लेखनीय होय की एकदा जेव्हा करमती शासकांनी मक्का शहर नष्ट केले होते आणि ते 'हजरुल असवद'ला जिंकलेला माल या स्वरुपात मायदेशी घेऊन गेले होते आणि तो त्या ठिकाणी कित्येक वर्षे राहिला त्याच्या अनुपस्थितीच्या काळातही मुसलमान त्या दिशेकडे वळले नाहीत, जिथे तो ठेवला गेला होता, किंबहुना ते सतत मक्का येथे असलेल्या काबागृहाकडेच तोंड करून नमाज पढत राहिले. काबागृहाचा बांधा (संरचना) देखील महत्त्वपूर्ण नाही. उदाहरणार्थ, जेव्हा दुरुस्तीसाठी किंवा नवीन बांधा उभारण्यासाठी तोडला जातो, तरीही मुसलमान त्याच जागेच्या दिशेने तोंड करून नमाज पढतात, मग त्या जागी काबागृहाची रचना किंवा काळा पाषाण अस्तित्वात असो किंवा नसो. जसे आधीच सांगितले गेले आहे की 'हजरुल असवद'चे व्यावहारिक महत्त्व हे आहे की हा त्या स्थानाचा निर्देश करतो, जेथून प्रदक्षिणा सुरु केली जाते.

# मुस्लिमेतरांना मक्का जाण्याची अनुमती का नाही?

काही मुस्लिमेतर असा प्रश्न विचारतात की "अन्य धर्मांच्या लोकांना इस्लामी पवित्र स्थळे अर्थात मक्का आणि मदीना येथे जाण्याची परवानगी का दिली जात नाही?" हे खरे आहे की मुस्लिमेतरांना मक्का आणि मदीना या पवित्र शहरात जाण्याची कायदेशीर परवानगी नाही. या मनाईच्या संभाव्य कारणांना विशद करण्यात खालील मुद्दे सहाय्यक ठरू शकतात.

मक्का आणि मदीना इस्लामची पवित्रे शहरे आहेत. मुसलमान त्या ठिकाणी हज करण्यासाठी जातात. कोणताही मनुष्य तिथे केवळ हिंडण्या फिरण्यासाठी किंवा मनोरंजनासाठी जात नाही. यास्तव तिथे केवळ इस्लामी सिध्दान्तांवर श्रध्दा राखणाऱ्या अर्थात ईमान बाळगणाऱ्या लोकांनाच जाण्याची आणि प्रतिनिधित्व करण्याची अनुमती दिली जाते. अन्य धर्मांची केंद्रस्थानेदेखील अशा प्रकारचे नियम लागू करू शकतात. जर कोणी तिरुपती, तिरुमाला देवस्थानम्च्या तीर्थ क्षेत्रांत भ्रमण करू इच्छित असेल तर त्याला हिंदू धर्मावर आपली श्रध्दा असल्याचे घोषित करावे लागेल. हिंदू नसलेल्यांना या ठिकाणी हिंडण्या फिरण्यापासून रोखले गेले आहे कारण हे मंदिर एखादे पर्यटनस्थळ किंवा मनोरंजनाचे ठिकाण नाही.

अशी अनेक धर्मस्थळे आहेत, जिथे दलितांना जाण्यास मज्जाव आहे आणि तिथे स्त्रियांच्या जाण्यावरही प्रतिबंध आहे तसेच मांसाहारी लोकांवर काही बंधने आहेत.

आपल्याच देशात अशी ठिकाणे आहेत, जिथे सामान्य नागरिकांना प्रवेश वर्ज्य असतो. जी व्यक्ती संरक्षण खात्याशी संबंधित नसते ती छावणीक्षेत्रात प्रवेश करू शकत नाही. अणुऊर्जा निर्मितीचे साधन अणुभट्टी, ज्या प्रयोगशाळा संवेदनशील क्षेत्रांमध्ये शोधकार्यात मग्न आहेत आणि गुप्तवार्ताच्या मुख्यालयांमध्ये सामान्य व्यक्तीच्या प्रवेशाला सक्त मनाई असते. ज्यांना त्या ठिकाणी जाण्याची अनिवार्य गरज असते, ते संबंधित अधिकाऱ्यांकडून पूर्वानुमति प्राप्त केल्यावरच जाऊ शकतात. एखाद्या छावणी क्षेत्रात प्रवेश वर्ज्य असण्याबद्दल सामान्य नागरिकांचे आक्षेप घेणे अतार्किक

ठरेल. तद्वतच मुस्लिमेतरांनी, मक्का आणि मदीना येथे त्यांच्या प्रवेशाला मनाई असण्याबद्दल आक्षेप घेणे तर्कसंगत ठरत नाही.

जगातले सर्व देश, विदेशी नागरिकांना आपल्या देशात प्रवेशाची अनुमती देण्यावर काही नियम व अटी लागू करतात. वीजा त्याच वेळी जारी केला जातो, जेव्हा ते त्या नियम-अटींचे पालन करण्याच्या करार पत्रावर सही करतील. याच प्रकारे सऊदी अरब लोकांना हजच्या या केंद्रांची यात्रा करण्याची अनुमती त्यांच्या धर्माची पुष्टि केल्यानंतरच देतो जे लोक इस्लाम धर्मात श्रध्दा राखत नाही, त्यांना या पवित्र क्षेत्रापासून दूर ठेवले जाते तथापि ते या देशाच्या इतर शहरांमध्ये व्यापार, रोजगार आणि पर्यटनाच्या हेतुने जाऊ शकतात.

# दरगाहांना भेट देणे

काही मुसलमान जे दरगाह वगैरेंच्या दर्शनासाठी जातात, त्यापैकी अधिकांश इस्लामचे चुकीचे प्रतिनिधित्व करतात. इस्लाम पूर्णत: एकेश्वरवादी धर्म आहे. एकेश्वरवादाशी अभिप्रेत केवळ एक मात्र सर्वोच्च सर्वशक्तिमान ईश्वरावर श्रध्दा राखणे. हा बिघाड मुसलमानांमध्ये दक्षिण आशियाच्या देशांमध्ये आला, जिथे सूफी संतांच्या व बुजूर्गांच्या कबरींवर दर्गा बनविला गेला. या सूफी संतांनी आपल्या जीवनकाळात लक्षावधी लोकांचे स्नेह प्रेम आणि मान-सन्मान प्राप्त केला होता कारण त्यांनी स्वत:ला लोक कल्याणासाठी, समाज सेवासाठी समर्पित केले होते. ते प्रेम आणि सद्‌भाव राखण्याचा उपदेश देत आणि पूर्णपणे नि:स्वार्थ भावनेने लोकांची सेवा करीत, तथापि लोकांचे जे अपार प्रेम त्यांनी प्राप्त केले होते ते कालांतराने श्रध्दा भावनेत परिवर्तीत झाले. नंतर तर हे एक प्रकारे त्यांच्या भक्ती-आराधनेत परिवर्तीत झाले. मृत बुजूर्ग काही जनसमूहांचे आराध्य दैवत बनले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती किस्से-कहाण्या बनत गेल्या आणि त्यांना महामानवसारख्या उपाधिंनी व दैवी शक्तींनी सुसज्ज केले गेले. लोकांचा एक खास वर्ग, ज्यांना समान हित आपसात जोडत होते, त्यांच्या छबीचा लाभ उचलू लागले आणि जवळजवळ त्यांना वरच्या श्रेणीप्रत नेऊन उपदैवत बनवून टाकले. इस्लामच्या साधारण श्रध्देत या ज्या काही प्रथा-परंपरा निर्माण झाल्यात, त्या स्वत:च या गोष्टीचा पुरावा होत की काही श्रध्दा तत्त्वे आणि विचारधारा पूर्वीसारख्या शुध्द राहू शकतात वस्तुत: त्यांचे संस्थापक फार पूर्वी जगातून निघून गेले. कबरींची उपासना आज भारतीय उपखंडात इस्लामी संस्कृतीचा भाग बनली आहे, वस्तुत: इस्लामच्या सिध्दान्तांशी यांचा काहीच संबंध नाही.

कोणत्याही पैगंबराने आपल्या अनुयायींना, आपल्या कबरींवर दरगाह बनविण्यास, त्यांना प्रकाशमान करण्यास, अगरबत्ती लावण्यास चादर चढविण्यास, उर्स साजरा करण्यास आणि शोक-विलाप करण्यास व कव्वालीसह संगीत समारोह आयोजित करण्यास सांगितले नाही. इस्लाम या सर्व कुप्रथांच्या विरुध्द आहे आणि यांना बिघाड संबोधून रद्द ठरवितो.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

''सर्वनाश असो त्या लोकांचा, ज्यांनी पैगंबरांच्या कबरींना पूजा-स्थळ बनवून टाकले, तुम्ही माझ्या कबरीला पूजा स्थळ बनवू नका.''

## दरगाह आणि मस्जिद यातील फरक

इस्लाम धर्मात मस्जिद उपासनास्थळ आहे. मुसलमान दिवसातून पाच वेळा तिथे नमाज पढण्यासाठी एकत्र होतात. दरगाह, मूलतः मुस्लिम सूफी-संतांच्या कबरीचे स्मारक होय. या संत-महात्म्यांनी आपल्या जीवन काळात सामान्य लोकांचे प्रेम आणि मान-सन्मान प्राप्त केला. लोक त्यांच्या निःस्पृह, शांतीवादी स्वभावाकडे आणि त्यांच्या प्रेम, सहानुभूती व समाज सेवाच्या संदेशाकडे आकर्षित झाले. जेव्हा ते मरण पावत, तेव्हा त्यांच्यावर अनासक्त प्रेम करणारे अनुयायी त्यांचे श्रध्दाळू बनत आणि त्यांच्या कबरीवर घुमटाकार भवन उभारीत, ज्याचे नाव दर्गाह किंवा मकबरा ठेवले गेले. या ठिकाणी घडणाऱ्या चमत्कारांच्या आणि त्यांच्यद्वारे रोगमुक्तीच्या लोक कथा रचल्या गेल्या.

काही लोकांनी अशा ठिकाणांवर असाध्य आजारावर उपायाची क्षमता असण्याबाबत प्रचारही सुरु केला. अशा वर्दळींनी या मकबऱ्यांना तीर्थ-यात्रेचे केंद्र बनविले. ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती (इ. सन ११४१-१२३०) या सूफी संताची अजमेर येथील दरगाह भारतातील एक मोठे तीर्थ-स्थळ (जियारतगाह) आहे. अनेक मोठमोठे सूफी संत उदा. दिल्लीचे ख्वाजा बख्तियार काकी पंजाबचे बाबा फरीदुद्दीन गंज शकर, दिल्लीचे निजामुद्दीन

औलिया, गुलबर्गाचे ख्वाजा बंदा नवाज आणि हैद्राबादचे यूसुफैन या औलीयांच्या महत्त्वपूर्ण कबरी आहेत, ज्यांनी भारतात शांती आणि प्रेमाचा प्रसार केला. त्यांचे मकबरे दरगाह बनले आणि मोठ्या संख्येने श्रध्दाळू त्यांच्याकडे आकर्षित होतात. विशेष म्हणजे येथे सर्व जाती-धर्माचे लोक येतात आणि येणाऱ्या श्रध्दाळू लोकांमध्ये मुसलमानांपेक्षा मुस्लिमेतर लोक अधिक असतात. इस्लामचा मुख्य स्त्रोत यांना मान्यता देत नसला तरी यांना भारतीय उपखंडात इस्लामची एक सांस्कृतिक शाखा म्हटले जाऊ शकते, कारण यांच्या घुमटांच्या आणि मिनाऱ्यांच्या रचनेत इस्लामी वास्तुकलेचा वापर केला गेला आहे. या ठिकाणी कव्वाली आणि धार्मिक कवी-संमेलन आयोजित केली जातात.

कबरींच्या पूजा-अर्चनेला इस्लाम धर्मात केवळ मान्यताच दिली जात नाही आणि तिला प्रोत्साहनही दिले जात नाही तर या प्रकाराची निर्भर्त्सना केली जाते, कारण असे करणे म्हणजे अल्लाहचा सहभागी ठरविणे समजले जाते आणि हे शिर्क (अनेकेश्वरवादा) चे एक रुप होय. इस्लामी विचारधारा पूर्णपणे एकेश्वरवादी आहे आणि यात कसलेही उणे-अधिक व बिघाड स्वीकारला जात नाही. इस्लाम ईश्वरत्व आणि सूफीपण यांच्या दरम्यान मर्यादांना चांगल्या प्रकारे स्पष्ट करतो. हे दोन्ही गुण-विशेष आपसात मेळ खात नाहीत. येथपर्यंत की पैगंबर (स.) देखील उपासना करण्यायोग्य नाहीत. पैगंबरांनी स्वत: ही घोषणा केली की ते एक मनुष्य या पलिकडे आणखी काही नाहीत आणि इतर माणसांप्रमाणे तेदेखील प्रमादशील आहेत. कुरआनाचा पहिला अध्याय सूरह फातिहा, इस्लामच्या अनुयायींना दुआ-प्रार्थना करण्याची सुयोग्य पध्दत पुढील शब्दांत शिकवितो,

> ''आम्ही केवळ तुझीच उपासना करतो आणि आम्ही केवळ
> तुझ्याचकडून सहायता मागतो.'' (कुरआन- १ : ४)

या प्रकारे दोघांच्या सीमा स्पष्ट आहेत, यात कसलाही संशय नाही.

दुसरे असे की इस्लामी सिध्दान्त प्रत्येक व्यक्तीला सरळ अल्लाहच्या संपर्कात आणतो. एक मनुष्य सरळ अल्लाहसमोर दुआ मागतो तेव्हा त्याला दरम्यान एखाद्या मध्यस्थाची इच्छा-अपेक्षा असता कामा नये. मनुष्य आणि

अल्लाहच्या दरम्यान कोणताही मध्यस्थ स्वीकारार्ह नाही. कबरींच्या उपासनेत मनुष्य आणि अल्लाह यांच्या दरम्यान दिवंगत सूफी संताला ठेवले जाते. इस्लाम ही रीत मुळीच पसंत करीत नाही. जेव्हा एखादा जिवित पैगंबर किंवा सूफी संत माणसाच्या बऱ्या-वाईटात, भाग्यात कसलाही हस्तक्षेप करू शकत नाही. तेव्हा एक मरण पावलेला थोर बुजूर्ग मनुष्य आणि अल्लाह यांच्या दरम्यान कशा प्रकारे कसे दखल देऊ शकतो? कुरआन स्पष्ट फर्मावितो,

> ''तुम्ही त्या लोकांना ऐकवू शकत नाही, जे आपल्या कबरींमध्ये आहेत.'' (कुरआन- ३५ : २२)

हेही एक कारण आहे की दरगाह-मकबरे पूजा स्थळ बनविले जाण्यायोग्य का नाहीत? काही गट मकबऱ्यांना थोडी पवित्रता प्रदान करतात परंतु अशाने इस्लामच्या मूलभूत सिध्दान्तांमध्ये कसलाही बदल होऊ शकत नाही.

# मदरसा शिक्षण

भारतात मदरसे त्या लोकांच्या टीकेचे लक्ष्य ठरले आहेत, जे राजकीय स्वार्थ राखतात आणि मीडियाच्या एका वर्गाकडूनही, जो पक्षपाती दृष्टिकोन बाळगतो. मदरशांविषयी आपला दृष्टिकोन ते लोक व्यक्त करतात, ज्यांना मदरसा व्यवस्थेसंबंधी आणि तिथे काय शिकविले जाते, त्यासंबंधी फार थोडेच ज्ञान असते. त्यांनी फक्त हे गृहित धरले आहे की ज्याअर्थी या इस्लामी संस्था आहेत, तेव्हा निश्चितच या ठिकाणी जिहाद व लढण्या मारण्याचे शिक्षण दिले जात असेल. येथपर्यंत की एन.डी.ए. सत्तारुढ असताना, त्यातल्या जबाबदार मंत्र्यांनीही अशी वक्तव्ये केली होती. यास्तव उचित माहिती आणि सखोल अभ्यासानंतरच आपला दृष्टिकोन प्रकट केला पाहिजे.

इस्लाम आपल्या आरंभकाळापासूनच भारतात प्रविष्ट झाला होता. काही लोकांची अशी धारणा आहे की इस्लाम धर्म, पैगंबर (स.) यांच्या जीवनकाळातच केरळ मार्गे उत्तर भारतात आला. उत्तर आणि दक्षिणे कडच्या शेकडो लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारला आणि अशा प्रकारे सुरुवातीपासूनच इथे धर्मज्ञान शिकविण्याची आणि धर्मज्ञानी (उलेमा) तयार करण्यासाठी मदरशांची गरज भासली, यासाठी की त्यांनी इतरांना शिकवावे आणि नमाज पढण्यात व इतर धार्मिक कर्तव्ये पार पाडण्यात लोकांना मदत करावी.

मदरसाशी अभिप्रेत ते स्थान होय जिथे अध्ययन आणि अध्यापनाचे कार्य चालते. 'मदरसा'- शाळा, विद्यालय, स्कूल इत्यादी शब्दांचा समानार्थी शब्द आहे. शाळा व विद्यालये प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक शिक्षणस्तराप्रत असतात. परंतु 'मदरसा'शी अभिप्रेत प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयीन स्तरापर्यंत शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था होय. इस्लामी देशांमध्ये उच्च शिक्षणाच्या केंद्रांनाही मदरसा म्हटले जाते. कोलकाता येथे

एक मदरसा 'आलिया' अर्थात उच्च शिक्षण-विद्यालय आहे, ज्याला आता प. बंगाल सरकारने विश्वविद्यालयाचा दर्जा बहाल केला आहे, ही माहिती नमूद करण्यायोग्य आहे की हे मदरसे इतर संप्रदायांच्या विद्यार्थ्यांकरिताही खुले आहेत. राजा राम मोहन राय यांनी मदरसा आलिया येथे शिक्षण घेतले होते आणि ते फारसी व अरबीचे त्याच प्रकारे विद्वान होते, ज्या प्रकारे ते संस्कृत व हिंदू धर्माचे विद्वान होते.

अनेकबाबतीत हे मदरसे धार्मिक आणि अधार्मिक अशा दोन्ही गरजा भागवित आणि हे ऐहिक व धार्मिक दोन्ही प्रकारच्या जीवनाकरिता आवश्यक होते.

आज सुमारे २०,००० मदरसे दरवर्षी १.५ दश लक्ष विद्यार्थ्यांना शिक्षण देतात. सच्चर कमेटीच्या रिपोर्ट (इ. सन २००६) नुसार सुमारे ४% मुस्लिम मुले मदरशात जातात. ही बाब महत्त्वपूर्ण होय की आजदेखील मदरसा, गरीब, ग्रामीण आणि काही मर्यादेपर्यंत शहरी मुसलमानांकरिता मोठी महत्त्वपूर्ण संस्था आहे. भारतात मुसलमानांची एक मोठी संख्या गरीब आणि अशिक्षित आहे. हे गरीब मुसलमान इच्छा असूनही आपल्या मुलांना धर्मनिरपेक्ष शिक्षणसंस्थांमध्ये पाठविण्याची क्षमता राखत नाही.

याव्यतिरिक्त त्यांच्या काही धार्मिक गरजा असतात आणि मदरसे केवळ धार्मिक गरजाच भागवित नाहीत, तर ते विनामूल्य शिक्षण, भोजन आणि निवासाची सुविधा विद्यार्थ्यांना प्रदान करतात आणि याहून विशेष हे अशा ठिकाणी प्रस्थापित असतात, जे मुलांकरिता सुविधाजनक असतात. सर्वच मदरसेसारखेच असतात असे आम्ही गृहित धरु नये. त्यांना वेगवेगळ्या वर्गात विभागून पाहण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, प्राथमिक स्वरुपाच्या मदरशांमध्ये, ज्यांना 'मक्तब' म्हटले जाते, केवळ प्राथमिक स्वरुपाचे धार्मिक शिक्षणच दिले जाते, त्यानंतर माध्यमिक दर्जाचे मदरसे येतात, ज्यात अरबी भाषा, कुरआन, कुरआनाचे भाष्य व अनुवाद आणि हदीस वगैरे शिकविले जातात. यानंतर उच्च क्षेणीचे मदरसे येतात, ज्यांची तुलना पदवी किंवा पदव्युत्तर स्तराच्या शिक्षणाशी केली जाऊ शकते. महाविद्यालयांच्या आरंभा सोबतच जामिया किंवा विश्वविद्यालयांचा विकास झाला. जगातील सर्वांत

प्राचीन विश्वविद्यालय मोरक्कोच्या फेज नगरमध्ये असलेले कराविईन विश्वविद्यालय आहे, ज्याची स्थापना इ. सन ८५९ मध्ये झाली होती. मग त्यानंतर लवकरच इजिप्तची राजधानी काहिरा (कैरो) मध्ये अल् अजहर विश्वविद्यालयाची स्थापना इ. सन ९७०मध्ये झाली. विश्वविद्यालयाचे विद्यार्थी धार्मिक ज्ञानाव्यतिरिक्त तर्कशास्त्र, आध्यात्म, तत्त्वज्ञान, गणित, पदार्थ विज्ञान, खगोल शास्त्र, भाषणशैली आणि औजार निर्मितीचे शिक्षण प्राप्त करीत असत.

मदरशांच्या आधुनिकीकरणाची एक चळवळ चालत आहे आणि अनेक मदरशांनी आपल्या आधुनिकीकरणाचे काम सुरु केले आहे.

गेल्या काही दिवसांत एक प्रमुख शासकीय संस्था एन.सी. ई.आर.टी (राष्ट्रीय शैक्षणिक, संशोधन आणि प्रशिक्षण परिषद) ने एक अध्ययन करविले. ज्यावरून हा निष्कर्ष निघाला की अनेक राज्यांच्या, प्रामुख्याने केरळ आणि प. बंगालच्या मदरशांमध्ये शिक्षण सामुग्रीत समतोल निर्माण करण्याची प्रक्रिया जारी आहे. या अध्ययनपूर्ण पाहणीत मदरशाच्या पाठ्यक्रमात कोणतेही राष्ट्रविरोधी तत्त्व आढळून आले नाही.

मुसलमानांद्वारे मदरसा शिक्षणाला अधिक महत्त्व देण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :

१. मुस्लिम बहुल क्षेत्रांमध्ये आधुनिक शाळा-विद्यालयांची कमतरता.

२. वेगळ्या मुलींच्या शाळांची कमी आणि सहशिक्षण असणाऱ्या शाळांमध्ये महिला शिक्षिकांची कमतरता.

३. आधुनिक शिक्षणाचे खूप महाग असणे आणि सरकारी शाळांची गुणवत्ता खालच्या दर्जाची असणे.

४. सरकारी शाळांमध्ये अध्ययन-अध्यापनाची वाईट स्थिती.

५. सनातनी मुसलमानांची तक्रार ही आहे की शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये हिंदू भेदभाव अस्तित्वात आहे.

## मदरसा आणि मक्तब

अधिकांश मुस्लिम मुले मदरशांमध्ये जातात या गैरसमजाचे एक कारण हे आहे की लोक 'मदरसा' आणि 'मक्तब' यातला फरक जाणत नाहीत. वास्तविक 'मदरसा' नियमित शिक्षण देणारी संस्था असते, तर 'मक्तब' मोहल्ल्याच्या मस्जिदीशी संलग्न असलेली पाठशाळा असते जी इतर शाळा शिकणाऱ्या मुलांना धार्मिक शिक्षण देते. अशा प्रकारे मक्तब औपचारिकरीत्या, संस्थांमध्ये शिकणाऱ्या मुलांना धार्मिक शिक्षण देतात. अशा प्रकारे मक्तब मोठ्या मदरशांना पूरक ठरतात.

# आजच्या काळात पैगंबर मुहम्मद (स.) यांची सुसंबध्दता

आजच्या आधुनिक आणि धर्मनिरपेक्ष समाजात आम्ही अनेक विकास कार्ये पाहत आहोत, ज्यावरून हे दिसून येते की सभ्यता व संस्कृतींमध्ये विकास झाला आहे. अधिक कार्यक्षम कार, अतिशय वेगवान विमाने, गगनाला गवसणी घालणाऱ्या उत्तुंग इमारती आणि खाद्य पदार्थांपासून लहान मुलांपर्यंतची जैनेटिक इंजीनियरिंग पाहता कोणताही मनुष्य आश्चर्य चकित होऊ शकतो की १४५० वर्षांपूर्वी वाळवंटात राहणारा एक मनुष्य एका अशा समाजाला कशा प्रकारचे योगदान देऊ शकतो. प्रगत तंत्रज्ञानानंतरही आजच्या जगात नियॉन विद्युद्दीपांनी प्रकाशमान गल्ली-मोहल्ले, एक असा समाज घडवितात, जो नैतिक एकता, सामाजिक समता, वातावरणीय सुरक्षा आणि सामान्य दयाशीलता आणि पारस्पारिक आदर सन्मानाच्या मामल्यात मागासला होत चालल्याचे वाटत आहे.

आमचे वर्तमान जग, जास्तीतजास्त मार्गभ्रष्टता आणि दुराचारात आकंठ बुडाले आहे, यात बलवान दुर्बलास गिळंकृत करीत आहे. परिणाम स्वरुपी वंशवाद, घराणेशाही, हत्या, चोरी, दरोडा, बलात्कार आणि अनेक वाईट गोष्टींचा अंत व्हायला हवा होता, परंतु खेदजनक बाब अशी की धर्मनिरपेक्षतेचा वापर यात असफल राहिला हे सांगण्याची गरज नाही की नागरी सभ्यतेच्या स्वरुपात आमची अधिकांश प्रगति लाभहीन आहे. याच्या उलट ही मोठी यंत्रसामुग्री आहे, जिच्याद्वारे आम्ही एकमेकांची सेवा करू शकतो आणि जिच्याद्वारे आम्ही आपल्या जगाला राहण्याचे एक उत्तम स्थान बनवू शकतो. तरीदेखील एक नाजुक घटक आहे जो सतत नाहिसा होत चाललेला जाणवतो आणि तो म्हणजे आध्यात्मिक घटक होय. जगाला आज दया, सहानुभूती, स्नेह, प्रेम आणि शांतीची नितांत गरज आहे आणि या सर्व

गोष्टी अल्लाहच्या उपासनेद्वारेच साध्य होतात.

पैगंबर मुहम्मद (स.) इतर अनेक नैतिक मूल्यांपैकी या नैतिक मूल्यांचे व्यावहारिक रुप होते, आजही आहेत आणि सदैव राहतील. जेव्हा पैगंबरांचे मिशन सुरु झाले, त्या वेळी त्यांच्या भोवती असलेला समाज अन्याय, दमन, निर्दयता, निर्धनता, सतत लढाया, बालकांची हत्या, वंशवाद यासारख्या अनेक वाईट गोष्टींशी सामना करीत होता. केवळ २३ वर्षांच्या कालावधीत पैगंबर मुहम्मद (स.) एक अशी क्रांती घडवून आणण्यात सफल झाले, जिने जगाचा इतिहासच बदलून टाकला आणि शांती, न्याय व दयेचा संदेश अनेक देशांपर्यंत पोहचविला.

अल्लाहचा संदेश, ज्या प्रकारे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याद्वारे पसरविला गेला आणि त्यात वृध्दी होत गेली, तो आजदेखील सहस्त्रावधी लोकांना मार्गदर्शन करीत आहे, त्याद्वारे न त्यांचे स्वत:चे जीवन उत्तम बनले आहे, किंबहुना त्या लोकांचे जीवनही अधिक चांगले बनत आहे, जे त्यांच्या सभोवती आहेत. हा दिव्य संदेश माणसाला हे स्मरण करण्यास प्रवृत्त करतो की हे जीवन कसोटीचे जीवन आहे आणि हे जीवन आमचे ध्येय उद्दिष्ट नव्हे, ज्याची आम्ही इच्छा अभिलाषा बाळगतो. एक दिवस असा उजाडेल, जेव्हा खरा आणि पुरेपूर न्याय प्रत्येक माणसाला प्राप्त होईल आणि प्रत्येक मनुष्य आपल्या जीवन-संघर्षाचे फळ प्राप्त करेल.

जे लोक आपल्या जीवनात महान धार्मिक स्त्री-पुरुषांच्या पदचिन्हांचे अनुसरण करतात, त्यांचे जीवन, त्या लोकांहून अगदी वेगळे असते, जे जीवनाच्या कोणत्याही कारण किंवा उद्दिष्टाचा इन्कार करतात. जस जसे आपण या पुस्तकाचे वाचन कराल आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणी व काही व्यक्तींना विशेषत्वाने दिल्या गेलेल्या निर्देशांचा प्रभाव संपूर्ण समाजांवर आणि राष्ट्रांवर पडलेला पाहाल, तेव्हा तुम्ही आजच्या जगात त्या महान व्यक्तिमत्त्वाच्या खऱ्या प्रासंगिकतेचा सर्वोत्तम अर्थ समजू शकाल. मुसलमान आधीपासूनच या सुसंबध्दतेला जाणतात, कारण त्यांना माहीत आहे की मुहम्मद (स.) संपूर्ण मानवजातीकरिता सुसंबध्द आहेत आणि जोपर्यंत आम्ही या मानववंशाचे सदस्य राहू तोपर्यंत सदा सर्वदा पैगंबरांच्या शिकवणी, त्यांचा उपदेश लाभदायक आणि व्यावहारिक राहील.

# अल्लाह आणि पैगंबरांच्या मूर्त्या का नाहीत?

विविध धर्मांचे अधिकांश अनुयायी आपल्या धर्मस्थळांत आणि आपल्या घरातील पवित्र कोपऱ्यात आपल्या दैवतांच्या व पवित्र विभूतींच्या प्रतिमा किंवा चित्रे सजवून ठेवतात. तथापि मस्जिदीत व मुसलमानांच्या घरात अल्लाह आणि पैगंबरांचे चित्र नसते. लोकांच्या मनात हा प्रश्न उद्‌भवत राहतो की शेवटी इस्लाम धर्म, मूर्त्यांची किंवा चित्रांची परवानगी का नाही देत?

पैगंबर हजरत मुहम्मद (स.) मानवजातीच्या मार्गदर्शनाकरिता अल्लाहतर्फे पाठविले गेलेले अंतिम पैगंबर होते. पैगंबरांनी इस्लाम धर्माचा उपदेश तीन मूलभूत श्रध्दा तत्त्वांच्या आधारे दिला :

१. एकमेव सर्वोच्च स्वामीवर श्रध्दा.

२. प्रेषित्वा (अल्लाहतर्फे पाठविले गेलेले आदमपासून मुहम्मद (स.) पर्यंत समस्त पैगंबरां) वर श्रध्दा.

३. पुनरुत्थानाच्या निवाड्याच्या दिवशी उत्तरदायित्वावर विश्वास.

पैगंबर (स.) यांनी लोकांसमोर हे स्पष्ट केले होते की ते इतर लोकांसारखे एक मनुष्य आहेत, आणखी काही नाही. स्वत:विषयी कसलेही दैवी गुण जोडू नये याबाबत त्यांनी लोकांना तंबी दिली. यास्तव इस्लाम धर्म, अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या दरम्यान फरक करण्याबाबत विशेष लक्ष देतो. पैगंबरांना, काही धर्मांच्या अवतार सिध्दान्ताशी जोडू नये. पैगंबर आणि अवतार दोन्ही वेगवेगळे आहेत. त्याचप्रमाणे अल्लाह शाश्वत आणि चिरस्थायी आहे, तथापि पैगंबर इतर माणसांप्रमाणे नाशिवंत असतात आणि लोकांच्या मार्गदर्शनाकरिता आकाशीय संदेशाचे वाहक असतात आणि

म्हणूनच पैगंबर (स.) यांनी स्वत:ला अल्लाहच्या दर्ज्यापर्यंत कधी जाणले नाही आणि तसे समजण्याची मुसलमानांना सक्त मनाई केली. पवित्र कुरआनाने स्पष्टत: घोषित केले की पैगंबरांना एक दिवस मृत्यु येईल आणि अल्लाह सदा सर्वदा जिवित राहील. अल्लाह कधीही झोपत नाही, किंबहुना त्याला कधी गुंगीही येत नाही.

यास्तव इस्लाम धर्माने अल्लाहला सर्व प्रकारच्या उपासने (इबादत) चे एकमेव केंद्र बनविले. दैवी धारणेत एखाद्या अशा गोष्टीला स्वीकार केले गेले नाही किंवा त्याची अनुमती दिली गेली नाही, जी आकाशीय उपास्याच्या श्रध्देस कमकुवत करत असेल हीच भावना ध्यानी राखत इस्लाम धर्मात उपास्य आणि पैगंबरांचे चित्र आणि मूर्त्या बनविण्यास सक्तीने रोखले गेले. यापूर्वी असे घडले होते की मूर्त्यांनी समाजाला मूर्तीपूजेच्या दिशेने लोटले होते आणि खऱ्या उपास्याचा विसर पाडला होता ज्या काबागृहाला पैगंबर इब्राहीम (अलै.) यांनी सुमारे ४००० वर्षांपूर्वी अल्लाहच्या उपासनेकरिता बनविले होते, याच मूर्तीपूजेमुळे अध:पतनास बळी पडला. तो विविध दैवतांचा एक पंथ बनला होता. ज्यात प्रत्येक देवतेकडे एक विशेष काम सोपविले गेले होते. इस्लाम धर्माने अल्लाहच्या ईशत्वाला बहाल केले आणि मूर्तीपूजेला पूर्णपणे वर्ज्य केले.

याच प्रकारे पैगंबरांची मूर्ती आणि चित्र वगैरे बनविण्यासही मनाई केली गेली. मनुष्यस्वभावाला लक्षात घेता ही भीती होती की माणूस पवित्र थोर व्यक्तींना उपास्याच्या जागी पोहचवितो ज्या लोकांनी पैगंबर (स.) यांना पाहिले होते, त्यांच्याशी भेट घेतली होती, त्यांच्या मनात लवकरच त्यांची मूर्ती बनविण्याची लालसा निर्माण झाली असती, मग त्यांनी त्यांची उपासना करायला सुरुवात केली असती, परिणामी खरे उपास्य असलेल्या अल्लाहला सोडून दिले असते.

संपूर्ण जगात मस्जिदींमध्ये चित्रे आणि मूर्त्या आढळत नाही या मस्जिदी पूर्णपणे स्वच्छ-शुध्द ठिकाणे आहेत, जिथे श्रध्दा एकमेव सर्वोच्च अल्लाहकरिता असते आणि त्याच्याचकडे ध्यान एकवटून नमाज पढली जाते, दुआ-प्रार्थना केल्या जातात आणि सर्व इच्छा आकांक्षा त्याच्याचकडे

मागितल्या जातात. पैगंबर मुहम्मद (स.) हेदेखील देवता स्वरुपातमध्ये येत नाहीत. ते अल्लाहपासून अलग असे एक अस्तित्व दिसून येतात. त्यांचे स्थान मार्गदर्शक, आध्यात्मिक नेता, एक आदर्श मनुष्य, एक सुधारक, शुभसूचना देणारे, अल्लाहच्या प्रकोपाचे भय दर्शविणारे असे आहे. ते न तर अल्लाहचे सहभागी आहेत आणि न त्याचे अवतार आहेत. त्यांची मूर्ती कदापि बनविली जाऊ शकत नाही आणि न त्याच्या छबीला प्रतिमा, कलाकृती आणि चित्र किंवा तसबीरीत रेखाटले जाऊ शकते. चित्राविषयी इस्लामच्या या दृष्टिकोनामुळे अल्लाह किंवा पैगंबराच्या मूर्तीच्या स्वरुपात प्रतिनिधित्व करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही आणि त्यांचे कार्टून बनविणे व आकृती रेखाटणे त्यांच्याविषयी अनादर व द्वेष भावना दर्शविते.

नेहमी पैगंबरांचे वीडियो चित्रेदेखील विरोध-प्रदर्शनाचे वादळ उठवितात. गेल्या काही दिवसांपूर्वी त्या वेळी मोठ्या प्रमाणात प्रदर्शने झालीत, जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना कार्टून स्वरुपात दाखविण्यासाठी डच कार्टूनिस्टने कार्टून बनविले आणि त्यास डच वृत्तपत्र 'जीलॅण्ड पोस्टेन'ने प्रकाशित केले. मुसलमान अशा कृत्यांना जाणूनबुजून भडकविणाऱ्या कृत्याच्या स्वरुपात पाहतात आणि मुसलमान इच्छितात की अशा कृत्यांना त्याच प्रकारे ब्लैसफेमी कायद्या अन्तर्गत आणले जावे, ज्या प्रकारे पाश्चिमात्य देशांमध्ये पवित्र विभूति, उदा. ईसा मसीहबद्दल अनादर प्रदर्शित करणे वर्ज्य आहे. पाश्चिमात्य देशांनी अशा प्रकारच्या मामल्यांमध्ये दुटप्पी नीती अंगीकारुन ठेवली आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये अशा अनेक नाटकांवर बंदी आहे, ज्यात प्रेषित ईसा मसीहची थट्टा-मस्करी उडविली गेली आहे. याला विचारस्वातंत्र्यावर एखाद्या प्रतिबंधाच्या स्वरुपात पाहिले जात नाही. पवित्र व्यक्ती व आणि धर्माच्या पवित्र प्रतीकांचा समानरीत्या सन्मान राखला गेला पाहिजे.

विचार-स्वातंत्र्याचा हा अर्थ नव्हे की आणि तसा तो असूही नये की वाटेल त्याची वाटेल तशी विडंबना करण्याचे स्वातंत्र्य असावे. वस्तुत: विचार-स्वातंत्र्य, अश्लिलता, मर्यादाहीनता, मिथ्यारोपण आणि विद्रोह यासारख्या गोष्टींचा अधिकार देत नाही. जगातल्या सर्वच देशांनी व्यक्तीची

मान-प्रतिष्ठा आणि व्यक्तिगत बाबींच्या सन्मानाकरिता कायदे बनविले आहेत. कोणा डच कार्टूनिस्टला पवित्र पैगंबरांचे अवमान कारक कार्टून बनविण्याची अनुमती कशी दिली जाऊ शकते?

मुस्लिम जगतात कोणीही, कोणत्याही पैगंबरांचे चित्र किंवा प्रतिमा बनवू शकत नाही. व्यंग चित्र रेखाटणे तर खूप लांबची गोष्ट आहे. इस्लाम धर्म हजरत मरियम, जो हजरत ईसा मसीह यांच्या पवित्र माता होत्या, त्यांना अतिशय आदरपूर्ण स्थान प्रदान करतो, वस्तुत: ते पित्याविना जन्मास आले होते. पवित्र कुरआन आपल्या अनुयायींना, इतर धर्मांच्या उपास्यांविषयी, त्यांच्या दैवतांविषयी आणि धर्माविषयी अवमान प्रकट करण्यापासून, बरे-वाईट बोलण्यापासून आणि त्यांची निंदा करण्यापासून रोखतो कारण याच्या प्रत्युत्तरात तेदेखील अल्लाहला बरे वाईट बोलू शकतात, परिणामी परिस्थिती पूर्वीपेक्षा बिकट होऊ शकते.

# पैगंबर (स.) यांनी इस्लामचा प्रसार तलवारीच्या जोरावर केला काय?

प्रत्येक पैगंबराचा आपला एक वेगळा दृष्टिकोन आणि एक वेगळी कार्यपध्दती असे. प्रत्येक पैगंबराचे आगमन वेगवेगळ्या कालखंडात झाले आणि त्यांनी विभिन्न जनसमूहांमध्ये कार्य केले. एका पैगंबराची तुलना दुसऱ्या पैगंबराशी करणे निरर्थक आहे आणि खरे पाहता, पवित्र कुरआन विशेषत्वाने अशी तुलना करण्यापासून रोखतो. हे खरे आहे की पैगंबर ईसा (अलै.) यांनी कोणतेही युध्द केले नाही, परंतु त्यांना युध्द करण्याची गरज भासली नाही, तथापि जसे आम्ही पाहिले, पैगंबर मुहम्मद (स.) यांना आत्मरक्षणास्तव युध्द करावे लागले.

जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना प्रेषितपदाने सन्मानित केले गेले, तेव्हा त्यांनी लोकांना शांतिमार्गाकडे आमंत्रित केले, परंतु मक्केच्या कुरेश सरदारांनी त्यांना सक्त विरोध केला, त्यांना अपशब्द वापरले आणि अनेक वर्षे त्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा खूप छळ केला. त्यांच्या संपत्तीवर कब्जा केला आणि त्यांना मक्का शहराच्या बाहेर घालविले. त्यांनी मुसलमानांचा पाठलाग त्या वेळीही केला, जेव्हा ते स्थलांतर करून मदीना येथे निघाले होते, तसेच त्यांनी मदीनेच्या लोकांजवळ आग्रह धरला की त्यांनी, यांचे शत्रू मुहम्मद (स.) यांना आपल्या शहरातून बाहेर घालवावे किंवा त्यांना नेस्तनाबूत करावे. जेव्हा मदीनाच्या लोकांनी त्यांचे म्हणणे मान्य केले नाही, तेव्हा त्यांना गंभीर परिणामांची ताकीद दिली गेली. मक्केच्या सरदाराने एका ढोंगी मुसलमान अब्दुल्लाह बिन उबईला हा संदेश पाठविला की त्याने त्यांच्या अपराधीला आश्रय देऊन ठेवला आहे, तेव्हा त्याने आमच्या अपराध्याची हत्या केली पाहिजे, अन्यथा आम्ही मक्कावासी मदीनावर हल्ला चढवू आणि मुहम्मद

(स.) यांच्यासोबत तुम्हा लोकांचाही सर्वनाश करून टाकू. जेव्हा मुहम्मद (स.) यांच्यासमोर मृत्यु किंवा संघटित प्रतिकाराच्या माध्यमाने आपल्या श्रध्देचे रक्षण करण्यासाठी कोणताही पर्याय उरला नाही, तेव्हा मुहम्मद (स.) यांनी संघर्षाचा मार्ग निवडला.

अशा प्रकारे युध्दे त्यांच्या शत्रूंनीच त्यांच्यावर थोपविली होती. वस्तुत: युध्द करण्याचा त्यांचा स्वत:चा इरादा नव्हता. यास्तव त्यांनी केलेल्या युध्दांना व्यापक अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर बघितले गेले पाहिजे. नि:संशय ती युध्दे धार्मिक युध्दे होती. कारण त्यांचा तो धर्म इस्लामच होता. ज्यावर निरंतर हल्ले होत होते.

सैनिकी आक्रमणाच्या धमकीला पैगंबर मुहम्मद (स.) सारखे जबाबदार नायक सहजपणे घेऊ शकत नव्हते, ज्यांना प्रत्येक व्यक्तीसाठी एक आदर्श घालून द्यायचा होता आणि आपल्या भावी पिढींच्या शासक आणि सैन्य प्रमुखांकरिता एक आदर्श प्रस्थापित करावयाचा होता. पैगंबर (स.) यांनी अल्लाहच्या संकेतानुसार युध्दाच्या नियमांना स्थापित करण्याचा प्रयत्न केला, ज्याद्वारे युध्दाला शक्यतो मानवीय स्वरुप दिले जाऊ शकावे, शांततेला प्रोत्साहन दिले जावे आणि मनुष्य जीवनाचा विनाश कमीतकमी केला जावा.

इस्लामचे वैरी आणि पूर्वग्रहदूषित मनोवृत्ती राखणारे लोक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या व्यक्तित्वास अशा प्रकारे चित्रित करतात की, ''त्यांनी इस्लाम धर्म तलवारीच्या जोरावर पसरविला'' जणू युध्द लढणे हाच त्यांचा मुख्य व्यवसाय राहिला असावा परंतु वस्तुस्थिती अशी की मदीना येथे त्यांच्या दहा वर्षांच्या जीवन काळात केवळ ९५ दिवस युध्दांमध्ये खर्ची पडले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अधिकांश युध्दे एक दिवसाहून कमी वेळेत जिंकलेत. बाकीची दहा वर्षे अर्थात ३५५५ दिवसांना, पैगंबरांनी लोकांच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्यात आणि धर्मशून्य समाजाच्या सुधारणेत पार पाडले. संपूर्ण अरब द्वीपकल्पात शांती आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. दुराचार आणि जुलमी शासनाचे उच्चाटन केले गेले आणि त्या जागी सर्वांसाठी न्याय, भलाई, नेकी, शांती-सद्‌भावाची स्थापना केली गेली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी लढलेल्या सर्व युध्दांमध्ये दोन्ही बाजूकडील जे लोक मारले गेलेत त्यांची एकूण संख्या १०१४ हून अधिक नव्हती. या युध्दांमध्ये त्यांचे एकूण २५५ लोक मारले गेले आणि शत्रू-सैन्याचे ७५९ लोक मारले गेलेत. ज्या लोकांनी या युध्दांमध्ये भाग घेतला, त्यांच्या तुलनेत मरण पावलेल्यांची संख्या १.५% होती. या आकड्यांची तुलना इतर क्रांतीशी करा ज्या युध्दांच्या माध्यमातून घडून आल्यात.

जी जागतिक युध्दे वर्षानुवर्षे चालत राहिली, त्यात लक्षावधी निर्दोष लोक मारले गेलेत. या सर्व क्रांतीमध्ये प्राणहानीची सीमा फार जास्त होती. उदाहरणार्थ, केवळ द्वितीय विश्वयुध्द पाहा, यात ज्या लोकांनी युध्दात भाग घेतला, त्यांच्या तुलनेत, युध्दात मारल्या जाणाऱ्यांची संख्या ५१७% होती. अर्थात एक कोटी सहा लक्ष लोकांनी युध्दात भाग घेतला होता, तथापि मारल्या जाणाऱ्या लोकांची संख्या याहून कित्येक पट अधिक ५ कोटी ४८ लाख होती.

जेव्हा आम्ही युध्दे, हिंसा आणि पाश्चिमात्यांच्या इतिहासावर विचार करतो, तेव्हा आम्ही असे पाहतो की पाश्चिमात्य संशोधक पैगंबर मुहम्मद (स.) वर टीका करण्याच्या स्थितीत तोकडेच दिसून येतात. तथापि याहून अधिक विषयाशी संबंधित प्रश्न विचारला जाऊ शकतो देशकाळाच्या परिस्थितींना पाहता काय हे अनुमान लावले जाऊ शकते की पैगंबर मुहम्मद (स.) यांचे मिशन युध्दांविना पूर्ण होऊ शकत होते. आपल्या मिशनच्या सुरुवातीला पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खात्रीने शक्यतोवर संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला. त्यांचा समुदाय याच्याखेरीज अन्य कोणत्याही पर्यायाची न तर क्षमता बाळगत होता न त्याच्याजवळ त्यासाठी लागणारी साधने होती. स्पष्टत: पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हिजरत (मक्केहून मदीनेस स्थलांतरा) नंतर सैनिकी पर्याय अंगीकारला.

इस्लामपूर्वी अरब समाज एक असा समाज होता, जो युध्दाच्या संस्कृतीत खूप खोलवर रुजलेला होता, जिथे हल्ला, लूटमार, आपल्या शत्रूचा विनाश इ. सर्वसाधारण सामाजिक रोग होते. आपला जीव वाचविण्याकरिता मुसलमानांना बचावात्मक युध्द करावे लागले. पवित्र

कुरआनात एक महत्त्वपूर्ण ताकीद आहे जिच्यात एक स्पष्ट नैतिक शिकवण दिली गेली आहे, न्यायपूर्ण युध्दाची एक अशी शिकवण जी युध्दाच्या नियमांच्या संदर्भात 'जिनेव्हा कन्वेंशन'मध्ये सम्मिलीत आहे. या शिकवणी हे स्पष्ट करतात की युध्दें आपल्या स्वभावात रक्षणात्मक असली पाहिजेत. सर्व सामान्य नागरिक, स्त्रिया, लहान मुले, वयोवृध्द यांच्यावर हल्ला केला जाऊ नये. उपासना स्थळ, मग ते चर्च, सायनागाग, मंदिर किंवा मस्जिद कोणत्याही प्रकारचे असो ते नष्ट केले जाऊ नये, किंबहुना याहून उत्तम, जर शत्रू पक्षाने शांतीचा प्रस्ताव मांडला तर तो प्रस्ताव त्वरित मान्य केला जावा. याच कारणास्तव इतर धर्म आणि संस्कृतींशी संबंधित लोकांशी मिळून शांती आणि सहनशीलतापूर्वक राहण्यात मुसलमानांचा व्यवहार अन्य समुदायांपेक्षा उत्तम राहिला आहे.

# इस्लाम जोरजबरदस्तीने पसरला काय?

याचे नि:संदिग्ध आणि जोरदार उत्तर आहे ''नाही.''

पवित्र कुरआनात हे स्पष्टपणे फर्माविले गेले आहे :

''धर्माच्या बाबतीत सक्ती नाही. रास्त मार्गापासून वाममार्ग स्पष्टपर्ण वेगळा केला गेला आहे.''(कुरआन- २ : २५६)

एक मनाने रचलेले असत्य, सत्याच्या नावाने साऱ्या जगात प्रचलित झाले आहे, जे इस्लामच्या प्रसाराचा संबंध तलवारीशी जोडते. राजकारणाने प्रेरित अशा या अपप्रचाराला इतिहासाची पाठ्यपुस्तके आणि मीडिया प्रमाणित करतात. भारतात जहालमतवादी संघटनांसाठी हा प्रकार एक राजकीय गरज बनली आहे कारण सांप्रदायिकतेच्या आधारावर ते मतांचे धृवीकरण करू इच्छितात. यास्तव तिरस्काराच्या राजकारणाला खत पाणी घालण्याची गरज असते, जे इतिहास खंगाळून काढले जाते.

असे करण्यात ही मंडळी केवळ, ब्रिटीश वसाहतवादी इतिहासकारांच्या पावलांवर पाऊल ठेऊन चालत आहे. इंग्रजांनी एका अशा देशात, 'फूट पाडा आणि राज्य करा' हा सिध्दान्त लागू केला होता, ज्याची विविधता नवलपूर्ण होती. ही वस्तुस्थिती आहे की मुसलमानांनी भारतावर सुमारे ६५० वर्षे राज्य केले. तेव्हा तेही असे करण्यास समर्थ होते की भारतातील प्रत्येक मुस्लिमेतर नागरिकाला धर्म-परिवर्तन करण्यास विवश करू शकत होते, तथापि त्यांनी असे केले नाही आणि अशा प्रकारे ८०% भारतीय लोकसंख्या हिंदूच राहिली. हेच तथ्य या असत्याचे निराकरण करण्यास पुरेसे आहे की इस्लाम तलवारीच्या जोरावर पसरला.

समकालीन विश्व आणि मुस्लिम बहुल राष्ट्रांच्या स्थितीवर दृष्टिक्षेप टाकल्यास हे स्पष्ट होईल की एकूण ७ बिलियन लोकसंख्येपैकी सुमारे १.६

बिलियन लोक इस्लाम धर्माचे मानणारे आहेत. इस्लाम धर्माच्या या अनुयायींपैकी केवळ २२% अरब लोक आहेत. ज्या देशात सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या आहे, ती इस्लामच्या अरब केंद्रापासून संपूर्ण पृथ्वीच्या अर्धगोलाच्या निम्म्या अंतरावर आहे, त्या देशाचे नाव इंडोनेशिया आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये सुमारे ४०० मिलियन मुसलमान आहेत, ज्यापैकी १५० मिलियन मुसलमान भारतात राहतात. बांगलादेशसारख्या देशात, जो हिंदू परंपरेत रुजलेली संस्कृती बाळगतो, तिथे १२० दशलक्ष मुसलमान राहतात.

मुसलमानांच्या एकूण लोकसंख्येच्या ३०% मुसलमान जगातील मोठ्या लोकशाहीच्या देशांत राहतात. उदा. भारत, संयुक्त राज्य अमेरिका, ब्रिटन, यूरोपीय देश आणि रशियामध्ये. आफ्रिकी देशांची एक मोठी संख्या अशी आहे की जिथे मुसलमानांची लोकसंख्या आहे आणि तिथे कधीही मुसलमानांची शासन सत्ता राहिली नाही. अशाच प्रकारे काही देश उदा. स्पेन आणि फिलिपाइन्स जिथे मुसलमान भूतकाळात शासक होते, आज त्या ठिकाणी उल्लेखनीय मुस्लिम लोकसंख्या नाही. याहून मजेदार गोष्ट अशी की पश्चिमेकडील अनेक विकसित लोकतंत्र उदा. संयुक्त राज्य अमेरिका, ब्रिटन, स्कॅन्डीनेवियन राष्ट्र आणि फ्रान्स व जर्मनीमध्ये इस्लाम सर्वाधिक वेगाने वाढणारा धर्म आहे. अशाने काही मुसलमानांना मनस्वी आनंद होत असला तरी इस्लामबद्दल तिरस्कारासाठी यंत्र स्वरुपात याचे सामर्थ्य कमी लेखले जाऊ नये.

इतिहासाच्या अभ्यासावरून हे दिसून येते की इंडोनेशिया आणि मलेशियासारख्या भूभागात इस्लामी सैन्यांनी कधीही प्रवेश केला नाही. इस्लाम धर्म तिथे सागरी मार्गाने पोहोचला त्याने तिथल्या स्थानिक सभ्यता आणि प्रथा-परंपरांमध्ये स्वत:साठी स्थान बनविले आणि जनसामान्यांच्या मनात घर केले. त्याने तिथल्या सांस्कृतिक परंपरा, वेषभूषा, भोजन आणि भाषा वगैरेत बदल केला नाही, याऐवजी तिथे एक सारगर्भित सांस्कृतिक एकता निर्माण झाली, जिने इस्लामचे एक नवे रुप सादर केले, जिने पश्चिम आशियाचे सिध्दान्त आणि दक्षिण पूर्व आशियाच्या आचरणांचे व परंपरांचे

मिश्रण तयार केले.

इस्लामी इतिहास या गोष्टीस साक्षी आहे की असे अनेक भूभाग, जिथे इस्लाम विजयाच्या माध्यमाने पोहोचला, तिथली लोकसंख्या इस्लामकडे आकृष्ट झाली आणि ती आजदेखील तशीच इस्लामला अंगीकारुन आहे. इस्लामने त्या भूमींवर केवळ विजय प्राप्त केला नाही किंबहुना लोकांच्या हृदयांवरही विजय प्राप्त केला. जे लोक आपल्या पूर्वजांच्या धर्मावर कायम राहू इच्छित होते, इस्लामने त्यांच्यासाठी धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले उदा. इजिप्तचे किब्ती ख्रिश्चन आणि लेबनानचे मेरोनाईट ख्रिश्चन इस्लामने वारसासाठी महत्त्वपूर्ण आणि वारसाच्या हिताला जोपासणाऱ्या सांस्कृतिक संपत्तिला नष्ट केले नाही. स्फिक्स, अबू सिंबल येथील फिरऔनी मंदिर आणि पिरॅमिड आजदेखील इतिहासाचा ठेवा म्हणून अस्तित्वात आहेत. हीदेखील एक वस्तुस्थिती आहे की अफगाणिस्तानच्या बामियानमध्ये असलेल्या बुध्द स्तूपां (ज्यांना कट्टरपंथी तालिबानींनी नष्ट केले) महमूद गजनवीनेदेखील हात लावला नव्हता, ज्याचा 'मूर्तीभंजक' या नावाने प्रचार केला जातो. ही वस्तुस्थिती, इस्लामेतर सांस्कृतिक वा धार्मिक वारसाबद्दल मुसलमानांनी राखलेल्या आदर सन्मानाची पुष्टी करते. इराणमध्ये असलेले पर्सिपोलिस आजही सुरक्षित आहे. इंडोनेशियाच्या बारबुदर आणि बाली येथे असलेले हिंदू मंदिरे सतत पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. प्रामुख्याने पूर्वीच्या राजांच्या जुलमी शासनानेच इस्लामला मुक्ती देणारी शक्ती बनविले.

आता भारतीय उपखंडावर विचार करा, जो असा भूभाग आहे ज्याच्या उत्तर पश्चिम सीमा अरब लोकसंख्या असलेल्यामध्ये अशियाच्या भूभागाशी संलग्न आहेत. हे खरे आहे की इस्लाम धर्म या ठिकाणी सुरुवातीला, सिंध नदीच्या क्षेत्रावर विजय प्राप्त करणाऱ्या सैन्यांच्या माध्यमाने आला. परंतु केरळबाबत विचार करा जिथे इस्लाम सुरुवातीपासूनच सुमारे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनकाळातच आला होता. भारतीय द्वीपकल्पाच्या सागरी तटांवर मुस्लिम जनजाती ११ व्या शतकापासून १३ व्या शतकांच्या दरम्यान येत राहिल्या. हा तो कालखंड होय, जेव्हा इब्ने बतूताने या भूभागांचे भ्रमण केले. दिल्लीचे मोगल शासकदेखील या मुसलमानांच्या

अस्तित्वाशी अनभिज्ञ होते आणि त्यांच्या संदर्भात असे म्हटले जाते की त्यांनी पोतुर्गालींना हा अधिकार दिला होता की त्यांनी समुद्री डाकूं (मुसलमानां) चा आपल्या अटींनुसार समाचार घ्यावा. केरळमध्ये, जिथे इस्लाम अरब व्यापाऱ्यांच्या माध्यमाने आला, तिथे त्रावणकोरच्या राजांनी मुसलमानांना मदत केली, जे सागरी-व्यापाराकरिता महामानव समजले जात, जे भारतीय जनतेच्या पारंपरिक श्रध्देनुसार वर्ज्य होते. ज्याअर्थी या साम्राज्याची संपन्नता समुद्री व्यापारावर आधारित होती, म्हणून त्यांनी नावाड्यांना अनुमती दिली. येथपर्यंत की त्यांना मदत पुरविली, त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यास प्रेरित केले, जेणेकरून तिथल्या नागरिकांपैकी नावाड्यांची एक तज्ञ व कुशल टीम तयार व्हावी. त्यांना हाही आदेश दिला गेला की सर्व नावाडी कुटुंबांपैकी निदान एका मुलाचे पालनपोषण मुसलमानाच्या स्वरुपात केले जावे. अशा प्रकारे जेव्हा इब्ने बतूता भारतात आला आणि येथून मालद्वीपकडे गेला, तेव्हा त्याने आठव्या शतकात मालबारच्या तटवर्ती क्षेत्रात अनेक मुस्लिम वसाहती पाहिल्या.

उत्तर भारतातही, जिथे लोकांची एक मोठी संख्या इस्लामने प्रभावित झाली, तिथे जबरदस्तीपूर्वक धर्म-परिवर्तन झाले नाही. मुहम्मद बिन कासिम, ज्याने सिंध पादाक्रांत केला होता, त्याच्यावर सिंधचे लोक जीवापाड प्रेम करीत. क्रूर राजा दाहिरच्या राजवटीत, ज्या लोकांनी मुहम्मद बिन कासिमचे स्वागत केले. जेव्हा मुहम्मद बिन कासिमला, खलीफा सुलेमान बिन मरवानच्या आदेशान्वये मुआविया इब्ने मुहल्लवसोबत कैदीच्या स्वरुपात दमिश्क पाठविले गेले तेव्हा सिंधचे रहिवाशी मुहम्मद बिन कासिमकरिता रडले आणि त्यांनी कीरज नावाच्या ठिकाणी त्याची मूर्ती ठेवून त्याच्या स्मृतीस जपून ठेवले (पाहा- विल्यम जॅक्सन ए.वी. 'हिस्ट्री ऑफ इंडिया', खंड २, ग्रोलिए सोसायटी, लंडन, बडौदा आवृत्ती, १९०७, पृ. १४) मुहम्मद बिन कासिमने त्या जाट आणि मेदींना आपल्या सैन्यात भरती करून घेतले, जे राजा दाहिरच्या जुलमी राजवटीपासून त्रस्त होते. जाट व मेदी लोकांनी एका परकीय सैन्यात भरती होणे पसंत केले. दाहिरच्या शासन काळात त्यांच्याशी दुर्व्यवहार आणि अपमानकारण वागणूक केली जात होती. त्यांना पगडी आणि

चांगला पोषाख घालून घोड्यावर स्वार होण्यापासून रोखले जात असे. त्यांना केवळ लाकूड तोड्या आणि पाणी वाहून नेणारा भिस्ती बनवून ठेवले गेले होते. (पाहा. प्रा. ईश्वरी प्रसाद, 'हिस्ट्री ऑफ मिडिवल इंडिया', पृ. ५५, ५६)

इस्लाम धर्म त्या भूभागात वेगाने पसरला, जिथे बौध्द धर्माचे प्राबल्य होते, वास्तविक त्या ठिकाणी बौध्द धर्माचा ऱ्हास होत चालला होता. सिंधमध्येही अधिकांश लोक बौध्द होते आणि ते ब्राम्हण राजाकडून फार त्रस्त होते. त्याच प्रकारे बंगाल, उत्तर पश्चिम सीमावर्ती राज्ये आणि पंजाब बौध्द बहुल क्षेत्र होते जे ब्राम्हण धर्माच्या जाचाला तोंड देत होते. बौध्द धर्म भारतातून रहस्यमयरीत्या लुप्त झाला नाही, किंबहुना छळ, जुलूमाने अगतिक होऊन बौध्दांनी एक तर देश-त्याग केला किंवा संधी प्राप्त होताच त्यांनी इस्लामचा आश्रय घेतला. जेव्हा उमय्या वंशाचे उमर बिन अब्दुल अजीज खलीफा बनले तेव्हा त्यांनी सिंधच्या राजकुमार व राजकुमारींना इस्लाम धर्म स्वीकारण्याचे निमंत्रण देत पत्र लिहिले. राजा दाहिरचा पुत्र जयशियाने इस्लामचा स्वभाव आणि त्याच्या सिध्दान्तांविषयी ऐकले होते, यास्तव त्याने इस्लाम धर्म स्वेच्छापूर्वक स्वीकारला (पाहा. विल्यम जॅक्सन, ए.वी. भारताचा इतिहास खंड ५, ग्रोलिए सोसायटी, लंडन, बडौदा आवृत्ती १९०७ पृ. १५)

दिल्लीच्या मुस्लिम शासकांद्वारे हिंदूंचे जबरदस्तीपूर्वक धर्म-परिवर्तन करविण्याच्या आरोपाच्या उलट अलाउद्दीन खिलजीने धर्म-परिवर्तन करून मुसलमान होण्यावर प्रतिबंध घातला. त्याने हे अशासाठी केले नाही की तो मोठा धर्मनिरपेक्ष शासक होता. त्याने पाहिले की व्यापारी वर्गाच्या अधिकांश लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारल्यामुळे जिझिया कराच्या माध्यमाने प्राप्त होणारा सरकारी महसूल कमी होऊ लागला आहे.

अकबरसारख्या सम्राटांनी लोकांना इस्लाम धर्मात आणण्याऐवजी जाचक जुलमी कायद्यांना निरस्त करून हिंदू धर्मातील कुप्रथांना सुधारण्याचा प्रयत्न केला. त्याने अनेक सुधारणा केल्या, ज्यांना हिंदू रीती-रिवाजांमध्ये हस्तक्षेप समजले जाऊ शकते. ज्या गोष्टीला तो आपल्या मानवी भावनांसाठी हानिकारक समजत असे त्या गोष्टीला त्याने बदलण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ, त्याने बाल-विवाह, अग्नि-परीक्षा, पशू बळी इ.वर प्रतिबंध

घातला. विधवांच्या पुनर्विवाहास त्याने अनुमती दिली आणि सती-प्रथेला ऐच्छिक ठरविले. त्याने सती-प्रथेला मज्जाव केला नाही, कारण तो समजत होता की असे केल्यास मोठ्या प्रमाणात विरोध होईल. त्यानेवर आणि वधू यांची मर्जी जाणून घेणे बंधनकारक ठरविले (पाहा. विल्यम जॅक्सन ए.वी. 'भारताचा इतिहास', खंड ४, ग्रोलिए सोसायटी, लंडन, बडौदा आवृत्ती, १९०७, पृ. १५,१८)

सत्ता नियंत्रणाचे कसब राज्यकर्त्यांना जनतेचे प्रिय बनवू शकत नाही आणि म्हणूनच कोणताही मुस्लिम सम्राट इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी एखाद्याचे हृदय जिंकू शकत नव्हता. अधिकांश लोक सूफी संतांच्याद्वारे आकर्षित होत असत, ज्यांचे लंगर (अन्नछत्र) आणि मक्बरे रुग्णांना आश्रय देत असत आणि ही ठिकाणे गोर गरीब, वंचित उपेक्षित व निराधार लोकांसाठी मोठा आधार होती. अजमेर, महरौली आणि बस्ती निजामुद्दीनसारख्या दर्गाहस्थानांनी मोठ्या संख्येत श्रध्दाळू लोकांचे प्रेम, आदर सन्मान प्राप्त केला. संत-महात्मे साधेपणाचे जीवन जगत आणि गरीबांना अशा प्रकारे खाऊ घालत की भंडाऱ्यात संध्याकाळपर्यंत, पुढच्या दिवसाकरिता काहीच उरत नसे, तसेच रुग्णांच्या उपचाराकरिता हकीम वैद्यांची नेमणूक करीत, जे विनाशुल्क उपचार करीत. ऐतिहासिक दस्तावेज दर्शवितात की साम्राज्याच्या विरोधकांद्वारे दिल्लीच्या सत्तेवरून शासकांना हजरत निजामुद्दीन औलिया यांच्या काळात अनेकदा हटविले गेले परंतु कोणीही त्यांच्या 'खानकाह' (आश्रमा) ला हातही लावला नाही.

भारतीय संघराज्यांतर्गत असलेली मुस्लिम बहुल राज्य जम्मू आणि काश्मीर मध्य आशियाच्या सूफी-संतांद्वारे इस्लाम धर्मात आणले गेले आणि शतकानुशतके तिथे हिंदू राजा राज्य करीत राहिले.

निजामच्या शासन सत्तेखाली असलेले हैद्राबाद राज्य, जेव्हा भारतीय संघराज्यात विलीन झाले, तेव्हा तिथल्या मुसलमानांची लोकसंख्या फक्त १२% होती, वास्तविक त्या वेळी मुसलमान त्या ठिकाणी चार शतकांपर्यंत शासक म्हणून होते.

जालंधरमध्ये हिंदू जाट लोकांचा एक समुदाय राहतो ज्यांना सुलतानी जाट या नावाने ओळखले जाते. त्यांना सुलतानी जाट एवढ्यासाठी म्हटले जाते की ते एक सूफी संत 'सुलतान सखी सरवर'चे श्रध्दाळू आहेत. ज्यांचा दर्गाह शाहकोटमध्ये आहे, हे ठिकाण आता पाकिस्तानात आहे. हे लोक आजदेखील हलाल मांस खातात. त्यांच्यात अधिकांश शेत-मजूर आहेत. ते केवळ हुक्का पितात. ते आपल्या गावाच्या वेशीवर सुलतान जियारतची स्थापना करतात, ज्याची ते प्रत्येक गुरुवारी साफ-सफाई करतात आणि तिथे दिवा बत्ती लावतात. शाहकोट येथे असलेल्या सुलतान सखी सरवरच्या दर्गाहवर ते जत्थ्याने जातात.

शिखांच्या राजवटीत मुल्तानचा गव्हर्नर सावनमलने हा जत्था रोखण्याचा प्रयत्न केला. त्याने त्या प्रत्येक हिंदूवर शंभर रुपये आर्थिक दंड लागू केला जो सुलतानी जत्थ्यात जात असे. परंतु १९ व्या शतकापर्यंत ते जात राहिले, ज्या काळात लुधियाना आणि जालंधरचे गॅजेटियर संग्रह व्हायला सुरुवात झाली होती, हे तर सर्व भारताच्या संदर्भात आहे.

केनिया तंजानिया आणि मेडागास्करसारखी राज्ये, जिथे मुस्लिम सैन्यांनी कधीही आक्रमण केले नाही, तरीदेखील तिथे मोठ्या संख्येत मुस्लिम संप्रदायाचे लोक वास्तव्यास आहेत.

१. तंजानियाचे ७०% लोक मुसलमान आहेत, तथापि त्या ठिकाणी नेहमी ख्रिश्चनांचे शासन राहिले आहे.

२. इस्लाम धर्माने यूरोपच्या हृदयातही विस्तृत मार्ग निर्माण केले आहेत. पूर्वेकडील यूरोपच्या बलकान राज्यांवर तुर्कीच्या उस्मानी शासकांची राजवट ५ शतकांपेक्षा जास्त काळ राहिली आहे, परंतु अल्बानिया आणि बोस्निया व हर्जीगोबिनाच्या लोकांखेरीज ते कधीही मुसलमान झाले नाहीत. अल्बानियामध्ये ९०% मुसलमान होते, तथापि बोस्निया आणि हर्जेगोविना यूगोस्लावियाच्या संघांतर्गत गेल्या काही दिवसांपर्यंत मुस्लिम बहुल राज्ये होती. आता बोस्निया त्यांच्यापासून वेगळा होऊन एक स्वतंत्र व सार्वभौम देश बनला आहे.

३. याच्या उलट स्पेन, ज्यावर मुसलमान ८ व्या शतकापर्यंत (इ. सन ७१२-१४९२) शासक म्हणून होते. तिथे मुसलमान बहुसंख्या राहिले नाहीत. त्यांच्या शासन काळात ख्रिश्चन आणि ज्यूना आपापल्या धर्मानुसार आचरण करण्याची पूर्ण सूट होती. आतापर्यंत उपलब्ध असलेली ऐतिहासिक तथ्यें या गोष्टीचे समर्थन करतात. इ. सन १४८० मध्ये एका लवादाद्वारे इक्वीजीशन अभियानात, जे लोक ख्रिश्चन बनण्यास तयार होत नसत, त्यांना देश सोडून जाण्यास सांगितले जात असे किंवा त्यांना देशा बाहेर घालविले जात असे. अशा प्रकारे तिथे वास्तव्यास असणाऱ्या मुसलमान व ज्यू लोकांना बलपूर्वक ख्रिश्चन बनविले गेले.

त्याचप्रमाणे अरब भूमीवर पुरेशा संख्येत ख्रिश्चन संप्रदायांचे अस्तित्व हा संकेत करते की इस्लाम लोकांवर जोर जबरदस्तीने थोपला गेला नव्हता

४. मिस्र (इजिप्त) मध्ये १०% किब्ती ख्रिश्चन आहेत.

५. इंडोनेशिया असा देश आहे, जिथे जगातील सर्वाधिक मुसलमान राहतात. बाली इंडोनेशियाचे हिंदू बहुल द्वीप आहे आणि या देशात हिंदू मंदिरे मोठ्या संख्येत आहेत.

६. मलेशिया देशाची बहुसंख्याक लोकसंख्यादेखील मुसलमानांची आहे, तथापि तिथे कोणतेही इस्लामी सैन्य गेले नाही. त्या ठिकाणी इस्लाम युध्दाद्वारे पसरला नाही, किंबहुना तो आपल्या नैतिक शिकवणीद्वारे पसरला. मलेशियाचे ४५% लोक मलय नाहीत आणि त्यांची भूमिका व्यापार, शिक्षण, व प्रशासनात इतकी महत्त्वपूर्ण आहे की तिथे भूमी पुत्रांना आरक्षण दिले जाते.

७. लेबनान देश, जिथे मुसलमान बहुसंख्याक आहेत. कायद्यानुसार तिथला राष्ट्रपती नेहमी एक मेनोराइट ख्रिश्चन असतो. पंतप्रधान मात्र मुसलमान असतो. पार्लमेंटचा अध्यक्ष शिया असतो आणि इतर पदे देशातील बहुवांशिक जनजातींना त्यांच्या संख्येच्या आधारावर दिली जातात.

८. ख्रिश्चनांचे प्राचीन संप्रदाय आजदेखील सीरिया, जॉर्डन आणि इराक या देशांमध्ये अस्तित्वात आहेत.

९. ट्यूनिशिया आणि इराणमध्ये ज्यूचे वास्तव्य आहे. ट्यूनिशिया देशात ते व्यापार-उद्योगात प्रभावशाली भूमिका पार पाडतात.

१०. बांगलादेशाची १२% लोकसंख्या हिंदू धर्मीय आहे आणि हे लोक कला, साहित्य, मीडिया आणि बंगाली चित्रपट सृष्टीत प्रभावी भूमिका पार पाडतात. या देशाच्या राजधानीचे ढाका हे नाव ढाकेश्वरी मंदिराच्या नावावरून पडले आहे. परंतु या नावाचे इस्लामी करण करण्याचा कोणताही प्रयत्न केला गेला नाही. बांगलादेश आजदेखील अनेक अशा हिंदू रीती-रिवाजांचे पालन करतो, जे इस्लामी नियमांशी विसंगत नाहीत. इथल्या स्त्रिया बिंदी आणि सिंदूर वापरतात आणि साडी त्यांच्या वेशभूषेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. बांगला भाषा संस्कृत प्रचूर भाषा आहे बांगलादेशी लोक नूतन वर्षाचा दिवस वैशाखच्या प्रथमेला साजरा करतात, जो भारतीय उपखंडाच्या पारंपरिक पीक कापणीच्या हंगामाशी मिळता जुळता आहे. इस्लाम धर्माने आपल्या लोकांना एकसमान पोषाख घातला नाही. इस्लाम सांस्कृतिक विविधतेस सहन करतो.

११. हा उल्लेख करणेही मजेदार ठरेल की मंगोलांनी इस्लामी साम्राज्याच्या एका मोठ्या भागावर विजय प्राप्त केला तेव्हा त्यांनी इस्लाम धर्माला नष्ट करण्याऐवजी त्याचा अंगीकार केला. ही इतिहासातील विचित्र घटना होय की विजेत्यांनी, पराजित जनसमूहाचा धर्म स्वीकारला. ज्याअर्थी ते विजेता होते, तेव्हा हे उघड आहे की त्यांना मुसलमान होण्यासाठी विवश केले गेले नसेल. संपूर्ण जगात जिवित वाचणाऱ्या १.७ बिलियनपेक्षा अधिक मुसलमानांना विचारा की काय त्यांना हा धर्म पत्करण्यास भाग पाडले गेले? जगातील सर्वांत मोठा मुस्लिम देश आज इंडोनेशिया आहे आणि इथे कधीही कोणतेही युध्द लढले गेले नाही. तेव्हा तलवार आली कुठून? कोणी एखाद्याला कशा प्रकारे,

आध्यात्मिक स्वरुपात बक्षिस प्रदान करणाऱ्या व सत्कर्मांचा आदेश देणाऱ्या इस्लामसारख्या धर्मावर चालण्यासाठी विवश करू शकत होता?

इतिहासाच्या या संमिश्र सूत्रांनी सर थॉमस अर्नाल्डच्या लेखणीला हे लिहिण्यास प्रवृत्त केले की, ''इस्लाम त्या कपोल कल्पित व्यक्तिमत्त्वाद्वारे पसरला नाही, ज्याच्याविषयी हे गृहीत धरले जाते की एका मुस्लिम योद्धयाच्या एका हातात तलवार तर दुसऱ्या हातात कुरआन असतो, किंबहुना हा पवित्र कुरआनाच्या शिकवणीचे सामर्थ्य आणि पैगंबर (स.) यांच्या चरित्राद्वारे पसरला.'' (पाहा - प्रिचींग ऑफ इस्लाम)

पाश्चिमात्य देशांच्या लोकांमध्ये इस्लामचे आकर्षण स्पष्ट स्वरुपात वाढत आहे. सहस्त्रावधी लोकांनी या धर्माचे वैयक्तिक अभ्यासाद्वारे ११ सप्टेंबरच्या घटनेनंतर स्वेच्छापूर्वक इस्लाम धर्म स्वीकारला. सर्वेक्षणाद्वारे हे कळले आहे की इस्लाम धर्मात नव्याने दाखल होणाऱ्यांमध्ये ७०% स्त्रिया आहेत या वस्तुस्थितींनी प्रभावीपणे हे मनाने रचलेले सत्य रद्दबातल व्हायला हवे की इस्लाम जोर जबरदस्तीच्या बळावर पसरला जर असे असते तर त्याची उलट प्रतिक्रियाही आज दिसून आली असती, कारण आज इस्लाम धर्माची छबी स्त्री विरोधक आणि हिंसात्मक दाखविली जात आहे. आता ती वेळ येऊन ठेपली आहे की इस्लामवर मनसोक्त टीका करणाऱ्यांनी इस्लामला विकृत स्वरुपात सादर करण्याची घोडचूक ध्यानी घ्यावी आणि संशयी इस्लाम विरोधी शक्तिद्वारे भरकटत जाण्यापासून किंवा मार्गदर्शन केले जाण्यापासून सुरक्षित राहतात.

# इस्लाम आणि पश्चिम

पाश्चिमात्यांद्वारे इस्लाम धर्माला राक्षसाच्या स्वरुपात सादर करण्याचा एक लांब लचक इतिहास आहे. हा इतिहास इस्लाम आणि ख्रिश्चन यूरोप यांच्या दरम्यान संघर्षाच्या १००० वर्षांच्या कालावधीत पसरलेला आहे. इस्लाम अरब द्वीपकल्पात आपल्या उदयाच्या एक शतकाच्या आतच यूरोपचे द्वार ठोठावू लागला इ. सन ७१२मध्ये उमय्या वंशाचा सेनापती तारीक बिन जियादद्वारे स्पेनवर विजय प्राप्त केला गेला. ज्यामुळे इबेरियन द्वीपकल्प (ज्याला नंतर 'अन्दलुस' किंवा 'स्पेन' म्हटले गेले) आणि हा पूर्णपणे ८०० वर्षांपर्यंत इस्लामी शासन सत्तेखाली राहिला. हेच ते स्थान होते, जिथे इस्लाम आपल्या धार्मिक आणि साम्राज्यवादी घेऱ्यातून बाहेर निघाला आणि एका संस्कृतीच्या रुपाने समोर आला आणि स्वत:ला अशा शस्त्रविहीन शक्तीच्या स्वरुपात विकसित केले, ज्याचे उदाहरण तत्कालीन जगात आढळत नाही. कार्डोवा (कर्तबा) आणि ग्रेनाडा (गर्नाता) शहरातील इस्लामी विश्व विद्यालये, ग्रंथालये आपल्याकडे मध्य-पूर्व, आफ्रिका आणि यूरोपहून विद्वानांना, खगोल शास्त्रज्ञांना, चिकित्सकांना, शास्त्रज्ञांना आणि तत्त्वज्ञानींना आकर्षित करीत राहिले.

त्रिमूर्ती-श्रध्देच्या क्लिष्टतेच्या तुलनेत तौहीद (एकेश्वरवाद) चा इस्लामी सिध्दान्त अधिक ठोस आणि स्पष्ट वाटत होता. कुरआन आपल्या मूळ स्वरुपात आणि शुध्द अवस्थेत असल्यामुळे एक आव्हान होता. इस्लाम जो धार्मिक लोकांना स्वातंत्र्य बहाल करत होता, त्याच्या अंगी अन्य एखाद्या गोष्टीच्या तुलनेत जास्त आकर्षण होते. स्वातंत्र्याचा हा अनुग्रह मुस्लिम स्पेनमध्ये ज्ञान-विज्ञानाच्या विकासाच्या भरारी मारण्याच्या रुपात दिसून येत होता. ख्रिश्चन यूरोपला आपल्या अस्तित्वासाठी एक आव्हान जाणवत होते. यामुळे इस्लामच्या वाढत्या महापूराला रोखण्यासाठी ते नवीन मोर्चे

शोधण्यासाठी प्रेरित झाले. पाश्चिमात्यांनी इस्लामविरुध्द धार्मिक आणि वैचारिक हल्ले चढवायला सुरुवात केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या व्यक्तिमत्त्वास मुख्य लक्ष्य म्हणून निवडले गेले. दोषारोपणासाठी पैगंबरांचे बहुपत्नित्व, युध्दे या गोष्टींना सोपी हत्यारे बनविले गेले. क्रूसयुध्दांद्वारे झालेल्या विध्वंसानंतर सलाहुद्दीन अय्यूबीद्वारे पवित्र स्थळांवर पुन्हा अधिकार मिळविण्यास व त्याच्या बऱ्याच कालावधीनंतर कुस्तुन्तुनिया-कान्स्टनटिनोपल (तुर्की-इस्तंबूल, जी पूर्वी रोमन किंवा बाजन्तिनी साम्राज्याची राजधानी होती) आणि उस्मानी साम्राज्याचा पूर्वेकडील भागांमध्ये प्रवेशाने यूरोपला आहत होण्यास वेगळे कारण मिळवून दिले.

आज इस्लाम आपल्या पूर्वीच्या प्रतिमेचे निस्तेज रुप असल्यामुळे मुसलमानांचे आपसात विभाजन, पाश्चिमात्यांद्वारे ऊर्जा स्त्रोतांची शिकार करण्यासाठी तेल-संपत्तीने धनाढय मध्य पूर्वेत युध्द छेडणे तिरस्काराच्या विझत चाललेल्या आगीवर तेल शिंपडण्याची गरज गेल्या दशकांमध्ये दुप्पट झाली. यास्तव हे सविस्तर सांगण्याची गरज नाही की, पाश्चिमात्य प्रसारमाध्यमे आणि राजकीय शासक अशा प्रकारच्या नीतीला का म्हणून बळी पडले? ते फक्त हे इच्छित होते की तिरस्काराला क्रोध भावनेत परिवर्तीत केले जावे. वास्तविक यूरोप खंडात अशा लहान राष्ट्रांची कमतरता नव्हती, जी निर्धारित राष्ट्रीय सीमांपासून वेगळे होण्यासाठी संघर्ष करीत होती. त्यांच्यापैकी काही बास्के, आयरिश होते. त्यांना नव्या शत्रूच्या रेखा चित्रात रंग भरण्यासाठी वेगवेगळया आणि विभिन्न रंगांच्या सशस्त्र लोकांची खूप खूप आवश्यकता होती. पाश्चिमात्यांना धडा शिकविण्यासाठी जी सामर्थ्ये प्रवृत्त आहेत त्यांच्यासाठी पॅलेस्टाइनचे शरणार्थी कॅम्प, इराक आणि अफगाणिस्तानमध्ये कारपेट बॉम्ब वर्षाव केला गेलेला भूभाग आपले मुजाहिद भरती करण्यासाठी सुपीक जमीन सिध्द झाला.

इस्लाम आणि पश्चिमात्यांच्या संबंधांचे चित्रण ज्या ऐतिहासिक शत्रुत्वात होते, त्यावर एक नजर टाकणे लाभदायक ठरेल या संदर्भात एक महान विद्वान जियाउद्दीन सरदार यांचा खालील प्रबंध मागदर्शक ठरेल.

इस्लामच्या उदयापासूनच मुसलमान युरोपसाठी समस्या बनले होते. आधी इस्लाम एक धार्मिक समस्या म्हणून होता. ईश्वराच्या स्वत: आपल्याच पुत्राच्या ६०० वर्षांपूर्वी सूळावर चढविल्यानंतर आणि मग उठवून घेतल्यानंतर एक अरबी पैगंबराचे काय प्रयोजन होते? दुसरे हे की जेव्हा इस्लामचे आगमन झाले. तेव्हा आपल्या उदयाच्या काही दशकांच्या काळातच तो यूरोपच्या सीमेवर पोहोचला, ज्यामुळे तो एक राजकीय समस्या बनला. तिसरे असे की मुस्लिम सभ्यता व संस्कृतीच्या बौध्दिक कामगिरींनी इस्लामला एक बौध्दिक समस्येचे रुप दिले. इस्लामी समस्येच्या प्रत्येक पैलूचा सामना विशेष साधनांद्वारे केला गेला.

धार्मिक स्वरुपात ख्रिश्चन यूरोप, केवळ इस्लाम, त्याचे पैगंबर आणि त्याच्या अनुयायींचा इन्कार करू शकत होता. राजकीय स्वरुपात यूरोपने इस्लामविरुध्द क्रुसेड-युध्दांची साखळी सुरु केली. जेव्हा ही कारस्थाने सफल झाली नाहीत, तेव्हा त्यांनी पूर्णत: मुस्लिम जगताच्या वसाहतीकरणावर काम करायला सुरुवात केली. बौध्दिक रुपाने, यूरोपने मुस्लिम चिंतन आणि इतिहासावर नियंत्रण राखण्याकरिता अनेकानेक विषयांची शृंखला कायम केली.

## १. जाहिर निषेध :

इस्लाम आणि त्याचे पैगंबर (स.) यांचा सार्वजनिक निषेध करण्याचा प्रकार आरंभापासूनच सुरु झाला होता. पाल अल्वारस (मृत्यु इ. सन ८५९) ने डॅनियलच्या पुस्तकाचा वापर हा शोध लावण्यासाठी केला की मुहम्मद अेन्टी क्राइस्ट 'ख्रिस्त-विरोधक' विवरणाशी साम्य राखतात आणि ते बीस्ट (हिंस्त्र पशू) इ. सन ६६६ चे पूर्ण प्रतीक आहेत ज्यास पैगंबराच्या मृत्युचे वर्ष समजले जात होते. पैगंबरांचे हे निंद्य चित्रण लोकप्रिय नाटकांच्या साहित्य-शृंखलेत समाविष्ट केले गेले ज्यांचे नाव बेंदे नवदे क्वहमेजम असे ठेवले गेले, ज्यात पैगंबरांच्या नावाला, राक्षसाचा समानार्थी शब्द 'महाडन्ड' वापरला गेला आणि अशाच प्रकारची निंदा त्यांच्यापैकी विकसित होणाऱ्या महाकाव्यांमध्येही केली गेली. संपूर्ण मध्यकाळाच्या अवधीत त्यांनी इटालवी, जर्मन, स्पेन,

फ्रान्सिसी आणि इंग्रजी साहित्यावर प्रभाव टाकला. हा प्रभाव १७ व्या आणि विसाव्या शतकात पुन्हा समोर आला. या विशेष साहित्याच्या पिढीतील आजची उत्पत्ति असलेले सर्वांत ताजे उदाहरण सलमान रश्दीचे सॅटानिक वर्सेज आहे, जे त्याने चान्सो साहित्य शैलीत पैगंबर मुहम्मद (स.) यांचे निंदापूर्ण चरित्र पुन्हा लिहिले आहे.

## २. क्रुसेड युध्द

एकदा जेव्हा इस्लामला राक्षस, काफिर आणि वैऱ्याच्या रंगात प्रस्तुत केले गेले, तेव्हा त्याच्या विरोधात युध्दास उचित ठरविणे तुलनात्मकदृष्ट्या अधिक सहजसुलभ झाले. नोव्हेंबर इ. सन १०९५मध्ये क्लेयर मॉन्डच्या 'पीस ऑफ गॉड' नामी प्रसिध्द कौन्सिलमध्ये पोप अर्बन द्वितीयने क्रुसेड युध्दांची सुरुवात केली. कौन्सिलने इस्लामविरुध्द 'वार ऑफ गॉड' (ईश्वरासाठी युध्द) आणि जेरुसलमच्या मुक्तीचे आवाहन केले. ख्रिश्चनांवे धर्म युध्द यूरोप ज्यू लोकांच्या नरसंहारासह सुरु झाले. क्रुसेड युध्द करणारे चाळीस दिवस जेरुसलमला वेढा टाकल्यानंतर १५ जुलै इ. सन १०९९ ला त्यात दाखल झाले. एक मुस्लिम इतिहासकार इब्ने असीरच्या कथनानुसार त्यांनी ७०,००० पुरुष स्त्रिया आणि बालकांची हत्या केली.

**आपण टॅमन्ड अगीलचा प्रत्यक्ष पाहिलेला रिपोर्ट ऐका :**

> ''तिथे अद्‌भुत दृश्ये पाहिली जाऊ शकत होती. आमचे काही लोक आपल्या शत्रूंची डोकी कापून वेगळे करीत होते, इतर काही लोक बाणांनी त्यांना लक्ष्य बनवित होते, यासाठी की ते मिनाऱ्यांवरून खाली कोसळून पडावेत, अन्य काही लोक त्यांना अग्नि-ज्वालांच्या हवाली करून यातना देत होते. शहरातल्या गल्लीबोळांमध्ये कापलेली डोकी, हातापायांचे ढीग पाहिले जाऊ शकत होते. पुरुषांच्या आणि घोड्यांच्या शवांमधून जाण्याकरिता आपला मार्ग बनविण्याची गरज भासत होती. परंतु सोलोमन टेंपलमध्ये जे काही घडले त्याच्या तुलनेत ही एक

क्षुल्लक बाब होती. सोलोमन टेंपल असे स्थान आहे, जिथे सामान्यत: धार्मिक सेवा पार पाडल्या जात. तिथे असे काय घडले? जर मी खरे खरे सांगेन तर हे विश्वासाच्या सीमे पलीकडचे ठरेल. यास्तव मला एवढेच सांगू द्या की तिथे कमीतकमी हे घडले की ते देऊळ आणि सुलेमानच्या पोर्चमध्ये लोक अशा प्रकारे स्वार होत होते की रक्त त्यांच्या गुडघ्यापर्यंत आणि घोड्यांच्या लगामापर्यंत होते. वस्तुत: ही ईश्वराची तीव्र इच्छा आणि त्याचा भव्य निर्णय होता की हे स्थान अधर्मी लोकांच्या रक्ताने भरगच्च व्हावे, यासाठी की हे स्थान त्यांच्या निंद्य कर्मांना दीर्घकाळ झेलत राहिले आहे.''

पवित्र भूमीत, इतर ठिकाणी क्रुसेड युध्द करणाऱ्यांनी मुसलमानांना मोठमोठ्या भांड्यांमध्ये उकळवून काढले. लहान बालकांना लोखंडी सळयांमध्ये भोसकून भाजून काढले आणि सारासेन्सच्या अधर्मी लोकांची शिकार करण्यासाठी गावोगावी फिरत होते.

जेव्हा दुसरे खलीफा हजरत उमर (रजि.) यांनी इ. सन ६३८मध्ये जेरुसलमवर ताबा मिळविला तेव्हा क्रुसेड युध्द करणाऱ्यांच्या उलट त्यांनी ख्रिश्चन व ज्यू लोकांशी अतिशय आदर सन्मानपूर्ण व्यवहार केला. कोणालाही त्यांनी कसलीही इजा किंवा हानी पोहचविली नाही. जेव्हा हजरत उमर (रजि.) ख्रिश्चन राजास भेटले तेव्हा त्यांनी त्याला भरवसा दिला की शहराच्या नागरिकांच्या प्राण-वित्ताचा आदर राखला जाईल आणि त्याला ख्रिश्चनांच्या पवित्र स्थळांकडे नेण्यास सांगितले. या दौऱ्यात नमाजची वेळ आली. त्या क्षणी ते पवित्र मकबरा असलेल्या चर्चमध्ये होते. हजरत उमर यांनी ख्रिश्चन राजाकडे नमाज पढण्याची अनुमती मागितली. राजाने त्यांना त्याच जागी नमाज पढण्यास सांगितले जिथे ते उभे होते. हजरत उमर (रजि.) यांनी उत्तर दिले, ''जर मी या ठिकाणी नमाज पढलो तर मुसलमान हे स्थान, असे सांगून आपल्या ताब्यात घेऊ इच्छितील की, हजरत उमर यांनी या ठिकाणी नमाज अदा केली होती.'' नंतर ते नमाजची चटाई घेऊन बाहेर निघून गेले आणि

खुल्या जागेत नमाज अदा केली.

मुसलमानांनी जेरुसलमवर २ ऑक्टोबर इ. सन ११८७ ला पुन्हा एकदा अधिकार प्राप्त केला. जेव्हा सलाहुद्दीन अय्यूबीने शहरात प्रवेश केला, तेव्हा त्यांनी आपल्या सैन्याला सक्त ताकीद दिली की कोणत्याही ख्रिश्चन माणसाला स्पर्शदेखील करता कामा नये. त्यांनी घोषणा केली की ख्रिश्चनांच्या पवित्र स्थळांचे रक्षण केले जाईल आणि जो कोणी इथे थांबू इच्छित नसेल तो मार्गस्थ होऊ शकतो. अनेक लोकांनी शहर सोडले आणि आपल्यासोबत आपली धन संपत्ती घेऊन गेले. जेरुसलमच्या राजाने स्वत: पवित्र मकबरा असलेल्या चर्चवर स्वत:च छापा मारला. अनेक चार्पेट भरुन सोने, कालीन, इतर मौल्यवान सामग्री भरुन सोबत नेली.

सलाहुद्दीन अय्यूबींच्या साथीदारांना हे पाहून धक्का बसला इमाम सलाहुद्दीन अल अस्फहानी, जे सलाहुद्दीन अय्यूबीचे खजीनदार होते, ते स्वत:देखील क्रोधित होते.

मी सुलतानास म्हणालो, ''हा राजा कमीतकमी दोन लक्ष दिनारची धन-संपत्ती आपल्यासोबत नेत आहे आम्ही त्यांना वैयक्तिक संपत्ती सोबत घेऊन जाण्याची अनुमती दिली होती, चर्च आणि कान्वेन्टची संपत्ति सोबत नेण्याची अनुमती दिली नव्हती तुम्ही त्यांना असे करू द्यायला नको होते.'' त्यावर सलाहुद्दीन अय्यूबी म्हणाले, ''आम्ही ज्या तह-करारावर हस्ताक्षर केले आहे. त्यास लागू केले पाहिजे, यासाठी की कोणीही ईमान धारकांवर हा आरोप लावू नये की त्यांनी तह कराराचे उल्लंघन केले आहे. याच्या उलट ख्रिश्चनांवर आम्ही जी दया-कृपा केली आहे, तिचे ते स्मरण राखतील.''

असे असतानाही ख्रिश्चनांनी प्रत्येक ठिकाणी सलाहुद्दीन अय्यूबीचे चित्र एका हिंसक अधर्मीच्या स्वरुपात रेखाटले आहे. ते असे की तो बालकांना खात असे. ख्रिश्चन रक्षकांची हत्या करीत असे आणि ख्रिश्चनांच्या पवित्र स्थानांना नष्ट करीत असे.

यूरोपच्या इस्लाम आकलनावर क्रुसेड योध्दयांचा जबरदस्त प्रभाव पडला. क्रुसेड युध्दांनी इस्लामचा प्रचार एक वाईट गोष्ट या रुपात केला जी यूरोपची काळी बाजू आहे. एक क्रूर, रानटी, अनैतिक, दुष्ट, उग्र अज्ञानी

मूर्ख, म्लेंच्छ आणि पतीत या स्वरुपात मुसलमानांचे विशेष चित्रण, यूरोपीय विचार सरणी, साहित्य आणि दृष्टिकोनाचे अविभाज्य अंग बनले. वसाहतवादी शासनांतर्गत ही प्रवृत्ती जारी राहिली व विकसित होत गेली आणि वेळोवेळी आजच्या काळातही ही प्रवृत्ती वारंवार डोकावत राहते.

## ३. पौर्वात्यवाद

इस्लामच्या अपप्रचाराला उचित ठरविण्यासाठी आणि त्याला संशोधनपूर्ण आधार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रशिक्षणास विकसित केले गेले. मानव समाजाच्या अभ्यासाचा विषय, 'अँथ्रोपोलॉजी' यासाठी अस्तित्वात आला की समस्त पश्चिमेतर सभ्यता व संस्कृतींचा अभ्यास करून त्याला पाश्चिमात्य समाजाचे अपूर्ण आणि अतिप्राचीन आवृत्ती असल्याचे दाखविले जावे. मानव समाजाच्या अनेक वसाहतवादी संशोधकांच्या हातून इस्लामला अपेक्षित वांशिक वागणूक सहन करावी लागली. पौर्वात्य वादाला विशेषत्वाने यासाठी विकसित केले गेले, जेणेकरून इस्लामला भय आणि तिरस्काराच्या रंगात प्रस्तुत करण्याचा एक स्वीकारार्ह उद्दिष्ट आणि शैक्षणिक साच्यात रंगविता यावे.

पौर्वात्य लेखक, जे जास्त करून पुरोहित वर्गापैकीच असत त्यांनी १५ व्या शतकापासूनच इस्लामी इतिहासाच्या पुनर्लेखनाचे काम सुरु केले, यासाठी की इस्लामी स्त्रोतांचा खुलासा वाईट आणि विकृत स्वरुपात प्रस्तुत करता यावा आणि मुस्लिम समाजांवर मूर्ख व बालिश, वाईट चारित्र्याचे आवरण घातले जावे. पवित्र कुरआनास एक वारंवार असंगत, एक गोष्ट वारंवार सांगणारे व हिंसक ग्रंथाच्या स्वरुपात विश्लेषण केले गेले, ज्याच्या कथनांचा परिणाम फार कमी निघतो. पैगंबर मुहम्मद (स.) यांना सतत एक नैतिकताहीन आणि वाईट गोष्टींना वैध ठरविणाऱ्या व्यक्तीच्या स्वरुपात प्रस्तुत केले गेले. मुस्लिम विचार सरणी आणि ज्ञानाची मुस्कटदाबी केली गेली आणि त्यास विज्ञानाच्या इतिहासातून मिटविले गेले.

पौर्वात्यवाद केवळ एक संशोधनप्रणालीच नाही तर इस्लामकडे बघण्याचा एक दृष्टिकोनही आहे. यूरोपियन प्रवाशांनी, कादंबरीकारांनी, कलाकारांनी व्यापक साहित्य रचना केली आहे आणि अशी चित्रे तयार केलीत

की ज्यांच्यात इस्लामला कामुकता आणि हिंसा यांच्या क्रूर रानटी मिश्रणाच्या स्वरुपात प्रस्तुत केले गेले आहे, ज्याचे जादू, अंधविश्वास, मादक पदार्थ आणि रुपांना विकृत करणाऱ्या खजीन्याच्या स्वरुपात वर्णिले गेले आहे. बहुतेक लेखक फ्लीचार्ड बर्टन, (मृत्यु- इ. सन १८९०), इसाबेल इबरहार्ट (मृ. इ. सन १९०४), टी. ई. लॉरेन्स (मृ. इ. सन १९३५) हे मुस्लिम देशांमध्ये एक तर गुप्तहेर बनून गेले अथवा कामुकतेच्या हेतुने गेले, ज्याची त्यांना यूरोपमध्ये संधी नव्हती.

## ४. मुस्लिम ज्ञान-विद्वतेचा यूरोपमध्ये प्रसार

१५ व्या शतकापर्यंतचा ज्ञानप्रवाह पूर्णपणे इस्लामकडून यूरोपच्या दिशेने होता. मुस्लिम विद्वानांच्या रचनांचा अनुवाद सतत लॅटिन आणि अन्य यूरोपियन भाषांमध्ये केला जात राहिला आणि त्यांचा उपयोग पाठ्य पुस्तक आणि व्यावहारिक नियमपुस्तिका म्हणून केला जात राहिला. यूरोपियन विद्वान आणि विचारवंत नियमितपणे ज्ञानार्जनास्तव मुस्लिम ज्ञान केंद्रांमध्ये जात असत. यूरोपियन विद्यार्थी कर्तबा, फेज, काहिरा, बगदाद, समरकन्द, यासारख्या शिक्षण केंद्रांवर त्याच प्रकारे महान तज्ञांकडून शिक्षण घेण्यासाठी जात असत, ज्या प्रकारे आज मुस्लिम विद्यार्थी उच्च शिक्षणकरिता यूरोप आणि उत्तर अमेरिकेत जातात. अरबी भाषा, विज्ञान आणि सभ्यता व संस्कृतीची भाषा होती आणि जे लोक ज्ञान व अध्ययनात प्रगति करू इच्छित होते, ते मुस्लिम विद्वानांप्रमाणे वेशभूषा अंगीकारण्याचा प्रयत्न करीत. यूरोपियन प्रबोधन आणि विज्ञान, तंत्र, आयुर्विज्ञान, संशोधन आणि मानवतावाद इत्यादींमध्ये जो समस्त विकास झाला आहे तो मुस्लिम संशोधक आणि विचारवंतांद्वारेच घडून आला आहे.

वस्तुत: प्रबोधनाची कल्पना मुस्लिम संस्कृतीच्या सहाय्याविना केली जाऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती फार कमी प्रमाणात मान्य केली जाते. याच्या उलट मुस्लिम संशोधक व वैज्ञानिकांनी मोठ्या मेहनतीने साध्य केलेल्या कामगिरींची (शोधांची) वारंवार चोरी केली जाते आणि जाणूनबुजून सुनियोजित पध्दतीने त्यांना कमी लेखले जाते आणि नंतर बाजूला सारले जाते.

खाली काही अशा गोष्टींविषयी सांगितले जात आहे, ज्यांना पाश्चिमात्यांनी मुसलमानांकडून शिकून घेतल्या, आत्मसात केल्या अथवा त्यांच्याकडून उधार घेतल्या:

- ✯ युक्तिवाद कसा करा (विशेषत्वाने तात्त्वज्ञानिक तर्क) बौध्दिक संशोधन प्रणाली.
- ✯ यूनानी (ग्रीक) तत्त्वज्ञान-प्लूटो, ॲरिस्टॉटल आणि नव-प्लेटोवादी प्रायोगिक व विश्लेषणात्मक पध्दती.
- ✯ विद्यापीठ यंत्रणा (कुलूप, भांडार आणि पिंप खुर्चीसह)
- ✯ गणना कशी केली जावी. शून्य, अरबी संख्या.
- ✯ बीजगणित, त्रिकोणामिती आणि गोलाकार भूमिती.
- ✯ प्रयोगशाळा उपकरणे- परीक्षा नलिका (टेस्ट ट्यूब), चंबू (जार) आणि तत्सम अन्य उपकरणे.
- ✯ दृष्टी आणि प्रकाशाचा अभ्यास, प्रकाशाचे मूलभूत नियम.
- ✯ हॉस्पिटल, शस्त्रक्रियेची उपकरणे.
- ✯ ग्रंथालयासंबंधी सामग्री-कॅटलॉग, ग्रंथ-सूची, शब्दकोष, चरित्रांवर आधारित शब्दकोष, अर्थक्षेत्रानुसार रचलेला शब्दकोष आणि विश्वकोष.
- ✯ ग्रंथालयांचे नियोजन आणि प्रशासन, वर्गीकरण योजना.
- ✯ कागद-निर्मिती.
- ✯ प्रकाशन (मोठ्या उद्योगाच्या स्वरुपात) आणि पुस्तक विक्रीची दुकाने.
- ✯ जलविज्ञान, सिंचनाची विविध उपकरणे.
- ✯ मार्गदर्शन-दिशेची गणना, समुद्री प्रवास आणि होकायंत्र.
- ✯ मानचित्रनिर्मिती - जगाचे एक प्रामाणिक मानचित्र.
- ✯ खगोलशास्त्राच्या मूलभूत तथ्य आणि नियमांचा समूह. (यापैकी अधिकतर दुसऱ्या वैज्ञानिकांशी जोडले गेले आहेत.)

- ✯ मानव शरीराचे मूलभूत अध्ययन.
- ✯ आयुर्विज्ञानाच्या सिध्दान्तांचे आधार (इब्ने सीनाचा ग्रंथ 'अल राजी')
- ✯ जगाचा इतिहास (ज्यास, मुस्लिम इतिहासाला कमी करून दाखविण्याकरिता प्रयोगात आणले गेले आहे) समाजशास्त्र.
- ✯ एखाद्या अभूतपूर्व घटनेविना आध्यात्मिक शक्ती बाळगणारा कसे बनावे.
- ✯ सन्मानपूर्ण जीवनाची कला.
- ✯ संगीतबध्दता, गिटार आणि इतर तारेची वाद्य-उपकरणे आणि ती वाजविण्याचे तंत्र.

## ५. वसाहतवाद

ज्या यूरोपियन शक्तींनी ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड इत्यादींनी मुस्लिम जगताला आपली वसाहत बनविले, त्यांनी थोड्याफार फरकाने एका निर्धारित पॅटर्ननुसार व्यवहार केला. मुस्लिम जगत हस्तगत करण्याची नीती 'फूट पाडा आणि जिंका' या तत्त्वावर आधारित होती. उदाहरणार्थ, भारतात एका शासकाला दुसऱ्या शासकाविरुध्द लढवणे ज्यामुळे त्यांची शक्ती व सामर्थ्य क्षीण दुबळे व्हावे आणि ब्रिटीश सैन्यांनी मोगल साम्राज्य सहजपणे गिळंकृत करावे. इ. सन १८५७ मध्ये लढला गेलेला स्वातंत्र्यसंग्राम भारतीय जनतेतर्फे ब्रिटीश राजवटीला मुळासकट उपटून फेकण्याचा अंतिम प्रयत्न होता, जो वाईटरीत्या असफल ठरला. भारताचा अंतिम मोगल सम्राट बहादुर शाह जफर स्वतंत्र व्यापाराकरिता जास्त उत्सुक नव्हते आणि ते ब्रिटीश व्यापार कंपनींना याचे स्वातंत्र्य देण्यात संकोच करीत होते, कारण त्यांच्या नीयतीबद्दल त्यांना शंका होती. पुढे त्यांची शंका खरी ठरली.

भारताच्या लोकांना सभ्य बनविण्याच्या त्यांच्या नियतीचे पहिले प्रमाण हे होते की ब्रिटीश सैन्याने त्यांच्यासमोर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे शिर कापून चांदीच्या ताटात सजवून त्यांना सादर केले. बहादूर शाह जफरला रंगूनला हद्दपार केले गेले, जिथे मोठ्या दयनीय गरीबीत त्यांचा मृत्यु झाला

आणि त्यांनी उर्दू साहित्याच्या काही महान कवितांची रचना त्या ठिकाणी केली.

अधिकार प्राप्त करून घेतल्यानंतर वसाहतवादी शक्तींनी सुनियोजितरीत्या मुस्लिम समाजांकडून त्यांचे सर्व हुनर आणि विशेष ज्ञान हिरावून घेतले. वसाहतवादी शासकांनी सर्वांत प्रथम जी कामे केलीत, त्यापैकी एक हे होते की त्यांनी बौध्दिक कार्य, ज्ञान आणि शैक्षणिक उपक्रमांवर प्रतिबंध घातला आणि शिक्षणावर बंदी घातली इ. सन १८५०मध्ये डच शासकांनी आपल्या हेतुंकरिता जी ग्रंथालये स्थापित केली, त्यात प्रवेश करण्यास स्थानिक लोकांना मज्जाव केला ते इथल्या लोकांना फक्त प्राथमिक शिक्षण घेण्याची अनुमती देत. तथापि माध्यमिक शिक्षण घेण्यास अद्यापही रोखत असत. यानंतर इस्लामी वैद्यक शास्त्र नष्ट केले गेले. १९ व्या शतकाच्या आरंभी एका फ्रान्सिसी वैद्याला चिकित्सा कार्यासाठी ट्यूनिसमध्ये मुस्लिम चिकित्सकांच्या प्रमुखाकडून अनुमती घ्यावी लागत असे. शतकाच्या अखेरीस फ्रान्सिसी वसाहतवादी प्रशासकांनी इस्लामी चिकित्सा प्रणालीस दुय्यम दर्जाच्या चिकित्सा पध्दतीत वर्गीकृत केले आणि पुढे या पध्दतीची वाईटरीत्या पायमल्ली करण्यासाठी पुढे सरसावले. शेवटी इस्लामी चिकित्सा प्रणाली संपूर्ण मुस्लिम जगतात बेकायदेशीर घोषित केली गेली.

## वसाहतवादाचा विकास

वसाहतवादी सैन्यांनी ज्या क्षेत्रांना आपल्या वसाहती बनविले, त्या क्षेत्रांच्या मुस्लिम समाजांच्या प्रत्येक वस्तूची लूटमार केली आणि प्रामुख्याने त्यांनी संपूर्ण स्थानिक कच्चा माल आपल्या मूळ देशात स्थलांतरित करण्यासाठी एका स्थायी आराखड्याची रचना केली.

उदाहरणार्थ, उत्तर इग्लंडच्या सूत गिरण्या भारतीय सूत व्यवसायाच्या भग्न अवशेषांवर उभारल्या गेल्या. वसाहतवाद आणि औद्योगिक क्रांतीला एकमेकांशी जोडले गेले. यूरोपियन राज्यकर्त्यांनी एका विशेष वर्गाचा विकास केला, जो सामान्यत: नोकरशाही वर्ग होता आणि या

वर्गाचा त्यांनी आपल्या प्रतिनिधीच्या स्वरुपात वापर करून घेतला. जेव्हा मेकॉलेने शिक्षणाचे विवरण इ. सन १८३५ मध्ये लिहिले, तेव्हा त्याने इतर वसाहतवादी शासकांना आवाहन केले, आम्ही या वेळी एका अशा वर्गाचा विकास करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला पाहिजे जो आमच्या आणि त्या कोट्यावधी लोकांच्या दरम्यान दुभाषाचे काम करील, ज्यांच्यावर आम्ही राज्य करीत आहोत. हा वर्ग अशा लोकांचा असावा जे आपल्या रक्त आणि रंगानुसार भारतीय तर असावेत, परंतु आपल्या रुचि, दृष्टिकोन नैतिक मूल्ये आणि बुद्धीनुसार इंग्रज असावेत.

ब्रिटिश इस्ट इंडिया आणि डच इस्ट इंडीज कंपन्या मुस्लिम जगतात स्वतंत्र बाजाराचे गुंतवणूक दार होते. त्यांना वेगवेगळ्या मुस्लिम शासकांद्वारे स्वतंत्रपणे व्यापार करण्याची सूट दिली गेली होती. तथापि त्यांच्या व्यापारात विजय आणि विस्तारवाद समाविष्ट होते.

जगातील मुस्लिम समाज एक प्रयोगशाळा बनले, जिथे सांस्कृतिकरणाची आवड राखणाऱ्या आणि विज्ञानात आस्था राखणाऱ्या नव-आधुनिकतावादी मिशनऱ्यांनी विकास आणि गौरवर्णीय लोकांच्या ओझ्यासोबत मुस्लिम समाजांवर सर्व प्रकारचे स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या शोधकारक शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक ध्येयधोरणांचे परीक्षण केले.

वसाहतवादाने मुस्लिम समाजाचे पुरते वाटोळे केले. त्याने केवळ मुसलमानांच्या शरीरावरच ताबा मिळविला नाही, किंबहुना त्यांच्या मन-मस्तिष्कावरही ताबा मिळविला. त्याने त्या प्रत्येक गोष्टीला न्यूनतम आणि कमी नैतिक मूल्य असलेले सांगितले, ज्याचा संबंध दुरुनही इस्लामशी येत असावा. त्याने मुस्लिम समाजांच्या सांस्कृतिक श्रेष्ठतांना बदलून टाकले. त्याने मुस्लिम देशांमधून धन प्राप्तीचा प्रत्येक स्रोत खेचून घेतला आणि मुसलमानांना दयनीय दारिद्र्याच्या खाईत लोटून दिले.

इस्लामच्या समस्येचे समाधान करण्याच्या पश्चिमी प्रयत्नांनी मुसलमानांविरुध्द अपराधांची व अन्यायांची एक अशी यादी तयार केली

आहे, ज्याचा विस्तारपूर्वक उल्लेख सादर केला जाऊ शकत नाही. त्याने इस्लामची एक अशी संस्था तयार करण्याच्या मार्गावर मुसलमानांना टाकले आहे की यूरोपियन विचारसरणी आणि इतिहासात मुसलमानांना परके आणि राक्षस घोषित करता यावे.

तथापि मुसलमान यूरोपियन इतिहासातील एक चाकोरीबध्द आणि सतत वापर करून गुळगुळीत झालेल्या मुस्लिम प्रतिमेपासून दूर होऊन, नष्ट केल्या गेलेल्या मुस्लिम संस्कृतीची पुनर्रचना करण्याकरिता तन मन धनाने कार्यरत आहेत.

## पतन

मुस्लिम समाजाच्या पतनाची अनेक कारणे सांगितली जातात. मुस्लिम साम्राज्यांतर्गत आंतरिक मतभेद, गृहकलह, आपसातील लढाया, राज्यकर्त्यांची भ्रष्ट आणि विलासपूर्ण जीवनशौली, इराकची राजधानी बगदादचा पराजय आणि स्पेन हातातून निघून जाणे इ. मुसलमानांच्या पतनाची काही सामान्य कारणे सांगितली जातात.

जेव्हा मंगोल आक्रमक इ. सन १२५८मध्ये बगदादच्या वेशीवर पोहोचले, तेव्हा त्यावेळी मुस्लिम शासक, जे अब्बासी होते इतके दुर्बल झाले होते की ते शहराचे रक्षण करू शकत नव्हते. हे शहर नष्ट केले गेले आणि खलीफासह सर्व नागरिकांची हत्या केली गेली. बौध्दिक हानिदेखील विनाशकारक होती. मंगोली आक्रमकांनी हस्तलिखित असंख्य ग्रंथांना जाळून टाकले आणि सर्व ग्रंथालयांना नष्ट केले, जी सुरुवातीच्या अब्बासी खलीफांद्वारे मोठ्या मेहनतीने स्थापित केली गेली होती.

दुसरा मोठा धक्का स्पेन हातातून निघून गेल्याने लागला इथेही तशाच घटना घडल्या जशा बगदादमध्ये घडल्या होत्या. गृहकलह, आपसातील मतभेद आणि राज्यकर्त्यांचा भ्रष्टाचार जेव्हा ग्रेनाडाच्या मूर वंशीय राजकुमार बोर्ड बिलने २ जानेवारी इ. सन १४९२मध्ये राजा फर्डीनेंड समोर गुडघे टेकले, तेव्हा याचसोबत स्पेनच्या मुस्लिम राजवटीच्या दिव्य आणि भव्य ८०० वर्षांचा शासनकाळ समाप्त झाला. याप्रसंगी आईने

आपल्या पुत्राची निर्भर्त्सना अशा शब्दांत केली, जी त्या वेळेपासून आज तागायत मुस्लिम इतिहासाला बोचत राहते.

''तू एखाद्या स्त्रीसारखा रडतोस, तू हा शोक-विलाप एका पुरुषाप्रमाणे रोखू शकत नाही''

बौध्दिक विनाशदेखील तितकाच प्रचंड होता. अगणित हस्तलिखित ग्रंथ जाळले गेले आणि शतकांवर आधारित मुस्लिम ज्ञानभांडार नष्ट केले गेले.

बगदादचा पराभव आणि ग्रेनाडाचे पतन मुस्लिम-इतिहासात निर्णायक क्षण होते, असे असले तरी यांना मुसलमानांच्या पतनाचे एकमात्र मुख्य कारण म्हटले जाऊ शकत नाही. जी शक्ती मुस्लिम संस्कृतीला मागे लोटण्यास कारणीभूत ठरली, ती आंतरिक आणि वैचारिक होती. १४ व्या शतकाच्या शेवटपर्यंत जे उलमा गजालीमुळे वर्चस्वाच्या स्थितीत होते, ते मानव-जीवनाऐवजी लिखित शब्दांना प्रतिनिधित्व आणि सत्याचे स्वतंत्र क्षितिज समजून बसले. ग्रंथांच्या प्रसाराने लेखक आणि शब्दांच्या दरम्यान एक असे अंतर निर्माण केले जे त्यांच्या विचारांना स्थळकाळाच्या पलीकडे नेत असे. मूळ धडा वास्तव तथ्ये आणि सत्यतेपासून दूर होऊन, प्रत्येक प्रकारच्या भाष्य-विवेचनाकरिता खुला केला गेला.

तेव्हा, जर एक मूल पाठ अनेक भाष्यांकरिता खुला सोडून दिला जावा तर काय होईल? मुस्लिम विद्वानां (उलमां) पुढे दोन प्रकारची चिंता होती. त्यांची पहिली चिंता ही होती की पवित्र कुरआन प्रत्येक प्रकारच्या मनाला येईल तशा भाष्य-विवेचनाकरिता खुला होता, हे भाष्य केवळ अडाणी, अशिक्षित वाचकच करीत नसत, किंबहुना योग्यता नसलेले धंदेवाईक लेखकही करीत असत. एका मर्यादेप्रत ही चिंता उचित होती, कारण याच्याद्वारे कुरआन व हदीसच्या आधारावर अविवेकपूर्ण आणि शोषणकारी व्यवहार उचित ठरविला जात असे. तथापि ही बाब दुसऱ्या व अधिक महत्त्वपूर्ण चिंतेशी खूप निगडित होती. ग्रंथांच्या प्रसाराने उलेमांच्या त्या सचोटी व नियंत्रणाला कमी केले, जे ते मुस्लिम शासक आणि जनतेवर ठेवत होते. ही समस्या सोडविण्यात उलेमांना सुमारे १०० वर्षे लागली. त्यांची प्रतिक्रिया तीन पातळींवर होती :

१. त्यांनी ज्ञान-संकल्पनेला सर्व प्रकारच्या ज्ञानाऐवजी केवळ धार्मिक ज्ञानापुरते मर्यादित केले.

२. त्यांनी 'इज्मा' (सर्वसंमत) संकल्पनेला जन समूहाच्या सर्वसंमतीऐवजी विद्वानांच्या सर्वसंमतीपुरते मर्यादित केले. अर्थात स्वत: उलेमांचे सर्वसंमत असण्यापर्यंतच सीमित केले.

३. त्यांनी इज्तिहादचे द्वार बंद केले. धर्माच्या संदर्भात स्वतंत्र तर्क-वितर्काला प्रभावीपणे बेकायदेशीर ठरविले गेले.

मुस्लिम समाजावर याचे विनाशकारक परिणाम झाले. अशा प्रकारे इज्तिहादचे स्थान तकलीद (अंधानुकरण) ने घेतले. तर्क अनुमान आणि संशोधनाचे स्थान इतरांची नक्कल करण्याने घेतले कुरआनाचे भाष्य-विवेचन इतिहासाच्या पानांमध्ये गोठविले गेले. नवे विचार, बदलणारी परिस्थिती समजून घेण्याच्या आणि त्यावर विचार व्यक्त करण्याच्या अभावापायी मुस्लिम विचारसरणी स्थिर झाली आणि ती पूर्णत: पाषाणवत झाली, तिच्यात असलेली लवचिकता नाहीशी झाली. परिणामी मुस्लिम संस्कृती गतिशीलता हरवून बसली आणि अधोगतीस बळी पडली परिणामस्वरुप मुस्लिम जनसमूह एक खुल्या समाजातून बदलून एका बंदिस्त समाजात परिवर्तीत झाला. धार्मिक विद्वानांनी जे श्रेष्ठतापूर्ण क्षेत्र आपल्या महद् प्रयत्नांनी निर्माण केले होते, त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला. त्याच्या उलट मुसलमानांनी चीनकडून कागद बनविण्याची कला हस्तगत केली आणि तिला एक व्यवसायाचे स्वरुप प्रदान केले, परंतु उलेमा सुमारे तीन शतकांपर्यंत मुस्लिम देशांमध्ये छपाईयंत्रांना प्रचलित होण्यापासून रोखत राहिले त्यांचा तर्क हा होता की ग्रंथाच्या मोठ्या प्रमाणात छपाईने पवित्र आणि प्राचीन ग्रंथांच्या आकलनास प्रोत्साहन मिळणार नाही, उलट अशाने त्यांचे चुकीचे प्रतिनिधित्व होईल आणि अशिक्षित लोकांद्वारे याचे चुकीच्या पध्दतीने आकलन केले जाईल. छपाईपासून रोखून उलेमांनी ऑक्सिजनच्या एका महत्त्वपूर्ण स्त्रोतापासून मुस्लिम समाजाला वंचित राखले मुस्लिम देश आता यूरोपियन शक्तींद्वारे मागे लोटून दिले जाण्यासाठी प्रवृत्त होते.

# आज आणि........

इस्लाम आणि दहशतवाद एकमेकांचे पर्यायी शब्द बनले आहेत. ११ सप्टेंबर इ. सन २००१ च्या घटनेनंतर हे स्वाभिविकत: जाणवते. तरीदेखील कोणतीही गोष्ट सत्याच्या पुढे गेली नाही. त्या दहशतवाद्यांच्या कृत्यांसाठी इस्लामवर आरोप ठेवला जाऊ शकत नाही, ज्यांनी न्यूयॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि वॉशिंग्टनच्या पेंटागॉनवर हल्ला केला होता. त्याचप्रमाणे आयर्लंडच्या ख्रिश्चन दहशतवाद्यांच्या कारवायांपायी ख्रिश्चन धर्माला गॅस चेंबरसाठी जबाबदार ठरविले जाऊ शकत नाही. दहशतवादी केवळ आपलेच बिन बुडाचे तर्क मानतात आणि संतुलन व विवेकापासून दूर राहतात. हे भावनाशून्य लोक आहेत, ज्यांची दुष्कृत्ये समस्त सचेत लोकांकरिता क्लेश यातना दायक असतात.

इस्लामी चेतना, मुसलमानांची व्यापक चेतना, न्याय, सत्य आणि समान मानवी मूल्यांवर आस्था राखते. समस्त मुसलमानांना एकाच रंगात रंगवून आम्ही त्यांच्या मानवतेला कमी करतो आणि आम्ही १७० लोकांतून, अर्थात प्रत्येक पाचपैकी एकाला, त्याच्या समाजाला, त्यांच्या इतिहासाला पाश्चिमात्यांच्या काळ्या बाजूच्या चित्रणाच्या स्वरुपात बदनाम करतो.

आज मुसलमान आपल्या ऐतिहासिक ओळखीचा पुन्हा एकदा शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. नवा वसाहतवाद आणि अत्याचार व अन्यायपूर्ण जागतिक व्यवस्थेच्या असह्य अवजड ओझ्यापासून स्वत:ला मुक्त करू इच्छितात आणि एका जबाबदार व व्यावहारिक भविष्याची रचना करू इच्छितात.

## .......उद्या

अनेकविध दिशांमध्ये खेचत राहणाऱ्या उपद्रव आणि विरोधामास यांच्या दरम्यान मुस्लिम जगत स्वत:ची निर्मिती एका क्रियाशील, विकासशील आणि भावी संस्कृतीच्या स्वरुपात करू इच्छिते. अत्याधिक वाचाळ आणि मोजक्या आततायी लोकांच्या कोलाहल आणि नारेबाजीपासून वेगळे होऊन यात विचार चिंतन, विचार-विनिमय आणि चर्चा होत आहे आणि लोक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संदेशाची समकालीनता आणि भावी काळात याच्या महत्त्वपूर्णतेवर चर्चा विवाद करीत आहेत. हे अनेक नवे विचार, सिध्दान्त, संस्था आणि दृष्टिकोन यांच्या माध्यमातून मुस्लिम समाजांची व इस्लामची सुधारणा करणार नाहीत. किंबहुना एक बहुलतावादी जगाच्या विकासात आपले बहुमूल्य योगदानही देतील.

यात शंका नाही की मुस्लिम जगत ज्या समस्यांना तोंडा देत आहे, त्यांचे समाधान सोपे नाही आणि त्यांचा उपाय अशा औषधांनी होऊ शकत नाही, जी केवळ पीडानाशक असावीत. कधी-कधी परिस्थिती फारच विषम आणि निराशाजनक दिसून येते, परंतु मुसलमान आपल्या ईमानाद्वारे निरंतर आशावान असतात आणि ते ही गोष्ट अधिक जाणून आहेत की चिंतनाच्या निरंतर प्रक्रियेशी मिळून पुनर्विचाराच्या प्रक्रियेसह निरंतर व दूरगामी बौध्दिक, सामाजिक आणि राजकीय प्रयत्न भावी काळाकरिता व्यावहारिक पर्याय मिळवून देतील. ते म्हणतात की जागृतीचा अर्थ अर्धी लढाई जिंकणे होय.

# ''आपले राजकारणी तंत्र जातीयतेच्या विषापासून मुक्त करा''

## -मार्कन्डेय काटजू

(सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आणि प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष)

समस्त भारतीयांनी त्या सर्व तत्त्वांना धुळीस मिळविले पाहिजे, जी तत्त्वे धार्मिक तिरस्काराची आग भडकविण्यात व तिला वाढविण्यात आस्था राखतात. आज भारतात अनेक हिंदू आणि मुसलमान जातीयतेच्या व्हायरसने बाधित आहेत. वस्तुस्थिती ही की इ. सन १८५७ च्या पूर्वी अधिकांश भारतीयांमध्ये जातीयवादी भावनांचा लवलेशही नव्हता. यात शंका नाही की हिंदू आणि मुसलमानांच्या दरम्यान काही मतभेद होते, तथापि त्यांच्यात वैमनस्य नव्हते. हिंदू बांधव ईद साजरी करण्यात मुसलमानांसह भाग घेत तर मुसलमान हिंदूंसोबत होळी आणि दिवाळीचा सण साजरा करीत असत आणि ते सर्व भावा-बहिणींसारखे मिळून मिसळून राहात असत. आमच्या या खंड प्राय देशात सुमारे १५० वर्षांनंतर शत्रुत्व नसले तरी दोन प्रमुख संप्रदायांच्या दरम्यान परस्पर शंका-संशय कशा प्रकारे वाढीस लागला? आज भारतीय मुसलमानांना हिंदूंकडून भाडे तत्त्वावर घर मिळविण्यात का अडचण येत आहेत?

जेव्हा भारतात एखाद्या ठिकाणी बॉम्बस्फोट होतो, तेव्हा पोलिस खऱ्या अपराध्याला पकडण्यात असमर्थ (कारण वैज्ञानिक तपास कार्याचे त्यांना प्रशिक्षण दिले गेले नाही) असल्यामुळे डझनभर मुसलमानांना अटक करून त्यांनी न केलेल्या अपराधाचा खुलासा मागतात. त्यांच्यापैकी अधिकांश कारावासात अनेक वर्षे घालविल्यानंतर शेवटी न्यायालयीन

प्रक्रियेद्वारे निर्दोष आढळून येतात. परिणामी मुसलमान देशात एकाकी पडले आहेत. पाकिस्तानात अल्पसंख्यांकांची अवस्था याहून दयनीय आहे. तिथे ते भयपूर्ण परिस्थितीत राहतात आणि उग्रवादी व धार्मिक रुढीवादींपासून भयभीत असतात.

## समाजाचे विभाजन

भारताच्या इतिहासात इ. सन १८५७ चे वर्ष 'वॉटरशेड-वर्ष' ठरले भारतात विभिन्न संप्रदायांच्या परस्पर संबंधांच्या इतिहासाने इ. सन १८५७ मध्ये एक नविन वळण घेतले. इ. सन १८५७ पूर्वी जातीयतेची समस्या नव्हती, त्या काळी दंगे होत नव्हते. अर्थात त्या काळात हिंदू-मुसलमानांच्या दरम्यान मतभेद नव्हते असे नाही, आता एकाच पित्याच्या संतती असलेल्या भावा-बहिणींमध्येही मतभेद असतात. तथापि त्या काळी हिंदू आणि मुसलमान शांती-सलोख्याने राहात असत आणि संकटप्रसंगी दोघेही भेदभाव सोडून एकमेकांना मदत करीत असत.

नि:संशय, ज्या मुसलमानांनी भारतावर आक्रमण केले, त्यांनी इथल्या अनेक मंदिरांना उद्ध्वस्त केले, परंतु त्यांचे वारसदार, जे स्थानिक मुसलमान शासक झाले, त्या सर्वांनीच सांप्रदायिक सद्भाव निर्माण केला. हे काम ते आपल्या हितासाठी करीत कारण त्यांच्या प्रजेत बहुसंख्य हिंदू होते. त्यांनाही जाण होती की जर त्यांनी मंदिरे पाडली तर देशात अराजकता पसरेल, दंगे भडकतील आणि फार मोठा अनर्थ घडून येईल. असे कोणताही शासक इच्छित नाही. यास्तव भारतातील सुमारे सर्वच शासक मोगल, अवध, मुर्शिदाबाद किंवा अरकोटचे नवाब, टीपू सुलतान अथवा हैद्राबादच्या निजामाने सांप्रदायिक सद्भाव वाढीस लावला.

इ. सन १८५७ मध्ये पहिले स्वातंत्र्य युध्द छेडले गेले, ज्यात हिंदू आणि मुसलमानांनी संयुक्तपणे इंग्रजांविरुध्द लढा दिला. हे बंड मोडून काढल्यानंतर इंग्रजांनी फैसला केला की भारतावर नियंत्रण राखण्याचा एकमेव फार्म्युला 'फूट पाडा आणि राज्य करा'चा अवलंब करावा. अशा प्रकारे भारताचा राज्य-सचीव, सर चार्ल्स वूड याने व्हाइसरॉय लॉर्ड एल्गीनला इ. सन १८६२ च्या आपल्या एका पत्रात लिहिले, ''आम्ही भारतात आपली सत्ता,

एका संप्रदायाला दुसऱ्या संप्रदायाविरुध्द उभे करून कायम ठेवली आहे आणि आम्ही असे सातत्याने केले पाहिजे. यास्तव या सर्वांना समान-भावना विकसित करण्यापासून रोखण्याकरिता, तुम्ही जे काही करू शकता ते करा.''

## 'फूट पाडा आणि राज्य करा'

राज्य-सचीव विस्काउन्ट क्रॉसने १४ जानेवारी १८८७ ला गव्हर्नर जनरल डफरिनला लिहिले, ''धार्मिक भावनांची वाटणी जास्त करून आमच्या हिताची आहे आणि भारतीय शिक्षण व शैक्षणिक सामुग्रीच्या तपासणीकरिता नेमलेल्या तुमच्या कमेटीच्या परिणाम स्वरुपी मी काही भलेपणाची अपेक्षा करतो.''

भारताचा राज्य-सचिव जॉर्ज हॅमिल्टनने गव्हर्नर जनरल कर्जनला लिहिले, ''मला वाटते भारतात आमच्या शासन सत्तेकरिता खरा धोका हळूहळू पाश्चिमात्य विचार सरणीचा भारतीयांमध्ये विकास व तिला अंगीकारणे हा आहे ................. आणि जर आम्ही सुशिक्षित भारतीयांना दोन विभिन्न वर्गात (हिंदू आणि मुसलमान)मध्ये फूट पाडू शकलो .................. तर आम्ही असे केले पाहिजे या वाटणीद्वारे-शिक्षणाचा प्रसार आमच्या शासकीय-तंत्रावर, जो सतत हल्ले करू शकतो, त्याच्याविरुध्द आम्ही आपली बाजू बळकट करू शकतो. यास्तव आम्ही शिक्षणाची पाठ्य-पुस्तक योजना अशी तयार करावी की ज्यामुळे दोघा संप्रदायांच्या दरम्यान मतभेद आणखी जास्त वाढावा.''

आणि म्हणूनच इ. सन १८५७ नंतर हिंदू आणि मुसलमान यांच्या दरम्यान तिरस्काराचे बीज पेरण्याकरिता एक विचारपूर्वक धोरण राबविणे सुरु केले गेले. हे काम अनेक मार्गांनी पार पाडले गेले.

## धार्मिक नेत्यांना अन्य समुदायाविरुध्द भाषण देण्यासाठी लाच दिली गेली :

इंग्रज कलेक्टर गुपचुपरीत्या पंडित पुरोहितास बोलावित असे आणि मुसलमानांविरुध्द बोलण्यासाठी त्यांना पैसे देत असे अशाच प्रकारे गुपचुपपणे मौलवीला बोलावून हिंदूंच्या विरोधात बोलण्यासाठी त्यांनाही पैसे पुरवित असत.

## जातीयतेचे विष पेरण्यासाठी इतिहासाच्या पुस्तकांमध्ये सत्य घटनांचा विपर्यास केला गेला :

वर सांगितल्याप्रमाणे हे खरे आहे की सुरुवातीच्या मुस्लिम आक्रमकांनी अनेक मंदिरांचा विध्वंस केला, तरीदेखील त्यांच्या वारसांनी (उदा. अकबर, जो आक्रमक बाबरचा वंशज होता) जे स्थानिक मुस्लिम शासक होते, त्यांनी मंदिरांना उद्ध्वस्त करण्याऐवजी हिंदू मंदिरांना सतत अनुदान देत राहिले, रामलीलाचे आयोजन करीत. होळी आणि दिवाळी (अवध, मुर्शिदाबाद आणि अरकोटच्या नवाबांसारखे) साजरी करीत. आमच्या इतिहासाचा दुसरा भाग अर्थात जवळपास सर्वच मुस्लिम आक्रमकांनी, सांप्रदायिक सद्भाव वाढीस लावला. या वस्तुस्थितीची आमच्या इतिहासाच्या पुस्तकांमध्ये पुरेपूर गळचेपी केली गेली आहे. आमच्या मुलांना फक्त हे शिकविले जाते की गझनीच्या महमूदने सोमनाथाचे मंदिर उद्ध्वस्त केले होते, परंतु त्यांना हे नाही शिकविले जात की औरंगजेबसारखे मोगल सम्राट आणि टीपू सुलतान वगैरे शासक हिंदू मंदिरांना जागीरी व अनुदान देत असत आणि हिंदू सण उत्साहाने साजरे करत असत (पाहा- बी. एन. पांडे यांचे ऑन लाईन पुस्तक 'हिस्ट्री इन द सर्विस ऑफ इम्पेरियालिझम')

## हेतुपुरस्सर जातीय दंगली भडकविल्या गेल्या :

सर्व साम्प्रदायिक दंगे इ. सन १८५७ नंतर सुरु झाले. त्या वर्षापूर्वी कोणतीही जातीय दंगल झाली नव्हती. दंगली पेटविणारे एजंट लोक, धार्मिक घृणा अनेक मार्गांनी मुद्दाम पसरवित उदाहरणार्थ, नमाजच्या वेळी मस्जिदीसमोर वाद्ये वाजविणे अथवा हिंदू मूर्ती तोडणे वगैरे.

ब्रिटिश राज्यकर्त्यांद्वारे आमच्या राजकीय तंत्रात वर्षानुवर्षे आणि दशकानुदशके योजनाबध्दरीत्या हे विष पेरले जात राहिले. येथपर्यंत की याचा परिणाम इ. सन १९४७ च्या फाळणीच्या रुपात झाला. आमच्या समाजात अजूनही अशा तिरस्कृत तत्त्वांचे अस्तित्व आहे, जे धार्मिक घृणा वाढवितात आणि त्यातच आपले हित-कल्याण आहे असे समजतात.

जेव्हा जेव्हा एखादा बॉम्बस्फोट होतो अनेक टी.वी. न्यूज चॅनल्स हे सांगायला. सुरुवात करतात की एक ई-मेल किंवा एस.एम.एस. मिळाला

आहे, ज्यात दावा केला गेला आहे की इंडियन मुजाहिदीन, जैश ए मुहम्मद किंवा हरकतुल जिहाद अल इस्लामियाने जबाबदारी स्वीकारली आहे. आता ई-मेल किंवा एस.एम.एस. संदेश कोणत्याही खोडसाळ व विघ्नसंतुष्ट माणसाद्वारे पाठविला जाऊ शकतो, परंतु हे सर्व दूरदर्शनवर दाखवून आणि दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांमध्ये मुख्यपृष्ठावर छापून हिंदू जनमानसात ही भावना बिंबवली जाते की सर्वच मुसलमान आतंकवादी आहेत, जे बॉम्ब स्फोट घडवितात (वास्तविक खरी गोष्ट ही आहे की सर्व जाती-संप्रदायांमध्ये ९९% लोक शांती प्रिय आणि चांगले आहेत) बाबरी मस्जिद-रामजन्मभूमी आंदोलनाच्या काळात मीडियाचा एक वर्ग (विशेषत: हिन्दी वृत्तपत्रे) कारसेवक बनला होता.

## बंगलोरमध्ये दहशत

गेल्या काही दिवसांपूर्वी बंगलोर आणि इतर शहरांमध्ये राहणाऱ्या उत्तर-पूर्वेकडील भारतीयांना एस.एम.एस. संदेश पाठविले गेले होते, ज्यात म्हटले गेले होते की त्यांनी आसाममध्ये मुसलमानांची हत्या केली आहे, तेव्हा त्यांनी बंगलोर सोडून निघून गेलेले बरे, अन्यथा त्यांची हत्या केली जाईल. यामुळे सगळीकडे दहशत पसरली. जेव्हा बंगलोरच्या मुसलमानांना हा खोडसाळपणा कळाला तेव्हा त्यांनी उत्तर-पूर्वेच्या भारतीयांसाठी एक भोजन कार्यक्रम आयोजित केला आणि त्यांना सांगितले की हा कुणाचा तरी खोडसाळपणा आहे आणि मुसलमान उत्तर-पूर्वेकडील भारतीयांविरुध्द नाहीत. काही हितसंबंधी लोकांद्वारे खेळल्या जाणाऱ्या या घृणित कारस्थानावर विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भारत अनेक जाती धर्मांचा देश आहे. इथे एकता आणि संपन्नतेचा एकमेव मार्ग, सर्व धर्म आणि समाजाच्या समस्त वर्गांबद्दल समानरीत्या आदर-सन्मान राखणे होय.

# जिहाद

## जिहादचे विविध पैलू

'जिहाद' शब्द ज्याचा नेहमी चुकीचा अर्थ 'इस्लामच्या शत्रूंविरुध्द पवित्र युध्द' या स्वरुपात लावला जातो. याला हिंसा आणि जुलुमाचा पर्याय असल्याचे सांगितले जाते. वस्तुत: अरबी भाषेत दुसरा एखादा शब्द असा नाही, जो 'जिहाद' शब्दासारखी प्रतिक्रिया जगात निर्माण करीत असेल. संभवत: 'जिहाद' सर्वाधिक विवादित आणि संवेदनशील शब्द आहे, ज्याला पाश्चिमात्य आज इस्लामशी जोडतात. पक्षपाती मीडियामध्ये असा एकही दिवस जात नाही, जेव्हा हा शब्द इस्लामवर टीका करणाऱ्यांतर्फे वापरला जात नसेल.

'जिहाद'ला पवित्र कुरआन आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कथनांच्या प्रकाशात पाहिले पाहिजे. अरबी भाषेत 'जिहाद' शब्दाच्या मूळ धातुचा अर्थ 'प्रयत्न' किंवा 'संघर्ष' अथवा 'मी प्रयत्न करेन, मी पुरेपूर प्रयत्नशील राहीन' या अर्थाने घेतला जातो. हा संघर्ष बौध्दिक, आध्यात्मिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय किंबहुना भौतिक स्वरुपाचाही असू शकतो आणि हा संघर्ष इतर अनेक रुप धारण करू शकतो. उदाहरणार्थ,

## व्यापक जिहाद

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हदीस-वचनात ही घोषणा केली गेली आहे की महान आणि व्यापक जिहाद आपल्या स्वत:विरुध्दचे जिहाद होय, अर्थात आपला अहंकार, लालसा, मोह, कधीही पूर्ण न होणाऱ्या इच्छा-आकांक्षा व वाईट गोष्टींविरुध्दचा जिहाद. हा जिहाद न केवळ आपल्या आंतरिक इच्छांविरुध्द असतो, किंबहुना समाजातल्या वाईट गोष्टी, दुष्प्रवृत्तींविरुध्दही असतो. याचा हेतु सर्व प्रकारचे अत्याचार, छळ, जुलूम

आणि अन्यायाविरुध्द संघर्ष करून समाजात नेकी, सदाचार, न्याय आणि शांती प्रस्थापित करणे होय. जर इस्लाम शांती आहे तर जिहाद तिला प्रस्थापित करण्याचा मार्ग आहे.

संतुलित दृष्टिकोनानुसार जिहाद आजही आवश्यक आहे, परंतु याचा मार्ग दोन दिशांमध्ये असला पाहिजे, एखाद्या व्यक्तीचा कर्तव्य परायणतेकरिता संघर्ष आणि एखाद्या समाजाचा न्यायासाठी संघर्ष.

जिहादच्या धारणेबद्दल सर्वाधिक शोधपूर्ण दृष्टिकोन बैरुतचे एक संशोधक यूसुफ विशने व्यक्त केला. ते लिहितात,

''महान व व्यापक जिहाद आपल्या पाशवी प्रवृत्तींविरुध्द लढणे होय. हा बाह्य जगाशी जिहादऐवजी आंतरिक जिहाद आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या पाशवी बाजूवर नियंत्रण ठेवण्याकरिता अल्लाहच्या मार्गात संघर्ष करणे होय. मनुष्य आणि जनावरांमध्ये काही व्यवहार समान असतात. जर या पाशवी प्रवृत्तींना निर्बंधपणे खुले सोडल्यास त्या माणसाला हिंस्त्र श्वापद बनवितात.''

या भावनांवर नियंत्रण ठेवणे हाच खरा जिहाद होय. माणसाच्या अंगी ही प्रवृत्ती असते की आपल्या पात्रतेला तो आहे त्यापेक्षा अधिक समजतो आणि आपल्या आध्यात्मिक क्षमतेला कमी समजतो. त्याच्या अंगी आपले वातावरण आणि इतर माणसांवर नियंत्रण प्राप्त करण्याची प्रवृत्ती असते. अशा प्रवृत्तींविरुध्द जिहाद करणे आवश्यक आहे.

हुनैन युध्दाहून परत येताना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ही घोषणा केली : ''आम्ही छोट्या जिहाद (प्रयत्न, प्रतिरोध आणि सुधारणेसाठी संघर्षा) हून परत येत आहोत आणि महान जिहादकडे जात आहोत.''

पैगंबरांच्या एका साथीदाराने विचारले, ''हे अल्लाहचे पैगंबर! हा महान जिहाद काय आहे?''

पैगंबर (स.) यांनी उत्तर दिले, ''हे आपल्या स्वत:शी (अहंकाराशी) लढणे होय, यासाठी की दुराचाराच्या आकर्षणावर नियंत्रण प्राप्त केले जाऊ शकावे.''

अशा प्रकारे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दुराचार, दुष्प्रवृत्तींविरुध्द माणसाच्या आध्यात्मिक संघर्षाला श्रेष्ठत्व प्रदान केले. ज्याला महान जिहाद म्हटले जाते.

संपूर्ण मानवजातीप्रमाणे मुस्लिम आणि मुस्लिमेतरांसाठीही हा आंतरिक संघर्ष सर्वांत जास्त कठीण आणि सर्वाधिक उत्तम होता, ज्यात सर्वाधिक सामंजस्य आणि क्षमाशीलतेची गरज होती आणि वस्तुत: आपल्या अंगी गांभीर्याची गरज होती.

## सर्वोच्च जिहाद

जिहादच्या सर्वोच्च स्वरुपांपैकी एक स्वरुप, अत्याचारी आणि क्रूर शासकासमक्ष उभे राहणे व त्याच्यासमोर खरे बोलणे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या अनुयायींना हा आदेश दिला आहे की त्यांनी जुलूम दडपशाहीविरुध्द आणि रंजल्या-गांजल्या वर्गाकरिता आवाज बुलंद करावा. पवित्र कुरआन फर्मावितो :

> ''दलितांचे मित्र बना आणि क्रूर राज्यकर्ते आणि त्यांच्या मार्गभ्रष्ट शासनाविरुध्द कायदेशीरपणे प्रतिरोध करा.''
>
> पवित्र कुरआन पुढे फर्मावितो,
>
> ''तुम्हाला झालंय तरी काय की अल्लाहच्या मार्गात आणि त्या दुर्बल पुरुष, स्त्रिया आणि बालकांकरिता युध्द न करावे, जे प्रार्थना करतात, आमच्या पालनकर्त्या! तू आम्हाला या वस्तीतून बाहेर काढ, जिथले लोक अत्याचारी आहेत आणि आमच्यासाठी आपल्यातर्फे तू एखादा सहाय्यक नेमून दे.'' (कुरआन- ४ : ७५)

## अल्पतर जिहाद
### (आक्रमक सैन्यांविरुध्द सशस्त्र प्रतिकार)

ज्याप्रकारे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मूलत: 'अल्पतर जिहाद'चा अर्थ विशद केला आहे. याचा आशय सैनिक संघर्षाच्या संदर्भात सशस्त्र संघर्ष होय, ज्याचा मूळ हेतु इस्लाम आणि न्यायाचे रक्षण करणे.

हा सर्वांनी स्वीकारण्यायोग्य सिध्दान्त आहे की खरोखर जर कोणी एखाद्या राज्यावर आक्रमण केले, तर ज्या देशावर आक्रमण केले गेले, त्याला आपल्या संपूर्ण लष्करी सामर्थ्याचा वापर करीत आत्मरक्षण करण्याचा वैध अधिकार राहील. आपल्या राज्याच्या रक्षणार्थ संघर्ष लेख, मीडिया, चर्चासत्र, तह-करार आणि शांतीप्रक्रियेच्या माध्यमाने केला जाऊ शकतो. जर हे प्रयत्न अयशस्वी ठरतील आणि आव्हान अद्याप कायम असेल तर राज्य सरकार जिहादची घोषणा करू शकते. हा जिहाद राज्याच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी केलेला सैनिक संघर्ष असेल, जो कोणत्याही देशाचा वैधानिक हक्क आहे.

हा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे की आंतरराष्ट्रीय कायदा लोकांच्या, आक्रमक आणि कब्जा केलेल्या परकीय सैन्यांविरुध्द सशस्त्र प्रतिकारास उचित मानतो.

परंतु जिहाद आक्रमक युध्द किंवा अधिकारक्षेत्र वाढविण्यासाठीचे युध्द असू शकत नाही. हे एक बचावात्मक युध्द आहे, जे, ज्या लोकांना यात सामील होण्याचे आवाहन करते, त्यांच्यावर काही प्रतिबंध आणि जबाबदाऱ्या टाकतो. एका नैतिक अभ्यासाच्या रुपात जिहाद, युध्दाच्या कठोर इस्लामी नियमांतर्गत लढला जातो. अर्थात हे की निर्दोष लोक, स्त्रिया, वृध्द, लहान बालके आणि नि:शस्त्र नागरिकांना हानी पोहचविली जाऊ शकत नाही. संपत्ती आणि वातावरणाला नष्ट केले जाऊ नये तसेच अन्य धर्मांच्या उपासनास्थळांना उद्ध्वस्त केले जाऊ शकत नाही. अपहरण, ओलीस ठेवणे,

निरपराध नागरिकांवर बेछूट गोळीबार करणे अशा ठिकाणांवर बॉम्ब लावणे जिथे लोक काम करतात, ही सर्व वाईट व अमानवीय कृत्ये आहेत, इस्लाम अशा कृत्यांची निर्मत्सना करतो. हे सर्व प्रकार दहशतवादात येतात आणि या भावनाशून्य हत्या होत.

यान्यतिरिक्त कोणताही मनुष्य कोणत्याही माणसाविरुध्द जिहादची घोषणा करू शकत नाही. उदाहरणार्थ, एखादा मुस्लिम देश अन्य एखाद्या मुस्लिम देशाविरुध्द अथवा एक क्रूर शासक आपल्या विरोधी देशांविरुध्द जिहादची घोषणा करू शकत नाही. जिहादसाठी संपूर्ण मुस्लिम समाजाचे सर्वसंमत असणे आवश्यक असते आणि याच्यासाठी त्याला अशा शत्रूची स्पष्ट ओळख असणे आवश्यक ठरते, जो असहाय्य. अगतिक लोकांचा छळ करत आहे.

तद्‌वतच इस्लामी जिहादचे दावेदार म्हणविणाऱ्या तथाकथित गटांना जिहादची घोषणा करण्याचा अधिकार नाही. याहून अधिक त्यांच्या आततायी पध्दतींकरिताही इस्लामी कायद्यात कोणताही आधार नाही, ज्यांच्याद्वारे निर्दोष लोकांची मोठ्या निर्दयतेने हत्या केली जाते. काही चुकीचे मार्गदर्शन लाभलेल्या अडाणी व अज्ञानी मुसलमानांच्या चूकीची कृत्ये, मुसलमानांची बिघडत जाणारी दशा आणि जगात सर्वत्र पसरलेली मार्ग-भ्रष्टता इ.मुळे इस्लामच्या संदर्भात ठोस निर्णय करणे किंवा तसे वक्तव्य करणे सर्वथा अनुचित आहे.

पूर्वी पॉप सिंगर असलेले केट स्टीवेन्स, जे आता यूसुफ इस्लाम आहेत. त्यांनी निरीक्षणांती आपले मत व्यक्त करताना म्हटले,

''इस्लामच्या संदर्भात एखादा निर्णय, काही मार्गभ्रष्ट मुसलमानांच्या गैर व्यवहाराच्या प्रकाशात करणे, ज्यांना नेहमी मीडियाद्वारे दाखविले जाते, फार चुकीचे आहे. हे एका कारविषयी निर्णय घेण्यासारखे आहे, जिच्या चालकाने नशेच्या अवस्थेत धडक दिली.''

## सामाजिक जिहाद

समाजाची क्रियाशीलपणे सेवा करणे हा जिहादचा एक प्रकार आहे, जो आजच्या काळाच्या संदर्भात उचित दिसून येतो. जर कोणी खरोखर समाजाला भलेपणाकडे नेण्यासाठी परिवर्तन करण्याचा दृढ-संकल्प बाळगतो तर त्याने सामाजिक कार्यांची जबाबदारी घेतली पाहिजे, जिला सिविल सोसायटीचे लोक आजच्या जगात, उचलण्याचा दावा करतात. हा लोकांच्या आचार-विचारास बदलण्याचा मूक परंतु निरंतर संघर्ष आहे. अशाप्रकारच्या संघर्षाची माध्यमे शिक्षण, जागृती, व्यवहारात बदल, आग्रह आणि प्रेरणा आहे. सामाजिक जिहाद आपल्या परिघात अनेक हेतु आणि मिशन बाळगतो, मग तो हेतु बालकांच्या हित-अधिकारांच्या पालनाचा असो किंवा स्त्रियांच्या सशक्तीकरणाचा असो, बाल-मजूरीच्या निर्मूलनाचा असो, किंवा शिशु मृत्यु दर कमी करण्याचा असो, पर्यावरण संरक्षण असो किंवा वन्य-जीवनाच्या रक्षणाचा असो. शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे असो किंवा मदरसा पाठ्यक्रमाचे आधुनिकीकरण असो पतित महिलांच्या पुनर्वसनाचा असो किंवा मादक पदार्थांच्या आहारी गेलेल्या लोकांचा पुनर्वास असो, गांव खेड्यात व्याजबट्ट्यापासून मुक्ती मिळवून देण्याबाबत असो किंवा बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्याबाबतचा असो, पुस्तकांना लोकप्रिय बनविण्याचा अथवा अप्रशिक्षित लोकांना प्रशिक्षण देण्याचा असो. वास्तु-निर्मितीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांच्या मुलाबाळांकरिता पाळणा घरे प्रस्थापित करण्याचा असो किंवा खाणीत काम करणाऱ्या मजुरांना सुरक्षा सहायता पुरविण्याचा असो, कैद्यांना कायदेविषयक माहिती पुरविण्याचा असो किंवा त्यांच्या कुटुंबियांची देखभाल करणे असो, वक्फ प्रॉपर्टीचे संरक्षण करण्याचा असो किंवा वृध्दाश्रमांची देखभाल करण्याचा असो, अपराधी सिद्ध झालेल्यांची सुधारणा करण्याचा असो किंवा बाल-अपराधींच्याकरिता सुधार गृहांची स्थापन करण्याचा असो. बेघर लोकांना स्वस्त घरे पुरविण्याचा असो किंवा गोर गरीबांकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा असो, ही सर्व कामे सामाजिक जिहादच्या अंतर्गत येतात. ही यादी एवढ्यावरच संपत नाही. शेकडो, सहस्त्र सिविल सोसायटी संघटना साऱ्या जगात रात्रंदिवस काम करीत

आहेत. यासाठी की जगाला अधिक चागले, सुरक्षित आणि सुखवस्तु स्थान बनविता यावे. ते सर्वच सामाजिक दुष्प्रवृत्तींविरुध्द लढा देत आहेत आणि ते असे विश्व विकसित करू इच्छितात, जिथे अधिक समानता साम्य, सुख-संपन्नता असावी आणि ते दयनीय अवस्था आणि दु:खापासून मुक्त व्हावे. पवित्र कुरआन आपल्या वाचकांना या गोष्टीस प्रेरित करतो की त्यांनी इतरांशी भलेपणाचे वर्तन करावे ज्या प्रकारे अल्लाहने तुमच्याशी भलाईपूर्ण व्यवहार केला आहे. (अहसिन कमा, अहसिनल्लाहु अलैक) दुर्भाग्याने तो पाश्चिमात्य समाजच होय, ज्याच्या व्यक्तिमत्त्वात अशा प्रकारचे वर्तन, त्या लोकांच्या तुलनेत अधिक आहे, जे दावा करतात की कुरआन त्यांचा ग्रंथ आहे. मुस्लिम जगत अशा सिविल सोसायटी विरहित आहे, जिचा उल्लेख केला जावा. याच्या धर्मगुरुंना जास्त करून फतवे देण्याची सवय पडली आहे. समाजाची सुधारणा करण्याऐवजी ते फतवा देण्यावर भरवसा करतात. आता ती वेळ येऊन ठेपली आहे की मुसलमानांनी सामाजिक कार्याची जाण बाळगावी आणि या जगाला दारिद्य्र, निरक्षरता, रोगराई, मादक पदार्थ, कर्ज, दास्यत्व आणि सावकारांच्या विळख्यातून सोडविण्याकरिता सामाजिक जिहाद पुकारावे.

इस्लाम धर्माच्या मध्यवर्ती सिध्दान्ताविषयी हे विवरण आम्हाला सामाजिक कार्याच्या समस्येवर नवा प्रकाश टाकण्याचा मार्ग मोकळा करतो. सर्वच मुसलमान जाणतात व याची पुनरावृत्ती ही करतात की इस्लामचे पालन नमाज, जकात, रोजा आणि हज एवढेच करून संपत नाही. आपल्या रोजच्या जीवनात असे ते प्रत्येक काम जे अल्लाहच्या स्मरणाने परिपूर्ण असावे, आपल्या ठायी कृतज्ञता आणि उपासनेचे कार्य आहे. याहून अधिक ईमान आणि आचरणात वारंवार म्हटली जाणाऱ्या वाक्यांद्वारे पवित्र कुरआनात जो निकट संबंध कायम केला गेला आहे, तो आम्ही जाणतो अर्थात, 'जे लोक ईमान राखतात आणि सत्कर्मे करीत राहतात.' अशा प्रकारे ईमान राखण्याचा सरळ अर्थ हा की ईमान राखावे आणि सदाचाराचा अंगीकार करावा आणि या सदाचाराची प्रवृत्ती अनेक पैलूंनी युक्त आहे. हेच ते सत्कर्म होय, ज्याला ईमानदारी म्हणतात. ज्यास कोणी स्वत:साठी बंधनकारक ठरवितो आणि आपल्या आप्तस्वकीयांशी भलाई व उदारतापूर्ण व्यवहार करतो. तद्‌वतच हे

सामाजिक सुधारणेत एक दृढ संकल्पयुक्त कार्य आहे किंवा अन्यायाविरुध्द लोकांना सचेत करणे आहे. अशा प्रकारचे सर्व प्रयत्न जे केले जातात ते या अर्थाने जिहादचे अंग आहेत, जे त्या गोष्टींकडे मुख्यत्वे लक्ष देतात, ज्या अवतरित सिध्दान्तांपैकी अधिक न्यायपूर्ण आणि अधिक मान प्रतिष्ठा दायक असाव्यात.

खालील आयत यास स्पष्ट करते,

''अल्लाहच्या मार्गात जिहाद करा आपल्या धनाने आणि आपल्या प्राणांनी, हे तुमच्यासाठी उत्तम आहे, जर तुम्हास जाणीव असेल.'' (कुरआन- ६१ : ११)

मुसलमानास हा आदेश दिला गेला आहे की त्याने आपली धनसंपत्ति आणि आपला प्राण योग्य उद्दिष्टे व योजनांवर खर्ची घालावा. व्यापक अर्थामध्ये हा असा एक अर्थ आहे, जो संपूर्ण कुरआनाच्या संदेशात आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हदीस वचनांमध्ये ज्याचे समर्थन केले गेले आहे. अल्लाहच्या मार्गात लढण्याचा अर्थ समस्त मानवी क्षमतांना, प्रेरणांना सेवेसाठी सज्ज करणे, आपले सर्व प्रयत्न पणास लावणे, आपले धन अर्पण करणे, किंबहुना वेळ पडल्यास प्राण अर्पण करणे, ज्यामुळे सर्व संकटांवर नियंत्रण मिळविता यावे. मग तो अन्याय, शोषण, भूक, दारिद्र्य बेरोजगारी, निरक्षरता अपराधिक व्यवहार, मादक पदार्थांची सवय, मद्यपान, जुगार, इ. वाईट गोष्टींविरुध्द अत्याधिक संघर्ष, निरंतर जिहाद आणि परिपूर्ण जिहादची नितांत गरज आहे, ज्यात प्रत्येक माणसाने सहभागी होणे आवश्यक आहे.

मुसलमानांपैकी असे किती लोक आहेत, जे आपला उंबरठा ओलांडून पुढे जाऊन लढू इच्छितात, जे इस्लामकरिता अत्याधिक गांभीर्याने आपला प्राण देण्यास तत्पर आहेत? तथापि या संकल्पाने परिपूर्ण होऊन ते हे विसरतात आणि ते त्या युध्दाबाबत आंधळेच राहतात, ज्यास त्यांनी आपल्या गल्ली-मोहल्ल्यात जारी राखायचे आहे. हे असे ध्येय-उद्दिष्ट आहे, ज्याला आपल्या शेजारी, आपल्या शहरात आणि देशा-देशात खूप खूप पाठिंबा दिला गेला पाहिजे. मिस्रचे (इजिप्तचे) एक विद्वान हसन अल् बन्ना यांनी म्हटले होते,

''अल्लाहच्या मार्गात मरण पत्करणे कठीण आहे, परंतु अल्लाहच्या मार्गात जीवन व्यतीत करणे त्याहूनही अधिक कठीण आहे. हा जिहाद जीवनाकरिता जिहाद आहे, यासाठी की प्रत्येक माणसाला तो हक्क प्रदान केला जावा, जो त्याचा जन्मसिध्द हक्क आहे. इस्लामचा संपूर्ण संदेश याच जबाबदारीचा वाहक आहे आणि हीच त्या महद् कार्याची आवश्यकता आहे.''

# पैगंबर मुहम्मद (स.) यांनी युध्दसंदर्भात काय फर्माविले?

आम्ही या ठिकाणी, प्रथम मुस्लिम खलीफा हजरत अबू बक्र सिद्दीक (रजि.) यांच्या त्या कथनाचा उल्लेख करू इच्छितो, जे त्यांनी आपल्या मुस्लिम सैन्याच्या सेनापतीला मोहिमेवर पाठविताना केले होते. हा असा आदेश होता जो मूलत: पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिला होता :

> ''स्त्रियांची हत्या करू नका, एखाद्या बालकाची हत्या करू नका, न एखाद्या दुबळया वृध्द इसमाची, एखाद्या फळ देणाऱ्या वृक्षाला कापू नका एखाद्या घराचा विध्वंस करू नका, एखाद्या मेंढ्याला किंवा उंटाला तोपर्यंत मारु नका, जोपर्यंत तुम्हाला त्यास खाण्याची आवश्यकता भासत नाही. मधमाशांना आगीच्या हवाली करू नका आणि न त्यांना बुडवा, युध्दात जिकलेली धनसंपदा अन्यायपूर्वक घेऊ नका आणि भित्रे बनू नका.''

दहा आदेशांवर आधारित या कथनात कोणत्याही माणसाला हे दिसून येईल की युध्दाच्या प्रसंगी मुसलमानांवर केवळ निर्दोष आणि युध्दात सहभागी नसलेल्या लोकांशी दया, सहानुभूतीने वागण्याची जबाबदारीच नाही, तर मुक्या प्राण्यांवर आणि वातावरणावर दया दाखविणे आवश्यक ठरविले गेले आहे. जर आजच्या काळात सर्व सैन्ये ही शिकवण आपल्या आचरणात आणतील तर आज युध्दापायी जेवढा विनाश होतो, त्याच्या उलट हे जग निश्चितच अधिक मानवीय आणि सचेत स्थान बनेल, अशाने यात फरक नाही पडत की युध्द लढणारे कोण आहेत, याहून अधिक पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अधिक जोर देऊन फर्माविले,

> “जो कोणी एखाद्या इस्लामी राज्याच्या मुस्लिमेतर प्रजेशी अन्याय करतो, तर कयामतीच्या दिवशी मी त्या मुस्लिमेतर लोकांचा वकील बनेन. मानवजातीची जैविक एकता एक वस्तुस्थिती आहे, ज्याविषयी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे शुभकथन आहे, हे अल्लाह! मी साक्ष देतो की समस्त मानव आपसात बांधव (बंधु-भगिनी) आहेत.”

आम्हाला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनात या ऐक्याचे व्यावहारिक उदाहरण मिळते. एकदा पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या साथीदारांसह होते, त्याचप्रसंगी एक अंत्ययात्रा जवळून जात होती. अल्लाहचे पैगंबर मृत व्यक्तीच्या सन्मानार्थ उठून उभे राहिले. त्यावर सहवासातील अनुयायी आश्चर्य चकित झाले.

ते पैगंबरांना म्हणाले, “हुजूर! ही एका ज्यूची शवयात्रा आहे.”

पैगंबर (स.) यांनी त्यांना उत्तरा दाखल विचारले, “काय तो एक माणूस नव्हता?”

इस्लाम मनुष्यजीवनाला एवढे महत्त्व देतो की कुरआन आदेश देतो,

> “याच कारणास्तव आम्ही इस्राईलच्या संततीकरिता लिहून दिले होते की ज्याने एखाद्या माणसाला, एखाद्याच्या हत्येचा सूड घेण्यासाठी किंवा जमिनीवर उत्पात पसरविण्याव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या कारणाने ठार मारले तर समजा त्याने समस्त मानवांची हत्या केली. आणि ज्याने एकही माणसाचा जीव वाचविला तर समजा त्याने समस्त मानवांना जीवनदान दिले.” (कुरआन- ५ : ३२)

या दिव्य संदेशाद्वारे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मनुष्य जीवनाचे पावित्र्य आणि अनुल्लंघनीयतेला अधोरेखित केले, मग तो मनुष्य मुस्लिम असो किंवा मुस्लिमेतर.

# 'जिहाद' शब्द : उपयोग आणि दुरुपयोग

'जिहाद' एक अरबी शब्द आहे, जो 'जहद' धातूपासून तयार झाला आहे ज्याचा अर्थ 'संघर्ष' असा आहे. 'जिहाद'ची व्याख्या ही की एखादे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता शक्यतो सर्व प्रयत्न केले जावेत. याचा वापर अनेक परिस्थितींशी आणि पध्दतींशी तोंड देणे असाही होतो. सर्वसाधारणत: उर्दू भाषेत नेहमी 'जद्दोजहद' हा शब्द नेहमी वापरला जातो, ज्याचा साधा अर्थ 'संघर्ष' असा आहे. एका अरबी वाक्प्रचारात म्हटले गेले आहे, ''अक्कलहुशारीने काम करा आणि अकारण अत्याधिक श्रम करू नका.''

जिहादचा अत्याधुनिक वापरात अगदी अनेक अधार्मिक कार्यासाठी वापर केला जातो. लोक भ्रष्टाचार, प्रदूषण, भृण हत्या इ.विरुध्द आणि महिला अधिकारांसाठी जिहादसारख्या घोषणांचा सर्रास वापर करतात.

राष्ट्रपिता महात्मा गांधींद्वारे भारतात ब्रिटीश राजवटीविरुध्द अहिंसा नावाने शंतिपूर्ण संघर्षाला अरबी भाषेत जिहाद म्हटले गेले. ज्या प्रकारे ट्यूनिशियामध्ये राष्ट्राच्या आर्थिक विकासाकरिता धर्मनिरपेक्ष राष्ट्रपती हबीब बोरगीबाच्या मोहीमेला जिहाद म्हटले गेले. काही स्त्रिया, महिलांच्या मुक्तीसाठी चालविल्या जाणाऱ्या आंदोलनाला जिहाद म्हणतात आणि इतर काही लोक न्यायपूर्ण नैतिक आणि सामाजिक व्यवस्थेसाठी केल्या जाणाऱ्या संघर्षाला जिहाद म्हणतात. काही जास्त भावनाशील वृत्तीचे मुस्लिम गट शिया लोकांविरुध्द आपली लढाई योग्य ठरविण्याकरिता चुकीने तिला जिहादचे नाव देतात.

कालक्रमान्वये संरक्षण आणि आक्रमण या शब्दांना जास्तीतजास्त घाळमेळ करून वापरले जाते आणि जिहाद संकल्पनेचा वापर जास्त करून मुस्लिम लष्करी मोहीमांच्या युध्दांसाठी निर्देशार्थ होऊ लागला. नेहमी मुस्लिम

राज्य इतर मुस्लिम राज्यांशी युध्द करीत असत. मुसलमानाविरुध्द मुसलमान संघर्ष होत असे. या संदर्भात इस्लामची स्पष्टत: कोणतीही भूमिका राहात नसे. १९ व्या शतकात सुडानचे बंडखोर नेते मेहदी, उस्मानिया शासकांविरुध्द आपल्या बंडाला 'जिहाद' अवश्य म्हणत आणि त्यांनी सर्व तुर्की लोकांना मृत्युदंड देण्याचे आवाहन केले होते. सऊदी अरबचा एक कट्टरपंथी गट सर्व मुसलमानांविरुध्द जिहादचे आवाहन करतो. दुर्दैवाची गोष्ट अशी की इस्लाम मधील काही पंथ जिहाद शब्दाचा उपयोग इस्लामच्या इतर पंथांविरुध्द आपल्या संघर्षासाठी करतात, जेणेकरून त्यांना इस्लामच्या त्या आवृत्तीला रद्द करता यावे, जिला दुसरे पंथ अंगीकारतात.

काही कट्टरपंथी गट आता युध्दाच्या कुराणातील कल्पनेला मुस्लिम जगात, आपल्या घरगुती राजकीय विरोधकांविरुध्द वापरु लागले आहेत.

सध्या अतिजहाल मतवादी गटदेखील आपल्या कारवायांना जिहादच्या स्वरुपात प्रस्तुत करीत आहेत. उदा. नायजेरिया, सोमालिया, माली, अफगाणिस्तान आणि लेबनान इ. देशात हे दिसून येते. हे गट, अपहरण, हायजॅकिंग वगैरे बाबींना आपल्या त्या जिहादचे अंग असल्याचे सांगतात जे तेआपल्या सरकारांविरुध्द लढत आहेत.

अशा प्रकारे गेल्या अनेक शतकांपासून जिहाद शब्दाचा सदुपयोग आणि दुरुपयोग होत राहिला आहे. हा शब्द आज पुन्हा मुस्लिम-जगात पाश्चिमात्य सैन्यांविरुध्द केल्या जाणाऱ्या प्रतिकारासाठी वापरला जाऊ लागला आहे.

शब्दावली काहीही असो, ही गोष्ट उल्लेखनीय आहे की आंतरराष्ट्रीय कायदा आक्रमक विदेशी सैन्यांविरुध्द लोकांच्या विरोधास उचित ठरवितो.

पाश्चिमात्य शक्तींनीही जिहाद या संज्ञेचा आपल्या हितानुसार वापर केला आहे. ही संज्ञा अफगाणिस्तानात सोवियत कम्युनिस्ट विस्तारवादाविरुध्द प्रतिकार आंदोलन काळात फार जास्त वापरली गेली. अमेरिकेच्या सी.आय.ए.ने हजारो अफगाण मुजाहिदीनांची भरती केली त्यांना

हत्यारे आणि प्रशिक्षण दिले व त्यासाठी फंड उपलब्ध करून दिला आणि मुस्लिम देशांचे समर्थन मिळवून दिले. सी.आय.ए.ने अल्जेरिया, यमन, चेचनिया आणि मध्य-आशियातील राज्यांकडून मोठ्या संख्येत दहशतवाद्यांना प्रेरित केले. मुजाहिदीन, जिहाद, शहीद वगैरे अनेक इस्लामी पारिभाषिक शब्दांना मीडियाच्या माध्यमाने प्रचारित व प्रसारित केले गेले.

किसिंजर डॉक्ट्रीननुसार आशियाच्या लोकांना आशियाच्याच लोकांशी लढविण्याचा प्रस्ताव मांडला गेला आणि लढणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हदीस-वचनांचा उपयोग केला गेला. त्या हेतुस्तव अफगाण, पाकिस्तान सीमांवर काही विशेष मदरसे स्थापित केले गेले, हे मदरसे ज्यांना अप्रत्यक्षरीत्या अमेरिका आर्थिक मदत देत होता, त्यांनी अशा प्रकारच्या घोषणा दिल्या की कम्युनिस्ट काफिर आहेत आणि त्यांची हत्या करणे जिहाद आहे आणि जे लोक या युध्दात मारले जातील, ते सरळ जन्नत (स्वर्गा) मध्ये जातील, जिथे ७२ कुमारिका त्यांची प्रतिक्षा करीत आहेत. या वैचारिक आणि तात्विक कॉकटेलने त्या मुस्लिम युवकांवर सखोल प्रभाव टाकला जे या ठिकाणी प्रशिक्षणासाठी येत असत, म्हणजे आपला जीव देऊन शहीद व्हावे.

कम्युनिस्ट सोवियत युनियनविरुध्द अमेरिकेच्या प्रातिनिधिक युध्दाला भडकविण्यासाठी अफगाणी तरुणांच्या दोन पिढ्यांनी शस्त्रे आणि आवश्यक वैचारिक प्रशिक्षण प्राप्त केले. या खेळीत अफगाणिस्तानसोबत मोठमोठ्या राजकीय गटांचा वापर केला गेला, जे जहालमतवादी विचारसरणी राखणारे होते आणि त्यांना सोवियत सैन्याशी लढविले गेले, जसे की राष्ट्रीय संरक्षण सल्लागार जिग्न्यू बेजेन्सकीने नंतर याचा पर्दाफाश केला. सी.आय.ए.ने मुजाहिदीनला हत्यारे पुरविली आणि आतंक पसरविण्याचे उच्च पातळीचे प्रशिक्षण दिले. या लोकांनी यशस्वीपणे सोवियत सैन्यांना बाहेर घालविले. परंतु त्यांनी आपल्या जनतेविरुध्दही भयंकर युध्द केले, ज्यात केवळ काबूलमध्येच कमीतकमी ४५,००० लोक मारले गेले. (निनान कोशे. डब्ल्यू ओटी, पृ ६२-६३)

हे गट केवळ रशियन सैन्याला पिटाळून लावण्यात सफल झाले नाहीत तर, किंबहुना त्यांनी याच हत्यारांचा व विचारसरणीचा आपसात

एकमेकांना मारण्यासाठीही वापर केला आणि ते रशियन सैन्याची शेवटची तुकडी निघून गेल्यानंतर सहा वर्षे आपसात लढत राहिले.

इ. सन १९९५मध्ये तिथे सर्वांत शक्तिशाली गट तालिबानचा उदय झाला आणि त्याने काबूलच्या सत्तेवर ताबा मिळविला. त्याने सत्तेची विध्वंसकारक खेळी खेळली, ज्यात त्याने मुलींच्या शाळेत जाण्यावर प्रतिबंध, बामियान येथे असलेल्या बुध्दाच्या प्राचीन मूर्तीचा भंग केला आणि याच कालावधीत इंडियन एयर लाइन्सच्या विमानाचे अपहरण करून कंधार येथे नेले आणि त्यातल्या प्रवाशांना ओलीस ठेवून त्यांच्या बदल्यात मसूद अजहरसारख्या भयंकर अतिरेक्याला सोडविले. अल कायदा संघटनेचे ओसामा बिन लादेन आणि इतर लोक याच युध्दाची उपज होती. तथापि बंदूकांचा रोख अमेरिका आणि त्याच्या हितांकडे वळताच तालिबानांविरुध्द एक मोहीम छेडली गेली आणि जिहादी आतंकवाद ही संज्ञा प्रचलित झाली. अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन्ही टॉवर्सवर ९/११ च्या हल्लयांसह घटनाक्रम आपल्या शिखराप्रत जाऊन पोहोचला आणि तत्कालीन राष्ट्रपती जॉर्ज बुशद्वारे दहशतवादाविरुध्द युध्दासाठी मैदान तयार झाले. बाकीचे सर्व काही आता इतिहास जमा झाले आहे.

आता हिंसेने हिंसा भडकते. अमेरिकेद्वारे अफगाणिस्तान आणि इराकमध्ये लढल्या गेलेल्या दोन अमेरिकी युध्दांनी मध्य-पूर्वेत केवळ सुडाची भावना आणि आत्मघाती बॉम्बवर्षाव भडकविला. अमेरिकेच्या हस्तक्षेपाने या क्षेत्रात सामाजिक आणि राजकीय अराजकता पसरविली. दहशतवादाविरुध्दच्या तथाकथित युध्दात एक दशलक्षाहून अधिक इराकी लोक मारले गेले आहेत. अफगाणिस्तानचे भविष्य अनिश्चित आहे. युध्दाची झळ पाकिस्तान सहन करीत आहे, कारण आत्मघाती बॉम्बस्फोट पाकिस्तानात दररोज अशांती पसरवित आहेत.

या कारवाया जिहादच्या परिभाषेत नीट बसत नाहीत. हिंसा आणि अतिरेक जिहादचे अंग नाहीत. जिहादचा अर्थ व्यक्ती आणि समाजाला अनिष्ट आणि अनपेक्षित आपले अधिकार क्षेत्र पसरविण्यासाठी, साधनसामुग्रीची लूटमार करण्यासाठी, एखाद्या विशिष्ट वंशाचा समूळ नाश

करण्यासाठी आणि जनसामान्यांच्या मनात भय-दहशत निर्माण करण्यासाठी व संवेदन शून्य हिंसाचारासाठी कदापि नाही. जिहादचा सर्वसाधारण अर्थ शान्ति-सुव्यवस्था आणि न्यायाची स्थापना करण्यासाठी केला जाणारा अविरत संघर्ष असा आहे. युध्द जिहादची शेवटची पायरी होय. याचा आरंभ, इच्छा आकांक्षांपासून आपल्या आत्म्याला स्वच्छ शुध्द केल्याने होतो. अनेक प्रकारच्या शक्ती-सामर्थ्यांनी जिहादचा उपयोग आणि दुरुपयोग केला आहे आणि जिहाद आता खऱ्या इस्लामी भावनेची अभिव्यक्ती राहिला नाही.

# धर्माचा दुरुपयोग

अतिरेकी मुस्लिम गटांद्वारे केल्या गेलेल्या हिंसक कारवायांचे वारंवार एक स्पष्टीकरण हे केले जाते की हे लोक हिंसक कारवायांसाठी आपल्या धर्माचा दुरुपयोग करतात. कारण यात धर्माचा हवाला दिला जातो म्हणून या कारवायांचे स्पष्टीकरण अशा प्रकारे केले जाते की धर्माचा संबंध, सरळ हिंसा आणि आतंकवादाशी जोडला जातो.

असा व्यवहार फक्त मुस्लिम गटांशीच केला जात नाही, तर याचा वापर व्यापक स्वरुपात केला जातो. राष्ट्रवादी आंदोलन आणि स्वातंत्र्य संघर्षदेखील काही धार्मिक घोषणा किंवा प्रतीकांवर आधारित असतात. ज्याअर्थी धर्म लोकांच्या मनाला खोलवर स्पर्श करतो यासाठी की धर्म त्यांच्यासोबत सहस्त्रावधी वर्षांपासून अस्तित्वात राहिला आहे, या उलट राष्ट्रांचा व राज्यांचा उदय गेल्या दोन शतकांच्या कालावधीत झाला आहे, म्हणूनच इस्लामवाद क्षेत्रीय संस्कृतीत आपली सखोल मुळे आणि क्षेत्रीय उद्दिष्टांच्या नावावर लोकप्रिय समर्थन साध्य करून घेण्याच्या योग्यतेमुळे संघर्षासाठी सर्वांत नविन आणि सर्वांत शक्तिशाली वैचारिक माध्यम आहे.

वर सांगितल्याप्रमाणे असला प्रकार फक्त इस्लामी गटांशीच नाही. अर्थात समस्त धर्मांचे अतिरेकी गट धर्माचे पाठबळ घेतात.

'द फर्स्ट क्रुसेड: द अकाऊन्टस ऑफ आय विटनेसेस अँड पार्टिसिपेन्टस'मधून घेतलेल्या या उताऱ्यावर विचार करा. नोव्हेंबर १०९५ मध्ये पोप अर्बन द्वितीयने मुस्लिम जगाचे वसाहतीकरण करण्याकरिता पहिला यूरोपियन प्रवास सुरु केला ज्याचे नाव पाश्चिमात्य देशात क्रुसेड असे आहे. त्यात तो मुस्लिम जनतेला काफिर आणि क्रूर रानटी घोषित करतो आणि यूरोपच्या ख्रिश्चन लोकांना तो आदेश देतो की त्यांनी हजरत ईसा (येशू) च्या नावावर या सर्वांची हत्या करून त्यांच्या जमिनी खाली कराव्यात आणि वास्तविक हा ईसा मसीहचा आदेश आहे. पुस्तक पुढील दृश्याचे विवरण

देताना सांगते, .......... जेरुसलेमवर दि. १५ जुलै १०९९ ला क्रुसेड करणाऱ्यांनी विजय प्राप्त केला, ज्याला 'क्रिश्चियन नाईट्स'ही म्हटले जाते. या युध्दात इथल्या ६०,००० नागरिकांची हत्या केली गेली, ज्यात ज्यू आणि मुसलमान सामील होते.

ही गोष्टदेखील ध्यानी घेतली पाहिजे की मुस्लिम आणि ज्यू पक्षाची एकही व्यक्ती या नरसंहारात वाचू शकली नाही. ख्रिश्चन नाईट अथवा ख्रिश्चन धर्मरक्षकांच्या तलवारींखाली जोदेखील शिशु, बालक, महिला आणि वृध्द आला तो वाचू शकला नाही, जे हजरत ईसा यांच्या मजारीसमोर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जात असत. काय ख्रिश्चन धर्माविषयी या घटनांच्या प्रकाशात निर्णय केला गेला पाहिजे? वस्तुस्थिती ही की या गोष्टीबद्दल कोणताही ख्रिश्चन आणि खरे पाहता कोणताही सभ्य ख्रिश्चनेतर सहमत होणार नाही तर काय फक्त हीच गोष्ट उचित ठरेल की इस्लामविषयी फैसला त्या अल्पशा अल्पसंख्यांक कट्टरपंथी, जहालमतवादी गटांच्या माध्यमाने केला पाहिजे, जे अल्लाहच्या नावाने निरपराध लोकांची हत्या करतात?

या ठिकाणी आणखी एक मुद्दा ध्यानी राखण्यायोग्य आहे की कशा प्रकारे ख्रिस्ती धर्माच्या नावाने समानरीत्या शासनांद्वारे आणि चर्चेसद्वारे हत्या आणि लूटीस सुरु करण्याचे, संस्थागत करण्याचे आणि समर्थन देण्याचे काम केले गेले. याला संस्थागत आतंकवादाचे नाव दिले जाऊ शकत होते. दुसरीकडे इस्लामच्या नावाने ज्या कारवाया पार पाडल्या जातात, त्या अधिकांश नेहमी काही व्यक्तींच्या कारवाया असतात. ज्यांना एखाद्या मान्यता प्राप्त संस्थेचे किंवा शासनाचे समर्थन नसते आणि तद्वतच त्यांना मुस्लिम नेतृत्वाचेही पाठबळ नसते.

बाप्टीस्ट ख्रिश्चन नावाच्या संघटनेच्या काही सदस्यांनी अनेक गर्भपात करणाऱ्या रुग्णालयांवर बॉम्ब वर्षावाला धर्मानुकूल दर्शविण्यासाठी आपल्या धर्मग्रंथांचे ओढून ताणून स्पष्टीकरण केले, ज्यात अनेक निरपराध लोक मारले गेले.

जेव्हा स्टॅलीनला दुसऱ्या महायुध्दात थर्डरीचच्या सैन्याच्या आक्रमणाचे आपण शिकार झाल्याचे आढळले, तेव्हा तो निश्चितपणे जाणत होता की मार्क्सवाद आणि लेनिनवाद प्रतिकाराच्या संघर्षाकरिता लोकांची मने

उत्तेजित करू शकत नाही. यास्तव तो रशियन राष्ट्रवादाकडे वळला आणि नंतर निराश होऊन लोकांना एका मुद्दयावर एकत्रित करण्यासाठी ऑर्थोडॉक्स चर्चवर श्रध्दा व्यक्त केली. जे पवित्र मदर रसियाचे प्रतीक होते.

दुसऱ्या महायुध्दापूर्वी जापानी साम्राज्य आशिया खंडात आपल्या विस्तारवादी आणि वसाहतवादी नीतींकरिता लोकांचे समर्थन मिळविण्यासाठी माध्यम शोधित होते. जापानचा आत्मा चेतावण्यासाठी सिन्टो धर्माचे पवित्र चारित्र्य आणि बौध्द धर्माच्या काही रुपांचाही वापर केला गेला.

श्रीलंका देशात, हिंदू तमिल विघटनवाद्यांविरुध्द आपल्या संघर्षात बहुसंख्यांक बौध्द सिंहली लोकांनी तमिल बडखोरांविरुध्द लोकांचा पाठिंबा प्राप्त करून घेण्याकरिता बौध्द भिक्षूंचे सहकार्य घेतले.

नाजी जर्मन हुकूमशहा हिटलर जो संयोगाने एक धर्मान्ध ख्रिश्चन होता. तो जे काही करीत होता, त्याबाबत त्याची श्रध्दा होती की ही ईश्वराची योजना आहे, त्याने नरसंहार केला, ज्यात सुमारे ६ दशलक्ष ज्यू मारले गेले. त्याने जर्मन युध्दात आपल्या समर्थनासाठी चर्चचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला.

युध्दाच्या प्रसंगी संयुक्त राज्य अमेरिकेतही राष्ट्रीय संघर्षाला धार्मिक वैधता प्रदान करण्यासाठी मुख्य प्रवाहाच्या चर्च, धर्म-गुरु, प्रोटेस्टंट, कॅथोलिक आणि ज्यू वगैरेंची सेवा प्राप्त केली गेली.

अशाच प्रकारे भारतातही पुराणमतवादी उजव्या गटाची सामर्थ्ये जास्त करून हिंदू प्रतीकांवर श्रध्दा ठेवतात आणि निवडणूकांच्या वेळी राष्ट्र-हिताला हिंदू-हिताशी आणि हिंदू-हिताला राष्ट्र-हिताशी जोडण्याचा प्रयत्न करतात. याहून पुढे जाऊन ते बहुसंख्यांक समुदायाच्या धृवीकरणाकरिता खोट्या आरोपांची वावटळ उठवितात आणि अल्पसंख्यांकाचा अनुनय यासारख्या विवादांना अधिक खत पाणी घालतात.

ज्या ज्या ठिकाणी लोकसमर्थन आणि मोठमोठ्या मोहिमा, लढायांना योग्य साबित करण्यासाठी पाठिंब्याची गरज भासेल, तिथे, सदैव धर्माचा वापर केला जाईल. परंतु ही उद्दिष्टे, या मोहिमा, युध्दे धर्माखातर नसतात. धर्माला वेगळे केल्यावरही, या मोहीमा, लढाया, हिंसाचार होत राहतील.

# दहशतवाद

दहशतवाद एखादे धार्मिक प्रकरण नाही. दहशतवाद, राजकीय आर्थिक आणि सामाजिक कारणांनी जन्मास येतो. लिब्रेशन टायगर्स ऑफ तमिल ईलम, आयरिश रिपब्लिकन आर्मी, उल्फा, साध्वी प्रज्ञा दयानंद पाडे आणि त्यांचे सहकारी या सर्वांवरून हे सिध्द होते की दहशतवादी सर्वच धर्मातून येतात. ज्याअर्थी मागील काही वर्षात मीडियाचा एक विशिष्ट वर्ग याचा संबंध इस्लाम धर्माशी जोडत राहिला, म्हणून दहशतवादाला मुसलमानांशी जोडणे एक फॅशन बनली आहे. वस्तुत: इस्लाम या कारवायांचे स्त्रोत असण्याची शक्यता फार कमी आहे.

जेव्हा अन्याय आणि लोकांच्या स्वातंत्र्याची गळचेपी होते. दडपशाहीचे वर्चस्व होते, तेव्हा अशाने हिंसाचाराचा उद्रेक होतो, जो नेहमी दहशतवादाचे रुप धारण करतो आणि जर याचा संबंध दुर्दैवाने एखाद्या विशिष्ट धर्माशी असेल तर जेथपर्यंत प्रेरणांच्या स्त्रोतांचा संबंध आहे, त्यांच्या अंगी धर्माचा रंग चढविण्याची प्रवृत्ती असते. हे पूर्णत: स्पष्ट आहे की लिब्रेशन टायगर्स ऑफ तमिल ईलमचे कार्यकर्ता व बंडखोर सर्वच्या सर्व हिंदू होते, परंतु मीडियाने त्यांना कधीही अशा प्रकारे सादर केले नाही, जहालमतवादी संघटना अभिनव भारतने बॉम्ब स्फोट केले, ज्याचा संबंध स्पष्टत: हिंदुत्वाशी होता. परंतु मीडियात फार कमी पत्रकार असे दिसून येतात, ज्यांना अशा घटनांमध्ये भगवा रंग दिसतो.

कट्टरपंथी लोकांद्वारे जिहादचा चुकीचा वापर करण्यामुळे समस्या आणखी जास्त बिकट झाली आहे. भरकटलेल्या तत्त्वांनी केलेल्या एकट्या दुकट्या हिंसक घटनादेखील जिहाद म्हणविल्या जात आहेत आणि काही लोक या घटनांना याच स्वरुपात प्रस्तुत करीत आहेत. एकीकडे अल कायदा आणि त्यासारख्या संघटना आहेत, ज्या जिहादच्या नावाने दहशत पसरवित

आहेत. जिहादच्या नावाने होणारी ही कृत्ये संपूर्ण मुस्लिम समुदायाचे सर्वांत मोठे वैरी आहेत. कधी कधी असे जाणवते की जेव्हा काही दहशतवादी असल्या कृत्यांमध्ये सामील होऊन मुसलमान होण्याचा दावा करतात तेव्हा मुसलमानांना इतर शत्रूंची गरजच नाही. ही तत्त्वे शत्रूंचे काम सर्वोत्तम पध्दतीने करीत आहेत, ज्यामुळे घडणाऱ्या प्रत्येक अप्रिय घटनेनंतर संपूर्ण मुस्लिम समुदायाची प्रतिमा डागाळली जात आहे. हे नादान व विवेकहीन लोक आपल्या कारवायांनी इस्लामची जी प्रतिमा साकार करीत आहेत, इस्लामचे कट्टर वैरीदेखील त्याहून अधिक चांगले काम करू शकत नाही. आपल्या आततायी कृत्यांनी ते दुसऱ्यांच्या मनात मुस्लिम समुदायाविरुध्द घृणा निर्माण करीत आहेत आणि प्रत्येक अशा कृत्यानंतर मुसलमानांची व इस्लामची प्रतिमा डागाळली जाण्याची प्रक्रिया आणखी वेगवान होत जाते.

इस्लाम धर्माच्या ग्रंथांमध्ये स्पष्ट सांगितले गेले आहे की जिहाद कोणत्याही माध्यमान्वये घडू शकतो, उदा. लेखणीच्याद्वारे, आपल्या स्वार्थाविरुध्द संघर्षाद्वारे अथवा एखाद्या पवित्र शब्दाने किंवा पवित्र कर्माद्वारे होऊ शकतो. परंतु मीडियाला यापैकी कोणताही भावार्थ माहीत नाही. जेव्हा मामला मुसलमानांचा येतो, तेव्हा काही तत्त्वांनी केलेल्या हिंसाचाराला जिहादचे लेबल लावले जाते.

सामान्यत: हे अवलोकनात येते की काही मुस्लिम देशांमध्ये छळवाद व दडपशाहीविरुध्द अशासकीय गट उभे राहिले आहेत. नि:संशय मध्य-पूर्वेकडील देशांचे समाज अनेक पैलूंनी कमी प्रमाणात विकसित आहेत. काही तेल निर्यात करणारे देश आणि खाडी देशातील लहानशा श्रीमंत लोकसंख्येला वगळता बहुसंख्य नागरिकांना शिक्षणस्तर, जीवनस्तर आणि नोकरी व्यवसायाचे अवसर कमी आहेत. भावी काळाकरिता संभावनांची अपेक्षा मर्यादित समजली जात आहे.

अनेक मुस्लिम देश जे राजांच्या, हुकूमशहांच्या आणि निरंकुश शासकांच्या अधीन आहेत, लोकशाहीसाठी उठणाऱ्या चळवळींचा तिथे कठोरपणे बिमोड केला जातो. नागरिक जीवन नर्कतुल्य बनविण्याकरिता मूलभूत हक्क हिरावून घेतले जातात आणि नागरी-स्वातंत्र्य दिले जात नाही.

सत्तारुढ पक्षांमध्ये पारदर्शिता नाही. भ्रष्टाचार पसरलेला आहे. हे हुकूमशहा आपल्या शासन सत्तेकरिता आपल्या नैसर्गिक साधनांवर उदा. तेल आणि नैसर्गिक गैस वगैरेवर स्वायत्तता प्राप्तीच्या बदल्यात पाश्चिमात्य शक्तींकडून वैधता मिळवितात तेव्हा आश्चर्य करण्यासारखी गोष्ट नाही की काही प्रतिकारात्मक आंदोलने या वातावरणातून उत्पन्न झाली असावीत. ही आपल्या देशाच्या शासकांविरुध्द प्रतिक्रिया आहे. हे लोक शस्त्रांचा वापर करू शकतात परंतु या असे करण्यात ते पाश्चिमात्यांच्या दुटप्पी नीतींचे पितळही उघडे करतात.

एक विख्यात अमेरिकन राजनैतिक तत्त्वज्ञानी आणि लोकप्रिय विचारवंत, बुध्दिजीवी मीकाईल वाल्जर ही समस्या खूप सामंजस्याने संक्षिप्तपणे सादर करतो, ''प्रथम छळवाद, दडपशाहीला दहशतवादासाठी निमित्त बनविले जाते, मग दहशतवादाला दडपशाहीकरिता निमित्त बनविले जाते. पहिले निमित्त अतिवामपंथी लोकांसाठी आहे आणि दुसरे निमित्त उजव्या नव पुराणमतवादी लोकांसाठी आहे.''

प्रत्येक जण या गोष्टीशी सहमत होईल की कोणत्याही समाजात राजकीय हिंसाचार अप्रिय आहे. दहशतवाद राजकीय हिंसाचाराचेच एक रुप आहे. परंतु जगातील अधिकांश देशांमध्ये राजनैतिक हिंसेचा वापर, छळवादी शासक स्वत: आपल्या जनतेविरुध्द आणि आपल्या घरगुती विरोधकांविरुध्द नियमितपणे करीत असतात. अवैध शासनांना खचितच राजनैतिक हिंसाचाराला तोंड द्यावे लागेल.

पॅलेस्टीयन लोकांनी दीर्घकाळपर्यंत इस्रायली रॉकेटांचा आणि क्षेपणास्त्रांचा मुकाबला केवळ दगडांनी आणि गोफणांनी केला. परंतु आता असे नाही. इस्रायली शासनातर्फे सतत वाढत्या हिंसेने हमास आणि हिज्बुल्लाहला अधिक सहयोगपूर्ण आणि सशक्त प्रतिक्रियेसाठी विवश केले. इराक आणि अफगाणिस्तान यांच्यात एक दशकांपासून चालत राहणाऱ्या युध्दांनीही शंका दृढ केली आहे की पाश्चिमात्य, पॅलेस्टीनची समस्या सोडविण्याऐवजी आपल्या नविन शस्त्रांच्या परीक्षणासाठी युध्द क्षेत्रांचा विस्तार करीत आहेत आणि नव्या रणभूमींचा शोध घेत आहेत. सद्दाम हुसैनच्या इराक मधील

विध्वंसक हत्यारांच्या संदर्भात पाश्चिमात्यांचा खोटेपणा उघडकीस आल्याने या विश्वासाला अधिक मजबूत केले आहे की पाश्चिमात्यांच्या युध्द, हिंसा, रक्तपात आणि अमर्याद राष्ट्रीय गर्वाच्या लालसेची कोणतीही सीमा नाही. नैराश्य आणि निरुत्साहाचे हेच वातावरण होय, ज्याने काही लोकांना पाश्चिमात्यांविरुध्द संघटित प्रयत्न सुरु करण्यास बाध्य केले आहे. या सर्वांच्या शेवटी पाश्चिमात्य त्याच तालिबानांसमोर गुडघे टेकताना दिसत आहे ज्यावर त्याने दहशतवादाचा आरोप लावला होता.

घटनांच्या परिणामस्वरुपी आलेल्या शहाणपणानंतर इस्लाम किंवा मुसलमानांच्या शब्दात दहशतवादाचा प्रत्यय लावणे या मागच्या खऱ्या हेतु किंवा इराद्याला अनावृत्त करतो.

जगात सध्या जे काही होत आहे, त्याच्या प्रकाशात इस्लाम किंवा मुसलमानांविषयी त्वरित एखादा निर्णय घेणे. न्यायसंगत ठरणार नाही. संयोगवश याला बळी पडणारे मुसलमान आहेत. तथापि त्यांचा क्रोध, दमन आणि प्रतिकार अपेक्षेला अनुसरुन आहे. कारण आम्ही श्रीलंका, उत्तर आयर्लेंड किंवा कांगोमध्ये पाहतो की छळ, दडपशाहीला बळी पडलेले लोक याचा प्रतिकार करीत आहेत. इस्लाम जगात शांती, सहअस्तित्व आणि जीवन, स्वातंत्र्य, संपत्ती आणि सर्व मानवांच्या आदर-सन्मानाचे रक्षण इच्छितो. या संदर्भात पवित्र कुरआन घोषणा करतो :

> ''ज्याने एखाद्या माणसाला, एखाद्याच्या हत्येचा सूड घेण्यासाठी किंवा जमिनीवर उत्पात पसरविण्याव्यतिरिक्त अन्य एखाद्या करणाने ठार मारले तर समजा त्याने सर्व मानवांची हत्या केली आणि ज्याने एकाही माणसाचा जीव वाचविला, समजा त्याने समस्त मानवजातीला जीवनदान दिले.'' (कुरआन- ५ : ३२)

ही पार्श्वभूमी लक्षात घेता ही गोष्ट मान्य करणे चुकीचे ठरेल की दहशतवाद एक इस्लामी दृश्य घटना आहे. निराकरण, काही धर्मांना बदनाम करण्यात दडलेले नाही, किंबहुना ते मानवतेतून अन्याय आणि छळवादाचा समूळ नाश करण्यात दडलेले आहे.

# इस्लामविरुध्द तिरस्काराचा प्रचार

सोवियत संघाचे विघटन आणि शीतयुध्दाच्या समाप्तीसह पाश्चिमात्य प्रामुख्याने संयुक्त राज्य अमेरिका सतत नव्या शत्रूच्या शोधात राहतो.

विल्यम फाफ, एक अमेरिकन लेखक आणि 'न्यूयार्कर'चा स्तंभलेखक आहे. ते 'इन्टरनॅशनल हेराल्ड ट्रिब्यून'साठी संपादकीय पानाकरिता लिहित असतात. ते लिहितात,

> ''लोकांची फार मोठी संख्या अशी आहे, जे विचार करतात की साम्यवाद आणि पाश्चिमात्यांच्या दरम्यान युध्दाच्या जागी पाश्चिमात्य आणि मुसलमानांच्या दरम्यानचे युध्द जागा घेत आहे. साम्यवादाच्या समाप्तीनंतर काही अमेरिकन लोकांना आपल्या क्षमता व शक्ती. सामर्थ्याच्या परीक्षणासाठी नव्या शत्रूचा शोध घेण्यात, इस्लाम एक मनपसंत शत्रू मिळाला आहे. तथापि संयुक्त राज्य अमेरिकेद्वारे इस्लामला शत्रू घोषित करण्याचा अर्थ एक नवे शीतयुध्द होय, ज्याच्या समाप्तीची आशा मागील विजयाच्या तुलनेत कमी आहे.''

साम्यवादाच्या लाल धोक्याची जागा हिरव्या रंगा (हिरवा रंग इस्लामचा रंग आहे) च्या भयाने घेतली आहे.

अफगाणिस्तानावर सोवियत आक्रमण निष्फळ करण्यासाठी अमेरिकेच्या सी.आय.ए.ने मुजाहिदीन आणि अल-कायदाला सहाय्य केले होते. अफगाण लढवय्यांना, ज्यांना पाश्चिमात्य देशांनी हत्यारे पुरविली होती, त्यांना पाश्चिमात्यांच्या हिताविरुध्द आपल्या बंदूकांची दिशा वळविण्यात वेळ

लागला नाही. वर्षानुवर्षे सी.आय.ए.च्या अपप्रचार तंत्राद्वारे नास्तिक आणि काफिरांविरुध्द जिहादची भावना भडकविण्याच्या परिणामी अमेरिकेने प्रशिक्षित केलेले मुजाहिदीननी मध्य-पूर्व आणि अन्य देशांमध्ये अमेरिकी हितांना लक्ष्य बनविण्यास सुरुवात केली.

याच कालावधीत अमेरिकेच्या शस्त्र-निर्मात्यांनी शस्त्रांच्या नव्या बाजार पेठींसाठी दबाव टाकणे सुरु केले. शीतयुध्दाच्या शेवटाने हत्यारांची विक्री कमी झाली होती. हत्यार उद्योग दीर्घकाळापर्यंत चालत राहणाऱ्या मंदीत सापडला. हे अमेरिकन काँग्रेसच्या त्या सदस्यांकरिता अपशकून होते. जे शस्त्र-निर्मिती करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांद्वारे उपलब्ध करून दिलेल्या निधीने निवडणूक जिंकत असत. ९/११ च्या घटनेने यांच्या विक्रीला असामान्यपणे वाढविले. नेसडेकचे आकडे दर्शवितात की हे शस्त्र निर्माण करणाऱ्या मोठमोठ्या कंपन्यां उदा. रेथीयॉन, बोईंग आणि लॉकहीड. मार्टिनचे शेअर होते, जे न्यूयार्कच्या टॉवर्सवर दहशतवादी हल्ल्यानंतर वाढले होते. अचानक युध्दाचा पारावर चढला आणि शस्त्र-निमार्त्यांची आवक वाढू लागली.

पाश्चिमात्य लोकशाहीत आज जे प्रचार तंत्र आहे ते मोठ्या प्रमाणात खऱ्याला खोटे आणि खोट्याला खरे बनविण्याची योग्यता राखते. ते या सिध्दान्तावर काम करतात की अधिकांश लोक मूर्ख आणि मुके असतात आणि त्यांना राजकारणात सक्रिय मदतनीस बनविले जाऊ शकत नाही. त्यांना भावनात्मक प्रकरणांद्वारे आणि भावुक प्रचाराच्या माध्यमाने आकर्षित करण्याची गरज असते. जनसंपर्क उद्योग याच धारणेचे एक अंग होते आणि हा लोकांच्या मनावर नियंत्रण राखण्यात विश्वास ठेवतो. प्रचाराचे मुख्य केंद्र अधिकतर हे असते की लोकांना एखाद्या मामल्यात राष्ट्रीय पातळीवर विचार करू द्यायला नको. याऐवजी त्यांना एखादी अशी घोषणा देऊन टाकावी, जी त्यांना पूर्णपणे मुख्य मुद्यापासून विचलित करील. उदाहरणार्थ, राष्ट्रपती जॉर्ज बुशची घोषणा, ''एकतर तुम्ही आमच्यासोबत आहात किंवा तुम्ही दहशतवाद्यांसोबत आहात'' याचा प्रभाव असा पडला की खरे तर त्यांचा कोणीही विरोध करीत नव्हता (या विषयावर अधिक माहितीसाठी वाचा

नोआम चोम्स लिखित पुस्तक- 'मीडिया कंट्रोल') अनेक यूरोपियन देशांमध्ये, मुसलमानांना गंभीर आव्हानांना तोंड द्यावे लागते, त्या आव्हानांमध्ये सतत वाढ होत आहे. परिस्थिती या मर्यादेप्रत जाऊन पोहोचली आहे की जर राज्यशासने आपल्या व्यवहारांना सद्‌भावपूर्वक चालवू इच्छितात तर त्यांना जागृत व्हावे लागेल. मुसलमानांविरुध्द आपत्तिजनक न वाटणाऱ्या व्यंगापासून सुरु होऊन मामला या हद्दीप्रत जाऊन पोहोचला आहे की इस्लाम धर्माला घृणा व तिरस्काराचा धर्म आणि मुसलमानांना सहनशीलता नसलेले व रुढिवादीच्या स्वरुपात प्रचारीत करण्याचा मोठ्या धुम-धडाक्याने प्रयत्न केला जात आहे. तुम्हाला प्रत्येक दुसरा माणूस असा भेटेल जो हे सांगेल की इस्लाम कशा प्रकारे काफिर लोकांची हत्या करण्याचा उपदेश देतो, जिहाद कशा प्रकारे इस्लामी शिकवणीचा भाग आहे आणि कशा प्रकारे जिहाद करणारे इस्लामचे सैनिक मात्र असतात. इथे भारतात मुसलमानांविरुध्द आरोपांची लांब लचक यादी आहे. मुस्लिम बादशहांच्या संदर्भात अनेकविध गैरसमज उदा. मंदिरांना तोडणे, हिंदू धर्माला अपमानित करणे प्रत्येक मुसलमानाला चार चार विवाह करण्याची अनुमती देणे आणि वीस पंचवीस मुलांना जन्मास घालणे, इथपासून 'प्रत्येक मुसलमान दहशतवादी असतो' इथपर्यंत पसरली आहे. या गैरसमजुतींमागे कारणे काहीही असोत. वस्तुस्थिती ही की आजच्या काळात अशा अनेक घटना आहेत, ज्यात हिंसेचा आरोप मुसलमानांवर ठेवला जातो, यासाठी की यांच्या माध्यमान्वये राजकीय शक्तींना यांच्यापासून लाभ उचलण्याचे निमित्त मिळावे आणि संपूर्ण मुस्लिम समुदायाला बदनाम करता यावे.

भारतात हा इस्लामविरोधी अपप्रचार यशस्वी होतो, कारण सामान्य माणूस प्रत्येक प्रसंगी जेव्हा जेव्हा टी.वी.च्या स्क्रीनवर काही पाहतो आणि वारंवार वृत्तपत्रांमध्ये जी बातमी किंवा घटनेचा वृत्तांत वाचतो, त्या संदर्भात आपल्या चिकित्सक बुद्धीचा वापर करीत नाही.

हा प्रकार बराच पुढे गेला आहे. मुसलमानांविरुध्द टार्गेट बनवून तिरस्कार, इस्लाम विरोधी वातावरणाची निर्मिती उंबरठा ओलांडून पुढे गेली आहे. या दुष्प्रवृत्तीने अमेरिकेला तेल-संपत्तीला हस्तगत करण्यासाठी अनेक

मुस्लिम देशांवर आक्रमण करण्याचे निमित्त दिले आहे. जहालमतवादी गटांना सामाजिक विशेषाधिकार मिळविण्यात मदत केली आहे. याचसोबत इतर काळांच्या तुलनेत ही नीती राज्य, समाज आणि समुदायांकरिता अधिक विपरित झाली आहे. विभिन्न समुदायांच्या दरम्यानचे अंतर लोकशाहींच्या तंत्रांवर कार्य करीत आहेत आणि सामाजिक विकासाची प्रक्रिया मंदावण्यासोबत त्यांना कमकुवत करीत आहेत. हे निश्चितपणे समाजाच्या दुर्बल घटकांना प्रभावित करेल आणि जागतिक पातळीवर आर्थिक व्यवस्थेलाही प्रभावित करेल आजच्या काळात मानवी-मूल्यांना कमी महत्त्व दिले जात आहे. पंथवादाच्या अंधकारपूर्ण युगातून शक्य तितक्या लवकर बाहेर पडण्याची आवश्यकता आहे. वेगवेगळ्या ठिकाणी उजव्या आणि धार्मिक पुराणमतवाद्यांचा उदय लोकशाहींकरिता एक ताकीद आहे. धोक्याची पूर्व सूचना आहे आणि संपूर्ण जगात उदारवादी विकसनशील तत्त्वांसाठी ही तंबी की या इस्लाम द्वेषची रोखथाम करणे अनिवार्य आहे. जगात वस्तुस्थिती अधिकतर आपल्या शिरावर उभी असते, जरी या क्षणी असे वाटत आहे की दहशतवादाचे कारण इस्लाम आहे आणि मुसलमानांमध्ये दहशतवादाची प्रवृत्ती आहे वास्तविक, सत्य हे की इस्लामला बदनाम करण्याचे कारण स्वार्थी तत्त्वांचा राजनैतिक लोभ-हव्यास आहे.

या क्षणी आम्हाला आंतरजातीय पर्यायाने आंतरधर्मीय संबंधांना आणि शांती-सद्‌भावपूर्ण गोष्टी पसरविण्याची, धर्माला नैतिक मूल्यांच्या चार्टर स्वरुपात सादर करण्याची आणि त्याला फक्त कर्मकांडापर्यंत मर्यादित न राखण्याची नितांत गरज आहे. आम्हाला त्या स्वार्थी आणि संधीसाधु तत्त्वांच्या कारवायांपेक्षा मानवभावनांना अधिक श्रेष्ठ समजण्याची गरज आहे, जे आपल्या स्वार्थाकरिता स्थानिक आणि जागतिक साधनसामुग्रीला आपल्या कब्जात घेऊ इच्छितात.

# दहशतवादी कोण आहेत?

गेल्या काही दशकांच्या कालावधीत संपूर्ण जगात व्यापक प्रमाणात हिंसाचार पाहायला मिळाला, ज्यात अनेकांचा बळी घेतला गेला आणि प्रचंड जनसंपत्तीचा विनाश झाला असे म्हटले जाते की वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन टॉवर्स वरील हल्ले दहशतवाद्यांच्या कारवाया आहेत. ही गेल्या काही काळापूर्वीचीच घटना आहे आणि आम्हाला यात खूप खोलवर जाण्याची गरज नाही. या सर्वांचे अधिकतर श्रेय दहशतवाद्यांना दिले गेले आहे, ज्यांच्याविषयी असे म्हटले गेले की ते जिहाद-भावनेने प्रेरित होते. असेही म्हटले गेले की त्यांचा संबंध त्या भूभागाशी होता, जो पाकिस्तानपासून मध्य-पूर्वपर्यंत पसरला आहे. याने इस्लाम आणि जिहादच्या विचार प्रवाहावर प्रश्न उद्‌भवला आहे, ज्याचे भाष्य व स्पष्टीकरण, काफिरांविरुध्द पवित्र युध्द या स्वरुपात केले जाते.

जगात मुसलमानांच्या लोकसंख्येचे प्रमाण सुमारे २३% आहे. अर्थात एकूण संख्या १७० कोटी. इस्लाम हा शब्द अरबी भाषेच्या सिल्म शब्दापासून बनला आहे, अर्थात शांती-सलामती. त्यानुसार याला शांतीचा धर्म समजले जाते. इस्लामचे विरोधकही हे मान्य करतात. वस्तुत: इस्लामचा अर्थ शांती आहे आणि या धर्मात असे काहीही नाही जे आपल्या अनुयायींना अन्यायपूर्वक हिंसाचार करण्यास प्रेरित करत असावे की ९ सप्टेंबरनंतर येणाऱ्या दशकात इस्लाम आणि मुस्लिम जगत, नॉटो, देशांच्या संघटित हिंसेचे प्रामुख्याने लक्ष्य राहिले आहे. जागतिक शांती आणि संरक्षण प्रस्थापित करण्याच्या दाव्यासोबत अमेरिकन सैन्यांनी अफगाणिस्तान व इराक या दोन मुस्लिम देशांवर आक्रमण केले आणि त्यांना पूर्णपणे नष्ट केले. हिंसाचक्र सातत्याने जारी आहे आणि अद्यापही तिथल्या नागरिकांना शांती स्थैर्य लाभलेले नाही. दहा लाखांपेक्षा अधिक लोकांनी आपला जीव गमविला आणि

५० लाख लोक बेघर झालेत. अशा लोकांविषयी सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुरआनात फर्मावितो :

> ''आणि जेव्हा त्यांना सांगितले जाते की जमिनीवर बिघाड निर्माण करू नका, तेव्हा ते म्हणतात, आम्ही तर केवळ सुधारणा करणारे आहोत. जाणून घ्या! हेच ते लोक होत, जे बिघाड निर्माण करतात, परंतु याची त्यांना जाणीवही नसते.'' (कुरआन- २ : ११,१२)

या वेळी जगात शांती-संरक्षणावर जी चर्चा होत आहे, त्या चर्चेवर सामर्थ्यशाली पाश्चिमात्य शक्तींचे आणि त्यांच्या बलाढ्य मीडियाचे वर्चस्व आहे. संयुक्त राष्ट्र संघासारखे जागतिक संगठनही याच देशांद्वारे नियंत्रित असतात. शांती-संभाषणांच्या माध्यमाने मीडिया आम्हाला जे काही पोहचवितो, त्यावरच आम्हाला विश्वास ठेवावा लागतो. आंतरराष्ट्रीय मीडियात लहानसहान देशांचा आवाज, मग तो कितीही विवेकपूर्ण असो, त्याला स्थान नसते. यास्तव जेव्हा हिंसा आणि अराजकतेकरिता इस्लाम आणि मुसलमानांना दोषारोपांचे लक्ष्य बनविले जाते तर यात नवल वाटण्यासारखे काही नाही. हे देश स्वत: जाणून आहेत की इस्लामी देश आपले रक्षण करण्याची क्षमता बाळगत नाही. पाश्चिमात्य देश या देशांवर आरोप ठेवतात की ते पाश्चिम विरोधी शक्तींना पाश्चिमात्यांवर किंवा जागतिक पातळीवर पाश्चिमात्यांच्या हितांवर हिंसक हल्ला करण्यासाठी चिथावणी देतात. या हिंसक हल्लयांकरिता पाश्चिमात्यांनी दहशतवाद ही संज्ञा मनाने रचली आहे आणि साऱ्या जगाला ही गोष्ट समजाविण्याकरिता लांबलचक लेख आणि पुस्तके प्रकाशित केली आहेत. अधिकांश विकसनशील देशांचे हितसंबंध पाश्चिमात्य देशांशी जुळलेले आहेत आणि ते त्यांच्या आदेशांचे पालन करण्यास अगतिक आहेत आणि ते पर्यायी तथ्यांचा आणि परिभाषांचा सामना करण्यापासून स्वत:चा बचाव करतात. जे देश पाश्चिमात्य देशांच्या आदेशांचे पालन करण्यास मनाई करतात, त्यांना प्रतिबंध लादून दंडित केले जाते. हे सर्व राजनीतीचे विविध पैलू आहेत. आम्हाला दहशतवाद, ज्या दहशतवादाचे आज अस्तित्व असण्याविषयी बोलले जात आहे, त्याच्या

वास्तवतेवर आणि जे कारक घटक या स्त्रोतांना मजबूत करतात त्यांच्यावर संभाषण करण्याची गरज आहे, कारण हे सर्व राजनीतीचे पैलू आहेत.

इस्लामी नियम आकलन आणि पालन करण्याच्या दृष्टीने साधे सरळ आहेत. पुस्तकांद्वारे याच्या बहुतेक तथ्यांना समजावले गेले आहे आणि एक मोठा बुध्दिजीवी वर्ग चांगल्या प्रकारे जाणतो की शतकानुशतके पृथ्वीच्या व्यापक क्षेत्रांमध्ये इस्लामसोबत धार्मिक स्वातंत्र्य अस्तित्वात राहिले आहे आणि त्यांच्याकरिता हीसुध्दा स्पष्ट वस्तुस्थिती आहे की इस्लाम पाश्चिमात्य देशांच्या मनमस्तिष्कात सातत्याने पसरत चालला आहे. वास्तविक हे लोक इस्लामवर आपल्या स्वभाव धर्मानुसार हिंसक होण्याचा आरोप लावत आहेत. खरे तर इस्लामची सर्वसाधारण श्रध्दा आणि उत्कृष्ट आदर्श असा मनुष्य विकसित करण्यात सहाय्यभूत आहे ज्याच्या अंगी विनम्रता, नि:स्वार्थ वृत्ती, स्नेह-सहानुभूती गांभीर्य, धर्म परायणता व ईश-चैतन्य अस्तित्वात असते. अनेक मुस्लिम देश आणि तिथली जनता, दारिद्र्यआणि तंत्रज्ञानाच्या अभावापायी अविकसित असू शकतात परंतु इस्लाम सतत मानवजातीकरिता एक प्रबळ आकर्षण राखतो आणि कसल्याही मिशनरी प्रयत्नाविना लोकप्रवाह इस्लामकडे खेंचला जात आहे.

इस्लामच्या शिकवणी अगदी स्पष्ट आहेत. सर्वश्रेष्ठ अल्लाह पवित्र कुरआनात फर्मावितो, ''न्याय प्रस्थापित करा, कारण ही गोष्ट धर्म परायणतेशी निकट आहे.''

इस्लाम शांती व सलामतीचा धर्म आहे आणि तो मानवजातीत असलेल्या अनिष्ट मतभेदांना संपवू इच्छितो. एखाद्या व्यक्तीच्या अन्यायपूर्ण हत्येला पवित्र कुरआनात संपूर्ण मानवजातीच्या हत्येसमान सांगितले गेले आहे. हा धर्म, इस्लामी राज्यात राहणाऱ्या मुस्लिमेतर नागरिकांचे प्राण, वित्त, स्वातंत्र्य, आदर-सन्मान इत्यादींच्या संरक्षणाची हमी देतो. त्यांच्यासाठी धार्मिक स्वातंत्र्याचीही गॅरंटी दिली गेली आहे. इस्लाम दुसऱ्यांच्या दडपशाहीवर केवळ प्रतिबंध घालत नाही, किंबहुना जे लोक छळवाद आणि अन्यायाला संपविण्यासाठी प्रवृत्त होतात, त्यांच्यासाठी न्याय आणि समानतेच्या सीमादेखील निर्धारित करतो. इस्लाम आपल्या अनुयायींना

आदेश देतो की त्यांनी दडपशाहीविरुध्द लढावे आणि अन्यायाविरुध्द प्रतिकारासाठी उभे राहावे, मात्र असे करीत असताना मर्यादा न ओलांडण्याचाही आदेश देतो. मुसलमानांना न्याय आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा आदेश देते वेळी तो धार्मिक स्वातंत्र्यालाही मान्यता देतो. हा धर्म शक्ती-सामर्थ्याच्या बळावर विकसित केलेल्या पूर्णत: एकाच धर्मावर आधारित समाजाचे स्वप्न पाहत नाही.

इस्लामचा इतिहास अन्याय आणि दडपशाही, छळवादाविरुध्दच्या संघर्षावर आधारित आहे. हा हल्लेखोरासमोर दुसरा गाल पुढे करण्यावर आस्था राखत नाही. याचसोबत हा या गोष्टीसाठी दिशा निर्देशही करतो की छळवाद किंवा दडपशाही करणाऱ्याचा मुकाबला केव्हा आणि कसा करावा? दडपशाही करणाऱ्यांविरुध्द शांतीपूर्ण संघर्ष आणि प्रतिकारासाठी नियम-सिध्दान्तही सांगितले गेले आहेत. युध्दावर प्रतिबंध घातला गेला नाही. वस्तुत: मुस्लिम देशाला अनावश्यक स्वरुपात युध्द सुरु करण्यापासून रोखले गेले आहे. आक्रमण आणि हल्ल्याविरुध्दची प्रतिक्रिया सुनियोजित असली पाहिजे आणि अत्याचाराविरुध्द कठोरपणे प्रतिबंध लावला गेला आहे. स्त्रिया, लहान मुले, वृध्द, रोगी आणि विकलांग व सामान्यत: युध्दात सहभागी नसलेल्यांना हानी न पोहचविण्याचा सक्त आदेश दिला गेला आहे. तसेच शेतातली पीके, पाण्याचे स्त्रोत, वृक्ष आणि वन्य संपत्तीचे रक्षण करण्याचाही आदेश दिला गेला आहे जो जिहाद पाश्चिमात्य प्रचार व प्रसारमाध्यमांकरिता इस्लामला दहशतवादाशी जोडण्याचे एक हत्यार बनले आहे, तो प्रत्येक प्रकारच्या संघर्षासाठी उपयोगात आणली जाणारी संज्ञा आहे. यात आपल्या इच्छा आकांक्षांवर आणि भावनांवर ताबा ठेवण्याचा प्रयत्नही सामील आहे एखादा मनुष्य संकटाच्या उंबरठ्यावर पोहचलेल्या जगाला न्यूक्लियर शस्त्रांपासून मुक्त करण्याची मागणी करू शकतो आणि याला जिहादही म्हटले जाऊ शकते. पाश्चिमात्य देश इस्लामविरुध्द दहशतवादाचा आरोप लावतात. यास्तव याला याच पार्श्वभूमीत पाहण्याची व त्याचे विश्लेषण करण्याची गरज आहे. जे लोक इस्लामला चांगले जाणत नाहीत, त्यांच्यात इस्लामचे भय निर्माण करण्याकरिता दहशतवाद, पूर्वीपासून चालत आलेल्या अनेकविध तंत्रांपैकी एक तंत्र होय.

# दहशतवादाविषयी मीडियाची दुटप्पी भाषा

पाश्चिमात्य इलेक्ट्रॉनिक साम्राज्याने आश्चर्यकारक मजल गाठली आहे. जागतिकीकरणाने या विचारप्रवाहाच्या व्यासपीठावर शक्तीप्रदर्शनासाठी मोठ्या प्रमाणात स्नायू उपलब्ध करून दिले आहेत. याने सॅटॅलाईट व केबल टेक्नॉलॉजीद्वारे त्वरित आंतरराष्ट्रीय संपर्क साधला आहे. पाश्चिमात्य, विशेषत: अँग्लो अमेरिकन मीडियाने जागतिक ऑनलाईन सेवा, रेडियो, वृत्तपत्रे व नियतकालिकांवर वर्चस्व मिळविले आहे. पाश्चिमात्य इलेक्ट्रॉनिक साम्राज्याच्या विस्तारासोबत पाश्चिमात्य मीडियाने सॅटेलाइट आणि केबल टेक्नॉलॉजीद्वारे तत्काळ जागतिक संबंध साध्य केला आहे.

आंतरराष्ट्रीय टेलीविजन बातम्यांचा मोठा भाग पाश्चिमात्य न्यूज एजन्सीजद्वारे प्रसारित केला जातो. यात रॉइटर टेलीविजन, वर्ल्डवाइड टेलीविजन न्यूजसारख्या न्यूज एजन्सीज आणि ए.पी.टी.वी. तसेच सॅटेलाइट आणि केबल आधारित संघटना उदा. सी.एन.एन., स्काय आणि बी.बी.सी. विश्वसेवा या दोन्ही प्रकारच्या सेवा आपल्या विभिन्न भाषांवर आधारित सेवांसह जगाच्या वायु लहरींवर आच्छादित आहेत.

जगातील चार न्यूज एजन्सीज- 'ॲसोसिएटेड प्रेस', 'युनाइटेड प्रेस इंटरनॅशनल', 'रॉयटर्स' आणि 'एजन्सी फ्रान्स प्रेस'पैकी पहिल्या तीन अमेरिकन आणि ब्रिटिश एजन्सीज आहेत आणि त्यांच्यात चारही विश्व समाचाराच्या सुमारे ८०% उपलब्ध करून देतात. विश्वव्यापी कर्मचाऱ्यांचे जाळे पसरवून ठेवल्यावरही या कंपन्या जाणूनबुजून किंवा नकळत पाश्चिमात्य आणि विशेषत: अमेरिकन व ब्रिटिश समाचार अजेंडा बाळगतात.

याव्यतिरिक्त, भारतातील इंग्रजी भाषेचे सर्व मोठमोठी वृत्तपत्रे आणि पत्रिका सिंडीकेट व्यवस्थेचा लाभ उचलून सतत गर्वाने पाश्चिमात्य वृत्तपत्रांच्या

व नियतकालिकांच्या टीका-टिप्पणी, फिचर्स वगैरे छापत असतात. अशा प्रकारे पाश्चिमात्य वृत्तसंघटना पाश्चिमात्यांचे हित ध्यानी घेत आंतरराष्ट्रीय समाचार अजेंडा ठरविण्यात आणि त्यांना आयोजित करण्यात खूप प्रभावकारक असतात. स्थानिक वृत्तपत्रांनाही मोठ्या बातम्या वितरित करणाऱ्यांद्वारे अनुवाद केलेल्या सामग्रीवर विश्वास ठेवावा लागतो आणि अशा प्रकारे ते घरगुती बातम्यांच्या ग्राहकांपर्यंत आपला प्रभाव पसरवितात. असे केवळ भारतातच होत नाही संपूर्ण विकसनशील जगाला अपरिहार्यपणे ते सर्व पाहावे लागत आहे जे वर्चस्वशाली पाश्चिमात्य दाखवू इच्छितात.

अनेक भारतीय वृत्तपत्रे पाश्चिमात्य वाक्‌प्रचार, त्यांची भाषा शैली बातम्या आणि मूल्यांचा अंगीकार करतात आणि त्यांची नक्कल करतात.

इस्लामी दहशतवाद ही संज्ञा पाश्चिमात्य वृत्तपत्रांनी व प्रसारमाध्यमांनी आपल्या मनाने रचली आहे. पाश्चिमात्यांच्या हितांबद्दल काळजीवाहू असल्यामुळे भारतीय मीडियात यांचा निनाद कानी पडतो. वास्तविक केवळ हे सांगणे की इस्लाम, दहशतवादाचा न तर प्रचारक आहे, न त्यास प्रोत्साहन देतो, याची रोखथाम करण्यास पुरेसे नाही. काही दहशतवादी अवश्य इस्लामच्या आवरणाआड आश्रय घेतात आणि अमेरिकेकडे कल राखणाऱ्या मीडियाकरिता एक निमित्त उलब्ध करून देतात, जेणेकरून जिहादला दहशतवादाच्या समानार्थी असल्याचे सांगता यावे.

पॅलेस्टीयन भूभागांवर इस्राईलचा कब्जा आणि इस्राईलद्वारे संयुक्त राष्ट्र संघच्या प्रस्तावांचे सतत उल्लंघन व अमेरिकेद्वारे मध्य-पूर्वेत वीजेच्या स्त्रोतांवर कब्जा मिळविण्याकरिता रक्तपाताचा खेळ, काही गटांना शस्त्र हाती घेण्यास प्रवृत्त करतो. मध्य-पूर्वेत घडणाऱ्या घटनांचे वृत्त लिहिण्यात पाश्चिमात्य समाचारमाध्यम दुहेरी मापदंडाचा अंगीकार करतात. इस्राईलद्वारे पॅलेस्टीयन क्षेत्रांना बळकाविण्याची घटना न पाहिल्यागत केली जाते, तथापि पॅलेस्टीयन मुसलमानांद्वारे या हल्लयाचा विरोध दहशतवाद ठरविला जातो. हे सांगण्याची गरज नाही की विभिन्न जनसमूहांद्वारे केल्या गेलेल्या अपराधांविषयी निर्णय घेण्याकरिता प्रचार व प्रसारमाध्यमांचे धनी वेगळेच मापदंड बाळगतात.

हे सर्व घटक इस्लाम आणि मुसलमानांशी दहशतवाद हा शब्द जोडण्यात विशेष हितांकडे संकेत करतात. दहशतवाद आणि दहशतवाद्यांच्या कारवायांबाबत एवढा जास्त दुहेरी मानक अंगीकारण्यामागे कोणते न कोणते कटकारस्थान नक्की असेल, कारण केवळ मुसलमानांनाच अशा कृत्यांसाठी जबाबदार धरले जाते. मुसलमानांद्वारे दहशतवादाच्या एखाद्या कृत्याचा संबंध इस्लामशी जोडण्याची गरज नाही, ज्या प्रकारे श्रीलंकेच्या हिंदू दहशतवाद्यांच्या कारवायांसाठी हिंदूंना जबाबदार ठरविले जाऊ शकत नाही. परंतु मीडियाचे हे असंतुलित धोरण विकसित पाश्चिमात्य देशांना काही अशा लोकांवर दहशतवादाचा आरोप लावण्याचा अधिकार प्रदान करतो, ज्यांच्याजवळ मीडिया नाही.

सलमान रश्दीने इस्लामला अवमानित करण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्यामुळे मुसलमानांना तीव्र दुःख होते, तथापि पाश्चिमात्य प्रसारमाध्यमांसाठी अभिव्यक्ती-स्वातंत्र्याच्या निमित्ताने रुश्दीचा बचाव करणे आवश्यक ठरते. पाश्चिमात्य देश रुश्दीचा बचाव करतात, परंतु होलोकास्टला नकार दिल्याबद्दल डेविड इर्विनला तुरुंगात पाठवितात. अभिव्यक्तीस्वातंत्र्याची ही कशी विडंबना आहे. संयुक्त राज्य अमेरिकेत इस्राईल आणि त्याच्या नीतीमत्तेवर टीका करणे जवळजवळ अशक्य आहे. अशा प्रकारचे प्रयत्न करणाऱ्या सर्व लोकांविरुध्द साम्यवाद विरोधी कायद्या अंतर्गत खटला चालविला जातो. यावरून एक गोष्ट स्पष्ट आहे की पाश्चिमात्यांनाही काही विश्वासांचे कोणत्याही किंमतीवर रक्षण करणे क्रमप्राप्त ठरते.

# हिंसा, दहशतवाद आणि जातीसंहाराच्या यादीत पाश्चिमात्य सर्वांत पुढे

हे आवश्यक नव्हे की दहशतवादी आपल्या धर्मानुसार चालणारे ख्रिश्चन, ज्यू, बौध्द, हिंदू किंवा मुसलमान असावेत, परंतु आपल्याशी जे तिरस्काराचे तत्त्व बाळगतात, त्याची मूळे, त्यांच्या सांस्कृतिक विकासात आणि ज्या समाजात ते राहतात, त्याद्वारे दिल्या गेलेल्या विचार प्रवाहांमध्ये असतात. मागील शतकांच्या इतिहासात, हिंसा, वंशविच्छेद आणि दहशतवादाच्या प्रसाराच्या ज्या मोठ्या घटना घडल्या, त्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे लाभप्रद ठरेल. वास्तविक त्यांना आणि त्यांच्या धर्माला त्या प्रकारे बदनाम करण्यापासून पथ्य पाळले गेले आहे, ज्या प्रकारे साऱ्या जगात, ज्या दहशतवादी घटना गेल्या काही दिवसात पाहिल्या गेल्या त्यांच्यावर इस्लाम आणि मुसलमानाची मोहर लावली गेली.

याउपरान्त जेव्हापासून ख्रिश्चन क्षेत्रांमध्ये इस्लामचा प्रसार सातव्या शतकापासून झाला, इस्लाम धर्माला चुकीच्या पध्दतीने हिंसा आणि युध्दाचा धर्म दर्शविले गेले. मध्य-पूर्वेत गेल्या दिवसात घडलेला हिंसाचार आणि ११ सप्टेंबरनंतर आणखी जास्त कोलाहल माजवून इस्लामवर दहशतवाद आणि असहनशीलतेचा धर्म असण्याचा आरोप ठेवला जात आहे. काय हे उचित आहे, किंवा या कोड्यातल्या काही महत्त्वपूर्ण कड्या अध्यारुत आहेत.

दहशतवाद आणि या प्रकारच्या इतर प्रवृत्तींवर पाश्चिमात्य देशांचे दुहेरी व दुटप्पी वर्तन आणि दोन तोंडी कथनांची अनेक उदाहरणे सादर केली जाऊ शकतात. प्रसारमाध्यमें लोकांचे लक्ष ज्या दिशेकडे केंद्रित करीत आहेत, त्या पार्श्वभूमीवर खालील तथ्यांवर विचार करा, ज्यापासून अधिकांश लोक अनभिज्ञ आहेत. कारण मीडिया या तथ्यांवर फार कमी विचार करतो. यापैकी

काही उदाहरणे खालीलप्रमाणे-

- ✯ कॅथोलिक चर्चची अध्यक्षता करीत राहणाऱ्या पोपच्या ख्रिश्चनांवरील निरंकुश अधिकाराच्या विरोधात मार्टिन ल्यूथर किंगने आपल्या अलग प्रोटेस्टंट ख्रिश्चन धर्माची स्थापना केली. यानंतर मार्टिन ल्यूथर किंगच्या अनुयायींना क्रूरपणे छळण्याचे लक्ष्य बनविले गेले आणि कॅथोलिक ख्रिश्चनांनी त्यांच्या घरांना आगी लावल्या, त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार केले. परंतु कोणीही कॅथोलिक ख्रिश्चनांवर दहशतवादाचा आरोप ठेवला नाही. काय कोणी त्यांना दहशतवादी म्हटले?
- ✯ जर्मनीचा नाजी हुकूमशहा हिटलर जो संयोगाने ख्रिश्चन होता, त्याने फार मोठ्या प्रमाणावर वंशविच्छेद केला, ज्यात ६ दशलक्ष ज्यू मारले गेले. या गोष्टीशी प्रत्येकजण सहमत असेल की ज्यूविरुध्द तो ख्रिश्चन पूर्वग्रहच होता, जो या कालावधीत वंश-विच्छेदाच्या रुपाने शिखर गाठले. काय कोणी हिटलरला दहशतवादी म्हटले? कदाचितच कोणी असे म्हटले असेल!
- ✯ स्टॅलीन, मुसोलिनी आणि माओ त्से तुंग यांनी लक्षावधी लोकांची हत्या केली, परंतु आजपर्यंत दहशतवादी म्हटले गेले नाही. आता हा प्रश्न विचारला जाऊ शकतो की, का नाही?
- ✯ विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात सर्ब ख्रिश्चनांनी बोस्नियाच्या मुसलमानांची सर्रास हत्या केली, परंतु त्यांनाही ख्रिश्चन दहशतवादाच्या कलंकापासून वाचवले गेले.
- ✯ पश्चिम बंगालच्या पुरुलिया जिल्हयात ब्रिटिश अतिरेकी पीटर ब्लीच आणि डेन्मार्कचा दहशतवादी कित डेवीने बंडखोरांकरिता हत्यारे खाली पाडलीत. भारतीय मीडियाने त्यांना ब्रिटिश किंवा पाश्चिमात्य दहशतवादी म्हणण्यापासून तोंड लपविले. भारत सरकारने पीटर ब्लीचला त्या वेळी कैद मुक्त केले, जेव्हा तो आपल्या शिक्षेचे सातवे वर्ष भोगत होता.
- ✯ अमेरिकन दहशतवादी रेमन्ड डेविस पाकिस्तानी 'तहरीके

तालिबान'साठी भरती करत असताना आढळून आला आणि जेव्हा त्याने दोन पाकिस्तान्यांची हत्या केली तेव्हा त्याला अटक केली गेली. अमेरिकेने त्याच्या सुटकेसाठी मोल भाव केला आणि इस्लामी शरीअतनुसार सुटका करण्यासाठी त्याने रक्ताची किंमत (मोबदला) अदा केली. जर अमेरिकन मीडिया त्याचा अमेरिकन आतंकवादीच्या स्वरुपात प्रचार करील तर प्रत्येकाला आश्चर्याचा धक्का बसेल.

- ✯ अमेरिकेच्या नौसेनेने एका इराणी विमानाला फारसच्या खाडीत खाली पाडले, ज्यात इ. सन १९९० मध्ये २५९ निर्दोष प्रवाशी मारले गेले. याला कोणीही दहशतवादी कृत्य म्हटले नाही. का?
- ✯ अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी यूनियन कार्बाईड (जिला आता डोव जोन्सने आपल्या ताब्यात घेतले आहे) मधून विषारी गॅसच्या गळतीमुळे डिसेंबर इ. सन १९८४ मध्ये भोपाळ शहरात २५०० लोक मारले गेले. अमेरिकन लोकांनी यूनियन कार्बाइडचा प्रमुख अँडरसनला खटला चालविण्याकरिता भारत सरकारच्या ताब्यात देण्यास नकार दिला. याच्या उलट त्यांच्या स्वत:च्या देशात 'लॉकर बी'वर बॉम्ब टाकण्याचा मामला पाहा. त्या मामल्यात पाश्चिमात्य देशात खटला चालवल्या जाण्यावर जोर दिला गेला. हे दुहेरी मापदंड कां?
- ✯ इस्राईल नि:शस्त्र पॅलेस्टीयन लोकांविरुध्द अमानुष अत्याचार करतो आणि त्याने आपल्या देशाच्या एकूण क्षेत्रफळाहून तिप्पट पॅलेस्टीयन जमीन बळकावून घेतली आहे आणि आपल्या देशात एक रंगभेदी भिंत उभारली आहे, जेणेकरून पॅलेस्टीयन लोकांना वेगळे करता यावे आणि त्यांच्या जलस्त्रोतांना हडप करता यावे. असे असतानाही त्याला मध्य-पूर्वेतील एकमेव लोकशाही म्हटले जाते आणि इतर देशांना निरंकुश देश म्हटले जाते. याच्या पंतप्रधानपदी असलेल्या मिनाकम बेगिनला एके काळी ब्रिटिश सरकार दहशतवादी म्हणत असे, परंतु त्याला नोबेल शांती पारितोषिक देऊन सन्मानित केले. आमचे कान अजूनही ज्यू दहशतवादीसारखी संज्ञा ऐकण्याकरिता आसुसले आहेत. न्यायाची ही कशी विडंबना!

- ✯ आयरिश रिपब्लिकन आर्मीच्या बंडखोरांनी असंख्य ब्रिटिश नागरिकांवर बॉम्बवर्षाव केला आणि त्यांची हत्या केली, तथापि त्यांना आय.आर.ए. दहशतवादी म्हटले गेले नाही वस्तुत: हे तथ्य सर्व जाणतात की उत्तर आयरलँड ब्रिटेनपासून विभक्त होऊ इच्छितो कारण ते लोक कॅथोलिक ख्रिश्चन धर्माची श्रध्दा बाळगतात. अद्याप हे माहीत होऊ शकले नाही की त्यांना दहशतवादी का म्हटले गेले नाही?
- ✯ सर्वच मुस्लिम देशांमध्ये एकूण जेवढे लोक मारले गेलेत, किंवा त्यांचे अपहरण केले गेले, त्याहून खूप अधिक मध्य आणि दक्षिण अमेरिकेत मारले गेलेत व अपहरण केले गेलेत. ही आकडेवारी www.nationmaster.com ने प्रस्तुत केली आहे.
- ✯ ज्या देशांमध्ये मुसलमान बहुसंख्यांकआहेत, त्यांच्यात एकंदरीत जेवढ्या हत्या होतात, त्या एकट्या अमेरिकेत होणाऱ्या हत्यांपेक्षा कमी आहेत जिथे लोक क्षुल्लक क्षुल्लक कारणांवरून प्रत्येक रात्री एकमेकांचा जीव घेतात. हे आकडे www.nationmaster.com ने प्रस्तुत केले आहेत.
- ✯ धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून पाहिल्यास अमेरिकेचे लोक, त्या दोन लाख स्त्रिया, लहान मुले आणि पुरुषांच्या मृत्युस जबाबदार नाहीत काय, जे अमेरिकेद्वारे हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकल्या गेलेल्या न्यूक्लिअर बॉम्ब वर्षावात मारले गेलेत? कारण अमेरिकन शासक वारंवार म्हणतात की युध्द सैन्यांच्या दरम्यान झाले पाहिजे आणि निर्दोष नागरिकांना बंदुकीचे टार्गेट बनविले जाऊ नये, तरीही याच उल्लेखनीय प्रकरणात काही लोकांनी हा निर्णय केला की एवढ्या मोठ्या संख्येत लोकांच्या हत्याकांडामुळे जापानच्या लोकांचे मनोबल खचू शकते, परिणामी ते आत्म समर्पण करतील.
- ✯ खात्रीने अधिकांश विवेकशील लोक असे इच्छित नाहीत की त्यांच्या धर्म किंवा जाती-समूहाला एखादी निष्ठा बाळगणाऱ्या गटाच्या कारवायांच्या आधारे पारखले जावे. उदाहरणार्थ, जर्मन देशाच्या लोकांना हिटलरच्या कारवायांनी पारखले जाऊ नये आणि न

हिरोशिमा व नागासाकीवर बॉम्ब वर्षाव करून सहस्त्रावधी निरपराध लोकांच्या हत्येसाठी सर्वसाधारण अमेरिकन लोकांना जबाबदार धरले पाहिजे.

☆ याचप्रमाणे अधिकतर ख्रिश्चन क्रुझेड युध्दांचा रानटीपणा किंवा स्पेनमध्ये चालविल्या गेलेल्या कडक तपासणीने लज्जित आहेत. वस्तुत: हाच तो तर्क होय, ज्याने जगप्रसिध्द महान मुष्टियोध्दा मुहम्मद अलीने प्रयोगात आणला. जेव्हा त्याला एका ख्रिश्चन वार्ताहराने विचारले की हे जाणल्यावर त्याला काय वाटते की ओसामा बिन लादेन त्याच धर्माचा अनुयायी आहे, ज्या धर्माला तो स्वत: मानतो, तेव्हा त्या वार्ताहराला मुहम्मद अलीने उत्तर दिले, ''तुम्हाला कसे वाटते जेव्हा तुम्हाला हिटलरबद्दल सांगितले जावे, कारण तो तर तुमच्याच धर्माशी संबंधित होता.''

अनेक धर्म आणि संस्कृतींची ही धारणा आहे की, ''जे लोक काचेच्या घरात राहतात, त्यांनी दुसऱ्यांच्या घरांवर दगड फेकू नये.'' तेव्हा आता आपण स्वत:विषयी विचार करा, तुम्ही मुसलमानांवर दगड फेक करीत आहात, परंतु तुम्ही आपल्या स्वत:च्या घराच्या अवस्थेकडे डोळेझाक करीत आहात.

आता पाश्चिमात्य स्त्रोतांपासून येणाऱ्या तथ्यांच्या प्रकाशात आंतर राष्ट्रीय दहशतवादाच्या रुपरेषेवर दृष्टिक्षेप टाकू या आणि हा निर्णय करण्याचा प्रयत्न करू या की मुसलमानांचे किंवा इस्लामी जगाचे यात स्थान कोठे आहे? अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटच्या वार्षिक अहवाल 'पॅटर्न ऑफ ग्लोबल टेरॅरिझम १९९७'नुसार इ. सन १९९२ ते १९९७ च्या दरम्यान दहशतवादाच्या ज्या घटनांचा रिपोर्ट मिळाला त्यात सर्वाधिक दहशतवादी घटना यूरोप (८३१) मध्ये घडल्या. त्यानंतर लॅटिन अमेरिका (६०२) नंतर मध्यपूर्व तिसऱ्या क्रमांकावर आहे, जिथे ४१२ घटना घडल्या. त्याच कालावधीत यूरोपच्या घटनांमध्ये मृत पावलेल्यांची संख्या ७६२१ होती आणि मध्य-पूर्वेच्या घटनांमध्ये मरणाऱ्यांची संख्या २६९२ होती. ही आकडेवारी या निष्कर्षाचे महत्त्व कमी करीत नाही की दहशतवाद एक आंतर राष्ट्रीय समस्या आहे आणि तिचा संबंध पूर्णत: एकट्या मुसलमानांशी आणि

मुस्लिम बहुल मध्यपूर्वेशी नाही ही आकडेवारी एडमन्ड के राल्फ बेबन्टीने प्रस्तुत केली आहे.

वॉशिंग्टन येथे असलेल्या 'वाल्श स्कूल ऑफ इन्टरनॅशनल अफेयर्स'ने खालील संक्षिप्त टीका केली :

"'ओम शिनरिक्यो' नामक एका बौध्दाद्वारे विषारी गॅसचा वापर, एका अमेरिकन ख्रिश्चनद्वारे ओकला होमावर बॉंब वर्षाव उत्तर आयरलॅंडच्या कॅथोलिक ख्रिश्चनांद्वारे दिर्घ काळापासून जारी असलेला दहशतवाद, भारतातील काही हिंदूंच्याद्वारे केला गेलेला हिंसाचार (बाबरी मस्जिद विध्वंस आणि त्यानंतरचा रक्तपाती संघर्ष) आणि बौध्दांद्वारे मुसलमानांचा वंशविच्छेद, बोस्निया आणि कोसोवोमध्ये रुढिवादी सर्ब ख्रिश्चनांद्वारे वांशिक हिंसाचार, लॅटिन अमेरिकेत मादक पदार्थांशी संबंधित कॅथॉलीक जमावाने केलेला हिंसाचार आणि श्रीलंकेत हिंदू तमिळांद्वारे श्रीलंकेच्या बौध्द सिंहली सरकारविरुध्द दहशतवादाच्या आंतरराष्ट्रीय दृश्य घटनेला आणि तिच्या उगमाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेला दर्शवितो.''

जर आम्ही फेडरल ब्युरो ऑफ इन्वेस्टिगेशनच्या अहवालातील आकड्यांनुसार अमेरिकेत घडणाऱ्या घटनांवर आधारित दृष्टिक्षेप टाकला तर सत्य सामोरे येईल. (एफ.बी.आय. गव्ह.)

१. SHêayeer Deelèe Ûèe Heeèeueeslegeej pUeme Fbi.go वर पाहिले जाऊ शकते, केवळ ६% दहशतवादी मुसलमान आहेत. अमेरिका शासित प्रदेशावर दहशतवादी हल्ल्यांच्या उरलेल्या टक्केवारीत लॅटिन अमेरिकन ४२% डावे जहालमतवादी गट २४% ज्यू अतिरेकी ७% साम्यवादी ५% आणि इतर दहशतवादी संघटना १६% सामील आहेत.

२. जर फक्त ६% दहशतवादी मुसलमान आहेत तर मीडिया केवळ इस्लामी अतिरेक्यांच्याच बातम्या का छापतो? हे लक्षात येत नाही. ज्याप्रकारे याचे चित्रण केले जाते ते पूर्णत: धोका आणि भ्रामक स्वरुपाचे आहे. (याचा अर्थ हा नव्हे की हे ६% प्रमाण सन्मान करण्यायोग्य आहे. हे शेकडा प्रमाणही खेदजनक आहे)

३. जर आम्ही यूरोपच्या दहशतवादाच्या तथ्यांचे विश्लेषण केले तर टाइम्स ऑफ इंडिया, २९/०७/२०११ च्या रिपोर्टनुसार ''यूरोपमध्ये अधिकतर दहशतवादी हल्लयांच्या मागे इस्लामवादी नव्हे तर फुटीरवादी आहेत.''

४. गोरा दहशतवाद : तिरस्काराची संस्कृती, संपादकीय डेक्कन हेराल्ड : http//www.deccanherald.com/content/2699972/culture-hate.html

पूर्वी सैन्यात असलेल्या एका अमेरिकन इसमाद्वारे विस्कानसिन येथील गुरुद्वाऱ्यात ६ शिखांची हत्या, ज्याविषयी म्हटले गेले आहे की त्याचा संबंध गोऱ्या सर्वोच्चवादी गटाशी होता. ही बातमी स्पष्ट दर्शविते की संयुक्त राज्य अमेरिकेत वंशवाद आणि असहनशीलतेने मोठे गंभीर आव्हान उभे केले आहे.

अमेरिकेच्या शीख समुदायावर दहशतवादी हल्ले गोऱ्या आतंकवादाकडून एकदा पुन्हा आमचे लक्ष वेधून घेतात. या संदर्भात हजारो अमेरिकन लोकांना अटक करून केवळ एवढ्यासाठी चौकशी केली गेली की काय ते मुसलमान आहेत आणि दाढी ठेवतात.

दहशतवादाच्या या ठराविक व चाकोरीबध्द प्रतिमेने अमेरिकेला आपल्या घरात असलेल्या शत्रूंपासून अनभिज्ञ राखले आहे. तथापि अमेरिकन अधिकारी इस्लामी दहशतवाद्यांवर आपले ध्यान केंद्रित करतात ते ख्रिश्चनांच्या आणि गोरा सर्वोच्च वादाच्या समर्थकांना पसरण्याची व दहशतवादी संघटनांच्या विस्ताराची वाट मोकळी करून देत आहेत. इ. सन २००९पासून उजव्या जहालमतवादी गटांची संख्या अमेरिकेत १४९ पेक्षा वाढून ८२४ झाली आहे.

अमेरिकन मीडिया मान्य करतो की या घृणास्पद अपराधामागे गोरा सर्वोच्चतावाद आहे.

शस्त्रास्त्रांची संस्कृती आणि दहशतवाद इस्राईलसाठी सातत्याने अमेरिकन समर्थनाचा सरळ परिणाम आहे आणि हा परिणाम अरब क्षेत्रांवर

आणि जेरुसलेमवर अधिकार व अमेरिकेद्वारे इस्त्राईली राज्यांना भरपूर आर्थिक मदत देणे होय. बहुतेक लोक आणि बुध्दिजीवी आता याकडे लक्ष देत आहेत. खालील गोष्टी ध्यान देण्यायोग्य आहेत.

- ✯ इस्त्राईलने बळकाविलेल्या क्षेत्रांवर अधिकार सोडण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाद्वारे मांडलेल्या प्रस्तावांना कधीही लागू केले गेले नाही. परंतु अमेरिकन सैन्य इराकद्वारे कुवैतवर अधिकार सोडविण्यासाठी मध्य-पूर्वेत उतरले.
- ✯ बर्लिनची भिंत कोसळल्यावर अमेरिका आनंद साजरा करतो, परंतु जेव्हा इस्त्राईल पॅलेस्टीयन लोकांना आपल्या सिंचन केलेल्या जमिनी, विहिरी आणि ज्यू वसाहतींपासून दूर करण्यासाठी ३७० किलोमीटर लांब भींत उभी करतो, तेव्हा हे करण्यासाठी अमेरिका त्याला फंड देतो.
- ✯ बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मालकीच्या मीडियाद्वारे इराक देशात भयंकर विनाश माजविणाऱ्या हत्यारांच्या अस्तित्वाची खोटी बातमी छापली जाते आणि तेल संपत्तीने समृध्द असलेल्या इराकवर ताबा मिळविण्याकरिता बहुराष्ट्रीय सैन्यांना एकजूट करण्याच्या उद्देशाने त्याच्यापासून धोका असल्याचा प्रचार केला जातो हा दुष्प्रचार संयुक्त राष्ट्र संघ आणि जागतिक दृष्टिकोनाविरुध्द केला जातो.
- ✯ जेव्हा इस्त्राईल आण्विक शक्ती (न्यूक्लिअर पॉवर) विकसित करतो तेव्हा त्याच्याकडे डोळेझाक केली जाते परंतु इराकच्या आण्विक संस्थानावर बॉम्ब टाकण्याची परवानगी इस्त्राईलला देऊन टाकली आहे. इराणविरुध्द धमक्या देण्याचे सत्र जारी केले जात आहे. इराणला अमेरिकेच्या संरक्षणाच्या दृष्टीने एक धोका म्हणून प्रस्तुत केले जात आहे, वस्तुत: अमेरिका एकमेव असा देश आहे, ज्याने आजतागायत जापानमध्ये मानववस्तीवर परमाणु बाँब टाकला आहे.
- ✯ अमेरिकन 'थिंक टँक'द्वारे इस्लाम धर्माला जागतिक संरक्षणास्तव धोक्याच्या स्वरुपात सादर केले जात आहे. कारण हे सांगितले जाते की अधिकतर मुस्लिम देश प्रजासत्ताक नाहीत. तिथे मानवाधिकारांचे रक्षण

> कमी आहे आणि राज्यकर्ते दडपशाही करणारे आहेत. 'इस्लाम विरुध्द पश्चिम' या विषयावर परिसंवाद आयोजित होत आहेत. परंतु अमेरिकेचे लोक चीनशी व्यापार करण्यात संकोच करीत नाहीत आणि चीन आणि पश्चिम यांच्या दरम्यान संवादाची गरजही त्यांना जाणवत नाही.

जेव्हा लोकांचे हक्क हिरावून घेतले जातील आणि त्यांचा छळ केला जाईल तेव्हा स्वाभाविकत: ते आपल्या रक्षणासाठी प्रतिकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतील. स्वातंत्र्यसंग्राम राष्ट्रवादाच्या भावनेने प्रेरित असतात आणि राष्ट्रवादाची भावनादेखील पश्चिमेचाच पायंडा आहे.

शेवटी आम्हा सर्वांना एका नवीन विश्वव्यवस्थेबाबत विचार केला पाहिजे, जो आम्हाला कबरीसाठी जमिनीचा तुकडा नव्हे तर न्यायासह शांती सुबत्ता प्रदान करू शकेल.

तमिळ फुटीरवाद्यांनी श्रीलंकेच्या पूर्वोत्तर क्षेत्रांमध्ये सुमारे तीन दशके आपले बंड जारी राखले. या सशस्त्र लोकांना तामिळनाडुमध्ये प्रशिक्षण दिले गेले. त्यांनी मीनाबक्कम विमानतळावर बॉम्ब टाकला आणि एका आत्मघाती हल्लेखोराने पूर्व पंतप्रधान राजीव गांधींची हत्या केली, परंतु त्यांना कधीही तमिळ दहशतवादी म्हटले गेले नाही. ही न नाकारण्यायोग्य वस्तुस्थिती आहे की श्रीलंकेचे सर्व तमिळ हिंदू आहेत, वस्तुत: ते फक्त सांस्कृतिक स्वरुपातच हिंदू आहेत.

उल्फाने पूर्वोत्तर क्षेत्रात इ. सन १९९० आणि २००६ च्या दरम्यान ७४९ दहशतवादी कारवाया केल्या, परंतु त्यांना कधीही दहशतवादी संघटना म्हटले गेले नाही.

उपरोक्त यादी प्रस्तुत करण्याचा हेतु हा नव्हे की विभिन्न धर्मांचा संबंध दहशतवादाशी जोडला जावा, किंबहुना ही साक्ष प्रस्तुत करण्यासाठी हे विवरण दिले गेले आहे की, जेव्हा काही घडते तेव्हा त्याचा संबंध सरळ मुसलमानांशी व त्यांच्या धर्माशी जोडला जातो आणि इतरांच्याबाबतीत ही भूमिका घेतली जात नाही, मग धर्म त्यांच्या संघर्षाचा भाग राहिला असला तरी, जो धार्मिक, सांस्कृतिक ओळखीवर आधारित असावा. स्पष्टत: वर

दिलेल्या अनेक उदाहरणांमध्ये अत्याचारासाठी धर्माचा आधार घेतला गेला. ज्या लोकांनी शस्त्र हाती घेतले आणि ज्या लोकांना हिंसेचे लक्ष्य ठरविले गेले. ते खात्रीने असे लोक होते, ज्यांना हे जाणवत होते की त्यांच्या ओळखीला उपयुक्त मान्यतेपासून वंचित केले जात आहे, किंवा त्यांची ओळखच त्यांच्या वरील अन्यायाचे मूळ कारण आहे.

मोठा प्रश्न ज्याला ठळकपणे नमूद करण्याची गरज आहे, तो हा की, काय पश्चिम, दहशतवादाविरुध्द लढाईच्या पडद्या-आड लपून इस्लाम धर्माची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करीत नाही? काय पाश्चिमात्य शासक, मुस्लिम देशांवर हल्ले चढविण्यासाठी, त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी आणि त्या जागी आपल्या पसंतीचे शासन प्रस्थापित करण्यासाठी, त्यांच्या नैसर्गिक साधनांचे शोषण करण्यासाठी, त्यांच्यावर आपल्या उपभोग्य वस्तू लादण्यासाठी आणि आपल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना नवनिर्मितीचे मोठमोठे ठेके मिळवून देण्यासाठी कट-कारस्थानाच्या स्वरुपात याचा वापर करीत नाही?

# इस्लाम धर्मात आत्मघाती बॉम्बहल्ले प्रतिबंधित आहेत.

संशोधन अध्ययन, आत्मघाती हल्लयांना परकीयांद्वारे अन्य देशांच्या जमिनीवर कब्जा करण्याच्या कारवायांशी जोडतात.

या! सर्वप्रथम आम्ही आत्मघाती हल्ला म्हणजे काय याचा खुलासा सविस्तरपणे करतो :

एखाद्या बॉम्बस्फोटाला आत्मघाती बॉम्ब हल्ला त्याच वेळी म्हटले जाईल, जेव्हा एखादा मनुष्य एखादे विस्फोटक एखाद्या ठिकाणी पोहचवितो विस्फोट घडवून आणतो आणि त्या विस्फोटातच मुद्दाम बळी पडतो. या रणनीतीचा वापर आजच्या काळात विभिन्न गटांद्वारे अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराक, चेचेनिया, व सोमालिया इ. देशांमध्ये केला जात आहे.

दुर्दैवाने ही रणनीती केवळ लष्करी ठिकाणांवर हल्ले करण्याकरिताच नाही, तर नागरी ठिकाणांवर हल्ले करण्याकरिताही वापरली जात आहे.

आमच्यापैकी बहुतेक जण हे मान्य करू लागले आहेत की मुस्लिम लढवय्यांद्वारे विदेशी हल्लेखोरांचा मुकाबला करण्यासाठी हे सर्वांत अधिक प्रभावी साधन आहे. ते श्रीलंकेत तमिळ टायगर्स (ज्यांचा संबंध संयोगाने हिंदू समुदायाशी होता, वास्तविक त्यांचे धर्माशी काही देणे-घेणे नव्हते) होते, ज्यांनी सर्वांत प्रथम आत्मघाती बॉम्ब हल्लयाचा नियमित प्रयोग १९८० च्या दशकात सुरु केला आणि त्या काळात आत्मघाती कारवायांचे प्रमाण सर्वांत जास्त होते. त्यानंतर नाटकीय पध्दतीने मध्य-पूर्वेत इराक आणि अफगाणिस्तानात अमेरिकी हल्ल्यांमुळे आत्मघाती बॉम्बहल्ले वाढत गेले

अमेरिकन राज्यशास्त्राचे तज्ञ रॉबर्ट पेप, ज्यांचा व्यापक स्वरुपात

सन्मान केला जातो, त्यांनी या विषयावर सर्वाधिक स्पष्ट पुस्तक लिहिले आहे, ज्याचे नाव आहे 'डाइंग टू विन' आणि त्यांनी आत्मघाती दहशतवादाचा प्रोजेक्ट शिकागोत सादर केला. या संदर्भात त्यांचा दृष्टिकोन खालीलप्रमाणे-

> ''संपूर्ण जगात आत्मघाती आतंकवाद वाढत चालला आहे तथापि ही गोष्ट स्पष्ट नाही की, का? कारण असे अनेक हल्ले, ज्यात, ११ सप्टेंबर २००१ चा हल्लाही सामील आहे, हा हल्ला मुस्लिम दहशतवाद्यांनी केला होता, ज्याच्या पाठीशी धार्मिक हेतु होते यावरून हे स्पष्ट वाटते की इस्लामी मूलतत्त्ववाद याचे मूळ कारण आहे. या संकल्पनेने ही धारणा वाढविली की भविष्यात ९/११ सारख्या घटनांपासून मुस्लिम समाजांची पूर्णपणे सुधारणा करून, सुरक्षित राहिले जाऊ शकते आणि इराकमध्ये अमेरिकेद्वारे हल्ल्याला गेल्या दिवसांत मोठ्या प्रमाणावर जनसमर्थन लाभण्याचे हेच कारण होते.''

वास्तविक, आत्मघाती दहशतवाद आणि इस्लामी मूलतत्त्ववादाच्या दरम्यान संबंधांची संकल्पना भ्रामक आहे आणि ही आंतरदेशीय व विदेशी नीतींना प्रभावित करणारी असू शकते आणि याच्यामुळे अमेरिकेची अवस्था खराब होऊ शकते आणि अशाने अनावश्यकरीत्या अनेक मुसलमानांना हानी पोहचू शकते.

प्रा. पेप यांनी इ. सन १९८० ते २००३ पर्यंत जगभरात होणाऱ्या ३१५ आत्मघाती हल्लयांपैकी प्रत्येकाचे आकडे तयार केले आहेत यात तो प्रत्येक हल्ला सामील आहे, ज्यात कमीतकमी एक दहशतवादीने इतरांना मारण्याच्या प्रक्रियेत स्वत:ची हत्या केली. यात त्या हल्लयांचा समावेश नाही जे राष्ट्रीय सरकारतर्फे अधिकृत होते. उदा. कोरियाद्वारे दक्षिण कोरियाविरुध्द हल्ला हे आकडे संपूर्ण जगात होणाऱ्या आत्मघाती दहशतवादी हल्ल्यांविषयीची संपूर्ण माहिती आहे, जी इंग्रजीत असलेल्या माहितीखेरीज इतर भाषा उदा. अरबी, इब्रानी, रशियन आणि तमिळ भाषांमध्ये छापलेली किंवा ऑन लाईन एकत्रित केली गेली आहे. हे आकडे असे दर्शवितात की

आत्मघाती दहशतवाद आणि इस्लामी कट्टरवाद, जगातील अन्य एखाद्या धर्माच्या तुलनेत फार कमी आहे. वस्तुतः आत्मघाती हल्लयांचे मुख्य प्रेरक श्रीलंकेतील तमिल टायगर्स, मार्क्सवादी, लेनिनवादी गट होते, ज्यांच्या कुटुंबांचा संबंध हिंदू धर्माशी होता. तथापि ते दृढपणे धर्माचा विरोध करीत असत.

इ. सन २००७ मध्ये, ज्या काळात सर्वाधिक आत्मघाती हल्ले झाले अमेरिकन सरकारच्या आकडेवारीनुसार ही संख्या ६५८ होती, ज्यात ५४२ हल्ले अमेरिकेच्या ताब्यात असलेल्या अफगाणिस्तान व इराकमध्ये झाले. ही संख्या मागील २५ वर्षांच्या काळात होणाऱ्या कोणत्याही वर्षात आत्मघाती हल्लयांच्या संख्येच्या दुप्पट होती. याव्यतिरिक्त गेल्या सात वर्षांच्या कालावधीत जे आत्मघाती हल्ले झाले ते एकूण आत्मघाती हल्लयांचा ४/५ भाग आहे आणि हे हल्ले साऱ्या जगात पसरत चालले आहेत. वाशिंग्टन पोस्ट लिहितो,

> ''इ. सन १९८३पासून ५० हून अधिक समूहात बॉम्ब वर्षाव करणाऱ्या अर्जेन्टिनाने अल्जेरिया ते क्रोशियापासून चीनपर्यंत आणि भारतापासून इंडोनेशियापर्यंत ट्रक बॉम्ब, कार बॉम्बपासून विस्फोटक बेल्ट आंतर्वस्त्र, खेळणी, मोटर सायकली, नौका, बॅकपॅक आणि खोटा गर्भ असणारे पोट बनविण्याची पध्दत अंगीकारली आहे................ गेल्या एक चतुर्थांश शतकात एकूण १८४० घटनांपैकी ८६% हून अधिक इ. सन २००७मध्ये घडल्या आहेत आणि वार्षिक घटनांची संख्या गेल्या चार वर्षांच्या कालावधीत सर्वांत जास्त राहिली आहे.''

विदेशी सैन्यांद्वारे ताब्यात घेतलेल्या क्षेत्रांमध्ये जी परिस्थिती निर्माण होते, तिच्यामुळे जास्तीतजास्त नवयुवक उग्र होतात. पाश्चिमात्य सैन्यांच्या हातून फार मोठ्या संख्येत नागरिकांची हत्या, अपमान आणि पराभवाची भावना, सूड घेण्याची तीव्र इच्छा आणि प्रसंगी आपल्या कुटुंबियांच्या हत्येपायी जन्म घेते. हे सर्व फार ठोस आणि व्यावहारिक मामले आहेत ज्यांचा

संबंध इस्लामी धर्मशास्त्राशी कदापि नाही. या संदर्भात पेपची टीका मार्गदर्शक आहे. ते लोक असा निष्कर्ष काढतात,

> ''जवळपास सर्व आत्मघाती दहशतवादी हल्ल्यांमध्ये एक गोष्टसमान आहे की त्यांचे एक विशिष्ट ऐहिक आणि युध्दनीतीविषयक 'लक्ष्य' असते. त्यांचा हेतु त्या क्षेत्रातून आधुनिक लोकशाहीला अपली सैन्ये हटविण्यासाठी भाग पाडणे हा असतो, ज्याला दहशतवादी आपली मातृभूमी समजतात. मूळ कारण धर्म फार कमी असते. जरी याला नेहमी दहशतवादी संघटनांद्वारे लोकांना भरती करू घेण्याकरिता आणि अधिक व्यापक रणनीतीविषयक ध्येय-उद्दिष्टे प्राप्त करण्याच्या प्रयत्नात, इतर साधनांव्यतिरिक्त याचाही एका औजाराच्या स्वरुपात वापर केला जातो.''

जर एखादा भयानक अनुभव आपल्या डोळ्यांनी पाहणे शक्य नसते तेव्हा तो ते दृश्य टेलीविजनवर पाहतो. एखाद्या जहालमतवादाने प्रेरित झालेल्या माणसाकडून ही अपेक्षा केली जाऊ शकत नाही की तो हत्यार उचलण्यापासून अशासाठी मागे सरेल की त्याने हा उपदेश ऐकला आहे की इस्लाम आत्मघाती हल्ले किंवा नागरिकांची हत्या करण्याची अनुमती देत नाही. एखादा मनुष्य सूड घेण्यास एवढ्यासाठी प्रवृत्त होतो की एकतर वास्तविकपणे किंवा काल्पनिक स्वरुपात त्याने आपले कुटुंब, आपला समुदाय अथवा आपल्या धर्मावर हल्ला होताना पाहिले आहे आणि तो आपल्या शत्रूचा जीव घेण्याचा प्रयत्न करील. तो अशा धार्मिक दृष्टिकोनांचा शोध घेईल. त्याला असा एखादा दृष्टिकोन लाभावा, ज्याद्वारे त्याला आपला घातक क्रोध योग्य ठरविता यावा. माणूस प्रथम क्रोधावेशात येतो, त्यानंतर तो त्यासाठी विचार करून धार्मिकरीत्या उचित ठरविण्याचे प्रमाण प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करतो आणि तो आधीपासून ठरविलेल्या उद्दिष्टासाठी नैतिक समर्थन मिळविण्याचा प्रयत्न करतो.

कधी कधी असे जाणवते की हे जे दहशतवादी असल्या कारवायांमध्ये स्वत:ला गुंतवून आपण मुसलमान असल्याचा दावा करतात

तेव्हा अशा परिस्थितीत मुसलमानांना अन्य एखाद्या वैऱ्याची गरजच नाही, कारण हे घटक संपूर्ण मुस्लिम समुदायाला शक्य त्या प्रत्येक पध्दतीने अशा प्रकारे एका चाकोरीबध्द कल्पनेच्या कठड्यात उभे करीत आहेत की मुसलमानांची डागाळलेली प्रतिमा बनविण्यात, या अजाण अविवेकी घटकांच्या दुष्कृत्यांहून जास्त कामगिरी कोणीही पार पाडू शकत नाही. एखादा मनुष्य असा मूर्खपणाचा मार्ग का पत्करतो? काय ही धर्माची शिकवण असते की या दहशतवाद्यांच्या माता-पित्याची की या दहशतवाद्यांना तयार करण्याची अन्य एखादी प्रक्रिया आहे? जेव्हा एखादा मनुष्य दहशतीचा आणि निरपराध लोकांची हत्या करण्याचा मार्ग पत्करतो, तर यांची अनेक कारणे असतात. जेव्हा मुंबईच्या गल्ली-बोळात मुस्लिमविरोधी हत्याकांड (असहाय लोकांची सुनियोजित हत्या) घडते तर एखादा मनुष्य अशा तरुणांना निश्चित भेटेल जे प्रतिक्रियावादी हिंसेच्या माध्यमान्वये सूड घेण्याची इच्छा व्यक्त करतील. गुजरातमध्ये घडलेल्या मुस्लिमविरोधी वंशविच्छेदानंतर अनेक मुस्लिम समाजशास्त्र तज्ज्ञांनी हे भविष्य कथन केले होते लोकांच्या या सुनियोजित हत्याकांडानंतर दहशतवाद खात्रीने वाढेल. एवढ्या विशाल जनसमुदायात मुसलमानांचा एक समूह असाही असू शकतो जो नाजुक स्थितीप्रत पोहचावा आणि अविवेकाच्या मार्गांनी सूड घेण्याचा पर्याय त्याने अंगीकारावा आणि दहशतवाद त्यांच्यापैकीच एक पर्याय आहे. क्रोध आणि आघातासह, ही जाणीव बाळगून की अपराध्याला शिक्षा होणार नाही, लोक एकत्र होऊन दहशतवादाच्या मार्गावर चालतात.

दयनीय स्वरुपात हे भय काल्पनिक ठरले. गुजरातमध्ये किंवा भारतात अन्यत्र कोठेही असे घडले नाही. मुस्लिम संघटनांद्वारे अनेक संमेलने घेतली गेलीत, ज्यात अत्याचारपीडित लोकांना म्हटले गेले की या अत्याचारांविरुध्द न्याय मिळविण्याकरिता त्यांनी कायद्याचा मार्ग अंगीकारावा. धार्मिक विद्वानांनी (उलेमांनी) अशा एखाद्याचा प्रतिक्रियेविरुध्द आपले विचार मांडले, जे सूड घेण्याचे आवाहन करीत असावेत किंवा निरपराध लोकांना टार्गेट बनविण्याचे आवाहन करीत असावेत. मोठ्या मुस्लिम विद्वानांपैकी काहींनी घोषणा केली की आत्मघाती हल्ले हराम (अवैध)

आहेत. मिस्र (इजिप्त) आणि सऊदी अरबच्या मोठमोठ्या विद्वानांनीही अशाच घोषणा केल्यात. सर्वच धार्मिक विद्वानांचे याबाबत एकमत आहे की अशा प्रकारची पावले उचलणे अपराध आहे आणि हे इस्लामी शिकवणींशी सुसंगत नाही.

काही पथभ्रष्ट मुसलमानांनी इतके अजाण असता कामा नये की त्यांना इस्लामच्या युध्दविषयक नियमांचे ज्ञान नसावे. तुम्ही हा विचार करू शकत नाही की एखादी वस्तू किंवा गोष्ट हराम असावी ती अचानक हलाल ठरावी, हा इस्लाम नव्हे. आत्महत्या केवळ पैगंबर मुहम्मद (स.) यांनीच हराम ठरविली नाही, किंबहुना ती सर्वशक्तिमान अल्लाहनेदेखील हराम ठरविली आहे. आवश्यक ज्ञान, जाणकार विद्वानांकडून प्राप्त करा, कमी ज्ञान बाळगणाऱ्या मुसलमानांकडून माहिती मिळवू नका अथवा अशा लोकांकडूनदेखील नाही ज्यांना मुळात ज्ञानच नाही आणि जे आपले नियम स्वत:च बनवितात. अशा प्रकारचे अनेक हल्ले राजकीय हेतुंपोटीच केले जातात, त्या हेतुंमागे धर्म नसतो. तथापि एखाद्याला असे मूर्ख बनविले जाऊ नये की तुम्ही असे कृत्य कराल तर शहीदचा दर्जा प्राप्त कराल. हा मोठा गुन्हा आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह पवित्र कुरआनात फर्मावितो :

> ''आणि स्वत: आपली हत्या करू नका. नि:संशय अल्लाह तुमच्यावर मोठा मेहरबान आहे.'' (कुरआन- ४ : २९)
>
> ''आपल्याच हातांनी स्वत:ला विनाशात टाकू नका. नि:संशय अल्लाह उत्तममोत्तम कार्य करणाऱ्यांना पसंत करतो.'' (कुरआन- २ : १९५)

आत्महत्येविषयी एका हदीस-वचनात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले-

> ''तुमच्यापूर्वी जे जनसमूह होऊन गेलेत, त्यांच्यापैकी एका जनसमूहात एक मनुष्य होता, त्याला घाव लागला आणि त्या घावाच्या वेदनेने तो आपला संयम हरवून बसला. त्याने एक चाकू घेतला आणि त्या चाकूने आपला हात कापला,

> त्यातून रक्त वाहत गेले आणि तो मरण पावला. अल्लाहने फर्माविले, ''माझा दास स्वत:वर मृत्यु आणण्यात घाई करतो यास्तव मी त्याच्यासाठी जन्नतला हराम केले आहे.''
>
> (हदीस- सहीह बुखारी : ४.५.६६९)
>
> ''जो कोणी जाणूनबुजून स्वत: आपली हत्या करतो तर निश्चितपणे जहन्नमच्या आगीद्वारा त्याला शिक्षा दिली जाईल, ज्यात तो सदैवकाळ राहील.''
>
> (हदीस- सहीह बुखारी : ५.७७.८७)

पवित्र कुरआनातील आयती आणि या हदीस वचनांद्वारे हे स्पष्ट होते की आत्महत्या करणे हराम (शरीअतदृष्ट्या अवैध) आहे. हदीस वचन तर हेही म्हणते की अल्लाहने अशा व्यक्तीवर जन्नतमध्ये प्रवेश हराम केला आहे.

# भविष्यवाणी

सुमारे १५०० वर्षांपूर्वी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दहशतवादाच्या संदर्भात भाकित केले होते. पैगंबर म्हणाले होते,

> ''कयामत जवळ आली असताना अगणित हत्या सर्वसामान्य होतील, ज्यात हत्या करणारा आपल्या शिकारीस जाणणार नाही आणि अत्याचारास बळी पडलेला हे जाणणार नाही की त्याची हत्या कोणी केली व कशासाठी केली?''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दु:खदायक परिस्थितीचे भविष्य कथन केले होते, जिचा सामना आज आम्हाला करावा लागत आहे, ज्यात सहस्त्रावधी निरपराध लोक दहशतवादी हल्ले आणि शत्रू देशांच्या सैनिक छाप्यांमध्ये मारले जात आहेत आणि विभिन्न देशांविरुध्द आर्थिक नाकेबंदी तसेच अन्य अडथळयांद्वारेही आणि विभिन्न देशांमध्ये पोलिस व सैनिक आपल्याच नागरिकांचा जीव घेत आहेत.

निरपराध व निर्दोष लोक मारले जात आहेत, त्यांना माहीत नाही की त्यांना कोणी व कशासाठी मारले? तसेच मारेकऱ्यांना माहीत नाही की ते कोणाची हत्या करीत आहेत. लोक अशा रीतीने मारले जात आहेत, ज्यांच्यात त्यांचे मारेकऱ्यांशी कसलेही शत्रुत्व नाही.

# इस्लामी रुढीवाद

रुढीवाद विसाव्या शतकातील एक रोग आहे. या आजाराने जवळपास सर्वच मोठ्या धार्मिक परंपरा- हिंदू, ज्यू, ख्रिश्चन आणि मुसलमानांना लागली आहे, मग ती कितीही पुरातन असो. रुढीवाद धर्मापासून विवेकाला हिरावून घेतो आणि आस्थेपासून सहानुभूतीला हिरावून घेतो. याची मुख्य लक्षणे पुनरुज्जीवन, अल्पसंख्यांकाविरुध्द वैरभाव, बुध्दिवादाचा विरोध, असहनशीलता, अहंकार, संकुचित मनोवृत्ती बौध्दिक दिवाळखोरी आणि नैतिक आंधळेपणा इ. आहेत. हा रोग बौध्दिक चर्चा-संवाद, अनेकतावाद, विचार-स्वातंत्र्य, लोकशाही राज्य प्रणाली, धर्मनिरपेक्षता आणि हिंसाचाराचा आधार यासारख्या प्रवृत्तींत बदलतो. कोणतीही रुढीवादी चळवळ सामाजिक उत्थान आणि समानता किंवा आर्थिक प्रगतीचा कोणताही कार्यक्रम राखत नाही. त्याच्या पतनाचे भविष्य-कथन केले जाऊ शकते आणि वस्तुत: त्याच्या पतनाची भविष्यवाणी केव्हाच झाली आहे.

एक भूतपूर्व कॅथोलिक नन ब्रिटिश लेखिका आणि निवेदिका जी धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासावर आपल्या पुस्तकांसाठी प्रसिध्द आहे. आम्हाला आठवण करून देण्यासाठी म्हणते की रुढीवादाचा अधिकतर धर्मांमध्ये उद्रेक होऊन तो समोर आला आणि हा विसाव्या शतकाच्या शेवटी एका खास तणावाची प्रतिक्रिया म्हणून साऱ्या जगात आल्याचे दिसून येते. काही क्रांतिकारी कट्टरपंथी वर्ण व्यवस्थेच्या वचावासाठी आणि भारतीय मुसलमानांच्या विरोधासाठी रस्त्यावर आले. त्यांनी हे साबित करण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न केला की रुढीवाद विशेषत: मुसलमानांमध्ये आहे, याउलट ते आपल्या रुढीवादी अजेंड्याला शिक्षण आणि सार्वजनिक जीवनाच्या इतर क्षेत्रांमध्ये लागू करण्याचा अत्याधिक प्रयत्न करीत आहेत. ज्यू रुढीवादाने पाश्चिमात्य किनाऱ्यांवर आणि गाजापट्टीत अवैध वसाहती वसविल्या आहेत आणि आपल्या पवित्र भूमीतून सर्व अरबांना बाहेर घालविण्याचा त्यांनी चंग

बांधला आहे.

जेरी फेयरबेलची नैतिक बहुसंख्या आणि नव-ख्रिश्चन जहालमतवादी पंथ, ज्याने रशियाला एका वाईट साम्राज्याच्या स्वरुपात पाहिले, त्याने संयुक्त राज्य अमेरिकेत इ. सन १९८० मध्ये आश्चर्यकारक शक्ती प्राप्त केली, तेव्हा हा विचार करणे चुकीचे आहे की रुढीवाद विशेषत्वाने मुस्लिम श्रध्दा बाळगणाऱ्या लोकांमध्येच आढळून येतो.

जो मनुष्यदेखील इस्लामच्या बाजूने बोलेल, त्याच्यावर रुढीवादाची मोहर लावण्याची प्रवृत्ती पूर्णत: निरर्थकच नव्हेतर भयंकररीत्या चुकीचीही आहे. मुसलमान एकाच वंश आणि एकाच जनसमूहावर आधारित नाही. मुसलमानांमध्ये सर्व प्रकारचे राजकीय दृष्टिकोन आणि इस्लामची वेगवेगळी स्पष्टीकरणे मानणारे आहेत.

तथापि गेल्या दशकात परंपरागत मुसलमानांच्या एका नवोदित आणि फटकळ गटाद्वारे असहनशीलता आणि उग्रतेत वाढ झाली. रुढीवादाच्या वृध्दीची अनेक कारणे आहेत.

१. आधुनिकतावादी नेत्यांद्वारे अत्याचार ज्यांनी आपले वर्चस्व मुस्लिम समाजावर, विशेषत: जोर जबरदस्तीपूर्वक कायम राखले व परंपरागत नेतृत्वाची क्रूरपणे दडपशाही केली. या छळवादात कैद करणे, यातना देणे आणि धार्मिक नेत्यांना व विचारवंताना फासावर चढवणे सामील आहे.

२. आधुनिकतावादी नेत्यांची आर्थिक आणि विकास धोरणांची भयंकर असफलता, जिच्या परिणाम स्वरुपी धन-संपत्ती कमीतकमी हातांमध्ये एकवटली गेली.

३. इ. सन ५०५पासून सतत परंपरागत विचार-चिंतन, जीवनशैली आणि तिच्याशी संबंधित प्रत्येक गोष्टीची विडंबना.

४. मुस्लिम देशांमध्ये इस्लामी विरोधाला जाणूनबुजून असफल करण्याची पाश्चिमात्य शक्तिची नीती, इस्लामी नेतृत्वाला बरे-वाईट बोलणे दडपशाही करणाऱ्या पाश्चिमात्य शैलीच्या शासनांना पाठबळ देणे आणि मुस्लिम राज्यांना आर्थिकदृष्ट्या कंगाल आणि मुस्लिम समाजांना कर्जदार बनविण्याची नीती आहे.

# स्त्रिया

## झाकून ठेवलेला भूतकाळ आणि अनिश्चित वर्तमानकाळ

पाश्चिमात्य आणि पौर्वात्य लोकांच्या चुकीच्या कल्पनांविषयी निर्णय करण्याकरिता भूतकाळात वेगवेगळ्या समाजांमध्ये स्त्रियांना दिल्या गेलेल्या वागणुकीचे सर्वेक्षण करणे लाभदायक ठरेल.

### १. बॅबिलॉन संस्कृती

स्त्रियांचा दर्जा खालचा होता आणि बॅबिलॉनच्या कायद्यान्वये त्यांना सर्व हक्कांपासून वंचित राखले गेले होते. जर एखादा पुरुष एखाद्या स्त्रीची हत्या करीत असे, तर त्याला दंड देण्याऐवजी त्याच्या पत्नीला मृत्युदंड दिला जात असे.

### २. यूनानी संस्कृती

समस्त पुरातन संस्कृतींमध्ये यूनानी संस्कृतीला सर्वाधिक भव्य दिव्य समजले जाते. याच अतिशय प्रतिष्ठित संस्कृतीत स्त्रियांना सर्व हक्कांपासून वंचित राखले गेले होते, त्यांना नीच समजले जात असे. यूनानच्या पौराणिक कथांमध्ये एक 'पंडोरा' नावाची काल्पनिक स्त्री मानवजातीच्या दुर्दैवाचे कारण मानली जात असे. यूनानी लोकांचीही धारणा होती की स्त्रिया कनिष्ठ श्रेणीच्या मानव आहेत आणि त्या पुरुषांपेक्षा गौण आहेत. वास्तविक स्त्रियांचे पावित्र्य व निष्कलंकता बहुमूल्य होती आणि स्त्रियांना उच्चस्थान दिले गेले होते, परंतु ग्रीक लोक नंतर अहंकार आणि विकृत यौनसंबंधाच्या आहारी गेले. ग्रीक समाजाच्या सर्वच वर्गांमध्ये वेश्यावृत्ती एक नियमित आचरणाची बाब बनली होती.

## ३. रोमन संस्कृती

जेव्हा रोमन सभ्यता व संस्कृती किर्तीच्या शिखरावर होती, तेव्हा पुरुषाला आपल्या पत्नीचा जीव घेण्याचाही हक्क प्राप्त होता. रोमन लोकांमध्ये वेश्यावृत्ती आणि नग्नता सर्व सामान्य होती.

## ४. मिस्त्र (इजिप्त) ची संस्कृती

मिस्त्रचे लोक स्त्री-जातीला वाईट समजत आणि स्त्रीला सैतानाचे प्रतीक असल्याचे मानत.

## ५. सुरुवातीचा ख्रिश्चन धर्म

सुरुवातीच्या ख्रिश्चन धर्मात स्त्रियांना भुरळ पाडणारी समजले जात असे, जी हजरत आदम (अलै.) यांना स्वर्गातून खाली उतरविण्यास जबाबदार होती.

फ्रान्स देशात इ. सन ५८७मध्ये 'समाजात स्त्रियांचे स्थान' या विषयावर एक संमेलन झाले, ज्यात हे ठरवायचे होते की स्त्रियांना, खरोखर मनुष्य समजले जावे किंवा नाही. 'आठव्या हेन्री'ने इग्लंडमध्ये स्त्रियांना बायबल वाचण्याची मनाई केली होती आणि संपूर्ण मध्य-युगात कॅथोलिक चर्च स्त्रियांना दुय्यम दर्जाच्या नागरिकांसारखी वागणूक देत असे. इ. सन १८५० च्या पूर्वी ब्रिटनमध्ये स्त्रियांची गणना नागरिक म्हणून केली जात नसे आणि इ. सन १८८२ पर्यंत इंग्रज स्त्रिया व्यक्तिगत हक्क बाळगत नव्हत्या.

## ६. भारतीय संस्कृती

भारतात, काही भारतीय समुदायांमध्ये सती-प्रथा एक धार्मिक अंत्यविधीची परंपरा होती, जिच्यात विधवा स्त्री स्वत:ला आपल्या पतीच्या चितेवर जाळून घेत असे. या प्रथेवर अनेकदा बंदी घातली गेली.

## ७. इस्लामच्या आगमनापूर्वी

सातव्या शतकात, जगात अधिकतर स्त्रियांना कनिष्ठ दर्जाचे समजले जात होते आणि अरब समाजातही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या

आगमनापूर्वी हीच वागणूक अरबांमध्येही होती. त्या काळात सामाजिक वातावरण कबिल्या-कबिल्यांमध्ये बंदिस्त होते, क्षुल्लक कारणावरून युध्द, लूटमार आणि अराजकता पसरलेली होती आणि त्यांचे नेतृत्व विभिन्न कबिल्यांचे पुरुषच करीत अशा प्रकारच्या वातावरणात स्त्रियांचे स्थान निर्विवादरीत्या खालच्या दर्जाचे होते.

इस्लामच्या आगमनापूर्वी अरब द्वीपकल्पात मुलगी जन्मास येणे पित्यासाठी अपमानकारक होते आणि कन्येचा पिता बनण्याच्या अपमानापासून वाचण्याकरिता तिला जिवंतपणीच जमिनीत गाडले जात असे, दहापैकी एकजण हा अपराध करीत असे. या अपराधात केवळ पुरुषच नव्हेतर स्त्रियादेखील सहभागी असत. माता आपल्या लेकीला जिवंत गाडण्यासाठी पित्याच्या हवाली करत असे. दुसरे हे की दारिद्र्याच्या भयाने ते आपल्या मुलींची हत्या करीत असत.

इस्लामच्या आगमनापूर्वी अरब द्वीपकल्पात अनेक प्रकारच्या विचित्र वैवाहिक प्रथा प्रचलित होत्या. पुरुष वारंवार विवाह करीत असत आणि वाटेल तेवढ्या पत्नी बाळगत. दहा, वीस तर कधी कधी शेकडो पत्नी बाळगत आणि हा सामाजिक प्रतिष्ठेचा मानदंड समजला जात असे. पवित्र कुरआनने ही पध्दत बंद केली आणि यासाठी मर्यादा निश्चित केली व कठोर नियम लागू केले. त्या काळात आणखी एक परंपरा प्रचलित होती. पुरुष, स्त्रियांशी लैंगिक संबंधांपासून आपला बचाव करण्यासाठी शपथ घेत असत. अशा प्रकारे त्यांना अधांतरी सोडत. न त्यांचा घटस्फोट होऊ शकत असे न दुसरा विवाह करण्यासाठी त्या मोकळया असत आणि न त्यांच्याशी पत्नीसारखे वर्तन केले जात असे. काही स्त्रिया आपले संपूर्ण आयुष्य अशाच बंधनात कंठीत असत. पवित्र कुरआनने अशा पुरुषांना तंबी केली,

> ''अल्लाहच्या नावाचा वापर अशा शपथा घेण्यासाठी करू नका की त्यामुळे सदाचार, धर्मपरायणता आणि जनकल्याणाची कार्ये करणे तुम्ही सोडून द्याल. अल्लाह तुमच्या सर्व गोष्टी ऐकणारा व जाणणारा आहे. अल्लाह तुमच्या निरर्थक शपथांबद्दल पकडणार नाही, तथापि ज्या

> शपथा तुम्ही प्रामाणिकपणे घेता, त्यांच्याविषयी तुम्हाला जरुर विचारले जाईल अल्लाह अत्यंत क्षमाशील व सहनशील आहे. जे लोक आपल्या पत्नीशी संबंध न ठेवण्याची शपथ घेतील त्यांच्यासाठी चार महिन्यांचा अवधी आहे. जर त्यांनी पुन्हा संबंध कायम केले तर अल्लाह माफ करणारा व कृपावान आहे आणि जर त्यांनी तलाकचाच विचार केला असेल तर लक्षात ठेवा, अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.''
>
> (कुरआन- २ : २२४ ते २२७)

अनेक मामल्यांमध्ये एक विधवा स्त्री आपल्या मृत पतीची मालमत्ता समजली जात असे, जी वारसाधिकाराने त्याच्या पुरुष वारसदांराना मिळत असे आणि अशा प्रकरणांमध्ये नेहमी तिचा आपल्या दुसऱ्या पत्नीच्या सर्वांत मोठ्या मुलाशी विवाह करून दिला जात असे. पवित्र कुरआनने स्पष्टरीत्या या अवमानकारक प्रथेवर बंदी घातली,

> ''आणि ज्या स्त्रियांशी तुमच्या पित्याने विवाह केला असेल त्यांच्याशी तुम्ही कदापि विवाह करू नका, तथापि जे यापूर्वी घडले ते घडले. खरे पाहता ही एक निर्लज्जपणाची कृती आहे, अप्रिय आणि मोठी वाईट प्रथा आहे.''
>
> (कुरआन- ४ : २२)

जर त्या विधवेचा विवाह तिच्या मृत पतीच्या सर्वांत मोठ्या पुत्राशी होत नसे तर तिला आपल्या पतीच्या भावाच्या हवाली केले जात असे. या परिस्थितीत पतीच्या भावांपैकी एक भाऊ आपले कपडे तिच्या अंगावर फेकत असे आणि अशा प्रकारे आपल्या मालकी-हक्काचा तो दावा करीत असे विधवा स्त्रीला आपल्या पतीचे घर सोडण्याची अनुमती कोणत्याही परिस्थितीत नव्हती.

इस्लामच्या आगमनापूर्वी अरब समाजात मोठ्या प्रमाणात लैंगिक स्वैराचारामुळे विवाहापूर्वी गर्भधारणाचे प्रकार होत याव्यतिरिक्त अवज्ञा केल्याबद्दल स्त्रियांना निर्दयपणे मारहाण केली जात असे.

अधिकांश कबिल्यांमध्ये त्यांना एक तर हीन दर्जा प्राप्त होता किंवा कसलीही मान-प्रतिष्ठा नव्हती आणि त्यांना पुरुषांच्या आनंदासाठी मूलत: भोग-विलासाची वस्तू समजले जात असे तसेच घराच्या बाहेर फार कमी वस्त्र घालण्यासाठी स्वातंत्र्य होते. उपासना करतानाही (उदा. काबागृहाला प्रदक्षिणा घालतेवेळी नग्न होऊन प्रदक्षिणा करणे) आपल्या समाजातील पुरुषांच्या आनंदासाठी, त्यांच्या मनोरंजनासाठी त्यांना असे करण्यास भाग पाडले जायचे.

इस्लामच्या आगमनापूर्वी अरब समाजात स्त्रियांना कसलाही वारसाधिकार नव्हता. याउलट स्त्रियांना मालमत्ता समजले जाई. त्यांची खरेदी-विक्री केली जात असे. मृत पुरुषाने मागे सोडलेल्या धन-संपत्तीप्रमाणे त्यांचीही वाटणी केली जात असे आणि कर्जापोटी परतफेडीच्या स्वरुपात त्यांना अदा केले जात असे. कुरआनने या सर्व अनिष्ट प्रथांचे निर्मूलन केले आणि नवे नियम प्रस्थापित केले. पवित्र कुरआनात जोर देऊन फर्माविले गेले आहे की स्त्रियांना केवळ वारसाधिकारच नव्हे तर नियमानुसार मालमत्तेची मालकीण बनण्याचाही अधिकार आहे.

# आधुनिक समाजात स्त्रियांचे स्थान

जगाच्या काना कोपऱ्यातून सध्या बऱ्याचशा घटनांच्या बातम्या येतात, ज्या आम्हालाही जाणीव करून देतात की निदान स्त्रियांशी केल्या जाणाऱ्या वागणुकीसंदर्भात आम्ही अज्ञानकाळासारख्या कालखंडाकडे परतत आहोत अर्थात तो कालखंड जो इस्लामच्या उदयापूर्वी सातव्या शतकाचा होता.

कन्या भ्रूणहत्येच्या स्वरुपात मुलींची हत्या, आजच्या या काळातही जारी आहे. यूनीसेफच्या 'वर्ल्ड चिल्ड्रेन रिपोर्ट'नुसार भारतात मुलांची संख्या, मुलींपेक्षा जास्त होत आहे. हा रिपोर्ट हेही दर्शवितो की संपूर्ण जगात लिंगानुपाताच्या अहवालानुसार १००० मुलांवर ९५४ मुली आहेत. मुलींच्या जन्म-दरात घसरणीचे कारण कन्या भ्रूणहत्या आहे.

दरवर्षी सुमारे ७० दशलक्ष मुलींना जन्मास येण्यापूर्वीच मारुन टाकले जाते. या आकड्यांनी मानवजातीची मान लाजेने झुकली पाहिजे आणि प्रत्येक माणसाच्या चेतनेला नखशिखान्त हादरुन टाकले पाहिजे. परंतु अजूनही आम्हाला हा विश्वास ठेवण्यास विवश केले जाते की आम्ही अशा सुसंस्कृत जगात राहतो, जो मानवाधिकारांचा आदर राखतो.

या आधुनिक युगात स्त्रियांना केवळ क्रीडा-मनोरंजनाची वस्तू किंवा साधन बनविले गेले आहे. आधुनिक काळात स्त्रिया स्वत:ला वास्तविक किंवा काल्पनिक समानता प्राप्त करण्यासाठी ऐच्छिक किंवा अनैच्छिकरीत्या खालच्या स्तराप्रत नेण्यास प्रवृत्त आहेत.

आजचे जग स्त्रियांना अधिकार प्रदान करण्याबद्दल आपली पाठ थोपटून घेऊ शकतो, परंतु यात तिच्या सुरक्षिततेवर फार कमी ध्यान दिले गेले आहे. परिणामी स्त्रियांच्या स्वातंत्र्याने त्यांच्या शोषणाचा मार्ग मोकळा करून

दिला आहे आणि समाजात एक विचित्र प्रकारची अव्यवस्था पसरली आहे. वस्तुत: हे स्त्री-स्वातंत्र्य बाजारात स्त्रियांची वाढती उपलब्धता निर्धारित करण्यासाठी निमित्त याव्यतिरिक्त आणखी काहीच सिध्द झाली नाही. वेश्यावृत्ती जगाचा सर्वांत मोठा बाजारच बनला असून मानवजातीकरिता सर्वांत मोठी दु:खदायक गोष्ट बनली आहे. अशाने स्वैराचार माजून लोक मृत्युमुखी पडत आहेत (एड्स, हत्या, आत्महत्या वगैरे) आणि याच्यामुळे परिवार उद्ध्वस्त होऊन सामाजिक सद्भाव प्रभावित होत आहे.

खाजगी मालमत्तेपेक्षाही अधिक वाईट व्यवहार स्त्रियांशी केला जातो. वेश्यावृत्ती, सेक्स वर्कर, अश्लील नृत्य, मॉडलिंग, नग्नता, हुंडा बळी, वधुला जाळून मारणे, आत्महत्या, जुगार, लाइव बॅंड्स आणि मद्यपान या सामान्य गोष्टी आहेत. तसेच वासना आणि स्त्रियांच्या दरम्यान रोमांचक भावना आणि कसल्याही भेदभावविना एकाच वेळी अनेकांशी यौनसंबंध आज सर्वसाधारण गोष्टी झाल्या आहेत.

अशा प्रकारे स्त्रियांना मालमत्तेच्या स्वरुपात प्रस्तुत करणे आजही सुरळीत चालले आहे. जिथे स्त्रियांना वासना किंवा उपभोगाची वस्तू बनविण्याच्या प्रवृत्तीने पूर्वीपेक्षा जास्त सामाजिक स्वीकृती प्राप्त केली आहे उदा. जाहिरातींमध्ये कमीतकमी कपडे घालून स्त्रिया, (वास्तविक अनेकदा जाहिरात असलेल्या उत्पादनाचा स्त्रियांशी कसलाही संबंध नसतो उदा. हॅम्बर्गर व्यवसाय, शीत पेयें, कार-व्यवसाय इत्यादी) अश्लील क्लीपिंग, स्ट्रिप बार, काही रेस्टारन्ट असे आहेत, ज्यांच्यात अशा वेटर्सची मागणी असते, ज्या कमीतकमी कपडे घातलेल्या असाव्यात आणि कपडे घातलेले असूनही त्यांचे अंग-प्रत्यंग दिसून यावेत आणि सध्या तर कॉस्मेटिक सर्जरी ब्रेस्ट इन्लार्जमेंट विशेष प्रकार आहेत.

# कामवासनेची वेडी धावपळ

आज स्त्रिया, तरुण मुली आणि निष्पाप कोवळ्या वयाची मुलेदेखील काम वासनेपासून सुरक्षित नाहीत. अशा बऱ्याच घटना समोर येतात ज्यांच्यात स्त्रिया आणि तरुण मुलींशी मोठे वाईट वर्तन केले जाते, त्यांचे अपहरण केले जाते, बलात्कार केले जातात. मागे काही लज्जास्पद घटनांमध्ये अश्लील कृत्याची विडीयोग्राफीही केली गेली, यासाठी की पीडित महिलेला ब्लॅक मेल केले जावे. तिची प्रतिमा डागाळता यावी किंवा तिच्या मान-प्रतिष्ठेला कलंकित करता यावे. काही भयंकर अपराधी एवढे धीट व निर्भीड होते की त्यांनी आपल्या यौन अपराधाला सामाजिक मीडियावर अपलोड केले. जणू ते कायदा व सुव्यवस्थेच्या यंत्रणेला खुले आव्हान देत आहेत की शक्य असेल तर आम्हाला पकडून दाखवा. अशा घटना आमच्या धार्मिकतेची, सामाजिक चेतनेची आणि सभ्य व सुसंस्कृत जीवनाच्या सिध्दान्तांची जणू थट्टाच उडवितात.

इतिहास या गोष्टीस साक्षी आहे की स्त्रियांच्या अनियंत्रित शोषणाची परिणति अनेक संस्कृतिंच्या विनाशाच्या स्वरुपात समोर आली आहे. आमचे चित्रपट, मासिके, नियतकालीके, वृत्तपत्रे हेही काम वासनेची उत्तेजना वाढविण्यात आपली भूमिका पार पाडत आहेत आणि अतिशय दुर्दैवाची बाब अशी की संपूर्ण देशात प्रतिष्ठा प्राप्त इंग्रजी वृत्तपत्रे व मासिकेही आपल्या अंकात अश्लील पुरवणी उपलब्ध करून देतात. इन्टरनेटच्या सहज सुलभ उपलब्धतेने अबोध आणि नवयुवकांच्या मनाला अनारोग्यकारक सामुग्रीला बळी पडण्याची शक्यता वाढविली आहे.

जर आम्ही या आधुनिक कामवासनेच्या वेड्या धावपळीच्या समस्येला सोडवू इच्छितो तर त्यासाठी सरकार, समाजशास्त्रज्ञ, प्रसारमाध्यमें आणि धार्मिक नेत्यांच्या प्रयत्नांची गरज आहे. आमची सभ्यता व संस्कृती

आणि आमचे कौटुंबिक जीवनच पणाला लागले नाही, किंबहुना आमच्या संस्कृतीचा आधारच आज पणाला लागला आहे. आमच्या साहित्य व वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रानिक मीडियात विचारस्वातंत्र्याच्या नावाने कोणत्याही अनारोग्यकारक गोष्टीच्या प्रसारणाची अनुमती दिली जाऊ नये अशा प्रकारचे लेख जे अनैसर्गिक यौनसंबंधांना, विवाह पूर्व यौनसंबंधांना, प्रोत्साहन देतात त्यांना कठोरपणे ठेचून काढले पाहिजे ईशभय, नैतिक मूल्यांचा आदर व त्यांची जोपासना आणि जबाबदारी पार पाडण्याची भावना इ. गोष्टींना समाजाच्या हित- कल्याणाच्या दिशेने वाढीस लावले पाहिजे.

इस्लाम धर्माने स्त्रियांना जे हक्क व अधिकार दिले आहेत त्यावर एक दृष्टिक्षेप टाकू या. २१ व्या शतकात मुस्लिम समाजांमध्ये व्यावहारिकदृष्ट्या स्त्रियांची जी सामाजिक आणि आर्थिक अवस्था आहे, त्यात आणि इस्लामने त्यांना जे अधिकार प्रदान केले आहेत त्यांच्यातला फरक ध्यानी राखणे आवश्यक आहे.

# स्त्रियांविषयी इस्लामचा दृष्टिकोन

## (सरळ मूलस्त्रोतांच्या माध्यमातून)

कुरआन अवतरणाच्या अगदी आरंभापासूनच इस्लाम धर्माने स्त्रियांना त्यांचे हक्क बहाल केले आणि पुरुषांसोबत त्यांच्यासाठी पूर्ण आध्यात्मिक समानता निर्धारित केली. इस्लाम धर्मात स्त्री आणि पुरुषाला जीवनात भागीदार म्हणून प्रस्तुत केले गेले आहे, ज्यात प्रत्येक वेगवेगळ्या परंतु पूरक भूमिका आणि जबाबदाऱ्या बाळगतो, ज्या त्यांच्या विशेष पात्रता व क्षमतांशी अनुरुप असतात. जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणी अरब स्त्रियांपर्यंत पोहोचल्या, तेव्हा त्यांनी जाणून घेतले की या शिकवणींमध्ये त्यांच्या मुक्तीचे साधन असेल. वस्तुत: ज्या पहिल्या व्यक्तीने इस्लाम धर्म स्वीकारला ती स्त्री (पैगंबर मुहम्मद (स.) यांची पत्नी हजरत खदीजा) होती. एक दुसरे महत्त्वपूर्ण उदाहरण हजरत उमर (रजि.) यांची सुपुत्री फातिमाचे आहे, जिने आपल्या भावाच्या आधी इस्लाम धर्म स्वीकारला आणि नंतर भावाच्या इस्लाम धर्म स्वीकारण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. जेव्हा ते अल्लाहचे एकनिष्ठ दास बनले, तेव्हा ते माणसांनी घडविलेल्या वस्तूंची उपासना करण्यापासून मुक्त झाले.

इस्लाम धर्मात स्त्रिया, त्या काळी असलेल्या छळ आणि दडपशाहीच्या कचाट्यातून मुक्त झाल्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या मिशनच्या काळात स्त्रियांचे रक्षण केले आणि त्यांचे हक्क व अधिकार मजबूत केले. हे कार्य पैगंबरांनी आयुष्याच्या शेवटापर्यंत केले आणि आपल्या निरोपाच्या प्रवचनातही केले (आपल्या अखेरच्या हजप्रसंगी उपस्थित जन समुदायाला संबोधून पैगंबर (स.) यांनी इस्लाम धर्माच्या महत्त्वपूर्ण पैलूंवर जोर दिला)

''लोक हो! हे सत्य आहे की तुमचे आपल्या स्त्रियांवर निश्चितपणे काही अधिकार आहेत, तथापि तुमच्यावर त्यांचेही काही अधिकार आहेत. लक्षात ठेवा, तुम्ही त्यांना केवळ अल्लाहच्या अनामतीच्या स्वरुपात आणि त्याच्या अनुमतीने आपल्या पत्नीच्या रुपाने स्वीकारले आहे. जर त्या तुमच्या अधिकारांचे भान राखतील, त्यांचे पालन करतील तर तुमच्यावर प्रेमपूर्वक त्यांना अन्न-वस्त्र पुरविण्याची जबाबदारी आहे. आपल्या स्त्रियांशी चांगले वर्तन राखा आणि त्यांना दया व भलेपणाची वागणूक द्या, कारण त्या तुमच्या जीवनाच्या सोबती व सहयोगी आहेत आणि हा तुमचा अधिकार आहे की त्यांनी अशा लोकांना आपला मित्र बनवू नये, ज्यांना तुम्ही पसंत करीत नाही आणि त्यांनी आपले शील-पावित्र्य कधीही नष्ट करू नये.''

## रुपांतरण

जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये दुय्यम दर्जाची नागरिक राहिल्यानंतर स्त्रिया शेवटी बंध-मुक्त झाल्या. इस्लाम त्यांचे हक्क प्रस्थापित करीत आणि त्यांना पुरुषांच्या बरोबरीने त्यांचा जोडीदार व सहयोगी बनवित आला. इस्लामने प्रत्येक स्त्रीकरिता विशेष आणि पवित्र अधिकार प्रस्थापित केले आणि तिला त्या उच्च स्तराप्रत पोहचविले, ज्याचा तिला अधिकार होता. हे व्यापक आणि बन्ध-मुक्त करणारे बदल कसे घडून आले?

इस्लाम धर्मात स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्री-पुरुषांच्या संघर्षाचा परिणाम नव्हे. हे अल्लाहतर्फे समस्त मानवजातीवर अवतरित केले गेले आहे. जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कुरआनाच्या संदेशांना प्राप्त केले, तेव्हा त्यांनी ते लोकांपर्यंत पोहोचविले आणि लोक त्यांना त्वरित आपल्या आचरणात आणण्याचे काम करीत. अशा प्रकारे स्त्रियांचे हक्क व अधिकार आणि

स्त्रियांशी दयाशीलतेच्या व्यवहाराबाबत पवित्र कुरआनातील संदेशांना सहज सौम्यपणे घेतले जात नसे. मुस्लिम पुरुष स्त्रियांसंबंधी जो दृष्टिकोन व वर्तन राखत होते, त्यात अल्लाहतर्फे जे संदेश येत, त्यानुसार, त्यांच्यावर कुरआनाच्या आयती अवतरित होताच ते आपल्या आचरणात बदल करून घेत. याचा परिणाम असा झाला की स्त्रियांना आपल्या हक्काधिकारांसाठी संघर्ष करावा लागला नाही. न एखादे बंड होत होते. न रॅली वगैरे निघत असे आणि निदर्शने करण्याची गरजच नव्हती. तेच पुरुष जे इस्लामपूर्वी अरब समाजात लहानाचे मोठे झाले होते आणि आपल्या मुलींना जिवंतपणी जमिनीत गाडत होते व स्त्रियांशी लैंगिक स्वैराचार करण्यात मग्न होते, तेच आता दयाळू, अल्लाहचे भय राखणारे आणि आपल्या कृत पापांची क्षमा मागणारे बनले. पैगंबर मुहम्मद (स.) आदेश देत ते लक्षपूर्वक ऐकत असत आणि त्या आदेशांचे पालन करीत.

> पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,
>
> ''तुमच्यात सर्वाधिक चांगला तो आहे जो आपल्या पत्नीसाठी सर्वांत चांगला आहे.''
>
> आणि पैगंबर (स.) यांनी हेही फर्माविले,
>
> ''ज्या कोणाला अल्लाहने दोन मुली दिल्या आणि तो त्यांच्याशी दयाळूपणे वागत असेल, तर त्या त्याच्या जन्नतमध्ये प्रवेशाचे कारण बनतील.''

समाज सुधारणा केल्यानंतर, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी बलात्कार, हत्या आणि नवजात मुलींच्या हत्येवर कठोर मृत्युदंडाची शिक्षा लागू केली तसेच वेश्यावृत्ती, जुगार, नृत्य आणि मद्याच्या मैफिलींवर पूर्णत: प्रतिबंध घातला. पैगंबर मुहम्मद (स.) अपव्यय आणि यौन स्वैराचारा (अर्थात अनेक लोकांशी लैंगिक संबंधा) वरही प्रतिबंध घातला. पैगंबरांनी, स्त्रियांना तुच्छतापूर्वक पाहण्याची, आर्थिक ओझे बनण्याची व क्रिडा किंवा भोग विलासाची वस्तू वा साधन बनविण्याची अनुमती दिली नाही.

# इस्लामी कायद्यान्वये स्त्रियांचे हक्क

१. इस्लाम धर्म विवाहाला भावनात्मक आणि लैंगिक समाधान, वैध-प्रजोत्पादन आणि आंतर कौटुंबिक संबंधांचे व कौटुंबिक एकतेचे माध्यम मानतो. इस्लामी कायद्यानुसार विवाह स्त्री-पुरुषामधील करारपद्धत आहे, मालकी नाही. याचा स्त्रीच्या सामाजिक दर्जावर सकारात्मक परिणाम झालेला आहे.

२. इस्लाम एकमेव असा धर्म आहे, ज्याने स्त्रियांचे हक्क-अधिकार आणि कर्तव्यांसंदर्भात कायदे दिले आहेत आणि स्त्रियांच्या अधिकारांसंबंधी एक वेगळे धर्मशास्त्र (शरीअत) प्रदान केले आहे.

३. जेव्हा एखाद्या मुस्लिम स्त्रीचा विवाह होतो, तेव्हा ती आपल्या कौटुंबिक नावाचा त्याग करीत नाही, किंबहुना ती आपली वेगळी ओळख कायम करते.

४. आपल्या भावी पतीची निवड करण्यासंदर्भात तिचा होकार प्राप्त करणे आवश्यक आहे.

५. मुस्लिम विवाहात वराने आपल्या वधूला स्वत: महर (स्त्री-धन) अदा करायचा असतो. महरची ही रक्कम तिच्या पित्याला दिली जाऊ शकत नाही. ती आपला महर हक्काने मागू शकते आणि विवाहप्रसंगी तो प्राप्त करू शकते, अथवा खर्च करू शकते आणि या संदर्भात ती आपल्या पुरुष नातेवाईकांच्या आदेशांचे पालन करण्यास विवश नसते.

६. ती आपल्या माता-पित्याकडून वारसा किंवा उपहार मिळविते आणि ती त्या संपत्तीची पूर्णपणे मालक बनते आणि तो हिस्सा आपल्या पतीला किंवा सासरच्या नातेवाईकांना देण्यास विवश नसते. अशा प्रकारे ती

आपल्या पतीच्या मालमत्तेतही वारसाधिकार राखते आणि आपल्या माता-पित्याच्या मालमत्तेतही. (पाहा, कुरआन- ४ : ७,३२,१७६)

७. पवित्र कुरआन पुरुषांवर आपल्या सर्व स्त्री-नातेवाईकांचे संरक्षण आणि त्यांच्या अन्न-वस्त्राची जबाबदारी टाकतो. याचा अर्थ असाही आहे की पुरुष आपल्या पत्नी व कुटुंबाचा खर्च अशा वेळीही उचलेल, जेव्हा त्याच्या पत्नीजवळ तिचे स्वत:चे धन असावे. आपल्या कुटुंबाचा खर्च उचलण्याकरिता तिच्यावर, तिचे स्वत:चे धन खर्च करण्याचे कर्तव्य टाकले गेले नाही. याच्या मोबदल्यात स्त्रियांकडूनही अपेक्षा केली गेली आहे की त्या आपल्या पतीशी एकनिष्ठ राहतील आणि आपल्या शील-अब्रूचे रक्षण करतील (पाहा कुरआन- ४ : ३४)

८. जर पतीसोबत जीवन व्यतीत करणे अशक्य झाले आणि पती तलाक देण्यास तयार नसेल तर ती पतीपासून खुलअ अथवा तलाक घेऊ शकते.

९. विधवा आणि घटस्फोटित स्त्रिया पुनर्विवाह करू शकतात. परिस्थितीनुसार त्यांना काम करणे आवश्यक असेल तर त्या काम करून, वाटल्यास अर्थोपार्जन करू शकतात.

१०. पूर्वापार चालत आलेल्या चाकोरी बध्द धारणेविरुध्द, इस्लाम स्त्रियांची भूमिका चार भींतीच्या आत मर्यादित ठेवत नाही. जर स्त्रिया एखादा उद्योग-व्यवसाय करू इच्छितील तर इस्लामची मनाई नाही.

११. स्त्रिया आपल्या इच्छेनुसार धन कमवू शकतात आणि ते खर्चही करू शकतात. ती आपले कमविलेले धन आपल्या माता-पित्यावर खर्च करू शकते किंवा दान म्हणून देऊ शकते. यासाठी तिला आपल्या पतीची किंवा सासरच्या मंडळीची परवानगी घेण्याची गरज नाही.

१२. विवाहानंतर जर पती एखादी भेट वस्तू, सामान किंवा रोख रकमेच्या स्वरुपात आपल्या पत्नीला देतो आणि तिला त्या वस्तू वा रकमेचा मालक बनवितो तर तलाक दिल्यावर ते परत मागू शकत नाही.

१३. इस्लाम धर्म शिक्षण घेण्याबाबत स्त्री-पुरुषांना समान लेखतो आणि या

गोष्टीवर जोर देतो की ज्ञान प्राप्त करणे पुरुष व स्त्रिया दोघांकरिता अनिवार्य कर्तव्य आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आणि पवित्र कुरआनने अशाच एका संस्कृतीचा प्रारंभ केला होता. सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाकरिता अशीच योजना निर्धारित केली आहे आणि अल्लाहपेक्षा अधिक उत्तम कोण जाणतो?

हे सर्व हक्क आणि अधिकार स्त्रियांना समाजातर्फे दान म्हणून दिले गेले नाहीत की जे कोणाच्याही मर्जीनुसार कधीही परत घेतले जावेत. या सर्व हक्कांची हमी इस्लामी कायद्याने दिलेली आहे जो शाश्वत आहे आणि भूतलावर कोणतीही राज्य-सत्ता यात कसलेही संशोधन वा परिवर्तन करू शकत नाही. इस्लाम धर्म स्त्रियांच्या मान-प्रतिष्ठेचे रक्षण अशा प्रकारे करतो. इस्लामने हे सर्व अधिकार अशा काल खंडात प्रदान केले जेव्हा पाश्चिमात्य जगात त्यांना संपत्ती समजले जात होते आणि या गोष्टीत गंभीर शंका व्यक्त केली जात होती की स्त्रीच्या अंगी आत्मादेखील असतो काय?

इस्लाम धर्म स्त्रीला इतके बहुमूल्य मानतो की तिचा अपमान किंवा अनादर केला जाऊ शकत नाही. काही मध्य-पूर्वेकडील देशांमध्ये किंवा भारतीय उपखंडात अथवा मुस्लिम कुटुंबांमध्ये स्त्रियांना जी वाईट वागणूक दिली जाते, ती त्या सांस्कृतिक रीति-रिवाजांमुळे असते, ज्यांचे काही मुसलमान चुकीने पालन करतात आणि असे इस्लाममुळे होत नाही जर इस्लाम छळवादाचा, दडपशाहीचा, जुलूम अत्याचाराचा धर्म आहे तर जगात असंख्य स्त्रिया स्वेच्छेने इस्लाम धर्म का स्वीकारत आहेत?

# इस्लाम धर्मात स्त्रियांची कर्तव्ये

इस्लाम एक न्यायपूर्ण आणि संतुलित जीवनव्यवस्था आहे. जिथे तो स्त्रियांचे हक्क आणि अधिकार निर्धारित करतो, तिथे त्यांच्या कर्तव्यांनाही निर्धारित करतो. एक मुस्लिम स्त्रीकडून खालील कर्तव्यांच्या पूर्ततेची अपेक्षा केली जाते :

१. एक अल्लाहवर अटळ श्रध्दा आणि इस्लाम धर्माचे पालन तिचे आद्य आणि सर्वात महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. मुस्लिम स्त्रीने वक्तशीरपणे नमाज पढली पाहिजे. रमजान महिन्यात रोजे ठेवले पाहिजेत. आपल्या धन-संपत्तीची जकात अदा केली पाहिजे आणि आर्थिकदृष्ट्या समर्थ असेल तर तिने हज-यात्राही केली पाहिजे.

२. तिच्याकडून हे अपेक्षित आहे की तिने सदैव आपल्या शील अब्रूचे रक्षण करावे. विवाहानंतर दुसऱ्याशी लैंगिक संबंध कधीही ठेवू नये.

३. स्त्री-सुलभ लज्जानुरुप असा सभ्य पोषाख तिने घालावा. पडदा किंवा बुर्क्याचा वापर करावा. घराबाहेर पडताना किंवा जवळच्या नातेवाईकांखेरीज इतर वयस्कर पुरुषांशी भेटताना बुरखा घालून जावे. बुरख्याला हिजाबही म्हणतात. ज्याचा अर्थ, बाहेरुन घालावयाचे एक लांब वस्त्र किंवा डोक्यावर घातला जाणारा स्कार्फ वापरावा. (पाहा. कुरआन- ३३ : ५९, २४ : ३०,३१)

४. हे तिचे कर्तव्य आहे की इस्लामच्या नियमांनुसार चांगल्या चारित्र्यासह आपल्या मुलाबाळांचे संगोपन व पालनपोषण करावे. आपल्या कुटुंबाची नीट देखभाल करावी आणि गृह स्वामीनी म्हणून तिला आपल्या घरगुती गोष्टींवर पूर्ण नियंत्रण प्राप्त राहील. वस्तुत: परिवार आपसातील सल्लामसलतीने आणि सहयोगाने चालविला जातो. खरे

पाहता ती आपल्या कुटुंबाची राणी आहे.

५. ती आपल्या पतीची सहचारिणी आहे. एकनिष्ठ पत्नी आपल्या पतीकरिता एक पोषाख, शांती-स्त्रोत, प्रेम, आनंद आणि समाधानाचे साधन आहे. (पाहा. कुरआन- ३० : २१, २ : १८७)

६. जर तिला अल्लाहच्या आदेशांविरुध्द वागण्यास सांगितले जाईल तर तिला आपल्या पती, पिता किंवा भावाची अवज्ञा करण्याचा अधिकार आहे. (पाहा. कुरआन- ९ : २३)

७. इस्लाम धर्म पती आणि पत्नीला एकमेकांचे पूरक मानतो. कोणी दुसऱ्यावर वर्चस्वशाली नाही. प्रत्येकाला आपला व्यक्तिगत अधिकार आणि कर्तव्य प्राप्त आहे. दोघे मिळून ते एक शांतीपूर्ण आणि प्रसन्न परिवार बनवितात तो स्थैर्यशील आणि शांतीपूर्ण समाजाकरिता आवश्यक आहे.

# इस्लाम धर्मात
# नुसत्या गृहिणीपेक्षा मातृत्व मोठे

आजच्या काळात सर्वाधिक दुर्दैवी घटनांपैकी एक ही की ज्या स्त्रिया स्वत:ला, गृहस्थ जीवनासाठी तद्नुषंगे मुलाबाळांच्या संगोपनासाठी समर्पित करतात, त्यांच्याशी मोठा अवमानकारक व तुच्छ व्यवहार होतो. नेहमी जेव्हा एखादी स्त्री एखाद्या सामाजिक समारंभात सहभागी होण्यास घराबाहेर पडते, जिथे इतर काही स्त्रिया मोठ्या अभिमानाने आपल्या करीयरचे गुणगान करतात. तिथे अधिकतर तुच्छतापूर्वक काही स्त्रियांचे हे कथन असते की मी फक्त गृहिणी आहे. तेव्हापासूनच नव्या पीढीची तयारी आणि तिच्या पालनपोषणाबद्दल समर्पण लज्जा आणि तुच्छ भावनेचे कारण बनते. हीच ती वस्तुस्थिती होय की जिच्यामुळे अनेक बालकांचे आज अनोळखी लोक पालनपोषण करत आहेत, उदा. क्रेशे, नेनी आणि बेबी सिस्टर्स वगैरे. वास्तविक, माता-पिता आपल्या कार्पोरेट आणि बौध्दिक इच्छा-आकांक्षांच्या मागे धावत असतात. तर काय अशा परिस्थितीत कुटुंबाचा सांगाडा विस्कळीत होणे आणि, अल्पवयात गर्भ धारणा (आमच्या नव तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात अत्याधिक लैंगिक स्वैराचाराचा भयंकर परिणाम) काही नवल करण्यायोग्य गोष्टी नाहीत. वस्तुत: आम्ही आजच्या भौतिकवादी समाजात ‘आई’चे गंभीर महत्त्व नजरेआड केले आहे.

तरीही इस्लाम धर्मात, जो आदर-सन्मान मातेशी आणि मातृत्वाशी जोडलेला आहे तो खरोखर अद्वितीय व अनुपम आहे. कुरआनात, आपल्या माता-पित्यासंबंधीचे कर्तव्य आणि त्यांच्याशी प्रेम व दया-अनुकंपापूर्ण वर्तनाला अल्लाहच्या उपासनेच्या त्वरित नंतर सांगितले गेले आहे :

‘‘तुमच्या पालन कर्त्याने निर्णय दिला आहे की तुम्ही

त्याच्याखेरीज अन्य कोणाचीही उपासना करू नये आणि माता-पित्याशी चांगले वर्तन करा. जर तुमच्याजवळ त्यांच्यापैकी कोणी एक किंवा दोघे वृध्द होऊन राहिले तर त्यांच्यासाठी 'अरे' शब्ददेखील काढू नका व त्यांना झिडकारुन उलट उत्तरदेखील देऊ नका, त्यांच्याशी आदराने बोला आणि नरमीने व दयाद्रतेने त्यांच्यासमोर नमून राहा आणि प्रार्थना करीत जा की, हे पालनकर्त्या! यांच्यावर दया कर ज्याप्रकारे यांनी दया-वात्सल्याने बालपणी माझे संगोपन केले.''

(कुरआन- १७ : २३,२४)

अल्लाहचे पैगंबर (स.) जेव्हा आपल्या साथीदारांशी व अनुयायींशी वार्तालाप करीत, तेव्हा माता-पित्याशी आदर-सन्मानाची वागणूक राखण्याची ताकीद अधिकतर त्यांच्या शुभमुखातून निघत असे. या संदर्भात पैगंबर (स.) यांनी फर्माविले,

''नि:संशय जन्नत (स्वर्ग) आमच्या मातेच्या चरणांखाली आहे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या साथीदारांना सांगितले की त्यांनी आपल्या माता-पित्याशी दयापूर्ण व्यवहार करावा, मग त्यांचा धर्म कोणताही असो.

त्यांची सहाबिया (निकटवर्ती अनुयायी) हजरत अस्मा (रजि.) म्हणतात, ''माझी आई, जी ईमान राखणारी नाही, ती मला भेटण्यासाठी मक्केहून मदीना येथे आली आणि ती माझ्याजवळ काही मागत आहे, तर काय मी तिची मागणी पूर्ण करावी?''

त्यावर पैगंबर (स.) यांनी फर्माविले, ''होय, आपल्या मातेशी दयापूर्ण वर्तन करा.''

जेव्हा एका माणसाने पैगंबर मुहम्मद (स.) यांना विचारले तेव्हा पैगंबर (स.) यांनी अतिशय सुंदर शैलीत सांगितले की एका स्त्रीची कशी

विशेष मान-प्रतिष्ठा आहे.

प्रश्नकर्त्याने त्यांना विचारले, ''हे अल्लाहचे पैगंबर! माझ्याकडून सर्वाधिक सद्वर्तन केले जाण्यास आणि सोबत राहण्यास पात्र कोण आहे?''

पैगंबर (स.) यांनी फर्माविले, ''तुमची माता''

त्या व्यक्तीने विचारले, ''तिच्यानंतर कोण?''

पैगंबर (स.) यानी पुन्हा फर्माविले, ''तुमची माता.''

त्याने पुन्हा विचारले, ''तिच्यानंतर कोण?''

पैगंबर (स.) म्हणाले, ''तुमची माता.''

मग त्याने चौथ्यांदा विचारले, ''तिच्यानंतर कोण?''

यावर पैगंबर (स.) यांनी फर्माविले, ''तिच्यानंतर तुमचा पिता.''

याहून विशेष हे की पैगंबर (स.) अशा वेळी आपल्या फर्ज नमाजांना संक्षिप्त करीत, जेव्हा ते आपल्या अनुयायींसह नमाज पढत असत कारण मातांकडून बालकांच्या पालनपोषणाची आठवण मातांना नमाजच्या अवस्थेतही येते.

पैगंबर (स.) म्हणत, ''जेव्हा मी नमाज पढण्यासाठी उभा राहतो तेव्हा माझा इरादा असतो की दीर्घ नमाज पढावी. परंतु एखाद्या लहान बाळाच्या रडण्याचा स्वर कानावर येताच मी नमाज अल्पशी करतो, कारण त्या बाळाच्या मातेला मी कोणताही त्रास देणे पसंत करीत नाही.''

# हिजाब किंवा बुरखा

आज मुस्लिम स्त्रीवर सर्वांत जास्त टीका तिच्या पोषाखाबाबत केली जाते. आज अनेकांच्या मनात स्त्री-स्वातंत्र्य किंवा महिला मुक्ती तिचे वस्त्र कमी करण्यात पाहिले जाते. जर एखादी स्त्री कमीतकमी कपडे घालते आणि आपल्या शरीराचे जेवढे जास्त अंग दाखविते, तेवढी जास्त ती स्वतंत्र समजली जाते. वस्तुत: पुरातन काळातील समाजांच्या दलित स्त्रियांना आपले शरीर शक्य तितके समाजात दाखविण्यासाठी प्रोत्साहित केले जात होते आणि जर ती असे करण्यास तयार होत नसे तेव्हा तिच्यावर दबाव टाकला जात असे. खरे तर हे त्यांच्याकरिता स्वातंत्र्याचे प्रतिनिधित्व किंवा हक्क अधिकार प्राप्त करणे नव्हते, किंबहुना याला तिच्या सभोवती असणाऱ्या पुरुषांच्या कामुक इच्छा अभिलाषांची प्राप्ती समजले जात होते, जे वासनापूर्ण नजरेने स्त्रियांना एक टक न्याहाळत असत, ज्याप्रमाणे आजच्या काळातले पुरुष अर्धनग्न स्त्रियांना टक लावून न्याहाळतात.

इस्लाम धर्मात स्त्रियांच्या संदर्भात अधिकतर चर्चा-विवाद 'बुरखा', 'हिजाब' किंवा 'पडदा'विषयी होतात, ज्याला अधीनता, वंचिततेचे माध्यम आणि मागासलेपणाचे लक्षण समजले जाते. 'हिजाब'शी प्रेम राखणारे याचा भावनाशीलपणे बचाव करतात आणि या बचाव करणाऱ्यांवर 'हिजाब'च्या टीकाकारांतर्फे भावनात्मक आणि कठोर हल्ले चढविले जातात. 'हिजाब' या शब्दाचा मुस्लिम स्त्रीचे चाकोरीबध्द संज्ञेत प्रतिनिधित्व करण्याकरिता वापर केला जात राहिला आहे. सध्या तर या शब्दाने प्रतीकात्मक तसेच राजकीय महत्त्व प्राप्त केले आहे. तथापि पवित्र कुरआन पडद्याविषयी काय म्हणतो?

पवित्र कुरआनात 'पडद्या' ('हिजाब' किंवा 'बुरखा') विषयी ज्या

संज्ञेचा वापर केला जातो ती 'हिजाब' आहे. हा शब्द पवित्र कुरआनात आठ वेळा वापरला गेला आहे. उदा. १९:१७, ३८:३२, १७:४५, ४२:५१, ७:४६, ३३:५३, ८३:१५. 'हिजाब'चा शाब्दिक अर्थ 'पडदा', 'विभाजक' किंवा 'स्क्रीन' असा आहे. 'हिजाब'चा ज्या अर्थाने पारंपरिक स्वरुपात वापर केला जातो आणि जो मुस्लिम समाजात समजला जातो, तो कपड्याचा असा एक तुकडा होय जो डोक्यापासून पायांपर्यंत संपूर्ण शरीर झाकतो.

स्त्रियांच्या शील-अब्रूच्या रक्षणाकरिता आणि एक स्वच्छ-शुध्द व पावित्र्यपूर्ण समाज विकसित करण्याकरिता हा आदेश दिला गेला आहे की स्त्रियांनी सैल पोषाख घालावा भारतीय उपखंडात मुस्लिम स्त्रीला डोक्यापासून पायापर्यंत झाकणारे वस्त्र, त्याला 'बुरखा' म्हटले जाते. मध्य-पूर्वेत याला 'नकाब' म्हटले जाते. इराण देशात संपूर्ण शरीराला झाकणारी काळी चादर असते आणि अरब देशांमध्ये जो पडदा मुस्लिम स्त्रिया वापरतात त्याला 'अबाया' असे म्हणतात. जगाच्या इतर देशांमध्ये याला 'स्कार्फ' म्हटले जाते, ज्याद्वारे मुस्लिम स्त्रिया आपले डोके झाकून घेतात.

# हिजाब

## अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी स्त्रियांची पसंती

हिजाब, सैल पोषाख आणि सभ्य पोषाख दिसून येणे दुर्लभ नाही. आजदेखील, त्या स्त्रिया, ज्या आपल्या शरीराचे अंग-प्रत्यंग फिट कपडे घालून दाखवू इच्छित नाहीत, त्यांच्याशी आदरपूर्ण वर्तन केले जाते. या उलट ज्या स्त्रिया चित्रपट अभिनेत्री, नृत्यांगना आणि अर्धनग्न मॉडेल होण्याचे धाडस करतात, त्यांना जाहिरातीच्या माध्यमातून वस्तूच्या स्वरुपात वापरले जाते आणि ती लोभवस्तू बनते. शृंगारसाधने, साबण, शॅम्पू, लिपस्टीक, वॅनिटी बॅग, पोषाख आणि अतिशय खाजगी स्वरुपाच्या वस्तू उदा. शौचालयात वापरला जाणारा नॅपकिन आणि गर्भनिरोधक गोळ्या व साधनांचे उत्पादक कोट्यवधी डॉलर्सचा उद्योग स्त्रियांच्या नग्नतेच्या भरवशावर करतात. जेव्हा शरीरसौंदर्याच्या प्रदर्शनाची गोष्ट येते, तेव्हा पाश्चिमात्य लोक कमीतकमी कपडे घालणाऱ्या स्त्रियांची आणि सूट घालणाऱ्या पुरुषांची निवड करतात. हे त्यांच्या स्त्रीविरोधी भेदभावासंदर्भात बरेच काही सांगते.

पाश्चिमात्य देशांच्या भौतिकवादी समाजाद्वारे मुस्लिम स्त्रियांच्या दडपशाहीवर विलाप आणि पडदा व बुरखावर बंदी घालण्या संदर्भात उचललेली पावले सर्वसाधारण बाब आहे. ही सामान्य गोष्ट आहे की सौंदर्यप्रसाधनांच्या उत्पादकांचे आठ बिलियन डॉलर्सचे उद्योग धंदे त्या वेळी तोट्यात येतील, जेव्हा स्त्रिया आपल्या सौंदर्याला लोकांच्या नजरेपासून आणि टेलीविजनच्या पडद्यापासून हटवून आपल्या पतींसाठी सुरक्षित करून घेतील. यास्तव यात आश्चर्य करण्यासारखे काहीच नाही की पाश्चिमात्य लोक स्त्रियांच्या पश्चिमेकडील संस्कृतीपासून पळ काढून इस्लामच्या छत्रछायेखाली आश्रय घेण्याबाबत विचार करीत आहेत, जिथे त्यांच्या स्त्रीत्वाला मीडियाची

चमक आणि वखवखलेल्या नजरांपासून सुरक्षितता लाभते.

भौतिकवादी समाज, जो स्त्री-स्वातंत्र्याच्या गप्पा मारतो तो आणखी काही नाही तर स्त्रीस्वातंत्र्य आणि त्यांच्या शरीर शोषणाचे एक परिवर्तीत रुप आहे आणि स्त्रियांचा आत्मसन्मान घटविणे, त्यांना प्रतिष्ठेपासून वंचित करणे होय. पाश्चिमात्य समाज दावा करतो की त्याने स्त्रियांचा दर्जा उंचाविला आहे उलट त्याने खरे तर समाजात स्त्रीला रखेल, गर्ल-फ्रेंड आणि सामाजिक फुलपाखरुच्या स्थानाप्रत पोहचविले आहे. जी आनंद शोधणाऱ्या व देहाचा व्यापार करणाऱ्यांच्या हातातले एक खेळणे बनले आहे. ही मंडळी कलेच्या रंगबिरंगी पडद्यांच्या व संस्कृती आणि फॅशन परेडच्या मागे लपलेली आहे.

एक असे युग की ज्यात स्त्रियांना आपल्या पसंतीची निवड करण्याचे जास्तीतजास्त स्वातंत्र्य आहे, ही घोर विडंबना होय की त्यांना अगदी मूलभूत स्वातंत्र्यापासूनही वंचित राखले गेले आहे. त्यांना आपल्या आधुनिक समाजात आपल्या पोषाखाची निवड करण्याचे स्वातंत्र्य नाही. जर एखाद्या स्त्रीला बुरखा घालण्यास भाग पाडणे अत्याचार असेल तर काय बुरखा न घालण्यास विवश करणे तसाच अत्याचार नाही? समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा उदोउदो करणारे, इस्लामच्या अनुयायींवर पोषाखाचे अत्याचारपूर्ण विधान का थोपू इच्छितात?

हिजाब किंवा बुरखा मुस्लिम स्त्रीची वैयक्तिक निवड आहे आणि इतरांनी याचा आदर राखला पाहिजे. इतर धार्मिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक प्रतीकांना किंवा विशिष्ट पोषाखांना, उदाहरणार्थ, ख्रिश्चन नन्सचा पोषाख, पास्टरचा रोब, डॉक्टरचा ॲपरन, न्यायाधीश आणि वकीलांचा काळा कोट, पगडी, टोपी, क्रासची लॉकेट्स इत्यादींना केवळ सहनच केले जात नाही तर त्यांचा खूप आदर-सन्मान राखला जातो. वस्तुत: बुरखा त्या पोषाखाहून खूप वेगळा नाही, जो ख्रिश्चन नन्स घालतात, तेव्हा इस्लामी हिजाबच्याबाबतीत आणि शालीनतेच्या नियमांबाबतच हा दुहेरी मानदंड का अंगीकारला जातो?

सहनशील असण्याचा अर्थ केवळ हा नव्हे की फक्त अशाच लोकांना स्वीकारले जावे, जे पूर्णत: त्यासारखेच दिसून यावेत, किंबहुना इतर लोकांची

पसंती स्वीकारणे सहनशीलता आहे. विशेषत: अशा वेळी जेव्हा तुम्ही त्यांच्याशी सहमत नसाल आणि त्यांना समजून घेत नसाल.

ग्लॅमरविश्वातील अनेक स्त्रिया आणि सर्व सामान्य स्त्रिया तथाकथित स्त्रीस्वातंत्र्याच्या आंदोलनांपासून व भौतिकवादी सभ्यतेच्या भ्रमापासून निराश आहेत. हे प्रतिष्ठित जीव इस्लाम आणि हिजाबमध्ये शांती प्राप्त करतात. या कारणास्तव पाश्चिमात्य देशात हजारो स्त्रिया हिजाबचा अंगीकार करीत आहेत जर टोनी ब्लेयरच्या पत्नीची बहीण लॉरेन बूध, मरियम जमीला, (पूर्वाश्रमी मार्गारेट मार्किज) ब्रिटिश पत्रकार अथवा मल्याळम कवयित्री कमला सुरैय्याला इस्लामच्या प्रांगणात शांती लाभते तर आश्चर्याची बाब नाही. आमच्या देशातदेखील 'सीएनएन-आयबीएन'तर्फे घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाने हे तथ्य समोर आले आहे की ''स्त्रिया आपल्या स्त्री सुलभ लज्जेपायी स्वेच्छेने बुरखा स्वीकारतात आणि अशाने त्यांना छेडछाड व धोका देणाऱ्यांपासून सुरक्षितता जाणवते.''

यावरून हा निष्कर्ष निघतो की डोक्यावर स्कार्फ घालण्याच्या परिणामी अधिकतर मुस्लिम स्त्रियांमध्ये नकारात्मक भावना आढळत नाही. जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इस्लामचा संदेश पोहचविला त्यानंतर १४५० वर्षांच्या कालावधीत हे तथ्य स्पष्ट आहे की आजही स्त्रिया शालीनता आणि धार्मिक ओळख दर्शविणारे कपडे अभिमानाने घालतात. अधिक हे की मुस्लिम स्त्रियांचे आपले नखशिखान्त झाकून घेण्याचे आचरण त्याची स्वत:ची पसंती आहे, ज्यास त्या स्वतंत्रपणे करतात, यासाठी त्यांच्यावर कोणी दबाव आणत नाही, जसे की पाश्चिमात्य देशांमध्ये अपप्रचार करताना नेहमी असेच चित्र रेखाटले जाते. एका स्त्रीच्या शब्दात, या स्त्रिया अशा प्रकारचे वस्त्र अंगावर घालण्याची निवड अल्लाहच्या प्रसन्नतेखातिर करतात. वास्तविक, इतर स्त्रिया ज्या प्रकारचे कपडे घालतात, ज्या समाजात ते राहतात त्यास खूश करण्याकरिता घालतात.

# हिजाब

## बुध्दिमत्ता आणि सुसंस्कृतपणाचा कळस

यमन देशाची महिला कार्यकर्ता आणि इ. सन २०११ ची नोबल पारितोषिक विजेता तवक्कोल कारमेनपेक्षा अधिक कोणत्याही स्त्रीने त्या सन्मानाला साकार रुप दिले नाही, जो स्त्रियांना इस्लाम धर्मात प्राप्त आहे. त्यांनी नॉर्वेची राजधानी ओस्लोच्या सिटी हॉलमध्ये नोबल पुरस्कार समारंभात अबाया आणि स्कार्फ घालून व्यासपीठावर येऊन आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांना आणि इलेक्ट्रानिक मीडियाला आश्चर्यचकित केले. त्यांनी तिला विचारले,

''काय तुम्हाला नाही जाणवत की तुमचा हा पोषाख तुमच्या शिक्षण आणि बौध्दिक स्तराला पाहता, त्याच्या उलट आहे. कारण हिजाबला स्त्रियांच्या दमन आणि मागासलेपणाचे लक्षण या स्वरुपात पाहिले जाते.''

त्यावर तवक्कोल कारमेनने उत्तर दिले,

''सुरुवातीला माणूस सुमारे नग्नावस्थेतच राहत होता, कालानुक्रमे आपल्या विचार चिंतनाच्या विकासासह त्याने कपडे घालायला सुरुवात केली. आज मी जी काही आहे आणि जे काही मी अंगावर घातले आहे ते बुद्धी आणि सुसंस्कृतपणाचे शिखर आहे, ज्यापर्यंत मनुष्य युगायुगांच्या प्रदीर्घ प्रवासानंतर पोहोचला आहे. हे मागासलेपण नव्हे. उलट नग्नता मागासलेपणाचे प्रतीक आहे आणि या गोष्टीचेही प्रतीक आहे की माणसाची विचारसरणी आदिकाळाकडे मागे गेली आहे.''

# मुस्लिम स्त्रियांसंबंधी आजचे काही वादग्रस्त मुद्दे

## प्रश्न आणि उत्तर

**इस्लामी कायद्यात स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत अर्धा वारस हिस्सा का मिळतो?**

इस्लामपूर्वी अरब समाजात केवळ पुत्रांनाच वारसाधिकार प्राप्त होता. परंतु कुरआनने आदेश दिला की कन्यांनाही पित्याच्या संपत्तीतून पुत्रांच्या तुलनेत अर्धा हिस्सा दिला जावा. तत्कालीन समाजात हे एक क्रांतिकारक पाऊल होते. जिथे स्त्रिया स्वत: मालमत्ता समजल्या जात होत्या आणि वारसाधिकाराने त्या बापाकडून पुत्राकडे स्थानांतरित केल्या जात होत्या अर्धा हिस्सा देण्या मागे दोन हेतु होते. एक हा की स्त्रियांना स्वतंत्र आणि स्वाधीन व्यक्तिमत्त्वाच्या स्वरुपात मान्यता दिली जावी आणि दुसरा त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जावे.

पवित्र कुरआनने आदेश दिला की स्त्रियांना आपल्या पिता आपले पती आणि आपल्या पुत्रांनी मागे सोडलेल्या संपत्तीत हिस्सा दिला जावा. एवढेच नव्हे तर अपत्यहीन भावांच्या संपत्ति मधूनही. पवित्र कुरआनाच्या तीन आयती ज्यात जवळच्या नातेवाईकांच्या हिश्श्यांसंबंधी सविस्तर वर्णन दिले गेले आहे त्या सूरह अन् निसाच्या आयत क्र. ११,१२ आणि १७६ आहेत. या तीन आयतींमध्ये, सर्व श्रेष्ठ अल्लाहने लहान बालके, माता-पिता आणि पती-पत्नीच्या अधिकारांना खास हिश्श्यानुसार निर्धारित केले आहे आणि यास माणसाच्या फैसल्यावर आणि त्याच्या भावनांवर सोडले गेले नाही. वारसाची इस्लामी व्यवस्था पूर्णपणे अल्लाहला मानवी गरजांचे सर्वोत्तम ज्ञान असल्यामुळे पूर्णत: संतुलित आहे.

आजच्या संदर्भात पाहिल्यास स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत आपल्या पित्याने मागे सोडलेल्या संपत्तीतून अर्धा हिस्सा दिला जाणे अन्यायपूर्ण वाटू शकते. परंतु जेव्हा कोणी सातव्या शतकाच्या अरब समाजाच्या स्थितीवर विचार केला तर हे स्पष्ट कळेल की ही पैगंबर (स.) आणि इस्लामतर्फे एक विशेष सुरुवात होती आणि स्त्रियांना संपत्ती व साधनांची मालकीण बनविण्याचे एक पाऊल होते. त्याच्यापूर्वी ती संपत्तीचे स्वामीत्व, नियंत्रण, वापर आणि उपयोग तसेच गुंतवणूकीविषयी कल्पनाही करू शकत नव्हती. आम्ही हे मान्य केले पाहिजे की स्त्रियांना आपल्या भावांच्या तुलनेत अर्धा हिस्सा दिला गेला आहे, त्यांचा हिस्सा निम्मा केला गेला नाही जर या दृष्टीने पाहिल्यास कोणताही मनुष्य या गोष्टीची प्रशंसाच करेल. आता आम्ही आपले लक्ष स्त्रियांच्या भूमिकडे वळवू आणि स्त्रियांना वारसात जो वाटा मिळतो त्याच्या उपयुक्त असण्यावर विचार करू या. जर आम्ही स्त्रियांच्या समाजातील भूमिकेकडे लक्ष दिले तर असे कळून येईल की इस्लाम व कुरआनने त्यांना जे काही दिले होते ते अन्यायपूर्ण नव्हते. हे त्यांच्या धनविषयक आणि आर्थिक जबाबदारींच्या तार्किक स्वरुपाशी सुसंगत आहे. कारण त्यांच्या जबाबदाऱ्या पुरुष वारसदारांच्या तुलनेत फार कमी आहेत. इस्लाम, कुटुंबाचा अन्न-वस्त्रासह सर्व खर्च उचलण्याची जबाबदारी पुरुषावर टाकतो. पत्नी, मुलेबाळे आणि माता-पित्याची देखभाल करण्याची जबाबदारी पुरुषाची आहे. हेच ते लोक होत जे त्यांना अन्न, वस्त्र आणि निवारा देतात, त्यांना शिक्षण देतात आणि त्यांचा विवाह करून देतात. यास्तव स्त्रियांना वास्तव जीवनाच्या खर्चांपासून पुरुषांच्या तुलनेत मुक्त राखले गेले आहे. अशा परिस्थितीत जर तिला आपल्या पुरुष नातेवाईकांच्या तुलनेत अर्धा वाटा मिळत असेल तर याला त्यांच्या रास्त हिश्श्यापेक्षा अधिक समजले पाहिजे आणि कायद्याच्या दृष्टीने न्याय म्हटला गेला पाहिजे. तेव्हा, आम्ही जेव्हा स्त्रियांच्या अनेकविध भूमिकांवर नजर टाकतो तेव्हा कन्येच्या रुपात ती पित्याच्या देखरेखी खाली असते आणि मातेच्या रुपात आपल्या पुत्रांच्या देखभालीत असते, तात्पर्य त्यांची आर्थिक जबाबदारी काहीच नसते. त्यांना जे काही मिळविण्याचा अधिकार दिला गेला आहे तो त्यांच्यासाठी पर्याप्त आहे.

यास्तव लिंगाच्या आधारावर भेदभावाच्या आरोपात कसलेही वजन नाही यावरून स्पष्ट होते की इस्लाम धर्म स्त्रिया व पुरुषांच्या दरम्यान त्यांच्या धार्मिक जबाबदाऱ्या आणि अधिकारांच्या दरम्यान संतुलन कायम करू इच्छितो. पुरुष आपले धन स्त्रिया आणि मुलाबाळांवर खर्च करण्यास बाध्य असतात, उलट स्त्रिया आपले धन वाचवू शकतात, गुंतवणूक करू शकतात. संपत्तित हिश्श्याव्यतिरिक्त पुरुषांना सांगितले गेले आहे की त्यांनी विवाहप्रसंगी आपल्या पत्नींना महरची रक्कम अदा करावी.

समजा कोणी एक पुत्र आणि एक कन्या सोडून मरण पावतो जेव्हा पुत्र आपल्या पत्नीला महर देईल तेव्हा त्याने वारसाधिकाराने प्राप्त केलेली संपत्ती कमी होईल कारण तो आपल्या कुटुंब आणि बहिणीवर खर्च करीत राहिल, जोपर्यंत तिचा विवाह होत नाही. यास्तव काम करून त्याला अधिक अर्थोपार्जन करावे लागेल, वास्तविक, त्याच्या बहिणीचा हिस्सा पूर्णत: शिल्लक राहिल आणि जर तिने गुंतवणूक केली तर तो आणखी जास्त वाढेल. जेव्हा तिचा विवाह होईल तेव्हा तिला आपल्या पतीकडून महर मिळेल आणि तिचा पती तिचा खर्चही भागविल आणि तिच्यावर खर्चाची कोणतीही जबाबदारी नसेल. अशा प्रकारे कोणी पुरुष हा निष्कर्ष काढू शकतो की इस्लामने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची बाजू घेतली आहे.

**सर्व पाश्चिमात्य देशांमध्ये स्त्रियांनी मताधिकार मिळविला असला तरी अनेक मुस्लिम देशांमध्ये स्त्रियांना अजूनही हा हक्क का दिला गेला नाही?**

लोकशाही प्रणाली अंगीकारलेल्या सर्व मुस्लिम देशांनी स्त्रिया आणि पुरुषांना मतदानाचा आणि निवडणूक लढण्याचा समान हक्क प्रदान केला आहे. अशा देशांमध्ये स्त्रियांनी केवळ मतदानाचा हक्कच बजावला नाही तर त्यांनी काही देशांमध्ये मानाची पदे भूषविली आहेत उदा. तुर्कीत कु. तानसु सिलर इ. सन १९९३ ते १९९६ पर्यंत पंतप्रधान पदी राहिली. बांगला देशात इ. सन १९९१पासून सतत सरकारचे नेतृत्व दोन बेगमा करीत आहेत. पाकिस्तानात बेनजीर भुट्टो दोन वेळा पंतप्रधानपदी राहिली आणि सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेल्या इंडोनेशियात मेघावती सुकार्नोपुत्री चार वर्षे राष्ट्राध्यक्ष राहिली. केवळ सहा खाडी देश असे आहेत, जिथे राजा राज्य

करतो. तिथे स्त्री किंवा पुरुष कोणालाही मतदानाचा अधिकार नाही. तथापि कुवैतमध्ये एक निवडून दिलेले पार्लमेंट आहे, जिथे स्त्रियांना मत देण्याची अनुमती आहे आणि निवडणूकीत उभे राहण्याचीही. परंतु कुवैतच्या पार्लमेंटला मर्यादित अधिकार आहेत आणि त्याने घेतलेल्या निर्णयांना कुवैतचा अमीर रद्द करू शकतो. सऊदी अरबमध्ये नागरी गटांच्या माध्यमाने लोकशाहीच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे, जिथे फक्त पुरुष मतदानाचा हक्क बजावू शकतात. इ. सन २०१५ नंतर स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्याचा वायदा केला गेला आहे. आशा आहे की बादशहांद्वारे राज्यकारभार चालविले जाणारे हे देश लवकरच इतर देशांचे अनुकरण करीत स्त्रियांना मतदानाचा व निवडणूक लढण्याचा हक्क देतील. तथापि लोकांना मतदानाचा हक्क देण्यापूर्वी लोकशाहीचे आगमन झाले पाहिजे. हे स्मरणात ठेवणे लाभप्रद ठरेल की अधिकांश पाश्चिमात्य लोकशाहीमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार गेल्या शतकाच्या सुरुवातीलाच मिळू शकला.

परंतु राजेशाही केवळ मुस्लिम देशांपुरती मर्यादित नाही चीन जगाची एक मोठी शक्ती असतानाही कम्युनिस्ट पक्षाच्या हुकूमशाहीच्या ताब्यात आहे आणि तिथे कोणालाही मतदानाचा हक्क प्राप्त नाही.

जोवर इस्लामचा संबंध आहे, तो राजकीय सल्लामसलतीच्या संदर्भात पुरुष आणि स्त्रियामध्ये फरक करत नाही. पैगंबर (स.) यांच्या मृत्युनंतर खिलाफतकाळात खलीफाची नेमणूक सल्लामसलतीच्या प्रक्रियेनंतरच होत असे. ज्यात स्त्रिया आणि पुरुष, दोघांचाही सल्ला घेतला जात असे. एकदा खलीफाची नेमणूक निश्चित झाली की स्त्रिया आणि पुरुष दोन्ही त्यांच्याशी बैअत् करण्यास येत.

जेव्हा आम्ही इस्लामी इतिहासाच्या सुरुवातीच्या काळाचे अवलोकन करतो, तेव्हा आम्ही पाहतो की तिसऱ्या खलीफाच्या निवडप्रक्रियेत प्रसिध्द सहाबी अब्दुल रहमान इब्ने औफने मदीनाच्या प्रत्येक व्यक्तीचे मत घेण्याची जबाबदारी घेतली होती कारण त्यांना हे जाणून घ्यायचे होते की इस्लामी राज्याच्या जबाबदारी संदर्भात लोकांचा दृष्टिकोन काय आहे? खरे तर, या प्रक्रियेत त्यांना मदीनाच्या प्रत्येक स्त्री व पुरुषाकडून त्यांचा दृष्टिकोन जाणून

घ्यायचा होता. आपल्या प्रयत्नांनंतर त्यांनी घोषित केले :

''मी मदीनाच्या प्रत्येक व्यक्ती-पुरुष, स्त्री आणि तरुणाकडून दृष्टिकोन जाणून घेतला आणि मला असे आढळून आले की त्यांच्यापैकी सर्व अलीपूर्वी उस्मानला खलीफा बनविणे पसंत करतात.''

(अवासिम मिनल कवासिम इब्न अल अरबी)

याद्वारे आम्हाला हा संकेत मिळतो की त्या स्त्रियांचाही सल्ला घेतला गेला ज्या आपल्या घरात व्यस्त होत्या. अशा प्रकारे स्त्रियांना मतदानाच्या हक्कापासून वंचित राखण्याचा कोणताही पुरावा नाही, जो इस्लामी साक्षीवर आधारित असावा आणि खरे पाहता हे पैगंबरांच्या निकटतम अनुयायीं (सहाबीं) च्या निर्धारित रीतिविरुध्द आहे, जी सर्वसंमतीकरिता उपयुक्त आहे.

इस्लामच्या सुरुवातीच्या दोन शतकांनंतर स्त्रियांचे स्थान गौण झाले, ज्यामुळे त्यांची भूमिका दुय्यम दर्जाची झाली.

# स्त्रियांचा शिक्षणाचा व वाहन चालविण्याचा हक्क

असे पाहण्यात आले आहे की मुस्लिम स्त्रियांना शाळेत जाण्याचा किंवा उच्च शिक्षण घेण्याचा अधिकार नाही आणि काही मुस्लिम देश त्यांना कार चालविण्याची अनुमती देत नाही. काय याचा इस्लामी शरीअतशी काही संबंध आहे?

शिक्षणाच्या अधिकारावर प्रतिबंधांच्या उलट इस्लाम धर्म स्त्रिया आणि पुरुष दोघांचाही शिक्षण घेण्याचा अधिकार मान्य करतो. या संदर्भात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

> ''ज्ञान प्राप्त करणे प्रत्येक मुस्लिम पुरुष आणि स्त्रीचे अनिवार्य कर्तव्य आहे.''

अधिकांश खाडी देशात आणि मिस्रमध्येही युनिवर्सिटीच्या विद्यार्थ्यांमध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे आणि जनसामान्यात पदवीधरांची संख्या स्त्रियांचीच अधिक आहे. हे मागील काही दशकांमध्ये होऊ शकले, याचे कारण स्त्रियांसाठी अनेक सुविधा पुरविल्या गेल्या आहेत. हे केवळ रुढिवादी तालिबानच आहेत जे शाळेत जाणाऱ्या मुलींवर बॉम्ब फेकत राहिलेत. त्यांच्या या कृत्याला इस्लामच्या कोणत्याही अँगलने समर्थन प्राप्त होत नाही.

जेथपर्यंत स्त्रियांच्या कार चालविण्याचा प्रश्न आहे, तर याबाबतीत सऊदी अरबच कठोर नियम राखतो. सऊदी अरब एक रुढिवादी राजतंत्र आहे. तिथले शासक या गोष्टीचे भय बाळगतात की स्त्रियांना वाहन चालविण्याची अनुमती दिल्याने स्त्रिया व पुरुष दोघांमध्ये घनिष्टता वाढेल. तथापि इस्लामी

शरीअत स्त्रियांना घोडेस्वारी करण्यास अनुमती देते. पैगंबर (स.) यांच्या काळात स्त्रिया घोडे किंवा उंटांवर स्वार होत असत. हा आदर्श लक्षात घेता, स्त्रियांच्या आवागमनावर कोणताही प्रतिबंध असू नये. केवळ महिला आणि पुरुषांच्या स्वतंत्र मेळ-मिलापाच्या भयामुळेच कार चालविण्यावर पूर्णपणे प्रतिबंध घातला जाऊ नये. जो देश असे करीत आहे तो केवळ आपल्या इच्छेने असे करीत आहे आणि तो निश्चितपणे याबाबतीत शरीअतचे उल्लंघन करीत आहे. अशा प्रकारच्या प्रतिबंधासाठी इस्लाम धर्माला दोषी ठरविणे अगदी अनाठायी व अनुचित आहे.

# बहुपत्नित्व आणि एकपत्नित्व

बहुपत्नित्व म्हणजे एकाहून अधिक पत्नी बाळगणे आणि याहून अधिक स्पष्ट सांगायचे तर एखाद्या पुरुषाने एकाच वेळी जास्त पत्नी बाळगणे आणि एकपत्नित्वात एका वेळी फक्त एकच पत्नी बाळगण्याची रीत आहे.

## बहुपत्नित्व : एक पाश्चिमात्य हत्यार

इस्लामचे कट्टर शत्रू आणि अज्ञानी लोकांनी अनेक विवाहांच्या निमित्ताने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर टीका केली, वस्तुत: या टीका करणाऱ्यांनी पैगंबरांच्या अनेक विवाहांचा हेतु, त्यांचा स्वभाव धर्म त्यांचे राहणीमान या गोष्टींचा गांभीर्याने अभ्यास केला नाही. सर्व प्रकारची टीका कसल्याहि ऐतिहासिक पुराव्याविनाच केली गेली. त्यांच्याकडे एखादे तर्कसंगत प्रमाणही नाही की ज्यावर विचार केला जावा. तेव्हा ही टीका, घोर अज्ञान, धार्मिक पूर्वग्रह, किंवा पैगंबर (स.) विषयी तिरस्कार आणि त्यांच्या, जीवनाविषयीच्या विशिष्ट तत्त्व ज्ञानामुळे आहे, ज्यापासून टीका करणारे यास मान्यता दिल्याविना लाभान्वित होत आहेत. असा विवाह कधी कधी अशासाठी उभा केला जातो की पैगंबर (स.) यांच्याद्वारे मानव-सभ्यता आणि संस्कृतीवर केल्या गेलेल्या खऱ्या सहभागाची उपेक्षा केली जावी. सर्वांत प्रथम आम्ही हे विसरु नये की नैतिकता लागू करण्याकरिता एकपत्नित्व एक पाश्चिमात्य हत्यार आहे आणि ही अलीकडचीच दृश्य घटना आहे. मध्ययुगात जगातील अधिकांश भागांमध्ये बहुपत्नित्व प्रचलित होते. पुरुष शेकडो पत्नीं बाळगणे हा सामाजिक प्रतिष्ठेचा मानदंड होता. पैगंबर ईसा (अलै.), ज्यांनी विवाह केला नव्हता, त्यांच्याव्यतिरिक्त अधिकांश पैगंबरांनी अनेक विवाह केले होते. येथपर्यंत की सेंट लोकही रखेल वगैरे ठेवत. अरब देशात स्त्रियांना

खाजगी प्रापर्टीपेक्षाही तुच्छ समजले जात होते. पिता आपल्या नवजात बालिकेला जिवंतपणी जमिनीत गाडून टाकत. विवाह सामाजिक सुगमतेकरिता केले जात होते. तलाक सर्व सामान्य स्वरुपात होत आणि त्यांना वाईट समजले जात नव्हते. आजच्या पाश्चिमात्य जगात व्यभिचार, एक सामान्य बाब झाली आहे. (आकस्मिक यौनसंबंध राखण्यात विभिन्न जोडीदारांमध्ये फरक केला जात नाही)

आजदेखील बहुपत्नित्व मुसलमानांमध्ये, पाश्चिमात्य आणि पौर्वात्य देशांमध्ये वैधरीत्या तर काही अवैधरीत्या आणि काही कपटाचाराने अंगीकारले जाते. काही लोक गुप्तपणे करतात तर काही सार्वजनिकरीत्या. यावर जास्त संशोधन करण्याची गरज नाही की हे जाणून घेतले जावे की कोठे आणि कशा प्रकारे जास्त संख्येत विवाहित लोक खाजगी स्वरुपात रखेल ठेवतात आणि आपल्या प्रेयसींमागे धावतात. किंवा सर्वसामान्यपणे अन्य स्त्रियांच्या नादी लागतात. नैतिकता वाद्यांना हे पसंत पडो किंवा न पडो. खरी गोष्ट ही की अवैध स्वरुपाचे बहुपत्नित्व प्रचलित आहे आणि हा प्रकार सर्वत्र पाहिला जाऊ शकतो.

## यहूदी धर्मात बहुपत्नित्व

बायबल आणि तलमूदचे कालखंड हे दर्शवितात की पुरातन इस्रायली लोक अनेक विवाह करीत असत आणि काहींच्या जवळ तर शेकडो पत्नी असत. तलमूदचा कायदा आणि मूसाचा कायदा याला प्रोत्साहन देत असे आणि त्यांचे अधिकांश पैगंबर एकाहून जास्त पत्नी राखत. विकीपीडियानुसार पैगंबर इब्राहीम (अलै.) यांच्या दोन पत्नी (सारा आणि हाजरा) होत्या, पैगंबर सुलेमान (अलै.) यांच्या सातशे पत्नी आणि तीनशे दासी होत्या. पैगंबर याकूब (अलै.) यांच्या चार पत्नी होत्या. पैगंबर दाऊद (अलै.) यांच्या आठ आणि पैगंबर मूसा (अलै.) यांच्या चार पत्नी (सफिया, गिबशिया बिन्त किनि, बिन्त हुबाब) होत्या. इन्सायक्लोपीडिया बिबलिकानुसार ''एक सामान्य ज्यू चार पत्नी करू शकतो आणि एक राजा

अठरा पत्नी बाळगू टाकतो.''

बहुपत्नित्वाची प्रथा रब्बी जरसौन बिन यहूदा (इ. सन ९६० ते १०३०) पर्यंत होती, ज्याने बहुपत्नित्वाविरुध्द एक आदेश जारी केला. गुराखी ज्यू संप्रदायाचे लोक या प्रथेवर इ. सन १९५० पर्यंत कायम राहिले, जेव्हा इस्राईलच्या चीफ रब्बीनेटच्या एका कायद्यान्वये एकापेक्षा अधिक विवाह करण्यावर प्रतिबंध घातला गेला.

तथापि हे दुरुस्त नव्हे की ज्यू धर्म आणि ख्रिश्चन धर्म नेहमी एकपत्नित्वाचे समर्थक राहिले आहेत किंवा बहुपत्नित्वाचे पूर्णपणे विरोधक राहिले आहेत आणि आजही नाहीत. काही विख्यात ज्यू विद्वानांची पुस्तके उदा. एस. डी. गोयटीन लिखित 'ज्यूज ॲन्ड-अरब्स' (यहूदी आणि अरब) एल. टी. हॉबहाऊस लिखित 'मॉरल्स इन इवोल्यूशन' (उत्क्रांतिवादात नीतीमत्ता) आणि इ. ए. वेस्टमार्क लिखित 'अ शॉर्ट हिस्ट्री ऑफ मॅरेज' (विवाहाचा संक्षिप्त इतिहास) इ.द्वारे आम्हाला असे कळून येते की अनेक विवाह करणारे ज्यू प्रवासी इस्रायली हाऊसिंग अधिकारी वर्गाकरिता समस्या आणि लज्जेचे कारण बनत आहेत. मार्मन ख्रिश्चनांची अवस्था सर्वांनाच ठाऊक आहे. त्याचप्रमाणे आफ्रीकी व आशियाई पाद्रींचा दृष्टिकोन आहे जो बहुपत्नित्वाला, निष्ठाहीनता, व्यभिचार आणि अवैध संबंधांवर अग्रक्रम देतात.

औपचारिकरीत्या, दृढतेने एकपत्नित्व आणि देह व्यापार, समलैंगिकता, अवैध संबंध, निष्ठाहीनता आणि सामान्य लैंगिक स्वैराचार इ.च्या बाबतीत जेव्हा आम्ही अभ्यास करतो तेव्हा या दोघांच्या दरम्यान आम्हाला परस्पर-संबंध आढळून येतो. ग्रीक-रोमन आणि ज्यू-ख्रिश्चन संस्कृतींचे ऐतिहासिक विवरण या संदर्भात याहून जास्त अर्थपूर्ण आहे, जसे की कुटुंबाच्या कोणत्याही पातळीच्या सामाजिक इतिहासावरून हे कळून येईल.

# ख्रिश्चन धर्मात बहुपत्नित्व

बायबलच्या अवतरणकाळात बहुपत्नित्व सामान्यपणे मान्य केले जात असे आणि ते प्रचलितही होते. असे काही ज्ञात नाही की ईसा मसीह यांनी अनेक विवाहांविरुध्द काही सांगितले असावे. याला धार्मिक, सामाजिक आणि नैतिक स्वरुपात मान्य केले जात असे. याबाबत कसलाही आक्षेप घेतला जात नसे. संभवत: हेच कारण होय की स्वत: बायबलनेही या विषयावर कसलीही चर्चा केली नाही. बायबल याला न मनाई करते, न नियमित करते आणि न याची मर्यादा निश्चित करते. काही लोकांनी 'टेन वर्जिन' (दहा कुमारिका) च्या कथेचे स्पष्टीकरण अशा प्रकारे केले आहे, जणू त्या काळी दहा पत्नी बाळगणे वैध होते. पैगंबर, राजा आणि अभिजनांसंबंधी बायबलचे किस्से अविश्‍वसनीय आहेत. ख्रिश्चन राजांचे एकाहून अधिक स्त्रियांशी विवाहाची अनेक उदाहरणे मिळतात. फ्रेड्रिक विलहेल्म द्वितीय आणि फिलिप वसेंट लूथरने स्वत: चर्चच्या समर्थनाने एकापेक्षा अधिक विवाह केले. कमी लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्याकरिता न्यूरेमबर्ग येथे इ. सन १६५०मध्ये आयोजित संमेलनात लोकांना एकापेक्षा अधिक विवाह करण्याची अनुमती देण्यास संमती दिली.

अगदी १७ व्या शतकापर्यंत ख्रिश्चन चर्च अनेक विवाहाच्या प्रथेस मान्यता देत राहिली. मारमनो (नंतरच्या संतांचे चर्च ऑफ जिझस क्राइस्ट) ने अनेकविवाहांच्या प्रथेला मान्यता दिली.

यावरून असे दिसून येते की अनेकपत्नित्वाची प्रथा एक वैध प्रथा म्हणून सर्व देशात व काळ खंडात प्रचलित राहिली आहे. ज्यूच्या पैगंबरांनी एकाहून जास्त विवाह केले आणि पैगंबर ईसा (अलै.) यांनीही यास मनाई केली नाही.

एकपत्नित्वाचे प्रचलन पोप पॉलच्या काळात झाले, जेव्हा ख्रिश्चन धर्मात अनेक सुधारित आवृत्त्या झाल्या होत्या. एकपत्नित्वाचा चर्चने अशासाठी अंगीकार केला की ख्रिश्चन धर्माला ग्रीक आणि रोमन संस्कृतींच्यानुसार बनवायचे होते आणि त्यांच्या संस्कृतीचे समर्थन करायचे

होते. जिच्यातले पुरुष एकच विवाह करीत असत, तथापि त्यांच्या उपयोगासाठी इतर अनेक दासी होत्या. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्यांच्यात बहुपत्नीकत्वाची कोणतीही मर्यादा नव्हती.

आरंभीच्या ख्रिश्चनांनी या विचार प्रवाहाचा शोध लावला होता की स्त्रिया पापाने भरलेल्या असतात आणि पुरुषासाठी हे अधिक चांगले की त्याने कधीही विवाह करू नये. परंतु असे केल्याने सर्व मानवजाती समाप्त होईल. यास्तव याच लोकांनी आपल्या त्या विचारसरणीशी तडजोड करून घेतली आणि सांगितले की, ''विवाह करा, परंतु फक्त एक.''

## हिंदू धर्मात बहुपत्नित्व

पुरातन काळापासून बहुपत्नित्व मानव समाजाची एक मान्यता प्राप्त संस्था राहिली आहे आणि इतिहासात माहीत असलेल्या प्रत्येक संस्कृतीचा हिस्सा राहिला आहे. प्राचीन भारतात सामान्य परंपरेनुसार अनेक पत्नी बाळगण्याची अनुमतीच नव्हती, किंबहुना या प्रथेला सर्वसामान्यपणे अंगीकारले जात होते. वीकिपीडियानुसार अनेक हिंदू धार्मिक व्यक्ती, ऋग्वेद आणि इतर धार्मिक पुस्तकांमध्ये अनेक पत्नींचा उल्लेख मिळतो, श्रीरामचे पिता राजा दशरथाच्या तीनहून अधिक पत्नी होत्या, ज्यांची नावे कौशल्या, सुमित्रा व कैकयी अशी होती. श्रीकृष्णाच्या १६,१०० पत्नी होत्या, ज्यापैकी राधा, रुक्मिणी सत्यभामा, जम्बावती, सत्या, लक्ष्मणा, कालिंदी, भद्रा आणि मित्रविन्दा या प्रसिध्द पत्नी होत्या.

हिंदू धर्मग्रंथात, मग तो वेद, रामायण, महाभारत, गीता कोणताही असो, त्यांच्यात पत्नींच्या संख्येवर कोणत्याही मर्यादेचा उल्लेख नाही. या धर्मग्रंथांच्यानुसार कोणीही वाटेल तितक्या स्त्रियांशी विवाह करू शकतो. नुकताच इ. सन १९५५मध्ये हिंदू विवाह कायदा संमत झाला, ज्यात हिंदूंकरिता एकापेक्षा जास्त विवाह करणे अवैध घोषित केले गेले. आजच्या काळात ती भारतीय घटना आहे, जी हिंदू पुरुषाला एकाहून जास्त विवाह करण्यास मज्जाव घालते, तथापि हिंदू धर्मग्रंथ त्यावर प्रतिबंध घालत नाहीत.

# पाश्चिमात्य समाजात बहुपत्नित्व

पाश्चिमात्य समाजात जास्त करून जेव्हा पती-पत्नी संबंध तणावपूर्ण होतात, तेव्हा पती सामान्यत: आपल्या पत्नीला सोडचिठ्ठी देतो. त्यानंतर तो विवाह न करताच इतर स्त्रियांसोबत राहतो. पाश्चिमात्य समाजात तीन प्रकारचे बहुपत्नित्वाचे प्रचलन आहे.

(१) मालिका बहुपत्नित्व अर्थात विवाह-तलाक, विवाह तलाक आणि हा क्रम चालत राहतो.

(२) एक पुरुष एका स्त्रीशी विवाह करतो परंतु एक किंवा एकाहून अधिक स्त्रियांशी अनैतिक संबंध ठेवतो.

(३) एक अविवाहित पुरुष अनेक स्त्रियांशी शरीरसंबंध राखतो.

पाश्चिमात्य समाज बहुपत्नित्वला मान्य करीत नाही, परंतु व्यावहारिकदृष्ट्या हा समाज अनेक विवाह करणारा समाज आहे. डॉ. ॲनी बेझन्टच्या शब्दांत पाश्चिमात्य देशात एकपत्नित्व निमित्त मात्र आहे, किंबहुना या देशांमध्ये, खरे पाहता असे बहुपत्नित्व असते, ज्यात कसलीही जबाबदारी नाही. विवाहबाहेरील स्त्रियांना जेव्हा त्यांच्यापासून पुरुषाचे मन भरते तेव्हा तो हळूहळू गल्लीच्या स्त्रीच्या रुपात पतित अवस्थेत सोडून देतो, कारण तिचा पहिला प्रियकर तिच्या भविष्याबाबत जबाबदार नसतो आणि ती बहुपत्नित्व असणाऱ्या घरात एक शरणार्थी पत्नी आणि मातेपेक्षा शंभर पटींनी दयनीय होते. जेव्हा आम्ही पाश्चिमात्य शहरांमध्ये रात्रीच्या वेळी अशा अगतिक स्त्रियांची गर्दी पाहतो तेव्हा आम्हाला हमखास हे जाणवते की पाश्चिमात्यांच्या तोंडी हे शोभा देत नाही की त्यांनी बहुपत्नित्वाबाबत इस्लामवर टीका करावी. स्त्रियांना पतित अवस्थेत गल्ल्यांमध्ये फेकले जाण्याच्या तुलनेत हे अधिक उत्तम व सन्मानपूर्वक आहे की तिने बहुपत्नित्वाचे जीवन जगावे आणि एकाच पुरुषासोबत राहावे, तिच्या कुशीत वैध मुलबाळ असावे आणि समाजात तिला काही मान-प्रतिष्ठा लाभावी. संभवत: नियम कायद्याच्या बाहेर एका अनौरस बालकासह निराश्रित व संरक्षक नसलेल्या स्थितीत एका रात्रीनंतर दुसऱ्या रात्री एका वाटसरुच्या वासनेला बळी पडून आई बनण्यापेक्षा व लोकांच्या

तिरस्कारास पात्र होण्यापेक्षा सवत बनणे अधिक चांगले.

आजच्या पाश्चिमात्य समाजाने संमतीपूर्वक दोन प्रौढ व्यक्तींना यौन-संबंध प्रस्थापित करण्याची परवानगी देऊन बेजबाबदार लैंगिक संबंधांना, अनौरस अपत्यांच्या विपुलतेला आणि अनेक कमी आयुष्य असणाऱ्या कुमारीका मातांच्या संख्येत वाढ घातली आहे, जी पाश्चिमात्य देशांच्या कल्याणकारी व्यवस्थेसाठी भारदस्त ओझे बनली आहे.

काही पाश्चिमात्य पुरुष हा दृष्टिकोन मांडतात की एका विवाहाने स्त्रियांच्या हक्क-अधिकारांचे रक्षण होते. परंतु हे पुरुष खरोखर स्त्रियांच्या हक्क अधिकारांबाबत काळजी करतात काय? खरे तर, समाजात अनेक अशा प्रथा आहेत, ज्या स्त्रियांचे शोषण व दमन करतात, ज्यामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्त्री-मताधिकार आंदोलनापासून आजपर्यंतच्या महिलामुक्ती आंदोलनाच्या संस्था निर्माण झाल्या आहेत.

पाश्चिमात्य समाजाची वास्तविकता ही की एकपत्नित्व विवाह पुरुषांचे रक्षण करतो आणि त्यांना कसल्याही जबाबदारीविना सर्वत्र खेळण्याची परवानगी देतो. सरल गर्भ निरोधक आणि वैध गर्भपाताने स्त्रियांसाठी अवैध यौन-संबंधाचे मार्ग खुले केले आहेत आणि त्यांना तथाकथित लैंगिक क्रांतीसाठी फूस लावली गेली आहे. परंतु ती स्त्रीच होय, जी गर्भपाताचा मानसिक आघात झेलते आणि गर्भनिरोधक उपायांच्या दुष्परिणामांना बळी पडते. पुरुष यौनरोगांचा महारोग हर्पिज आणि एड्स वगैरेकडे डोळे झाक करीत निश्चिंत होऊन निरंतर उपभोगाचा आनंद घेत आहे. पुरुष असे लोक आहेत, ज्यांचे रक्षण एकपत्नित्व विवाह व्यवस्था करते, तथापि स्त्रिया सातत्याने पुरुषांच्या कामवासनेला बळी पडत आहेत. पुरुषप्रधान समाज बहुपत्नित्वाचा अत्याधिक विरोध करतात, कारण याच्यामुळे पुरुष जबाबदारी व एकनिष्ठतेकरिता विवश होतील. आपल्या बहुपत्नित्वाच्या प्रवृत्तींमुळे त्याला जबाबदारींना तोंड द्यावे लागेल आणि पत्नी व मुलाबाळांचे पालनपोषण व संरक्षण करावे लागेल.

# इस्लाम धर्मात बहुपत्नित्व

आता इस्लाम धर्माकडे वळू या. पाश्चिमात्य आणि पौर्वात्य देशांमध्ये आम्हाला असे अनेक लोक आढळून येतात, जे समजतात की मुसलमान एक असा मनुष्य असतो जो भौतिक इच्छा-आकाक्षांनी ग्रस्त असतो आणि तो स्वत: अनेक स्त्रियांशी विवाह करतो, मग ती संख्या मर्यादित असो किंवा अमर्यादित लोक हा विचार करतात की मुसलमान एका पत्नीपासून दुसरी पत्नी बदलण्याकरिता पूर्णत: स्वतंत्र आहे आणि हे इतके साधे सरळ आहे, जितके एक घर बदलून दुसऱ्या घरात जाणे अथवा एक पोषाख बदलून दुसरा पोषाख अंगावर चढवणे. मुसलमानांविषयी ही विचारसरणी, भावनात्मक चित्रपट, टी.वी. मालिका, फूटपाथवर विकली जाणारी पुस्तके, प्रसारमाध्यमांद्वारे मुसलमानांचे विकृत चित्रण आणि एका मर्यादेप्रत मुसलमानांच्या बेजबाबदार वर्तनामुळे आणखी जास्त वाढली आहे.

इस्लामकरिता ही दुर्दैवाची गोष्ट होय की पवित्र कुरआनने जो काही आदेश दिला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यानुसार जे आचरण केले, अधिकांश मुस्लिम राज्यकर्त्यांनी त्याची अवहेलना केली आणि शिक्षेपासून बचावाकरिता आपल्या मनाच्या समाधानासाठी त्यांनी मुहम्मद (स.) यांच्या नावाने हदीस-वचने रचली, ज्यामुळे पैगंबर (स.) यांची प्रतिमा डागाळली आणि दोषारोपणासाठी त्यांनी रंगबिरंगी सामग्री उपलब्ध करून दिली.

या परिस्थितीचा अपरिहार्य परिणाम असा झाला की असे अस्थायी अडथळे निर्माण केले गेले की लक्षावधी लोक इस्लामची दैदिप्यमान ज्योत आणि त्याच्या सामाजिक तत्त्वज्ञानाच्या अवलोकनापासून वंचित होत आहेत आणि अशाच लोकांसाठी या मुद्यावर खाली स्पष्ट चर्चा करण्याचा प्रयत्न केला गेला आहे जी वाचल्यानंतर कोणताही मनुष्य आपल्या परिने निष्कर्ष काढण्यास मोकळा आहे.

जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इस्लाम धर्म लोकांसमोर सादर केला, तेव्हा बहुपत्नित्व-प्रथा सर्व सामान्यपणे प्रचलित होती आणि तिथल्या सामाजिक जीवनात याची मूळे खोलवर रुजलेली होती. पवित्र कुरआनने या प्रथेला नजरेआड केले नाही. किंवा तिला बंद केले नाही आणि तिला अमर्यादरीत्या जारी राहू देण्याची अनुमती दिली नाही. पवित्र कुरआन अनेक विवाहांशी संबंधित अनियमितता आणि बेजबाबदारपणापासून तटस्थ राहू शकत नव्हता. ज्या प्रकारे कुरआनने त्या काळच्या व्याप्त इतर सामाजिक परंपरा व रीति-रिवाजांशी केले, तद्‌वतच त्याने बहुपत्नित्वाच्या संस्थेलाही संगठीत केले. त्याला अशा प्रकारे स्वच्छ शुध्द व सुसंस्कृत केले की त्यातल्या पारंपरिक वाईट गोष्टींचे निर्मूलन व्हावे आणि त्याच्या लाभांना निर्धारित करता यावे. पवित्र कुरआनने यात हस्तक्षेप एवढ्यासाठी केला की याला व्यवहारिक बनविणे कुरआनास अभिप्रेत होते आणि कुरआन कौटुंबिक साच्यात अव्यवस्थतेची अनुमती देऊ शकत नव्हता. जो कोणत्याही समाजाचा पाया असतो.

कुरआन एकमेव असा धर्म ग्रंथ आहे जो फर्मावितो,

''एकच विवाह करा.''

'एकच विवाह करा' या आदेशाचा संदर्भ पवित्र कुरआनाच्या चौथ्या अध्यायातील सूरह निसामध्ये आहे :

> ''ज्या स्त्रिया तुम्हाला चांगल्या वाटत असतील तर त्यापैकी दोन किंवा तीन किंवा चार स्त्रियांशी विवाह करा, मात्र जर तुम्हाला भय असेल की तुम्ही त्यांच्या दरम्यान न्यायाने वागू शकणार नाहीत तर फक्त एकाशीच विवाह करा.''

कुरआन अवतरित होण्यापूर्वी बहुपत्नित्वाची कोणतीही मर्यादा नव्हती. पुरुष अनेकानेक पत्नी बाळगू शकत होता. काही जण तर शंभर शंभर पत्नी बाळगत होते. पवित्र कुरआन कोणत्याही परिस्थितीत चार पत्नींची मर्यादा निश्चित करतो. तीही अनेक अटींसह. पुरुषाने आपल्या सर्व पत्नींशी एकसमान वर्तन राखले पाहिजे. प्रेमासंदर्भातही आणि यासोबत हा स्पष्ट

निर्देशही आहे व घोषणादेखील की असे करणे शक्य नाही.

> ''आणि तुम्ही कदापि स्त्रियांना समानरीत्या राखू शकत नाही, तुम्ही असे करू इच्छित असाल तरीही. यास्तव पूर्णपणे एकीच्याचकडे झुकू नका की दुसरीला अंधांतरी सोडून देऊ नका.'' (कुरआन- ४ : १२९)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे शुभ-कथन आहे की जर एका पुरुषाजवळ दोन पत्नी असतील आणि तो अनपेक्षितपणे एका पत्नीच्या तुलनेत दुसऱ्या पत्नीकडे जास्त झुकेल तर कयामतच्या दिवशी त्याचे अर्धे शरीर अपंग होऊन एका बाजूला लोंबकळत राहील. अशा प्रकारे इस्लाम धर्म एकपत्नित्वाला एक नियम आणि बहुपत्नित्वाला अपवाद म्हणून काही असामान्य स्थितीत अनुमती देतो. इस्लामचे धर्म शास्त्री (शरीयत-तज्ज्ञ) इमाम अबू हनीफा (रह.) उल्लेख करतात की पैगंबर (स.) यांनी फर्मावि‍ले, ''एक मनुष्य ज्याच्याजवळ एक पत्नी असेल तो सुखा-समाधानाचे जीवन जगतो. या उलट एक पुरुष दोन पत्नी बाळगल्यावर क्लेश-यातनांना बळी पडतो.'' साधारणत: जगातील समस्त मुसलमानांमध्ये नियम स्वरुपात एकपत्नित्व प्रचलित आहे.

यास्तव इस्लाम धर्मात बहुपत्नित्व एखादा अनिवार्य नियम नाही, किंबहुना एक अपवाद आहे. ती एक सशर्त अनुमती आहे. ती श्रध्दा किंवा आवश्यक अशी बाब नाही. काही लोक हा गैरसमज बाळगतात की मुस्लिम पुरुषाकरिता एकाहून जास्त विवाह करणे अनिवार्य आहे.

पवित्र कुरआनातील उपरोक्त आयत उहदच्या युध्दप्रसंगी अवतरली, जेव्हा अनेक मुसलमान शहीद झाले, त्यामुळे विधवा स्त्रिया आणि अनाथ बालकांचे पालनपोषण करणे उर्वरित मुसलमानांचे अनिवार्य कर्तव्य होते. त्या विधवा आणि अनाथ मुलांचा सांभाळ करण्याचा एक पर्याय विवाहदेखील होता.

या पार्श्वभूमीनंतर हे स्पष्ट होते की इस्लाम धर्माने अनेक विवाह करण्याची प्रथा शोधून काढली नाही आणि त्यासाठी असे नियम रचून त्यास नियमाच्या स्वरुपात प्रोत्साहन दिले नाही. इस्लामने या पध्दतीचे निर्मूलन

अशासाठी केले नाही कारण जर ही पध्दत संपुष्टात आली असती तर ती केवळ एक सिध्दान्त रुपाने संपुष्टात आली असती आणि लोक या रीतिला अंगीकारत राहिले असते, ज्याप्रमाणे इतर लोक अंगीकारतात ज्यांची राज्य घटना आणि सामाजिक मानदंड बहुपत्नित्वाचे समर्थन करीत नाहीत. इस्लाम धर्म जिवित राहण्यासाठी आला आहे. आचरणात राहण्यासाठी आला आहे. तो निलंबित होण्यासाठी आलेला नाही आणि न केवळ सिध्दान्त म्हणून अस्तित्वात राहण्यासाठी आला आहे. तो व्यावहारिक आहे आणि जीवनाविषयी त्याचा दृष्टिकोन अतिशय व्यावहारिक आहे. याच कारणास्तव इस्लाम बहुपत्नित्वाची अटींसह अनुमती देतो. कारण जर बहुविवाहाविना जीवन व्यतीत करणे संपूर्ण मानवजातीच्या हित कल्याणाचे असते तर अल्लाहने निश्चितच ही पध्दत समाप्त करण्याचा आदेश दिला असता. तथापि अल्लाहपेक्षा अधिक चांगले कोण जाणतो?

# पवित्र पैगंबर आणि त्यांचे कौटुंबिक जीवन

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कौटुंबिक जीवनाची अधिकतर इस्लामच्या विरोधक आणि टीकाकारांद्वारे कसून पडताळणी केली जाते. या संदर्भात तुलना केली जाते की ईसा मसीह अविवाहित राहिले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी बारा विवाह केले. धार्मिक विचार चिंतन या विश्वास किंवा अविश्वासावर पुढे गेले की विवाहापासून दूर राहून जीवन व्यतीत करणे प्रेषितत्वाचा आदर्श असला पाहिजे. किंबहुना विवाह करणे व गृहस्थजीवन जगणे अशा सामान्य लोकांचे लक्षण सांगितले जाते जे इच्छा आणि भावनांच्या मागे धावतात.

इस्लाम धर्म जीवनाच्या आध्यात्मिक व ऐहिक बाजूंना एकत्र करतो. तो दोघांत फरक करीत नाही आणि माणसाचे मार्गदर्शन दोन्ही क्षेत्रात करतो आणि आदेश देतो की त्यांनी एकमेकांना वेगळे करू नये. इस्लाम माणसाच्या आध्यात्मिक आणि शारीरिक दोन्ही इच्छा-आकांक्षा मान्य करतो आणि असे मानदंड निर्धारित करतो, ज्यांच्यात राहून इच्छा पूर्ण केल्या जाव्यात आणि घातलेल्या मर्यादांचे उल्लंघन न केले जावे. इस्लाम हे तथ्यही मान्य करतो की जर वैध साधनांद्वारे नैतिक मर्यादांचे पालन करीत शारीरिक इच्छा पूर्ण करण्याची संधी दिली गेली नाही तर मनुष्य जीवनात बिघाड निर्माण होईल आणि नैतिकदृष्ट्या त्याला आतून पोखरुन टाकेल अशाच प्रकारे इस्लाम एक असा समाज विकसित करू इच्छितो, ज्यात लोक आपल्या शारीरिक इच्छांचे समाधान करीत पारदर्शक जीवन पार पाडू शकतील. इस्लाम अविवाहीत जीवन व्यतीत करताना इच्छा-अभिलाषांना दाबण्याच्या नैतिक जोखमीशीही परिचित आहे. जिने भूतकाळात अनेक समाजांना विनाशाच्या खाईत लोटले

आहे. विशेषत: खानकाह आणि ख्रिश्चन मठ दुराचाराचे अड्डे बनले आणि स्कँडल्समध्ये ओढले गेले. समाजाला अशा प्रवृत्तीपासून सुरक्षित राखण्याकरिता इस्लामने आपल्या अनुयायींना, विवाह करण्याचा, गृहस्थ जीवन कायम करण्याचा आणि जन्म व विवाहच्या आधारावर निकोप समाज घडविण्याचा आदेश दिला. यास अनिवार्यही समजले गेले, यासाठी की समाज-घटकांची आर्थिक कर्तव्ये आणि अधिकार निर्धारित करता यावेत आणि व्यक्ती किंवा घटक एकमेकांशी कर्तव्य आणि अधिकारांद्वारे संलग्न राहावेत.

याहून अधिक लाभदायक गोष्ट दुसरी असू शकत नव्हती की पैगंबरांना स्वत:ला आदर्श पती व आदर्श पिता म्हणून प्रस्तुत करण्याचा आदर्श दिला गेला असता. याच संदर्भात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अनेक विधवा स्त्रियांशी विवाह केला संसार थाटला. ही गोष्ट ध्यानी ठेवली पाहिजे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत:ला एक मनुष्य मात्र घोषित केले आणि स्वत:ला न मनुष्याहून कमी, न अधिक असल्याचे सांगितले. मानव-समाजाचा आदर्श एक मनुष्यच असू शकत होता. एखादे अलौकिक व दैवी व्यक्तिमत्त्व आदर्श ठरू शकत नव्हते. एक असे अस्तित्व जे मानवी इच्छा-अभिलाषा आणि गुणांविरहित असावे. ते फक्त फरिश्त्यांच्या वर्गासाठी लाभदायक ठरू शकत होते आणि पावित्र्य व प्रतिष्ठा प्राप्त करू शकत होते. तथापि मानवी चारित्र्याचे ते प्रतिनिधित्व करू शकत नव्हते. ते आश्चर्य व प्रेमाचे केंद्र बनू शकत होते परंतु अनुकरणीय ठरू शकत नव्हते, कारण त्याच्या वैशिष्ट्यांची मूलत: उणीव ही होती की ते मनुष्य नव्हते. याचप्रमाणे केवळ असा पैगंबर, ज्याने विवाह केला असेल घर संसार थाटला असेल तोच याच्या अडी अडचणी व कठीणतेची समज राखू शकत होता आणि याच्या आव्हानांना जाणू शकत होता, असाच मनुष्य आपल्या अनुयायींना अशा जीवनाच्या समस्यांचे निराकरण कशा प्रकारे करावे याचे मार्गदर्शन करू शकत होता. केवळ असाच एक नायक पर्याप्तरीत्या लाभदायक मानला जाऊ शकत होता, जो इतरांकरिता आदर्श ठरू शकत होता, ज्याने जीवनाच्या त्या गंभीर बाबींना झेलले असावे, ज्यांना प्रत्येक सामान्य व्यक्ती आवश्यकरीत्या झेलते.

जर पैगंबर (स.) अविवाहित राहिले असते तर संभवत: ते एक पूर्ण मनुष्याच्या प्रतिमेसाठी उपयुक्त ठरले नसते. एक नायक असणे तर फार लांबचे. आदर्श समाजाविषयीचा त्यांचा दृष्टिकोन अर्धवट राहिला असता आणि ते त्या स्थानाप्रत पोहचले नसते जे त्यांना आज प्राप्त आहे. केवळ अनुभवांनी भरलेले मार्गदर्शनच ही पोकळी भरण्यायोग्य असू शकत होते. याहून अधिक हे की त्याने एक सामान्य माणसाकरिता लैंगिक बाजू, शरीर, कुटुंब आणि समाजाच्या आव्हानांना पेलण्याचे काम अधिक कठीण बनविले असते. कारण त्यात एक अनुभवी नेत्याद्वारे उपयुक्त मार्गदर्शनाची कमतरता राहिली असती. जेथपर्यंत दिव्य मार्गदर्शनाचा संबंध आहे, या क्षेत्रांना नैतिकतेच्या रंगात रंगविण्याचे कार्य अपूर्ण राहिले असते.

# कुरआनाच्या आयती, ज्यांचा चुकीचा अर्थ घेतला गेला आहे

इस्लाम धर्मावर आजतागायत असंख्य टीकाकारांनी व वैरींनी मन सोक्त टीका केली आहे. त्यांचा सर्वांत चांगला खेळ हा की ते इस्लामवर मुस्लिमेतरांविरुध्द हिंसा भडकविण्याचा आरोप लावतात आणि हे लोक अधिकतर जगाच्या त्या भागातून येतात, जे मानवजातीविरुध्द सर्वाधिक वाईट अपराधांमध्ये खितपत पडले आहेत. दोन महायुध्दे (जागतिक युध्दें) बोस्नियाचा वंशविच्छेद, स्टॅलिनचा आतंक, जपानवर आण्विक हल्ला, इराक, अफगाणिस्तान, लीबिया आणि लेबनानचा सर्वनाश एवढे सारे करूनही यांच्या तोफा शांत नाहीत. इस्लाम धर्माला सर्वांत जास्त अंधकार मय रंगात रंगविण्यासाठी त्यांची प्रसारमाध्यमें नेहमी पवित्र कुरआनच्या आयतींना विकृत स्वरुपात सादर करण्यात मग्न असतात, यासाठी की कुरआनातील आयती हिंसाचाराचा उपदेश करीत असलेल्या वाटाव्यात. अर्थात असे विकसनशील आणि नैसर्गिक संपत्तीने समृध्द असलेल्या मुस्लिम देशांविरुध्द युध्दांना योग्य ठरविण्यासाठी केले जाते.

पवित्र कुरआन मुसलमानांच्या मार्गदर्शनाचा मुख्य स्रोत आहे. हे खरे आहे की पवित्र कुरआन एकाच वेळी अवतरित झाले नाही. याऐवजी याचे, मक्का व मदीनाच्या शहरांमध्ये, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सुरुवातीच्या अनुयायींच्या एका अल्पशा समाजात बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेत २३ वर्षांच्या कालावधीत अवतरण झाले. या दोन्ही ठिकाणचे श्रोते एकमेकांपासून पूर्णत: भिन्न होते. तसेच स्वाभाविकदृष्ट्या परिस्थितीही भिन्न होती. मक्का शहरात, जिथे पैगंबर (स.) यांनी आपल्या प्रेषित्वाची २३ वर्षांपैकी पहिल्या १३ वर्षांच्या काळात इस्लाम धर्माचा प्रचार व प्रसार केला.

तिथे त्यांनी विरोधी वातावरणाला तोंड दिले. संघर्षाची सुरुवात त्यांच्या विरोधकांतर्फेच केली गेली. त्यांचे विरोधक मक्काचे कुरेश होते आणि हा विरोध हळूहळू टीका, छळ, क्लेश-यातना आणि हत्येचा प्रयत्न इ. स्वरुपात केला जात राहिला. पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांचे अनुयायी मदीना येथे स्थलांतरित झाले, जिथे त्यांना शांतीपूर्वक राहता यावे. त्यांच्यापैकी अनेकांना मक्का शहरा बाहेर घालविले गेले आणि त्यांना त्यांचे कुटुंब व संपत्ती मक्का येथेच सोडण्यास सांगितले गेले. त्यांच्यापैकी इतर काही जणांना रात्रीच्या अंधारात मक्का सोडून जावे लागले, कारण त्यांच्या जीवाला धोका होता. काही जण इतके बहादूर होते की त्यांनी आपल्या प्रवासाची उघडपणे घोषणा केली. मदीना येथे अनुयायींची मोठी संख्या होती जे आज्ञा पालनात समर्पित होते आणि ते आपले जीवन अल्लाह आणि पैगंबरांच्या आदेशानुसार घडवू इच्छित होते.

परंतु प्रवासाच्या दुसऱ्याच वर्षी इस्लामचे कट्टर वैरी, मक्काचे कुरेश ज्यांनी मदीनावर हल्ला केला याच्या परिणामी बद्रचे युध्द झाले. ज्यात कुरेशचे इस्लाम विरोधक (इन्कारी लोक) मुसलमानांच्या हातून वाईटरीत्या पराजित झाले. तिसऱ्या वर्षीही मक्काच्या रहिवाश्यांनी मदीनाविरुध्द आक्रमणाचे नेतृत्व केले. मुसलमानांना यात खूप हानी पोहचली, परंतु कसे तरी मुसलमान स्वत:ला पूर्ण विनाशापासून वाचविण्यात सफल राहिले. हिजरत (स्थलांतरा) च्या पाचव्या वर्षी मक्काच्या लोकांनी सुमारे १०,००० च्या विशाल सैन्यासह मदीनावर हल्ला चढविला. पैगंबर (स.) आणि त्यांच्या अनुयायींनी आपले संख्याबळ खूपच कमी आणि हत्यारांचीही कमतरता पाहून मदीना शहराच्या चारही बाजूंना एक विशाल खंदक खोदून सरळ संघर्षापासून अलिप्तता अंगीकारली युध्दांनी खूप थकल्यामुळे मक्काचे लोक पुन्हा परत आले नाहीत सातव्या वर्षी दोन्ही पक्षात एक करार झाला, ज्याचे मक्काच्या लोकांनी सहा महिन्याच्या आतच उल्लंघन केले. याचा सूड घेण्यासाठी स्वत: पैगंबरांनी १०,००० चे सैन्य घेऊन हिजरतच्या आठव्या वर्षी मक्कावर हल्ला केला आणि युध्दाविना व रक्तपात न करता मक्कावर विजय प्राप्त केला. इस्लामच्या वैऱ्यांना पैगंबरांनी क्षमादान दिले. आरंभीच्या इस्लामच्या लष्करी

मोहीमांचा हा संक्षिप्त इतिहास आहे. या अनेक वर्षांच्या कालावधीत पवित्र कुरआन सतत पैगंबर (स.) यांना मार्गदर्शन करीत राहिला.

उपरोक्त इतिहासात ही गोष्ट पाहिली जाऊ शकते की ही युध्दे पैगंबर (स.) यांच्यावर थोपली गेली होती. त्यांनी स्वत: एखाद्या युध्दाचा आरंभ केला नाही, किंबहुना जेव्हा त्यांच्यावर हल्ला चढविला गेला तेव्हा त्यांनी सर्व शक्तीनिशी त्याचा मुकाबला केला आणि जेव्हा तह-कराराचा भंग केला गेला, तेव्हा त्यांनी कराराचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द युध्द करण्याची घोषणा केली. तथापि त्यांनी इतर सर्व नागरिकांसाठी क्षमादानाची घोषणा केली.

हाच ऐतिहासिक घटनाक्रम आहे. याच्यानुसारच पैगंबरांना मार्गदर्शन केले गेले होते. आता कुरआनातील आयतींना समजूण घेण्याकरिता हे आवश्यक ठरेल की प्रत्येक आयतीला तिच्या संदर्भाशी जोडले जावे. पवित्र कुरआनाचे टीकाकार याबाबतीत घोडचूक करतात आणि ते इस्लामविरुध्द आपल्या पूर्वग्रहांना पाठबळ देण्यासाठी यांना संदर्भाविना पाहतात.

भारतात आणि जगातील काही देशांमध्ये कुरआनातील काही आयतींबाबत शंका निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात राहिले. काही महाभाग आयतींना कुत्सित इराद्याने संदर्भ वगळून प्रस्तुत करतात आणि आपल्या धारणा व कल्पनांच्या आधारावर त्यांचे स्पष्टीकरण करतात. कुरआनाला ससंदर्भ वाचले पाहिजे. जर कोणी एखाद्या आयतीची निवड करेल आणि तिच्या पार्श्वभूमीकडे डोळेझाक करील तर तो अधिकतर भटकून जाईल. कुरआन आणि त्याच्या आयतींचे वाचन करण्यासाठी अट ही आहे की विश्वासाच्या एकाग्रतेने वाचन केले जावे. जर कोणी वाईट इराद्याने व संकुचित बुद्धीने वाचन करील तर त्याला मार्गदर्शन कदापि होणार नाही.

पवित्र कुरआनाच्या त्याच भाष्य व स्पष्टीकरणांना मान्य केले पाहिजे जे सत्यनिष्ठ असावेत आणि अशा लोकांनी लिहिले असावेत ज्यांना कुरआन, त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाचे प्रामाणिक ज्ञान असावे.

या ठिकाणी आम्ही कुरआनाच्या अशा आयती सादर करीत आहोत

ज्यांचा असे लेखक वापर करतात, ज्यांचा हेतु शंका-संशय निर्माण करणे आणि लोकांना पथभ्रष्ट करणे हा असतो.

> ''आणि अल्लाहच्या मार्गात त्या लोकांशी युध्द करा, जे तुमच्याशी युध्द करतील आणि मर्यादा ओलांडणारे बनू नका. नि:संशय अल्लाह, मर्यादा ओलांडणाऱ्यांना पसंत करीत नाही आणि त्यांना ते जेथे आढळतील तिथे ठार करा आणि त्यांना बाहेर घालवा, जेथून त्यांनी तुम्हाला बाहेर घालविले आहे आणि फितना (उत्पात दंगा) हत्येपेक्षा भयंकर आहे आणि तुम्ही त्यांच्याशी मस्जिदे हराम (काबा) जवळ लढू नका, जोपर्यंत ते तुमच्याशी तिथे लढणार नाहीत. आज्ञाभंग करणाऱ्यांचा हाच मोबदला आहे. मग जर ते असे करण्यापासून परावृत्त होतील, तर नि:संशय, अल्लाह अतिशय क्षमाशील व दयाशील आहे आणि त्यांच्याशी युध्द करा येथपर्यंत की दंगा-उपद्रव बाकी न राहावा आणि दीन (धर्म) अल्लाहचा व्हावा. पण जर ते परावृत्त होतील तर अत्याचारींखेरीज कोणाच्याही विरुध्द पाऊल उचलणे योग्य नव्हे. आदराचा महिना आदराच्या महिन्यासमान आहे आणि आदराच्या संदर्भात समान मोबदला आहे. तेव्हा जो कोणी तुमच्यावर हात उचलतील, तर तुम्ही त्याच प्रमाणात त्या अतिरेकाचा सूड घ्या आणि अल्लाहचे भय राखा. लक्षात ठेवा की अल्लाह त्याच लोकांच्या सोबत आहे, जे त्याचे भय बाळगतात.''
>
> (कुरआन- २ : १९० ते १९४)

पवित्र कुरआनाचा उपरोक्त परिच्छेद अनेक प्रकारे आमच्या आजच्या काळाच्या संकटाकडे आणि असांमजस्याकडे संकेत करीत आहे. हे अशामुळे की या आयती पवित्र कुरआनात सर्वाधिक चर्चित कथनांचे प्रतिनिधित्व करतात. इस्लामवर टीका करणारे आणि पूर्वग्रह बाळगणारे लोक म्हणतात की इस्लाम धर्म स्वभावत: हिंसक वृत्तीचा आहे.

वरील आयती त्या निर्देशांचा भाग आहे, जे मुसलमान आणि अन्य समुदायांच्या दरम्यानचे संबंध नियंत्रित करतात, यास्तव या आयतींच्या सावधगिरीपूर्ण विश्लेषणाची गरज आहे आणि या गोष्टीची आवश्यकता आहे की समस्त लोकांनी यांना स्पष्टपणे समजून घ्यावे. या आयती आकलनाच्या दृष्टीने फार नाजुक आहेत की मुसलमानांनी आपल्या स्वत:शी काय अपेक्षा केली पाहिजे आणि इतर समुदायांनी कशा प्रकारे मुसलमानांना जबाबदार धरले पाहिजे.

आता साधारण प्रश्न असा की ज्या निश्चयात्मक आणि घोषणात्मक कथनाने हा परिच्छेद सुरु होतो, तेथपासून ''परंतु अत्याचार करू नका, अल्लाह अत्याचार करणाऱ्यांना पसंत करीत नाही'' अशा स्पष्ट आदेशास हिंसेची परवानगी कसे म्हणता येईल?

**उत्तर :** हा प्रश्न एखादा मनुष्य त्याच वेळी करू शकतो, जेव्हा तो आपले आकलन दूषित करून आणि या गोष्टीला दृष्टीआड करून विचार करतो की हा परिच्छेद पवित्र कुरआनाच्या संपूर्ण नैतिक साच्यात कशा प्रकारे बसतो.

वस्तुत: कुरआनाच्या या आयतींचे वाचन करताना हे अत्यावश्यक आहे की फक्त एकच नव्हेतर अनेक तंबींना लक्षात ठेवले गेले आहे. पहिली गोष्ट ही की कोणताही उदधृत परिच्छेद त्याच्या संदर्भाला वगळून वाचला जाऊ नये. सर्व परिच्छेदांना कुरआनाचा समग्र साचा आणि परिच्छेदाच्या आधी व नंतर येणाऱ्या परिच्छेदांच्या प्रकाशात पाहिले पाहिजे. दुसरे असे की हे विसरता कामा नये पवित्र कुरआन २३ वर्षांच्या कालावधीत अवतरित झाला आणि तो केवळ सामान्य लोकांच्या वास्तव आणि जिवंत समुदायाच्या खऱ्या परिस्थितींनाच संबोधित करीत नाही किंबहुना भावी काळात येणाऱ्या जगाच्या शेष मानवजातीलाही संबोधित करतो. याचा स्पष्ट अर्थ असा की सुमारे १५०० वर्षांपूर्वी कुरआनाच्या आयतींच्या अवतरणप्रसंगी मुसलमान कोणत्या बिकट परिस्थितीला व समस्यांना तोंड देत होते, ही माहिती राखण्याव्यतिरिक्त आम्ही हाही विचार केला पाहिजे की पवित्र कुरआन खरोखर कशा प्रकारची मानसिकता आणि कशा प्रकारचा दृष्टिकोन विकसित करू इच्छितो?

ज्या संदर्भात या आयती अवतरित झाल्या, त्यास प्रामुख्याने समजून घेण्याची गरज आहे. उदयास आलेला मुस्लिम समुदाय ज्याची संख्या शंभराहून अधिक नव्हती, त्यांना वेढा टाकला गेला जीवन-मृत्युच्या भयंकर व भीषण परिस्थितीत जखडले गेले. मुसलमान आणि अरबच्या विभिन्न कबील्यांच्या, विशेषत: मक्काच्या कुरेश कबील्याच्या दरम्यान खुले वैर जारी होते. इस्लामला मक्का येथे दाबून टाकण्यात असफल झाल्यावर आणि हे जाणून घेतल्यावर की मुसलमानांना मदीना येथे आश्रय मिळाला आहे आणि तिथे ते सामर्थ्यशाली होत चालले आहेत. मक्काच्या कुरेश लोकांनी नेहमीकरिता मुसलमानांना संपविण्यासाठी तलवार आणि हत्यारे हाती घेतली.

कुरेश अशा मोठ्या युध्दाची तयारी करीत होते, ज्याद्वारे हा फैसला करायचा होता की मुसलमानांना जिवंत राहायचे आहे किंवा नष्ट व्हायचे आहे (या संघर्षाचा अंतिम परिणाम बद्रच्या प्रसिध्द युध्दाच्या स्वरुपात झाला.) (कुरआन: २:१९४) जसे की नंतर येणाऱ्या कुरआनातील आयती स्पष्ट करतात की कुरेश पूर्णपणे मुस्लिम समुदायाला नष्ट करण्यास वचन बध्द होते.

> ''ते तुमच्याशी त्या वेळपर्यंत लढत राहतील जोपर्यंत ते तुम्हाला तुमच्या ईमानापासून विमुख न करतील, जर ते करू शकतील.''

तेव्हा अशा परिस्थितीत मुसलमानांजवळ कोणते पर्याय उरले होते? शेवटी अगतिकतेने मुस्लिम समुदायाला आत्मरक्षणार्थ लढण्याची अनुमती दिली गेली, ज्याला आतापर्यंत युध्द करण्यापासून रोखले गेले होते. अशा प्रकारे पवित्र कुरआनाच्या आयती अशा वेळी अवतरित झाल्या जेव्हा मक्काचे कुरेश आणि मदीनाचे मुसलमान यांच्या दरम्यान शत्रुत्व वाढत चालले होते आणि एका समुदायाच्या स्वरुपात मुसलमानांचे अस्तित्व पणाला लागले होते.

तसेच या आयतींमध्ये एक खास निर्देश आहे जो केवळ एका ऐतिहासिक परिस्थितीसाठी विशेषत्वाने आहे. उदाहरणार्थ, हा आदेश ''त्यांना ठार करा'' हे स्पष्ट करतो की पवित्र कुरआन त्या कारवायीकडे संकेत करीत आहे, जी अशा लोकांविरुध्द केली गेली पाहिजे जे मुसलमानांशी शत्रुत्व राखण्यात अहोरात्र मग्न आहेत. विशेषत: मक्का येथील कुरेश लोक. कुरेश

कबील्याच्या या अत्याचारींनी मुसलमानांना त्यांच्या स्वत:च्या घरातून बाहेर घालविले होते. तसेच ''तुम्हीदेखील त्यांना त्यांच्या घराबाहेर घालवून द्या.'' यास्तव पैगंबरांच्या अनुयायींना ही अनुमती दिली गेली की त्यांनी बाहेर घालविले होते. त्यांनी मक्काच्या पवित्र मस्जिदीला आपल्या ताब्यात घेतले होते आणि मुसलमानांना सांगितले गेले की ''शक्यतो पवित्र मस्जिदीच्या परिसरात युध्द करू नका.''

आणि तरीही कसोटीच्या या कठीणप्रसंगी मुसलमानांना हे सांगितले जात आहे की, ''मर्यादांचे उल्लंघन करू नका.'' अर्थात ही तंबी की त्यांनी स्त्रिया, बालके किंवा युध्दात सहभागी नसलेल्यांची हत्या करू नये. मालमत्ता जाळू नये, शेतातली पीके, गुरे-ढोरे, पाळीव प्राणी नष्ट करू नये. तसेच त्यांनी जेवढ्या प्रमाणात अत्याचार केला तेवढ्याच प्रमाणात सूड घेतला जावा. त्याहून जास्त अत्याचार करू नये. अतिरेक करण्याची मुभा नाही. कारण मर्यादा ओलांडण्याचा परिणाम आत्मविनाश ठरू शकतो.

''आपल्याच हातांनी स्वत:चा विनाश करून घेऊ नका.''
(कुरआन- २ : १९५)

आणि जर शत्रूपक्षाने शस्त्र खाली ठेवले तर मुसलमानांनीही हत्यार टाकून दिले पाहिजे. अशा प्रकारे मुसलमानांचे युध्द खरे पाहता एक प्रतिकारात्मक कारवाई होती, जिचा हेतु शत्रूला नाहक ठार करणे, त्याला बाहेर घालविणे हा नव्हता, किंबहुना त्याला या गोष्टीसाठी राजी करणे की त्याने लढण्यापासून परावृत्त व्हावे.

यास्तव हेच सर्वसाधारण नियम सांगितले गेले आहेत, ज्यांचा व्यापक प्रमाणात व्यावहारिक उपयोग आहे. कुरआनानुसार युध्दाला न्यायोचित ठरविण्याची एक मात्र शक्यता आत्मरक्षण हीच आहे. खऱ्या अर्थाने व कायद्यान्वये शत्रू तो आहे जो इस्लाम आणि त्याच्या समुदायाविरुध्द युध्द छेडतो. हाच नियम कुरआनात दिला गेला आहे (अर्थात अशाच लोकांना युध्द करण्यास परवानगी दिली गेली, ज्यांच्याविरुध्द अन्यायपूर्वक युध्द लादले गेले आहे) (कुरआन- २२ : ३९) यास्तव पैगंबर (स.) द्वारे लढण्यात आलेली तीन युध्दे- बद्रचे युध्द, उहदचे युध्द आणि खंदकचे युध्द-

स्वाभाविकपणे बचावात्मक होती. वर वर्णिलेले अंतिम युध्द वास्तविक लढलेच गेले नाही. आपल्या सुरक्षेसाठी मदीनाच्या चारही बाजूंनी खंदक खोदले गेले आणि ही कृती यशस्वी ठरली कारण शत्रू या खाईला पार करू शकला नाही, मदीना शहराला महिना भर वेढा टाकल्यानंतर निराश होऊन परत फिरला. यात हा बोध दडलेला आहे की, नाहक अत्याचार करण्यास मनाई केली गेली आहे आणि मुसलमानांनी स्वत:हून संघर्षाचा आरंभ करू नये. ''अत्याचार करू नका, कारण अल्लाह अत्याचार करणाऱ्यांना पसंत करीत नाही.''

पवित्र कुरआनात रक्षणात्मक युध्दाचा सरळ संबंध छळ, दडपशाही आहे. कुरआन फर्मावितो छळ, दडपशाही आणि अत्याचार हत्येपेक्षाही वाईट आहे. छळ भयंकर स्वरुपाच्या अत्याचारांकडे नेतो, ज्याच्या परिणाम स्वरुपी अवहेलना आणि मानव-प्रतिष्ठेचे उल्लंघन होऊ शकते आणि याद्वारे लोकांना स्वातंत्र्य आणि विकासाच्या अधिकारांपासून वंचित केले जाऊ शकते. छळ आणि अत्याचार, छळकर्ता पीडित दोघांचीही मर्यादा घटवितात. ते सतत तिरस्काराच्या आगीला भडकवित असतात आणि खऱ्या स्वातंत्र्यापासून वंचित करून नित्यनवा संघर्ष निर्माण करतात आणि त्या संधींपासून वंचित राखतात ज्या सर्व लोकांना मिळाल्या पाहिजेत. ते निर्दोष लोकांवर जिवंत मृत्यु थोपवितात. याचीच पुनरावृत्ती रोखण्यासाठी पवित्र कुरआन मदीनाच्या मुसलमानांना, मक्काच्या अत्याचारी लोकांविरुध्द उठून उभे राहण्याची व युध्द करण्याची अनुमती देतो, जे मदीनाच्या मुसलमानांचा खूप छळ करीत होते आणि त्यांच्याविरुध्द अनैतिक भाषा वापरत होते. नंतर येणाऱ्या आयतीत कुरआन छळ दडपशाहीच्या स्वभावाची चर्चा करताना फर्मावितो :

> ''जर ते तुम्हाला जिवंत राहू देत नसतील आणि तुम्हाला शांतीपूर्वक राहू देत नसतील आणि आपले हात तुमच्यावरून रोखत नसतील.''

दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर छळ-दडपशाही सतत क्लेश-यातनांचे नाव आहे, जे एखाद्याला आपल्या इच्छा व ओळखीनुसार जीवन जगण्याच्या हक्क आणि स्वातंत्र्यापासून वंचित करते आणि शांतीसाठी अन्य कोणत्याही

पर्यायाची अनुमती देत नाही. ज्या शब्दाचा अर्थ छळ, दडपशाही असा केला जातो, तो अरबी भाषेत 'फितना' असा आहे. यात छळ, गळचेपी, दुर्दशा, हत्या, विद्रोह आणि सातत्याने संकट सामील आहे. हे लोकांना आपल्या श्रध्देनुसार आचरण करण्याच्या स्वातंत्र्यापासून रोखण्यासमान आहे. याच त्या परिस्थित्या होत्या, ज्यांच्यात या अध्यायामध्ये नंतर युध्दाला तिरस्कृत गोष्टीच्या स्वरुपात प्रस्तुत केले गेले आहे (कुरआन- २ : २१७) आणि हेच नंतर वैध आणि न्यायोचित ठरते.

छळ आणि दडपशाहीविरुध्द युध्द आणि आपल्या जीवनाकरिता या संघर्षालाच पवित्र कुरआनात अल्लाहच्या मार्गात न्यायोचित युध्द म्हटले गेले आहे 'अल्लाहच्या मार्गात' या संज्ञेचा अर्थ आपल्या श्रध्देच्या प्रचाराकरिता लढले जाणारे युध्द नव्हे आणि या स्वरुपात कुरआनात एकदाही प्रस्तुत केले गेले नाही. या ठिकाणी हेतु निश्चितपणे छळ आणि अत्याचारापासून मुक्ती हा आहे आणि ''जेव्हा छळ अत्याचार समाप्त होत नाही आणि धर्म अल्लाहकरिता होत नाही'' या आयतीचा अर्थ इस्लामचे वर्चस्व आणि इतर श्रध्दा बाळगणाऱ्या लोकांना अधीन बनविणे आणि त्यांचा छळ करणे असाही नाही.

याऐवजी या संज्ञेचा हेतु सामाजिक प्रणालीच्या त्या लाभांवर जोर देणे आहे, ज्यात माणूस, माणसाच्या गुलामगिरीपासून मुक्त व्हावा आणि याचा हेतु छळ अत्याचारापासून सुटकेच्या अंतिम परिणामाकडे संकेत करण्याचाही आहे अल्लाहची उपासना भय आणि छळ अत्याचाराविना करता यावी. वस्तुत: उपवाक्य 'धर्म अल्लाहकरिता व्हावा'चा अर्थ असा की प्रत्येक समुदायाला उपासना करता यावी. पवित्र कुरआनात ही गोष्ट सूरह क्र. २२ च्या आयत क्र. ४०मध्ये स्पष्ट केली गेली आहे की जे लोक अल्लाहच्या मार्गात छळ, जुलूम अत्याचाराशी लढतात ते मठांना, ज्यू व ख्रिश्चनांच्या उपासना गृहांना आणि मस्जिदींना मुक्त करवितात, ज्यात अल्लाहचे नाम:स्मरण अत्याधिक स्वरुपात केले जाते आणि जर असे नसते, तर या धर्मस्थळांना जमीन दोस्त केले गेले असते. ज्या शब्दांचा प्रयोग केला गेला आहे ते अगदी हेच आहेत ''धर्म अल्लाहकरिता आहे.''

या आयतींचा संदेश हा की जुलूम अत्याचाराविरुध्द युध्दाचा अंतिम परिणाम हा असला पाहिजे की धर्माच्या आधारावर कसलाही छळ, जुलूम अत्याचार होऊ नये आणि प्रत्येक मनुष्य आपल्या आवडीचा धर्म पत्करण्यास स्वतंत्र असावा. यास्तव स्पष्टपणे या आयती आणि यापूर्वीच्या कुरआनातील आयतींमध्ये कसलाही विरोधाभास नाही.

वस्तुत: याच्या उलट जे स्पष्टीकरण केले गेले आहे की युध्द त्या वेळीपर्यंत जारी राहिले पाहिजे, जोपर्यंत सर्व लोक इस्लामचा स्वीकार न करतील-एकाबाजूला तर हे कुरआनच्या भावनेविरुध्दच आहे आणि दुसऱ्या बाजूला इतर अनेक आयतींना विरोधाभासात्मक बनविते. उदा. ''धर्मात कसलीही जोर जबरदस्ती नाही.'' (कुरआन- २ : २५६) असे स्पष्टीकरण त्या आयतींना तथ्यहीन बनविते, ज्या ईमान बाळगणाऱ्यांना इतर समुदायांशी समेट करण्यास व समझोता करण्यास प्रवृत्त करतात.

पवित्र कुरआनाच्या या आयती (कुरआन - २:१९० ते १९५) सामान्यत: अन्य आयतीं (उदा. कुरआन ४:७६, ४:३४, ४:८९, ४:९१ आणि ९:५, ९:१२, ९:१४, ९:२९, ९:३६, ९:१२३) सोबत पठण केल्या जातात, ज्यांच्यापैकी सर्वच युध्द करण्याच्या आदेशाबाबत सांगतात. तथापि ज्या आयतींनी प्राचीन भाष्यकारांचे आणि कुरआनच्या टीकाकारांचे लक्ष आपल्याकडे सर्वाधिक वेधून घेतले आहे ती कुरआनातील ९ व्या अध्यायाची ५ वी आयत आहे. जिला तलवारीची आयत असेही म्हटले जाते. या ठिकाणी यांची खास प्रासंगिकता लक्षात घेता या आयतींवर चर्चा करणे आवश्यक वाटते.

तलवारीची आयत (९:५) ''अनेकेश्वर वाद्यांना ठार करा, जिथे जिथे ते तुम्हाला आढळतील, त्यांना धरा आणि त्यांना कैद करा आणि प्रत्येक हल्ल्याच्या ठिकाणी त्यांच्या पाळतीवर सज्ज राहा.'' याला समस्त मुसलमानांसाठी निर्देश म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, तर हे त्या लोकांना संबोधून आहे जे घमासान युध्दाच्या मैदानात लढत आहेत. आयतीचा पहिला भाग पवित्र महिन्यांविषयी सांगतो जेव्हा हे गृहित धरले जात होते की एक प्रकारचा करार लागू आहे, परंतु बनी दमरा आणि बनी कनाना या

कबील्यांव्यतिरिक्त, जे मुसलमानांशी केल्या गेलेल्या तह कराराचा आदर राखत, मदीना आणि जवळपासचे इतर सर्व कबीले आपल्या तह-कराराचा भंग करत होते आणि मुसलमानांची सतत हत्या आणि जुलूम अत्याचार करीत होते. वस्तुत: मुसलमानांबाबत, हा करार भंग सर्व अरब कबिल्यांचे वैशिष्ट्य होते. या ठिकाणीही मुस्लिम समुदायाचे अस्तित्व पणाला लागले होते. यास्तव मुसलमानांना सांगितले गेले की आपला बचाव करण्यासाठी त्यांनी युध्दाचा मार्ग पत्करावा तथापि जेव्हा शत्रू क्षमायाचना करील अर्थात लढाई समाप्त होईल, तेव्हा त्यांना आपल्या मार्गावर जाण्याची अनुमती दिली गेली पाहिजे. युध्दाच्या मैदानातही इस्लामच्या शत्रूंचे आचरण योग्य नव्हते आणि मोठ्या प्रमाणात आदर केल्या जाणाऱ्या, कबील्यांमधील समझोत्याचा आदर राखत नसत. मुसलमानांनी युध्दबंदीच्या या आदेशाचे पालन केले आणि आपल्या तलवारींना अशा वेळी परत म्यानात टाकले, जेव्हा शत्रू पक्षाने हत्यार खाली टाकले. परंतु मक्काचे कुरेश, मुसलमानांच्या या नीतीचा नेहमी गैर फायदा घेत आणि या कालावधीत धोकेबाजी आणि विश्वासघात करीत असत. अशा प्रकारे अनेक मुसलमानांची हत्या करीत. यास्तव पवित्र कुरआनाची ही आयत त्या लोकांविरुध्द घृणा व क्रोध व्यक्त करते, ''ज्या लोकांशी तुमचा समजोता आहे आणि ते हा तह-करार वारंवार भंग करतात.'' (कुरआन- ८ : ५६) हेच ते खास लोक होत, ज्यांच्याकडे ही आयत अंगुलीनिर्देश करते.

आता आम्ही या आयतीवर विचार करू या (अर्थात, आम्ही श्रध्दा न राखणाऱ्यांच्या मनात भय-दहशत टाकू), ते अन्य उपास्यांची भक्ती-आराधना करतात, ज्यांच्यासाठी कोणतेही प्रमाण अवतरित केले गेले नाही. (कुरआन- ३ : १४९) ही आयत कुरआनाच्या खऱ्या आणि काल्पनिक विरोधकांचे मनपसंत हत्यार राहिले आहे.

इस्लामचे विरोधक आणि टीकाकार जो प्रचार करतात, त्याच्या उलट हे वस्तुस्थितीचे कथन आहे (या आयतीचा संदर्भ पाहा) ही आयत उहदचे युध्द सुरु असताना अवतरली, जेव्हा पैगंबर (स.) बद्रच्या युध्दात मुसलमानांच्या अल्पशा सैन्याद्वारे मक्काच्या सैन्याला पराभूत केल्यानंतर एक वर्षाच्या आत दुसऱ्यांदा मक्काच्या सैन्याच्या आक्रमणाचा मुकाबला करीत होते. कुरआन

या ठिकाणी पैगंबर (स.) यांच्या अव्यवसायिक व अनुभव नसलेल्या सैन्याद्वारे आतंकित केला जाईल. जर या संदर्भात पाहिल्यास हे स्पष्ट कळून येईल की ही आयत मुसलमानांसाठी सामान्य आदेश नाही, किंबहुना ही आयत, शत्रूला, त्या वेळी जे काही जाणवत होते त्यावर एक टीप आहे.

जे लोक अतिशय साधारण बचावात्मक कारवायांमध्येही दहशतवादाच्या दर्शनासाठी उत्सुक असतात, ते अशा प्रकारच्या आयतींमध्ये जास्त भयंकर परिणाम वाचण्यासाठी आतुर असतात. पवित्र ग्रंथांवर काळीमा फासण्याची त्यांची उत्कंठा, त्यांना बहुधा भगवद्‌गीतेतही दहशतवाद शोधण्यास प्रेरित करू शकते. गीता आत्मरक्षणार्थ आणि जुलूम अत्याचार व अन्यायाविरुध्द युध्द करण्याचा आदेश देते. जेव्हा अर्जुनाने आपल्या चुलतबांधव– कौरवांविरुध्द लढण्याऐवजी नि:शस्त्र अवस्थेत ठार मारले जाणे पसंत केले, तेव्हा श्रीकृष्णाने त्याला युध्द करण्याची प्रेरणा पुढील शब्दांत दिली–

> ''तुमच्या अंत:करणात हे अशुभ विचार कसे आलेत, जे तुम्हाला स्वर्गात जाण्यापासून रोखत आहेत. या पतित नपुंसकत्वाचा आणि अंत:करणाच्या दुर्बलतेचा त्याग करा आणि उठा, हे शत्रूंना पराभूत करणारे!''
>
> (भगवद्‌गीता अध्याय १ श्लोक ४३ ते ४६,
> तसेच अध्याय २ श्लोक २,३)

# संदर्भ-ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुहम्मद | - | अफजलुर्रहमान<br>इन्सायक्लोपीडिया ऑफ सीरत |
| २. | द इमर्जन्स ऑफ इस्लाम | - | डॉ. मुहम्मद हमीदुल्लाह |
| ३. | लाईफ ऑफ मुहम्मद | - | हेकल |
| ४. | मुहम्मद | - | मॉर्टिन लिंग्ज |
| ५. | प्रॉफेट मुहम्मद | - | फतहुल्लाह गुलेन |
| ६. | मुहम्मद ऑल दॅट मेट्स | - | जियाउद्दीन सरदार |
| ७. | इन्ट्रोडयूसिंग इस्लाम | - | जियाउद्दीन सरदार |
| ८. | अ वर्ल्ड विदाऊट इस्लाम | - | ग्राहम ई. फूलर |
| ९. | द इस्लामिक थ्रेट | - | जॉन एल.<br>एस्पोजिटो मिथ ऑर रियॅलिटी |
| १०. | डिमिस्टीफाईंग ऑफ इस्लाम | - | डॉ. अली शिहाता |
| ११. | मुहम्मद अँड द कुरआन | - | रफिक जकरिया |
| १२. | इस्लाम इन फोकस | - | हमूदा अब्दालाती |
| १३. | द होली कुरआन | - | अब्दुल्लाह यूसुफ अली |
| १४. | द कुरआन | - | डॉ. नजीर अहमद |

# सय्यद हामिद मोहसिन

बंगलोरच्या प्रथितयश व अग्रक्रमावर असलेल्या ॲडवर्टायजिंग कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

त्यांनी इ. सन २००८मध्ये 'सलाम सेन्टर'ची स्थापना केली. आंतर श्रध्देय संवाद-संभाषण आणि सांप्रदायिक एकात्मतेच्या माध्यमातून इस्लामच्या संदर्भात सकारात्मक सामंजस्य लोकांमध्ये निर्माण करण्यासाठी ते कार्यरत राहिले. पवित्र कुरआनाच्या संदेश जन समुदायांसमोर व्यक्त करण्यात ते सर्व प्रसारमाध्यमे आणि अत्याधुनिक संभाषण पध्दतीला उपयोगात आणण्याचे प्रणेते ठरले. आपल्या हाती असलेल्या या पुस्तकात, 'इस्लाम : शंका-संशय, गैरसमज आणि त्यांचे निराकरण' लेखकाने, इस्लाम आणि मुस्लिमांविषयी व्यापक प्रमाणात बाळगल्या जाणाऱ्या गैरसमजूतींची चर्चा केली आहे. त्यांच्यापैकी काही अज्ञान व अडाणीपणामुळे असे करतात, तथापि बरेच जणांचे वक्तव्य किंवा लेखन, खोडकर स्वरुपाच्या चुकीच्या माहितीचे फलित असते. लेखकाने समस्त सत्यनिष्ठ गोष्टी एकत्र करून त्याद्वारे मनोरचित असत्य कथनांचे पितळ उघडे पाडले आहे, ज्या इस्लाम आणि मुस्लिमांविषयी पसरविल्या जातात. हे लेखकाचे दुसरे पुस्तक आहे. यापूर्वी त्यांनी लिहिलेल्या 'फॉलो मी गॉड विल लव यू' या पुस्तकाला लोकांच्या सर्वच थरांतून अपार प्रेम आणि प्रचंड प्रतिसाद लाभला. दोन्हींचा उद्देश, मुस्लिम व मुस्लिमेतरांना पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन-चरित्र, त्यांचे मिशन, त्यांची महान कार्ये, गुणविशेष याविषयी सत्यनिष्ठ माहिती करून द्यावी. मोहसिन यांनी आपल्या जीवनाचे ध्येय उद्दिष्ट बनविले आहे की इस्लाम आणि मुस्लिमांविषयीचे गैरसमज, भ्रामक व असत्य कथनांना दूर करावे आणि स्नेह सलोखा वृध्दिंगत करावा, विभिन्न समाजांमध्ये दया अनुकंपा, बंधुत्व आणि बंधुभावपूर्ण नाते कायम करावे.

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/